

# गौतम बुद्ध ते महात्मा गांधी

न. चिं. केळकर

पुणे नगर वाचन मंदिर
137832

# गौतमबुध्द ते महात्मा गांधी

: लेखक :

नरसिंह चिंतामण केळकर

: संग्राहक :

काशिनाथ नरसिंह केळकर

ॲडव्होकेट

नी ल कं ठ प्र का श न, पु णे.

१९६९ ] [ मूल्य ५ रुपये

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १. भगवान गौतमबुद्ध | १ |
| २. ज्ञानेश्वर-महात्मता | १२ |
| ३. स्वामी विवेकानंद | २५ |
| ४. समर्थ रामदास | ३१ |
| ५. शिवाजीमहाराजांची थोरवी | ३६ |
| ६. महर्षि दादाभाई नौरोजी | ४८ |
| ७. न्यायमूर्ति रानडे | ५४ |
| ८. सर फिरोजशहा मेहेता | ६० |
| ९. ॲनी बेझंट | ६४ |
| १०. लो. बाळ गंगाधर टिळक १–२ | ६९ |
| ११. विष्णुशास्त्री चिपळूणकर | ८१ |
| १२. लोकहितवादी | ८५ |
| १३. गोपाळराव आगरकर | ८८ |
| १४. ना. गोपाळ कृष्ण गोखले | ९३ |
| १५. महर्षि धोंडो केशव कर्वे | ९८ |
| १६. अण्णासाहेब पटवर्धन | १०५ |
| १७. बाबू सुभाषचंद्र बोस | ११२ |
| १८. विनायकराव सावरकर १–२ | ११८ |
| १९. महात्मा गांधी | १३५ |
| **परिशिष्ट** | |
| कै. सौ. कस्तुरबा गांधी | १४३ |
| The Yogi And The Commissars | १४४ |


* * *

# संग्राहकाचे दोन शब्द

महर्षि दादाभाई नौरोजी यांच्या श्री. मसानी यांनी लिहिलेल्या चरित्राला महात्मा गांधी यांनी फक्त एक पानभर प्रस्तावना लिहिली आहे; त्यांत विनयाने पहिलेच वाक्य असे लिहिले आहे की, "दादाभाईंच्या चरित्राला माझ्या प्रस्तावनेची जरुरी नाही!" या पुस्तकासंबंधाने माझीहि तशीच भावना आहे. या पुस्तकात भगवान गौतम बुद्ध, ज्ञानेश्वर, विवेकानंद, रामदास, शिवाजी महाराज या ऐतिहासिक व्यक्ति; तसेच महर्षि दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, सर फेरोजशहा मेहेता, ॲनी बेझंट, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकहितवादी, ना. गोखले, आगरकर, कर्वे, महर्षि अण्णासाहेब पटवर्धन, लो. टिळक, सावरकर, सुभाषचंद्र बोस व शेवटी महात्मा गांधी, अशा अर्वाचीन लोकोत्तर व्यक्तींची चरित्रे दिलेली आहेत. ही केवळ चरित्रेच म्हणता येणार नाही. यांपैकी अनेक लेखांत त्या त्या व्यक्तींचे गुणवर्णन आणि शब्दचित्र ती. न. चिं. केळकर यांनी आपल्या समर्थ लेखणीने इतके समरसतेने रेखाटले आहे की, ती ती व्यक्ती आपल्या डोळ्यापुढे सजीव साकार व्हावी! या अनेक व्यक्तींबद्दल तात्यासाहेबांचे मनात खरीखुरी आदरबुद्धि वसत होती. आणि आपल्या चाळीस वर्षांच्या संपादकीय कारकीर्दीत आदरणीय महनीय व्यक्तींचा गौरव करून त्याला आदर बुद्धीचा करभार अर्पण करण्याचा प्रसंग त्यांनी कधीहि दवडला नाही! मोठेपणा कशांत असतो किंवा त्याचे मोजमाप काय हेच सामान्य मनुष्याला कळत नसते. तीन-चारशे पृष्ठांची चरित्रे वाचण्याला त्याला वेळ नसतो. अशाहि वाचकाला केवळ आठदहा पृष्ठांचे मर्यादेत, किंवा व्याख्यान असले तर केवळ तास-दीड तासाच्या अवधीत त्या व्यक्तीचे किंवा विषयाचे उत्तम मर्म तें मनात ठसवून देत. या पुस्तकात हीच चरित्रे एकत्र केली आहेत. यातले पहिले चरित्र गौतमबुद्धाचे आणि शेवटचा लेख महात्मा गांधींविषयी, यामुळे या पुस्तकाला "गौतम बुद्ध ते महात्मा गांधी" हे अनुप्रासयुक्त नांव सुचावे हे अगदी साहजिक आहे.

या पुस्तकातील दर लेखाचे शेवटी त्या त्या लेखाचा स्थळकाल निर्देश केला आहे. तात्यासाहेबांच्या वीस हजार पृष्ठ वाङ्मयांत या अलौकिक व्यक्तींची चरित्रे निरनिराळ्या ठिकाणी विखुरली असल्याने ती आजवर एक प्रकारे दृष्टीआड झाली होती; ती ठळकरीतीने या पुस्तकात एकत्र करून, या अनेक बहुमोल रत्नांचा मी एक रत्नहारच गुंफला आहे! या पुस्तकाचे संपूर्ण लिखाण तात्यासाहेबांचे हातचे आहे. फक्त या पुस्तकाची कल्पना माझी व 'संस्कार' माझा. संस्कार याचा अर्थ, त्यांचे लिखाणात माझी पदरची भर घालणे असा नव्हे! फार तर, मोठा लेख असेल तर

त्या त्या व्यक्तीला दिलेली पृष्ठसंख्येची मर्यादा लक्षात घेऊन तो लेख थोडा कमी करणे इतकेच. सावरकरांवरील लेख दोन पुस्तकांच्या प्रस्तावना एकत्र करून केला आहे; लो. टिळकांवरील लेखातहि दोन लेख एकत्र आहेत, पण त्यांचे संदर्भ व स्थलकाल-निर्देश लेखाचे शेवटी नमूद केले आहेत. लिखाण तात्यासाहेबांचे खरे, पण आपणहि त्यातून एक 'शिल्प' निर्माण करीत आहो, अशी या पुस्तकाचे संपादन करिताना माझी भावना होती, ही गोष्ट प्रांजलपणे कबूल करणेच बरे. गाणाराला जसे ताल व लय यांचे बंधन सांभाळावेच लागते, तसेच काही तारतम्याचे बंधन कलाकृति निर्माण करणाऱ्या कलावंतालाहि संभाळावे लागते. याकरिता, या पुस्तकात मत जरूर यावे, पण मतप्रचाराची जरुरी नाही असे धोरण मी मनाशी ठरविले होते. आणि दुसरे असे की, त्या वेळी त्या लेखात तो मतप्रचार सकारण किंवा इष्ट वाटला तरी, कालांतरामुळे आज त्याची आवश्यकता राहिलेली नाही. प्रमाणबद्धता हाच कलेच्या सौंदर्याचा पाया आहे. यामुळे, अनवश्यक मजकूर गाळल्याने त्या विषयाची हानि होत नाही; उलट त्याच्या सौंदर्यात भर पडते ! हे धोरण अंमलात आणण्याचा प्रसंग या पुस्तकात एखाददुसऱ्या लेखाखेरीज फार करून आलाच नाही. कारण या पुस्तकातील सर्वच लेख इतके तन्मयतेने आणि शुद्ध व निकोप भावनेने लिहिले आहेत की, ते पाहून मन मोहून जाते. यातील अनेक महापुरुषांची चरित्रे वाचत असता उत्तुंग गिरिशिखरांची रांगच रांग आपण पाहात आहो असा वारंवार मनाला भास होतो.

या पुस्तकातील पहिला लेख १९११ सालचा व शेवटचा लेख १९४६ सालचा असल्याने या पुस्तकातील लेखांचा एकप्रकारे मी साक्षीदारच आहे. यापूर्वी हे लेख केसरीत किंवा अन्यत्र ज्या ज्या वेळी प्रसिद्ध झाले. त्या वेळचे अनेक प्रसंग व आठवणी माझ्या मनात जागृत होतात. ना. गोखल्यांच्या स्मशानयात्रेचे वेळी मी हजर होतो आणि ओंकारेश्वरावर झालेले लो. टिळकांचे भाषण लो. टिळकांपासून दहा हातांवर बसून मी ऐकले आहे. टिळक मोठे की गोखले मोठे ? हा वाद लहानपणी पोरवय असल्यामुळे इतर मुलांत आम्ही कसून करीत होतो. पण वादाचा निर्णय होत नसे. तात्यासाहेबांनी एकदा मला असे सांगितले की, "एकेक गुण घेऊन यात दोघांपैकी कोण मोठा ? असा प्रश्न मनाशी करावा, म्हणजे काहीतरी उत्तर मिळेल. नुसते, गोखले मोठे की टिळक मोठे या प्रश्नाचे काय उत्तर द्यावे ? दुसरे असे की, या दोघांपैकी जो तुमच्या मताने लहान असेल त्याच्याइतके तुम्ही स्वतः मोठे व्हा, आणि मग हा वाद करा ! नुसता अभ्यास हा गुण घेतला तरी ना. गोखले यांनी इतका अभ्यास केला होता की तितका करण्याला सामान्य मनुष्याला एक जन्महि पुरणार नाही !"

महर्षि अण्णासाहेब पटवर्धन वारले त्या वेळी योगायोग असा की, त्या वेळी मी स्वतःच नवज्वराने अत्यवस्थ असून माझ्या तापाचा नववा दिवस होता. हाताची

नाडी सुटली होती, आणि सर्वांनी माझ्या जगण्याची आशा जवळजवळ सोडली होती! अशा खडतर वेळी अण्णासाहेब पटवर्धन यांचा मृत्युलेख तात्या लिहित होते. दर पंधरा मिनीटांनी शेजारच्या खोलींत येऊन माझ्या हाताची नाडी चांचपावी व नंतर पलीकडे जाऊन मृत्युलेखाचा मजकूर तोंडाने सांगावा असे चालले होते. केसरीचा संपादक होणे म्हणजे कसे ' सतीचे वाण ' आहे हे दृश्य त्या वेळी आमचे घरी आलेल्या अनेकांनी पाहिले आहे.

एखादा लोकोत्तर मनुष्य वारला की केसरीत त्यासंबंधी कसा अग्रलेख येतो हे पाहण्याची लोकांना चटकच लागली होती. त्या व्यक्तीचे गुणवर्णन केलेला ठसठशीत अग्रलेख न आला तर केसरीचे नांव व अब्रू धुळीला मिळाली असे संपादक मानीत असत. आणि हीच परंपरा लोकमान्य टिळकांपासून आजतागायत केसरीने जोपासलेली होती. दादाभाई नौरोजी यांना मृत्यु आल्याची तार सोमवारी संध्याकाळी हाती आली. या वेळी दुसरे दिवसाचा अग्रलेख कंपोजहि झाला होता. त्या वेळी तडक केसरी ऑफिसात जाऊन, पूर्वीचा लेख काढून ठेवून त्यांनीं ताबडतोब दादाभाईवर मृत्युलेख लिहिला. होमरूल-चळवळीच्या ऐन सद्दीचा हा काळ असल्याने तात्यांची लेखणी तरवारीच्या धारेप्रमाणे सतेज होती. या लेखावर त्यांनी उत्स्फूर्तरीतीने एक संस्कृत श्लोक रचून घातलाः—

> शिष्टं ध्येयं स्वराज्यस्य यत्नैः संस्थाप्य भारते ।
> तत्सिध्यर्थं प्रयतितुं दादाभाई दिवं गतः ॥

या श्लोकाचे मूळ सांगण्यात गंमत आहे. नाना फडणविसांचे पदरी कारकुनी फडांत तात्या काकिर्डे या नावाचा शीघ्रकवि असून, नानांचा त्याचेवर लोभ होता. रामशास्त्री प्रभुणे वारले हे कळविण्याकरिता त्याने खालील श्लोक रचून नानांकडे धाडला—

> वाग्विलासैरनुपमैः जित्वा भूदेव मंडलं
> जेतुं सुरगुरुं शास्त्री रामनामा दिवंगतः ॥

नाना फडणिसांचे चरित्रात वाचलेला हा श्लोक व विशेषतः ' रामनामा दिवंगतः ' हा शेवटचा चरण लक्षात असल्याने, ' दादाभाई दिवंगतः ' हे शब्द सहज स्फुरले; व त्यालाच अनुसरून ' शिष्टं ध्येयं स्वराज्यस्य ' वगैरे पहिले तीन चरण नवे रचून त्यांनी स्वतःचा श्लोक बनविला.

न्या. रानडे यांचेबद्दल त्यांना नितांत आदर होता. १९३४ साली न्या. रानडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त झालेल्या व्याख्यानांत त्यांनी असे उद्गार काढले होते की,

" १९ व्या शतकात कोणत्या दोन गोष्टी विशेष घडल्या असे जर कोणी मला विचारले तर पेशवाईचा अस्त आणि न्या. रानडे यांचा उदय असे मी उत्तर देईन. "

धोंडोपंत कर्वे यांच्या कार्याचे त्यांनी असेच एका वाक्यात ठळकपणाने वर्णन केले होते. एका व्याख्यानात ते म्हणाले, " गेल्या शंभर वर्षांत दोन मोठ्या गोष्टी कोणत्या घडल्या ? असे जर कोणी मला विचारले तर एक गोष्ट म्हणजे पहिले महायुद्ध व दुसरी गोष्ट म्हणजे स्त्री-शिक्षण ही गोष्ट कर्वे यांनी पुण्यांत लोकप्रिय करून दाखविली ही होय. पन्नास वर्षांपूर्वी स्त्रियांना शिक्षण देणे ही केवढी भयंकर गोष्ट समजली जात असे ! "

या पुस्तकांत महर्षि कर्वे यांचे वरील लेख अत्यंत सरस उतरला आहे. अनेक माणसे, अमका मनुष्य मोठा की दुसरा त्याहून मोठा, असे व्यर्थ वाद करीत असतात. पण असे करणे केवळ अज्ञानीपणाचे दर्शक आहे. हिरा, पुष्कराज, मोती, वैडूर्य, नीलमणि ही सारी रत्नेच. त्यांचे प्रकार वेगळे, त्यांची तुलना कशी होऊ शकेल ? आपापल्या परीने स्वतःसिद्ध गुणाने त्यातील प्रत्येक रत्न मोठेच आहे. टिळकांना म्हणावे, " तुम्ही समाजसुधारणा काय केलीत ? आणि कर्वे यांना म्हणावे की तुम्ही राजकीय काम कोणते केले ? असे केले तर कोणतीहि व्यक्ति जागेवर उरावयालाच नको ! रामदासांनी मार्मिकपणे म्हटले आहे- " कोठे काही, एक आहे, एक नाही " जगात दर ठिकाणी एक आहे तर दुसरे नाही. असे प्रत्यहि आढळावयाचेच ! पूर्ण गुण असे जगात काय आहे ? याकरिता कोठे काही, पण ' एक आहे ' ते घेण्याची दृष्टि ठेवावी. ' एक नाही ' इतकेच दर गोष्टीत म्हणून दोषैक दृष्टीने जगाकडे जो पाहील त्याला स्वतःला करंटेपणाशिवाय कोणता लाभ होणार ?

महात्मा गांधी १९२०-२१ साली आमचे घरी पाहुणे म्हणून उतरले होते, त्या वेळची मला आठवण आहे. अत्यंत साधी राहणी आणि विनोद बुद्धि यांचा त्यांचे ठिकाणी फार सुंदर मेळ पडला होता. साधेपण इतके की, ते स्नानगृहात गेले असता स्नानानंतर स्वतःचे धोतर व पंचा धुऊनच बाहेर आले ! तसे न करण्याबद्दल तात्यांनी त्यांना सांगितलेही; पण ते त्यांनी मनावर घेतले नाही. आमच्या घरी लहानमोठे शेकडो पाहुणे आजवर उतरले असतील. पण स्वतःचे धोतर, पंचाहि धुण्याची दुसऱ्याला तसदी न देणारा हा एकच पाहुणा म्हणजे महात्मा गांधी ! त्यांचा विनोद केवळ बोलण्यातच नसे, पत्रव्यवहारातहि त्याची झाक उमटे. Case for Indian Home-Rule हे स्वतः लिहिलेले राजकारणविषयक पुस्तक तात्यांनी म. गांधी यांना पाठविले, त्याबद्दल महात्माजींनी पत्रात लिहिले- ' केस फॉर इंडियन होमरूल ' या तुमच्या पुस्तकाची प्रत मिळाली. त्याबद्दल आभारी आहे. ते केव्हा वाचीन हे सांगता येत नाही.

पण निदान हिंदुस्थानातील पहिली होमरूल– पार्लमेंट जेव्हा एखाद्या गुन्ह्याकरिता मला तुरुंगात घालील तेव्हा ते मी खास वाचीन ! आज चालू राजकारणासंबंधाने माझी जर कोणी परीक्षा घेतली तर मी त्यात नापास होईन असे वाटते ! ''

पण अशा व्यक्तिविषयक आठवणी मला अनेक सांगता येण्यासारख्या असल्या तरी तो मोह टाळला पाहिजे. त्यात अनौचित्यहि घडेल, म. गांधी ही केवळ राजकीय व्यक्ति नाही. संत कबीराप्रमाणे त्यांना साधुसंतांतहि स्थान आहे. पण इतर साधु-संतापेक्षाहि म. गांधींचे वैशिष्ट्य असे की, देहबुद्धि सुटल्यावर इतर साधुसंत मोक्षार्थी बनून देवाचे चरणी सर्वस्व अर्पण करीत. देह आणि देव यामध्ये ' देश ' ही एक मधली अवश्य पायरी आहे असे ते मानीत नव्हत. याकरिता, देश मुक्त होत नसेल तर मला एकट्याला मोक्षप्राप्तीची इच्छा नाही, असे जो म्हणेल तोहि त्या संताच्याच योग्यतेचा होय असे लोकांनीहि का मानू नये ? महात्मा गांधी यांनी तर शेवटी शेवटी रामनामाचा ध्यासच घेतला होता ! " तुम्ही रामनाम घ्या, तुमच्या सर्व आधिव्याधि संपतील " असे अनेक प्रार्थनांतून ते निश्चयात्मक आत्मविश्वासपूर्वक सांगत. आमच्या घरी कुलदैवत म्हणून रामोपासना गेली साठ-सत्तर वर्षे चालत आली आहे; यामुळे म. गांधींची ही रामनामावरील श्रद्धा माझ्या मनाला स्पर्श करून जाते ! आणि असे मनात येते की, गेल्या शंभर वर्षात अनेक राजकीय पुढारी भारतात झाले; पण " तुम्ही रामनाम घ्या " असे आवर्जून किंवा अट्टाहासाने सांगणारा पुढारी महात्मा गांधीशिवाय हिंदुस्थानात दुसरा कोण झाला ? राजकारणात मी काही म. गांधींचा अनुयायी नाही तथापि म. गांधींविषयी माझे मनात नितांत आदर आहे म्हणूनच या पुस्तकाला " गौतमबुद्ध ते म. गांधी " हे नाव मी दिले. म. गांधींची व माझी समक्ष ओळख होती. त्यांचे मोठेपण मी मनोमन जाणू शकतो. म. गांधी हयात असता त्यांचेबद्दल मनाला योग्य दिसेल ते लिहिता येत असे. पण आज पंचवीस वर्षांनंतर दुर्दैवाने त्यांचेविषयी लिहिणे-बोलणे ही तितकी सोपी गोष्ट राहिलेली नाही ! तुम्ही स्तुति केली तर तोंडपुजेपणाच्या दोषाचे तुम्ही धनी; आणि मतभेद किंवा टीका असेल तर मग बोलावयासच नको ! स्वातंत्र्याचे काळात मतस्वातंत्र्याची ही प्रगति की परागति मानावयाची याचा विचार करावा ! मोगल बादशहा हुमायूनचे अंगठीवर " हेहि दिवस जातील " असे सूचक शब्द कोरलेले होते. मीहि तसेच म्हणतो, " हेहि दिवस जातील ! "

माझ्या नशिबी पूर्वसुकृताची काही पुण्यगांठ असावी, म्हणूनच या पुस्तकाची कल्पना मला सुचली, आणि तीर्थरूप तात्यासाहेबांच्या ग्रंथसंपत्तीत सहजगत्या एका नव्या पुण्यवान पुस्तकाची भर पडली. या पुस्तकातील अनेक आदरणीय पुरुषांची

मालिका पाहून उत्तुंग गिरिशिखरांची रांगच रांग डोळ्यापुढे उभी असल्याचा भास होतो, आणि रामायणातील चित्रकूट पर्वताच्या वर्णनाची आठवण होते—

यावता चित्रकूटस्य नरः शृंगाण्यवेक्षते ।
कल्याणानि समाधत्ते न पापे कुरुते मनः ॥

" चित्रकूट पर्वताच्या शिखरांचे दर्शन झाले असता पुरुषाचे मनात चांगल्याच गोष्टी येऊ लागतात. पापाकडे त्याची प्रवृत्तीच होत नाही. " आणि भरद्वाज ऋषींच्या वरील आदेशाप्रमाणे जेव्हा राम चित्रकूट पर्वताजवळ आला, तेव्हा चित्रकूट पर्वत आणि त्याच्या पायथ्याशी वाहणारी रम्य मंदाकिनी नदी यांची अद्‌भुत शोभा पाहून राम सीतेला म्हणाला—

न राज्यभ्रंशनं भद्रे न सुहृद्भिः विनाभवः ।
मनो मे बाधते दृष्ट्वा रमणीयमिमं गिरिम् ॥

" हा रमणीय पर्वत अवलोकन करून सुहृदाचा वियोग किंवा राज्यभ्रष्टता यांचे योगाने माझ्या मनाला पीडा होत नाही. तुझ्या सहवर्तमान लक्ष्मणासह मी जरी येथे अनेक वर्षे राहिलो तरी अयोध्यानगरी, माझे आप्तेष्ट, किंवा सुहृद् बांधव यांची मला आठवण देखील होणार नाही ! माझा सारा जन्म मी आनंदाने येथे काढीन. या वनवासाने मला दोन फलांची प्राप्ति झाली. पित्याच्या ऋणातून मुक्तता होणे हे एक; आणि दुसरे म्हणजे भरताला निष्कंटक राज्य मिळून त्याचाहि मनोरथ पूर्ण झाला ! "

अनेन वनवासेन मम प्राप्तं फलद्वयं ।
पितृश्चानृण्यता धर्मे भरतस्य प्रियं तथा ॥

रामाप्रमाणेच माझेहि मनोगत्त उत्तम रीतीने व्यक्त करण्याला रामायणातील वरील शब्दांशिवाय दुसरे कोणते शब्द मिळणार ?

शके १८९१
वर्षप्रतिपदा

**का. न. केळकर**

*[ या पुस्तकाचे पुनरावृत्ति, भाषांतर, रूपांतर, उतारे यासंबंधी सर्व कॉपीराईट हक्क अरविंद काशिनाथ केळकर, प्रभातरोड, गल्ली ४. डेक्कन जिमखाना, पुणे ४. यांजकडे आहेत. ]*

प्रकाशक : प्रकाश दामोदर रानडे, नीलकंठ प्रकाशन, टिळकरोड, पुणे २.
मुद्रक : मा. प. तळेकर, श्रीदत्त मुद्रणालय, ३३५ शनिवार पेठ, पुणे २.

भगवान गौतमबुद्ध

✤ ✤ ✤

धराबद्धपद्मासनस्थांघ्रियष्टि-।
नियम्यानिलं न्यस्तनासाग्रदृष्टिः ॥
य आस्ते कलौ योगिनां चक्रवर्ती।
स बुद्धः प्रबुद्धोऽस्तु निश्चित्तवर्ती ॥

श्रीशंकराचार्य

निंदसि यज्ञविधेरहह श्रुतिजातं
सदयहृदयदर्शितपशुघातं
केशवधृतबुद्धशरीर। जय जगदीश हरे ॥

गीत–गोविंद

बरोबर पंचवीसशे वर्षे झाली; वैशाख शुद्ध १५ स शाक्य कुलातील अत्यंत श्रेष्ठ पुरुष जो सिद्धार्थ गौतम तो 'बुद्ध' झाला व तेव्हापासून जगातील श्रेष्ठ अशा धर्मांपैकी एकाची म्हणजे बौद्ध धर्माची स्थापना झाली. वास्तविक सिद्धार्थ गौतम या व्यक्तीच्या जन्मास पंचवीसशेहून अधिक वर्षे झाली आहेत. तथापि ज्या दिवशी त्याला खरा आत्मसाक्षात्कार झाला, अनेक वर्षेपर्यंत तीव्र चिकित्सापूर्ण अशा मनाने

हुडकीत असलेली भवचक्राची गुरुकिल्ली चिच्छक्तीच्या प्रेरणेने ज्या दिवशी त्याच्या हस्तगत झाली, तोच दिवस बुद्धावतारजयंतीचा मानण्यात येतो तत्पूर्वीचा गौतमबुद्ध हा तुमच्या आमच्याप्रमाणे केवळ एक संसारी पुरुष होता. खिस्त, महंमद वगैरे-प्रमाणेच बुद्ध ही एक खरी ऐतिहासिक व्यक्ती होऊन गेली व तिजविषयी साधार अशी माहिती ग्रंथांतून मिळते. बुद्धाचा बाप शुद्धोधन शाक्य हा वास्तविक राजा असा नव्हता. कारण शाक्य जातीच्या लोकांत त्या वेळी एक प्रकारची प्रजासत्ताक राज्यपद्धति असून समाजाचा सर्व कारभार प्रातिनिधिक पद्धतीने चालत असे. शुद्धोदनास प्रत्यक्ष राज्यपद असे नसले तरी तो घरचा श्रीमान व सुखी होता आणि आपला प्रिय पुत्र जो सिद्धार्थ त्याला त्याने एखाद्या राजपुत्राप्रमाणे चैनीत व ऐषआरामात लोळता येईल अशा स्थितीत ठेवले होते. सांसारिक दुःख कसे असते ते आपल्या मुलाच्या दृष्टीसही पडू नये, अशी त्याने विशेष खबरदारी घेतलेली होती.

यशोधरा नावाच्या सुंदर स्त्रीशी सिद्धार्थाचे लग्न लहानपणीच लागलेले असून राहुल नावाचा एक अत्यंत कमनीय असा पुत्रही त्याला होता. सिद्धार्थाचे लक्ष ऐहिक ऐषआरामात गुरफटलेले नसून जगाच्या स्थितीकडे लागलेले होते. प्रेमळ बापाने केलेल्या कडेकोट बंदोबस्तातूनहि मानवी दुःखाचा थोडाबहुत मासला त्याच्या नजरेस मधूनमधून पडल्याशिवाय राहात नसे; व प्रत्येक वेळी हा मासला पाहताच या दुःखाचे मूळ कशात आहे ? दुःखनिवारणार्थ चाललेला जगाचा प्रयत्न योग्य मार्गाने होत आहे किंवा भलत्याच अयोग्य मार्गाचे वळण त्याला लागले आहे ? ही त्याची विचिकित्सा वाढतच जाई. संसारातले त्याचे मन निवाल्यामुळे प्रतिक्षणी संसाररोपाधीचा जाच त्याला अधिकाधिक दुःसह वाटू लागला. संसारपाश तोडल्याशिवाय आपल्या शंकांस समाधानकारक उत्तर मिळणार नाही, असा त्याचा कायमचा निश्चय झाला; व राहुलच्या जन्मोत्सवासंबंधाने कपिलवस्तू नगरीच्या पौरजनांनी केलेल्या एका विशेष समारंभाच्या दिवशीच गौतमबुद्धाने आपल्या अलौकिक अशा वैराग्याचा मासला जगास दाखविला. जगांत सामान्यतः वैराग्याला कारण दुःख हेच असते; आर्त भक्तीची उदाहरणेच पुष्कळ. सुखांत लोळणाऱ्याला वैराग्य क्वचितच आठवते. पण गौतमबुद्धाच्या वैराग्याला जगात दुसरे उदाहरण मिळणे कठीणच. समर्थ रामदासस्वामी विवाहाकरिता पाटावर उभे असता 'सावधान' या सूचक शब्दाचा इशारा तरी त्यांच्या कानी पडला होता. पण गौतमबुद्धाला जी वैराग्य-जागृती मिळाली ती केवळ आत्मप्रेरणेने. बुद्धाच्या 'महाभिनिष्क्रमणा' सारखा काव्यमय व उदात्त प्रसंग दुसरा मिळणार नाही. रामचंद्राला ऐन राज्यारोहणप्रसंगी राज्य सोडून जावे लागले खरे, पण त्याला मूळ कारण परेच्छा, स्वतः रामचंद्राची इच्छा नव्हे. रामचंद्राचा वनवास हे पितृभक्तीचे उदाहरण होय, वैराग्याचे नव्हे. गौतमाने सर्व संसारसुखाचा त्याग केला तो केवळ स्वतःच्या परमार्थज्ञानाच्या सात्त्विक इच्छेने. उत्सवप्रिय मनुष्यांनी

वाडा गजबजून गेला आहे, नाचरंग चालला आहे, मंगल वाद्यें वाजत आहेत, सर्वत्र रोषणाई केलेली आहे अशा दिवशीं गौतमबुद्धाचे मन मात्र ठिकाणावर नव्हते. व्यग्र चित्ताने त्याने सर्व दिवस घालविला आणि ऐन मध्यरात्री यशोधरा ही पुष्पशय्येवर राहुलला कुशीत घेऊन गाढ निद्रित असतां तिला जागी न करता तो निघाला. आपल्या प्रिय पत्नीला विरहदुःख काही दिवस सोसावे लागणार; पण मनांत जी विचिकित्सा उत्पन्न झालेली आहे, तिचे समाधान झाल्यानंतर परत येऊन तिला भेटून आपणास झालेल्या सम्यक ज्ञानाचा उपदेश तिलाहि करूं अशा सदय भावनेने गौतमबुद्ध त्या उभयतांस तेथेच सोडून देऊन फक्त एका सारथ्याला घेऊन राजोद्यानांतून बाहेर पडला. रात्रभर प्रवास करून सकाळी एका पवित्र नदीच्या तीरावर येताच आपल्या तरवारीने त्याने आपले लांबसडक व सुगंधी तेल लावून तुळतुळीत केलेले केस कापले. अंगावरील सर्व अलंकार उतरले, आणि ते सर्व सारथ्याबरोबर कपिलवस्तूस परत पाठविले. नंतर मगध देशाची राजधानी जे राजगृह शहर तेथे जाऊन डालार व उद्रक या दोन पंडितांकडून हिंदू तत्त्वज्ञानाची माहिती त्याने करून घेतली. अर्थात शुष्क तत्त्वज्ञानाने त्याचे समाधान झाले नाही. तेव्हा योगसाधनाने तरी चित्तात सम्यक ज्ञानाचा प्रकाश पडेल या भरवशाने, विंध्य पर्वतातील उरुवेलच्या निबिड अरण्यात सहा वर्षेपर्यंत त्याने इतके देहदंडन केले की, शेवटी उभा राहण्याची देखील शक्ती त्याच्या अंगी राहिली नाही. हठयोगाने समाधान होईना तेव्हा त्याने तोहि सोडून दिला. असाच विचार करीत करीत भटकत असता व निरंजना नदीच्या तीरी महावृक्षाखाली बसला असता, एक दिवस त्याच्या मनात **खऱ्या परमार्थ ज्ञानाचे** तेज प्रकाशमान झाले. ती सर्व रात्र त्याने मनःसमाधीच्या एकांतिक सुखात घालविली, दुसऱ्या दिवसापासून आपल्याला मिळालेले ज्ञान दुसऱ्यास शिकविण्यास त्याने सुरुवात केली. वैराग्य, आत्मयज्ञ, उपास, तप, इत्यादिकांनी त्याच्या ठिकाणी जे तेज उत्पन्न झाले होते ते सम्यक ज्ञानाच्या आनंदाने दुणावले आणि सर्व जग शहाणे करून सोडण्याच्या त्याच्या सात्त्विक निश्चयाने जगद्गुरूची पदवी नसली तरी पात्रता त्याच्या अंगी आपोआप विनटली. येथपासून पुढे आपल्या अवतारसमाप्तीपर्यंत सुमारे चाळीस वर्षेपर्यंत त्याने उपदेशांचे पवित्र काम केले; शेकडो लोकांशी युक्तिवाद केला, शेकडो लोकांस कळकळीने आळविले, शेकडो संघ स्थापले व जवळजवळ सर्व देशभर शिष्यमंडळ बनविले. कोणत्याही नवीन मताची शिष्यपरंपरा हिंदुस्थानात कशी फैलावत जाते याचा ज्याला अनुभव आहे, त्याला गौतमबुद्धाने केवळ आपल्या निम्म्या हयातीत प्रचंड धर्मक्रांती कशी घडवून आणली असेल याची कल्पना येईल. यास्तव गौतमगुरूचा दिग्विजय प्रथम केवळ पाच शिष्य-सैनिकांसह कसा सुरू झाला, त्याला पहिल्याच यशाची प्राप्ती वाराणशीसारख्या सनातनप्रिय अशा वैदिक धर्माच्या क्षेत्रीं कशी झाली, त्याच्या अपूर्व धर्मोपदेशाच्या लाटेत संशयग्रस्त संसारी जनच्यसे काय पण पूर्व

परंपरेने पढलेले विद्वान व बुद्धिमान असे वैदिक पंडित व पराक्रमी राजे कसे गडप झाले; चोर, जार, पतित, चांडाल वगैरे सर्व प्रकारचे मूढ व दुराचारी जनहि त्याच्या प्रसादतीर्थाने अंतर्बाह्य पुनीत होऊन सद्‌गुणी कसे बनले, वगैरे तपशील सांगत बसण्याचे कारण नाही. तसेच, या नव्या धर्मावताराने निस्तेज झालेल्या असूयाग्रस्त अशा अनेक लोकांनी गौतमबुद्धाचा पाडाव करण्याकरिता निंदा, अत्याचार वगैरे तामसी विद्या व पैशुन्य कला खर्ची घातल्या. तरी गौतमबुद्धाच्या यशाची यत्किंचितहि हानी न होता अखेरपर्यंत त्याची कीर्ती वाढतच कशी गेली हा कथाभागही सांगत बसण्याचे कारण नाही. जगात कोठेही जा, सख्ख्या भावंडांचा तोंडवळा जसा सारखा असतो, तसेच विभूतिमात्रांचे चरित्रहि पुष्कळ अंशी सारखे असते.

असो. अशा रीतीने आपले आयुष्य सत्कार्यी खर्चून व आपले नाव अजरामर करून गौतमबुद्धाने आपल्या वयाच्या ऐशीव्या वर्षी देह ठेवला. बुद्धाने प्रथम पाच शिष्यांस उपदेश करून आपल्या कामास सुरवात केल्याचे वर सांगितले आहे. लवकरच या पाचांचे साठ झाले व साठाचे हजारो झाले, व आजमितीस बुद्धाच्या धर्माचे अनुयायी असे पन्नास कोट लोक पृथ्वीच्या पाठीवर आहेत ! खुद्द बुद्धाच्या हयातीत कित्येक राजेलोकांनी बौद्धधर्माची दीक्षा घेतली होतीच. तथापि ख्रिस्ती शकापूर्वी सुमारे तिसऱ्या शतकाच्या सुमारास अशोक नामक जो हिंदी सम्राट होऊन गेला त्याने बौद्धधर्माचा स्वीकार करून चहूकडे त्याचा प्रसार होण्याची अतोनात खटपट केली. खुद्द अशोकाचा पुत्र मिलिंद व त्याची मुलगी ही दोघेही संन्यास स्वीकारून धर्मोपदेश करण्यास बाहेर पडली, त्यामुळे बौद्धधर्माच्या प्रसारास अत्यंत मदत झाली. पीतवस्त्र परिधान करणारे भिक्षु व धर्मोपदेशाच्या सात्त्विक आवेशात संसारसुखाचा विसर पडलेल्या भिक्षुणी यांनी थोड्याच काळात चारी दिशा व नवखंड पृथ्वी व्यापिली. पूर्वेस ब्रह्मदेश, सयाम, चीन, जपान; उत्तरेस अफगाणिस्तान, तिबेट व हिमालयापलीकडील प्रदेश; दक्षिणेस सिलोन, जावा व पश्चिमेस खोतान, तुर्कस्तान, मध्य आशिया वगैरे ठिकाणी बौद्धसंघ व विहार यांची स्थापना झाली. तथापि कर्मधर्मसंयोगाने बौद्धधर्माची जन्मभूमी जे हिंदुस्थान त्यातून उत्पत्तीपासूनच एक हजार वर्षांच्या आत त्याचे उच्चाटन झाले. बौद्धधर्माची वाढ जलद झाली व विस्तार फार वाढला, त्यामुळे लवकरच त्यात अनेक पंथ व मतांतरे उत्पन्न झाली. या सर्वांचा मेळ घालण्याचा प्रयत्न प्रथम प्रथम वजनदार बौद्धधर्मानुयायी राजेलोकांनी केला. एकवाक्यता करण्याचा प्रयत्न करणारी पहिली परिषद बुद्धाच्या मरणानंतर लवकरच म्हणजे इ. स. पूर्वी ५४३ व्या वर्षी मगध देशाचा राजा अजातशत्रू याच्या कारकीर्दीत राजगृह येथे बुद्धाचा ब्राह्मण पट्टशिष्य महाकाश्यप याच्या अध्यक्षतेखाली भरली होती. दुसरी परिषद यानंतर सुमारे शंभर वर्षांनी वैशाली येथे भरली, व त्या प्रसंगी एका परिषदेच्या दोन परिषदा होण्यापर्यंत मतभेदाची मजल गेली.

तिसरी परिषद् प्रसिद्ध सम्राट अशोक मौर्य याच्या कारकीर्दीत इ. स. पू. २५० व्या वर्षी पाटणा शहरी भरली व चौथी परिषद् राजा कनिष्क याने इ. स. ४० या साली भरविली. या सर्व परिषदांचा हेतू बौद्धधर्माच्या ग्रंथात सुव्यवस्था व विल्हेवारी लावणे व मतांतराची एकवाक्यता करणे हा एक होता. तथापि ती गोष्ट शक्य नसल्यामुळे उत्तरेकडची व दक्षिणेकडची अशा बौद्धधर्माच्या वेगवेगळ्या परंपरा निर्माण झाल्या. कालांतराने हजारो कोसांचे व हजारो वर्षांचे अंतर पडल्यामुळे उत्तर बौद्ध व दक्षिण बौद्ध यांची परस्पर ओळखही नाहीशी होऊन प्रत्येक परंपरेचा विस्तार व परिणती स्थानिक स्थितीप्रमाणे वेगवेगळ्या दिशांनी होत गेली. सुदैवाने बौद्धधर्माच्या पुनर्जीवनाचा काळ हल्ली आलेला दिसतो. या पुनर्जीवनप्रसंगी पूर्वीप्रमाणे एखादा धर्मदिग्विजयी अवतारी पुरुष निर्माण होणार किंवा कसे ते कोण सांगणार? तथापि, एवढा गोष्ट खरी की, एकंदर जगावर जी एका नव्या विचारक्रांतीची छाया हल्ली पडत आहे, तिच्या अनुवेगाने बौद्धधर्माविषयी तन्मतानुयायांची दृष्टी नवीन होऊन निरनिराळ्या बौद्धधर्मी देशात पूर्वीहून परस्पर अधिक दळणवळण वाढेल, जुन्या बौद्ध वाङ्मयावर पडलेली राख फुंकली जाऊन त्यातील सद्यांश सतेज होऊन लोकनिदर्शनास येईल, आणि बुद्धाच्या जन्मभूमीत पूर्वकालीन विरोध विसरला जाऊन बौद्धधर्म हा काही झाले तरी भारतीय धर्मापैकीच एक पंथ आहे व या दृष्टीने हिंदू लोकांचेही ममत्व त्याच्या ठिकाणी असले पाहिजे ही भावना अधिकाधिक जागृत होईल यात शंका नाही. बौद्धधर्म व ब्राह्मणधर्म यांचा पूर्वी एके काळी तीक्ष्ण विरोध होता, व अद्यापहि त्या काळच्या भांडणाचा प्रतिध्वनी सर्वस्वी निःशेष झालेला नाही. या कारणास्तव बौद्धधर्माविषयी आज कोणास जे काही बोलणे ते जपूनच बोलले पाहिजे यात शंका नाही. तथापि आजच्या नवीन युगात गौतमबुद्धाच्या २५०० व्या जयंतीच्या महोत्सवप्रसंगी या दोन धर्मांतील परस्परसंबंध काय आहे, कोणकोणत्या बाबतीतला विरोध खरा म्हणजे सकारण व कोणत्या बाबतीतला विरोध खोटा म्हणजे निर्मूल व निष्कारण आहे, याचा विचार कोणी शांत मनाने केल्यास असली विचारसरणी ऐकून घेण्याइतकी सहिष्णुता तरी आजच्या ब्राह्मणधर्मात खास आहे, अशी आमची समजूत आहे. धर्मदृष्ट्या पूर्वीचा काळ विशेषीकरणाचा होता; तसा आज नसून आजचा धर्मदृष्ट्या व राष्ट्रीयदृष्ट्या एकीकरणाचा आहे. अर्थात जी जी म्हणून भारतीय वस्तू पुनरुज्जीवनोन्मुख असेल तिचा सत्कारपूर्वक परामर्ष घेणे हे राष्ट्रहितेच्छू भारतीयांचे काम आहे. या दृष्टीने पाहता बौद्धधर्म हा अस्सल भारतीय आहे, ही गोष्ट प्रथम लक्षात घेतली पाहिजे.

वर जो बुद्धाचा अल्प इतिहास दिला आहे, त्यावरून बुद्धाचे कुळ, स्वतः त्याचा जन्म, त्याचे निर्वाण, त्याने स्थापलेल्या धर्मपंथाचा जन्म व परिणाम या सर्व गोष्टी भारतीय आहेत हे उघड आहे व आज हिंदुस्थानात त्या धर्माचा फारसा

मागमूस राहिलेला नाही, तरी ज्या देशात तो पूर्वीपासून आजवर प्रचलित आहे त्या म्हणजे चीन, जपान वगैरे देशांचे लोक हिंदुस्थानास अद्यापि पवित्र भूमी मानतात या देशांच्या भाविक यात्रेकरूंची यात्रा हिंदुस्थानात आल्याशिवाय पुरी होत नाही, व पूर्वी ज्या ज्या वेळी बौद्धधर्म व बौद्ध वाङ्मय यांची जागृती करावी अशी चिनी व जपानी समाजास इच्छा झाली त्या त्या वेळी, मूळच्या पवित्र कुंडांतून तीर्थोदकाच्या रिकाम्या गिंड्या भरून घ्याव्या, त्याप्रमाणे हिंदुस्थानात प्रसिद्ध असलेल्या धार्मिक पंडितांस सन्मानपूर्वक पाचारण करून त्यांना स्वदेशी नेले व अशा रीतीने सुमारे हजार-पाचशे वर्षेपर्यंत हिंदुस्थान व बौध्दधर्मीय देश यांच्या संगतीचा सांधा जुळत आलेला होता. गौतमबुध्द हा भारतीय आहे एवढेच नव्हे तर व्यक्तिशः तो अखिल भारतीयास परमपूज्य होता व अद्यापिही आहे. तसे नसते तर शिरोभागी दिलेल्या अवतरणात खुद्द श्रीशंकराचार्य व जयदेव कवी यांनी बुध्दाला अवतार मानून त्याची जी प्रशस्ती केली आहे तशी खास केली नसती. स्वतः गौतमबुद्धाच्या चरित्रांत अशी कोणती गोष्ट आहे की, तिजमुळे त्याच्या कट्टया निंदकासही त्याला तिळमात्र नाव ठेवण्यास जागा मिळेल ? बुद्ध हे नाव घेताच कित्येकांच्या मनात जी अनादरलहरी उत्पन्न होते तिचे खरे कारण स्वतः बुद्ध ही व्यक्ती नसून, त्याच्या धर्मांची तत्त्वे व विशेषतः तद्धर्ममतानुयायांनी कालांतराने माजविलेला अनाचार हेच होय, असे सूक्ष्म दृष्टीच्या मनुष्यास दिसून येईल. त्यातल्या त्यात पाहता दुसरी गोष्ट सर्वस्वी असमर्थनीय आहे; पण अविचारी अशा बौद्ध मतानुयायांच्या मूर्खपणाबद्दल जर बुद्धास जबाबदार धरावयाचे तर जगातला दुसरा कोणताही धर्मसंस्थापक अशा संकटांतून सुटेल असे आम्हाला वाटत नाही श्रीमच्छंकराचार्य हे बुद्धाप्रमाणेच व्यक्तिशः पवित्र व सदाचरणी होते; पण शंकरपरंपरेत ' घटाकाश ' 'मठाकाश' वगैरे शब्दांचा स्वतःस अगर दुसऱ्यास न समजेल असा शुष्क गोंधळ माजवून ' कलौ वेदान्तिनो भान्ति फाल्गुने बालका इव ' अशा निंदेस पात्र झालेले विचित्राचारी असे लोक निर्माण झालेच नसतील काय ? अहिंसा, सत्य यांचा उपदेश करणाऱ्या बुद्धाच्या नामधारी चिनी व जपानी अनुयायांत हिंसाच इतकी माजून राहिली आहे की, हे लोक आज मारून खात नाहीत असा प्राणीच जगात नाही ! पण याला बुद्धाने काय करावे ? झुरळे मारून खाणाऱ्या चिनी लोकांच्या आचाराकरिता दयासागर बुद्धाला जर नावे ठेवावयाची तर मनुस्मृतीत देहान्त प्रायश्चित्त सांगितलेले पातक करणाऱ्या हिंदूंच्या अपराधाकरिता खुद्द मनूस फाशी चढविणे योग्य का होणार नाही ? ' शिष्यापराधे गुरोर्दंडः ' का ?

दुसरा आक्षेप म्हटला म्हणजे बुद्धाच्या सिद्धान्तासंबंधाचा. सनातन वैदिक धर्माभिमान्यास बौद्ध मतांत विषाद वाटण्यासारख्या मुख्य चार गोष्टी आहेत. एक निरीश्वरवाद, दुसरी अनात्मवाद, तिसरी यज्ञहिंसानिषेध व चौथी चातुर्वर्ण्यनिंदा. पण यातही थोडा विचार आहे. निरीश्वरवाद व अनात्मवाद हे दोन्ही बुद्धाने स्वतःच नवे

निर्माण केलेले होते असे नाही. आपल्या खास वैदिक धर्मात या दोन्ही वादांचे मूळ आहे. सांख्यमतवादी परमपूज्य कपिलमहामुनी हा निरीश्वरवादी होता व अद्वैतवादी शंकराचार्य हे एका अर्थाने अनात्मवादी होते. सांख्य तत्त्वज्ञानात ईश्वराशिवाय सृष्टि-व्यवस्थेचा निर्वाह मानिलेला आहे. कपिलाचार्य हे फक्त प्रकृती व पुरुष ही दोन तत्त्वे मानतात. ईश्वर मानीत नाहीत. सृष्टी उत्पन्न करणारा, दयेने तिचे पालन करणारा, निग्रहानुग्रह-समर्थ, भक्तीस पावणारा, वगैरे गुणविशिष्ट असा ईश्वर मानणे हेच लौकिक आस्तिक्यवादाचे लक्षण आहे. पण या दृष्टीने पाहावे तर कपिल काय किंवा शंकराचार्य काय या दोघांनाही ' आस्तिक ' ही पदवी कितपत लावता येईल याची शंकाच आहे. जो आत्मा, अर्थात व्यक्तिमात्राचा न मानल्याबद्दल बुद्धावर आम्ही रागावतो तो आत्मा कपिल मानतात तरी ! शंकराचार्य तोही मानीत नाहीत. जीवात्मा परमात्म्याहून भिन्न नाही, हेच अद्वैतसिद्धांताचे मर्म असल्यामुळे जीवात्मा वेगळा उरतच नाही. शंकराचार्यास आक्षेपक लोक ' प्रच्छन्नबौद्ध ' ही निंदाव्यंजक पदवी देतात, त्याचे झाले तरी कारण हेच होय. सांख्यमत निरीश्वरवादी असूनही जर ' नास्ति सांख्यसमं ज्ञानं ' या स्तुतीस पात्र आहे, तर निरीश्वरवादाबद्दल बुद्धाचा अनादर करणे योग्य होणार नाही. बुद्धाच्या अनात्मवादाविषयी एक गोष्ट विशेष लक्षात ठेवावयास पाहिजे; ती ही की, हा अनात्मवाद प्रयोजनपुरस्सर नसून केवळ आनुषंगिक आहे. बुद्धाचा कटाक्ष आत्म्याचे अस्तित्व नाशाबीत करण्याकडे नव्हता; तर ज्या यज्ञयागाच्या योगाने हत्या माजली होती त्याविरुद्ध होता; आत्मा असिद्ध ठरवून त्यास काही मिळावयाचे नव्हते; तर वादग्रस्त आत्म्याच्या मोक्षसाधनार्थ प्रत्यक्ष हत्यादी पापात्मक अनाचार होत होते ते त्यास बंद करावयाचे होते.

यज्ञहिंसानिषेधाबद्दल बुद्धास नावे ठेवण्यापूर्वी दोन गोष्टींचा विचार होणे जरूर आहे. पहिली अशी की, यज्ञयागाचे स्तोम बुद्धाच्या वेळी बेसुमार वाढलेले असून, त्याविरुद्ध निषेधपूर्वक प्रतिक्रिया करणारा कोणी तरी धीट पुरुष निर्माण व्हावयास पाहिजे होता. व दुसरी अशी की, जो यज्ञहिंसेचा निर्बंध बुद्धाने आपल्या वेळी केला त्याचा अनुवाद आज हजारो वर्षे आपण करीत आहोच की नाही ? यज्ञहिंसा हाच जर वैदिक धर्माचा खरा आत्मा असता, तर श्रीमच्छंकराचार्यांनी बौद्धमतखंडनपूर्वक दिग्विजय समाप्त केल्याबरोबर, प्रथम देशभर यज्ञवेदीच निर्माण करून होमधूमाने आणि 'वषट्कार' गर्जनेने दशदिशा भरून धुंद करून टाकल्या नसत्या काय ? यज्ञहिंसा हीच हिंदु-धर्माच्या मते मोक्षपदाची खरी गुरुकिल्ली असती तर वेदांतानंतर प्रेमळ व परम कारुणिक अशा भागवतधर्माचा प्रसार का झाला असता ? व तो लोकांस कसा पटला असता ? आज आर्यसमाजिस्टांनी वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन करण्याच्या कामी सर्वांत पुढे मजल मारली आहे. सर्व नित्यनैमित्तिक कर्मांचा त्यांचा ओनामा होमहवनाने होत असताहि यज्ञहिंसा त्यांनी वर्ज्य का मानिली आहे ? व आश्चर्य हे की, केवळ यज्ञसंबंधी मांस-

भक्षण वैदिक धर्माने विहित मानले असता, आर्यसमाजाच्या एका शाखेने आत्मपुष्ट्यर्थ मांसभक्षण शिल्लक ठेवून त्याचा यज्ञसंबंध मात्र काढून टाकला ! 'अश्वमेध', 'पल-पैतृक' वगैरे गोष्टी कलियुगात वर्ज्य करून ठेवण्यात स्मृतिकारांचा काय हेतू असेल बरे ? व या स्मृतिकारांनी जे केले तेच अन्य रीतीने गौतमबुद्धाने केले असे म्हणण्यास काय हरकत ?

चातुर्वर्ण्यनिषेधासंबंधाने बुद्धाचा कटाक्ष ब्राह्मण्यास वरच्या पायरीवरून खाली ओढण्याचा नसून खालच्या दर्जाच्या लोकांस वरच्या पायरीस नेण्याचा होता. या बाबतीत भक्तिमार्गाची व बौद्धमताची एकवाक्यता आहे. खऱ्या भक्तिपंथात जातींची आडकाठी भक्तभजनाच्या मार्गात येऊ शकत नाही. बुद्धाने झाले तरी ब्राह्मण्याची विशेष लक्षणे असे जे गुण त्या गुणास केव्हाहि कमीपणा न देता, बुद्धसंघात प्रवेश करण्यास जातीची अडचण राहू नये असे ठरविले. भक्तिमार्गात सेना न्हावी, गोरा कुंभार, चोखामेळा महार वगैरेंना ज्या कारणाकरिता मान देण्यात येतो, त्याच कारणाकरिता बुद्ध संघातहि अनेक हीन जातीच्या लोकांना घेऊन बुद्धाने गौरविले होते. सुविनीत भिक्षू हा मूळचा हलालखोर होता. उपाली हा मूळचा न्हावी होता. पण बुद्धसंघात समाविष्ट होऊन त्याची योग्यता इतकी वाढली होती की, महाकाश्यपाच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या धर्मपरिषदेत त्रिपीटक नामक बौद्धग्रंथसमूहापैकी 'विनय' सूत्रे म्हणण्याचे काम त्याजकडे होते. तात्पर्य, कोणासही धर्मोच्छेदक किंवा नास्तिक म्हणणे फार सोपे आहे; पण ते म्हणण्यापूर्वी ज्याने त्याने आपण स्वतः असा विचार करावा की, हिंदुधर्माची साधारण व्याख्या काय आहे ? त्या व्याख्येत मी स्वतः कितपत येतो ? ज्यांना ज्यांना मी हिंदू हे पद लावतो ते ते त्या व्याख्येत कितपत येतात ? हिंदुधर्माची सर्व अंगे सर्वकाळ सारखीच नित्य व अबाधित राहिली आहेत की काय ? नसल्यास कोणत्या अंगांत फेरबदल झाला आहे ? त्याच्या अनेक अंगांपैकी कोणतेहि एखादे अंग मान्य केल्याने हिंदुत्वास बाध येतो की काय ? अशा रीतीने बाध येऊ लागल्यास आपणांस व इतरांस हिंदुत्वाचे अधिष्ठान कितपत हक्काने मागता येईल ? 'हिंदू' नावाच्या धर्माने उत्पन्न केली ती हिंदू जात किंवा 'हिंदू' म्हणविणाऱ्या जातीने बनविलेला तो हिंदुधर्म ? निदान बुद्धाच्या आक्षेपकांनी तरी हे प्रश्न विचारण्यासारखे आहेत यात शंका नाही. वर सांगितलेले दोष लक्षात घेतले तरी बौद्धमतास फार तर अपभ्रष्ट हिंदुधर्म म्हणता येईल; पण स्वभाषेच्या अपभ्रंशाचा स्वभाषेतच जसा अंतर्भाव होतो—अपभ्रष्ट स्वरूपामुळे त्यांच्या भाषेचे गोत्र बदलत नाही— त्याचप्रमाणे स्वभावधर्माचे अपभ्रंशहि स्वधर्मातच समाविष्ट मानावे लागतात. कारण अपभ्रंश हा कितीही झाले तरी मूळ पायाच्या परंपरेवर रचलेला असतो. पुष्कळ वेळा भाषेप्रमाणे धर्माचा अपभ्रंशहि देशकालानुरूप योग्य व लोकांस इष्ट असा असतो; व म्हणून तो ग्राह्यही होतो. बुद्धधर्माची जी विशिष्ट म्हणून अंगे आहेत

किंबहुना रामायणातील ‘ यथा चोरस्तथा बुद्धः ’ या उल्लेखाचा ग्रंथ परवा डॉ. गर्दे यांनी मार्मिकपणाने लावून दाखविला त्याप्रमाणे लावला असता सकृद्दर्शनी बुद्धाची जी निंदा ती परिणामी स्तुती ठरते. म्हणजे बुद्धाने आपला पंथ स्थापताना जरी मताची चोरी केली असे मानले तरी वैदिक परंपरेतील प्राचीनाचार्यांच्या मतांचीच होय. आज-देखील जसा प्राचीन मताचा आधार देऊन प्राचीनतर खोडून टाकण्याचा प्रयत्न कित्येक सद्बुद्धिप्रेरित समाजसुधारक करतात, तसलाच प्रयत्न बुद्धाचाही असावा असे वाटते. प्राचीनतर गोष्टींचा आधार घेणे हे जर धार्मिक भावनेशी विसंगत नाही, तर प्राचीनतम गोष्टींना आधार घेणे हेही तसेच मानले पाहिजे. कलिवर्ज्यसारख्या प्राचीनतर गोष्टी केवळ कालमानानुसार म्हणून प्राचीनतम गोष्टींविरुद्ध प्रवर्तित करता येतात, त्याचप्रमाणे हेच कालमान फिरून बदलले म्हणजे नवीन अशा प्राचीनतर गोष्टींचा निषेध होऊ लागून मन प्राचीनतम गोष्टींकडे धावते.

कोठेही धर्मचरित्रांत विशिष्ट गोष्टींची अतिशयोक्ती व तिजमुळे होणारी प्रतिक्रिया ही जोडी वारंवार आढळते. प्युरिटन व क्वेकर लोक यांनी रोमन कॅथॉलिक लोकांचा जो निषेध केला तो त्यास स्वतःस बायबल नापसंत होते म्हणून नाही; तर कॅथॉलिक लोकांच्या आचाराचा निषेध करता येण्यासारखी वचने व विचारसरणी बायबलातच आढळते म्हणून. बौद्धमत हेही सर्व वैदिक परंपरा झुगारून देण्याकरिता म्हणून पुढे आले नव्हते; तर त्या काळच्या अर्वाचीन वैदिक आचारात म्हणजे यज्ञयागादिकांत एक प्रकारची अतिशयोक्ति झाली होती व त्याविरुद्ध प्रतिक्रिया ( protest ) करणे जरूर होते म्हणून. पण बौद्धमत हे केवळ प्रतिक्रियारूप नव्हते तर कोणत्याही धार्मिक समंजस मनुष्यास पटेल अशा तऱ्हेचा वैदिक परंपरेतून एकत्र केलेला नीतिवाद अधिक ग्राह्य म्हणून त्याने लोकांपुढे मांडला, तो लोकांस मानवला व त्यामुळेच बौद्धमताचा त्या वेळी विजय झाला. बौद्धाने उपदेशाचे काम सुरू करताच ब्राह्मणधर्मातील मोठमोठी धेंडे येऊन त्यास मिळाली, याचे कारण तरी तेच होय. सारीपुत्र, महामोगलान, महाकाश्यप, अशोकाच्या वेळी सर्वश्रेष्ठ मानलेला बुद्धभिक्षुतित्सा हे सर्व ब्राह्मण होते; व ते अप्रमाणिक किंवा धर्मलंड होते, असे म्हणण्यास आपल्याला अधिकार नाही. बौद्धमताची मुख्य लक्षणे म्हटली म्हणजे अशी आहेत— एक तर ते मत अत्यंत विनयसंपन्न आहे. मनुष्याने मनुष्याशी केलेला प्रांजल युक्तिवाद त्यात भरलेला असून आपण ईश्वरप्रणीत आहो, अर्थात आपल्यास न मानील तो प्रत्यक्ष ईश्वराचा अपराधी आहे अशी प्रौढी ते मत मारीत नाही. बुद्धाने सांगितलेली चार प्रकारची सत्ये, आठ प्रकारचे कर्मभाग वगैरे गोष्टी अगदी आधुनिक किंवा अगदी प्राचीन अशा नीतिवेत्त्यांनाही मान्य होण्यासारख्या आहेत; व हेच त्याच्या यशाचे कारण. हे यश पुढे अनंत काल टिकले नाही ही गोष्ट वेगळी; व त्याची कारणेही वेगळी आहेत. नदीच्या मुळातले निर्मळ पाणी ज्याप्रमाणे तिच्या प्रवाहात पुढे तसेच टिकत नाही, त्याचप्रमाणे

अनेक मतानुयायांच्या अप्रबुद्धपणामुळे बौद्धमताचे निर्मल स्वरूपहि पुढे टिकले नाही. वैराग्य, समबुद्धी, दाक्षिण्य, शुचिर्भूतता, विनय वगैरे बौद्धमतातले मूळचे गुण नष्ट होऊन सुमारे चारपाचशे वर्षांच्या आंतच हिंदुस्थानात तरी बौद्धमताचे वैशिष्ट्य नाहीसे झाले आणि बौद्धमतवाले अनेक रीतींनी हिंदू समाजाशी मिळून एकजीव झाले. एक हजार वर्षांच्या अवधीनंतर जगद्‌गुरू शंकराचार्य यांनी बौद्धमताचे जे खंडन केले तेहि वरील कारणामुळेच होय. पण शंकराचार्यांनी मारलेली लढाई ब्राह्मणी व बौद्धधर्माच्या युद्धांतील पहिली नसून शेवटची होती, हे लक्षांत ठेवणे जरूर आहे. बौद्धधर्माच्या किल्ल्यावर ब्राह्मणी धर्मांचा झेंडा फिरून रोवण्याचा मान शंकराचार्यांना यथायोग्य मिळाला खरा; पण या किल्ल्यातील तटबंदीत खिंडारे पाडण्याचे काम पूर्वीच दुसऱ्याने केलेले होते. बौद्धधर्माच्या स्वरूपाची खरी परीक्षा करावयाची ती शंकराचार्यांनी पाडाव केलेले बौद्धमत व बौद्धाचार यावरून करावयाची नसून खुद्द बुद्ध किंवा अशोक यांच्या वेळी शंकराचार्यांच्या तोडीचे बुद्धिमान ब्राह्मण त्या मतास येऊन मिळाले व त्यांनी बौध्द दीक्षा घेतली, यावरूनच करावयाची आहे.

कसेही असले तरी बौद्ध व ब्राह्मण यांची पांचव्या-सहाव्या शतकांत भांडणे झाली ती त्याकाळास योग्य होती. आज ती भांडणे उसनी घेऊन भांडण्याचे किंवा त्याविषयीचे त्या काळचे वैषम्य आज आपण मनांत बाळगण्याचे कारण राहिलेले नाही. शिवाय बौद्धधर्माच्या पुनरुज्जीवनाचे धोरण, आजचा ब्राह्मणवर्ग जशा प्रकारचा धर्म प्रत्यक्ष पाळतो त्याच्याशी बरेच जुळून आहे. बौध्दधर्मासंबंधाने लौकिक स्वरूपाचे काही आक्षेप पुढे आणण्यात येतात. कोणी म्हणतात, बौध्दमत हे क्षात्रगुणांचा नाश करणारे आहे. शांति-ब्रह्मपद पावण्याची हाव धरणे म्हणजे सर्व प्रकारच्या ऐहिक महत्त्वाकांक्षेस रजा देण्यासारखे आहे. आमच्या मते हा आक्षेप बरोबर नाही. बौद्धधर्माच्या वेळी जितके राजकीय स्वातंत्र्य आम्हांस होते, जितके बौद्धधर्मांचा समूळ उच्छेद झाल्यावर आपणामध्ये फार तर पाचसहाशे वर्षे टिकले व तेव्हापासून आज हजार वर्षे म्हणजे ज्या काळात आमच्या राजकीय स्वातंत्र्या-वर वारंवार घाले पडले त्या वेळी आम्ही बौद्धधर्मांचे कोठे अनुयायी होतो ? एको-णिसाव्या शतकाच्या प्रारंभी इकडे आपण कडकडीत ब्राह्मणधर्म पाळीत असता आपले राज्य का गेले ? बौद्धधर्मांचा उत्कर्ष शिखरास पोहोचला होता अशा वेळी अशोक हा सर्व हिंदुस्थानावर साम्राज्य कसे करता झाला ? व आज जेथे जो काही धर्म म्हणून आहे तो बौद्धधर्मच अशा जपानने एवढे राजकीय यश कसे मिळविले ? या निरनिराळ्या प्रश्नांची उत्तरे देतांना बौद्धधर्म हा क्षात्रगुणांविध्वंसक आहे, या आक्षेपास उत्तर सहजच मिळणार आहे. तात्पर्य, बुद्ध-जयंतीसारख्या प्रसंगी गौतमबुद्ध या अवतारी

पुरुषाचे व त्याच्या विशिष्ट मताचे खरे गुण कोणते आहेत हे पाहणे व त्यावर नसते दोषारोप न करणे हेच अधिक श्रेयस्कर होईल.

[काही झाले तरी बौद्धधर्म ही शाखा व ब्राह्मणीधर्म ही शाखा या दोन्ही एकाच भारतधर्मवृक्षाच्या खोडापासून निघाल्या आहेत, व यामुळेच ख्रिस्ती व महंमदी धर्मापेक्षा तोच आपणास अधिक जवळ आहे; या दृष्टीने या दोन धर्मांहून बौद्धधर्मावरच आमचे ममत्व विशेष असले पाहिजे.

( केसरी ता. १६ मे १९११ )

• • •

ज्ञानेश्वर-महात्मता

प्रत्येक लहानमोठ्या समाजाला आपल्यातील श्रेष्ठ व्यक्तींविषयी आदर वाटत असतो हे स्वाभाविकच आहे. मनुष्येतर समाजातही आपणांमध्ये श्रेष्ठ कोण ही जाणीव असते. पण त्याच्याविषयी त्याला भीति मात्र वाटते. आदरामध्येही एक प्रकारची भीति असतेच. तथापि शुद्ध आदर ही भावना शुद्ध भीतीपेक्षा श्रेष्ठ होय. आणि फक्त मनुष्यप्राण्यालाच परिणतीने लाभलेल्या संस्कृतीचे ते फळ होय.

काही शोधांती असे मानले गेले आहे की, श्रीयाज्ञवल्क्य हे ऋषि आणि श्रीज्ञानेश्वर हे संत कविवर्य, हे दोन महापुरुष शुक्लयजुर्वेदीय ब्राह्मण समाजात जन्मले. या समजुतीमुळे त्या वैदिकशाखीय समाजाला स्वतःविषयी धन्यता वाटावी हे सर्वस्वी योग्यच आहे. तथापि जन्माने या दोन विभूती एका विशिष्ट ब्राह्मणवर्गाच्या असल्या तरी, त्यांतील एका विभूतीने स्वतःच्या कार्याने चवथ्या वर्णाची, म्हणजे सेवा हाच ज्याचा धर्म ( ! ) त्या वर्णाची, एवढी मोठी सेवा केली आहे की, ब्राह्मणवर्गापेक्षाहि शूद्र वर्गालाच ज्ञानेश्वरमहाराज हे एकमेव आपलेच धन वाटावे.

ज्ञानेश्वरांविषयीची आदरबुद्धी लोकांत अनेक रीतींनी प्रगट होताना दिसते. वारकरी लोक ज्ञानेश्वरीला 'आई' म्हणतात,ती डोक्यावर धरून आदरितात. तिजवर गंधफुलें वाहून पूजा करतात. सांप्रदायिकांची भक्ति आणखी एका वेगळ्या रीतीने प्रकट होते. ती अशी की, ज्ञानेश्वरीविषयी ते जाज्वल्य शब्द प्रामाण्य ठेवतात. इतकेच नव्हे,तर आपल्या परंपरेत चालत आलेला एखादा अपपाठ, किंवा शुद्धपाठाचा विपरीत शब्दार्थ, शेकडो वर्षे चालत आला आहे तोच ते प्रमाण मानतात. दुसरा पाठ किंवा अर्थ युक्तिसिद्ध असला तरीहि ते स्वीकारीत नाहीत. पढिकांचा वर्ग तिसरा. ते पहिल्या वर्गाइतके भाविक किंवा दुसऱ्याइतके हटवादी नसतात. परंतु ज्ञानेश्वरीची गोडी त्यांना संत-काव्य या नात्यानेच इतकी लागलेली असते की, त्या ग्रंथांतील अध्यायचे अध्यायहि ते तोंडपाठ म्हणतात. आणि ते म्हणताना त्यांतील अध्यात्म व काव्य यांच्या रसाळपणाचे सेवन करण्याच्या आनंदात गर्क असतात.

वरील तीनहि वर्गांत पडणारा मी स्वतः नाही. माझे सत्य वर्णन असे की, वाङ्मय व तत्त्वज्ञान यांच्या लोभाने किंवा इतर विशिष्ट हेतूने ज्ञानेश्वरी मीही वाचली आहे. पण हवी तेव्हा, वाटेल तेथेच काढून, व प्रसंगकार्यापुरती अशीच वाचली आहे. तथापि ज्ञानेश्वरीचे सर्वांगीण श्रेष्ठत्व मला पूर्णपणे पटलेले आहे.

## प्रथमच डोळ्यांपुढे येणारे वाद

ज्ञानेश्वरांचे नाव निघाले की, प्रथमच काही वाद डोळ्यांपुढे येतात. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वर एक का दोन ? अभंगकर्ते व ज्ञानेश्वरीकर्ते हे एकच आहेत काय ? ज्ञानेश्वर हे पंढरीच्या विठोबाचे भक्त होते की नाही ? ज्ञानेश्वर हे अद्वैती की द्वैती ? इत्यादी. मी या वादांना महत्त्व देत नाही. माझ्या मते :–१– ज्ञानेश्वर हे अद्वैतवादी होते. द्वैतवादाचा उल्लेख ज्ञानेश्वरीत असला तरी त्याचा स्वीकार नाही. अद्वैत उपदेशिणाऱ्या श्रीकृष्णांनीच स्वतः गीतेच्या शेवटी अर्जुनाला द्वैतावर आणून सोडले. तीच गोष्ट ज्ञानेश्वरांनाहि आपल्या भावार्थदीपिकेत सांगावी लागली. स्वतंत्र अशा अमृतानुभवांत द्वैताचा मागमूसहि नाही.–२–ज्ञानेश्वर अद्वैतवादी असताही भक्त होते. ज्ञानी भक्त असे त्यांना म्हणता येईल.–३–तथापि, ज्ञानेश्वरीत त्यांनी उपास्य या नात्याने कोणत्याही देवदेवतेविषयी–शंकराविषयीहि – पक्षपात दर्शविलेला नाही. ते नाथपंथी असल्यामुळे त्यांची उपास्य देवता गुरू हीच असावी.–४–ज्ञानेश्वर हे पंढरपूरच्या विठोबाला आपली 'उपास्य–देवता' मानीत होतेसे वाटत नाही. मात्र ज्ञानेश्वरीत पंढरीचा उल्लेख प्रत्यक्ष नावाने नसला तरी, काही ओव्यांवरून पाहता ते वर्णन पंढरीला लागते हा युक्तिवाद मार्मिक वाटतो. अठराव्या अध्यायात—" एक प्रदक्षिणा जपांचिया । बाहेरूनी करिती यया । एक हे श्रवणमिषे छाया । सेविती

ययाची ।। एक ते अवधानाचा पुरा । विडा पाऊड भीतरा । घेउनी रिघती गाभारा । अर्थज्ञानाच्या ॥ ते निजबोधें उराउरी । भेटती आत्मया श्रीहरी । परी मोक्ष प्रसादी सरी । सर्वांहि आधी '' ।। गीतारूपी वैष्णवमंदिराचे हे वर्णन पंढरपूरच्या विठ्ठल-मंदिराला साजेसेच आहे. देवाशी ' उराउरी ' भेट ही पंढरपुरातच घडते म्हणतात. पण याहिपेक्षा माझे स्वतःचे एक वेगळे कारण असे की, ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत व आई रुक्मिणीबाई ही नावे काय दर्शवितात ? ५. तथापि ज्ञानेश्वरांच्या नावावर प्रसिद्ध असलेले अभंग ज्ञानेश्वरीकर्त्या ज्ञानदेवांचेच आहेत की नाहीत याविषयी मात्र माझे मन निःशंक नाही. एक तर अभंगादिकांची बाडे संशोधन न करता जशीच्या तशी आपल्या इकडे छापली जातात. त्यामुळे ज्ञानेश्वरांनीही काही अभंग रचले असल्यास ते नक्की हुडकून काढणे कठीण. आजाचे नाव नातवालाहि ठेवण्याची प्रथा आहे. मग इतक्या वर्षांत ज्ञानेश्वर नामधारी कोणी दुसरा अभंगकार झालाच नसेल असे नाही. ज्ञानेश्वर हे विशिष्टदेवतोपासक नव्हते हे माझे मत वर सांगितलेच आहे.

## अपूर्व महत्त्व

हे सर्व वाद सोडून देऊन, आहेत असे ज्ञानेश्वर व आहे अशी ज्ञानेश्वरी घेतल्यास त्यांचे अपूर्व महत्त्व ( १ ) लौकिक-व्यावहारिक आणि ( २ ) आध्यात्मिक या दोनही दृष्टींनी कोणालाही पटण्यासारखेच आहे. म्हणून त्याचा क्रमाने विचार करू.

प्रथम ज्ञानेश्वरीचे ऐतिहासिक महत्त्व हे की, ती लिहिली जाण्याच्या काळी महाराष्ट्रात स्वतंत्र मराठी यादव राज्य नांदत होते, हे स्वतः ज्ञानेश्वरीच्या शेवटी सांगितलेच आहे. यानंतर फारच थोड्या वर्षांत रामदेवराव यादवाचे राज्य मुसलमानांनी घेतले, व पुढे तोच प्रसंग विजयनगरच्या राज्यावर आला. पण पुढे लवकरच शिवशाही प्रस्थापित झाली. नंतर पेशवाई होऊन गेली. नंतर आज आंग्ल ' शाही'हि हिंदुस्थानास राजकीय स्वातंत्र्य मिळणार यामुळे, नष्ट होण्याचा काळ आला. अशा रीतीने यादवशाही, मुसलमानशाही, शिवशाही, पेशवेशाही व आंग्लशाही इतक्या ' शाह्या ' नष्ट झाल्या तरी ज्ञानेश्वरशाहि मात्र अखंड अबाधित राहिली आहे. हा कशाचा प्रभाव ? म्हणून, राजकीय स्वातंत्र्य भोगणाऱ्या जुन्या पिढीची सांगड ते फिरून भोगणाऱ्या नव्या पिढीशी घालून देणाऱ्या ज्ञानेश्वरीला राजकीय ऐतिहासिक महत्त्व उघडच येते.

यानंतर ज्ञानेश्वरांच्या व्यक्तिविषयक महत्त्वाचा विचार करू. ते महत्त्व लक्षात येण्याला त्यांच्या बाळपणाचा वृत्तान्त लक्षात घ्यावा. तो वृत्तान्त सर्व छळाचा आहे. ज्ञानेश्वरादी चार भावंडांच्या वडिलांवर, कडव्या ब्राह्मण धर्मन्यायाधिशांनी, बहिष्कार घालून प्रायश्चित्तारिता देहविसर्जन सांगितले. त्याप्रमाणे विठ्ठलपंत व रुक्मिणीबाई

यांनी गंगा नदीत जीव दिला. अर्थात ही चार मुले अल्पवयात अनाथ झाली. असे असता निवृत्तिनाथाच्या पुढारीपणाखाली ज्ञानदेवांनी अध्ययन करून गाढ विद्वत्ता संपादन केली, व अगदी अल्पवयात ज्ञानेश्वरी व अमृतानुभव असे ग्रंथ लिहिले. ही गोष्ट काय दर्शविते ? एका टोकाला ती दुर्दशा ! वा दुसऱ्या टोकाला हे मान्यता-वैभव ! व्यक्तिविभूतिमत्त्वाची याहून दुसरी खूण कोणती ? दुसरेहि एक तत्त्व यावरून सिद्ध होते. ते असे–' जगात ज्याचा जितका छळ तितके त्याला बळ ! ' ' Blood of the Martyr is the seed of the Church ' ही इंग्रजी म्हणहि तेच दर्शविते. ' धर्मछळात मेलेल्या प्रत्येक हुतात्म्याच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबागणिक धर्म-यशस्वितेचा एक एक नवा वृक्ष उगवतो ' या म्हणीचे प्रत्यंतर सर्व जगभर आलेलेच आहे.

## मराठी भाषेवर उपकार

यानंतर मराठी भाषेवर ज्ञानेश्वरांनी केलेले उपकार काय आहेत हे पाहू. केवळ भाषिक दृष्टीने पाहता मराठी भाषेच्या इतिहासाची अनेक साधने ज्ञानेश्वरीत मिळतात. सहाशे वर्षांपूर्वी व्याकरण कसे होते, शब्दप्रक्रिया काय होती हे साधार समजते. विशेषतः आजच्या पिढीला सुमारे आठदहा हजार नव्या, म्हणजे उपयोगात नसलेल्या, शब्दांची संपत्ती लाभते. मी प्रथम ज्ञानेश्वरी वाचली तेव्हा प्रत्येक ओवीत निदान एक व केव्हा दोन-तीनहि अपरिचित शुद्ध मराठी शब्द मला आढळले. हे शब्द नव्या शब्दकोशात समाविष्ट झाल्यास त्यांचा उपयोग बहुधा होऊ लागेल. आणि आंग्लभाषाग्रस्त, पण अनेक प्रकारचे नवे ज्ञान आत्मसात करू पाहणाऱ्या, नव्या मराठी पिढीला शब्दसाहाय्य फार होईल. जुन्या वाङ्मयात सुश्लिष्ट समर्पक नादमधुर असे शब्द किती तरी आहेत ! केवळ अपरिचितत्वामुळे आपण त्यांना मुकतो ज्ञानेश्वरीच्या वाढत्या अभ्यासाने ही मोठी शब्दसंपत्ति आपणाला व्यवहारात आणता येईल

पण मराठी भाषेत लिहिलेल्या या गीताभाष्याचे महत्त्व आणखी वेगळेच आहे. ते असे की, ज्ञानेश्वरांनी धार्मिक वाङ्मयलेखनाच्या रीतीत एक क्रांतीच केली. पूर्वी ग्रंथ म्हटला म्हणजे तो, विशेषतः शास्त्रग्रंथ, संस्कृत भाषेतच लिहिला जाई. म्हणजे तो पंडितांनीच लिहावयाचा व पंडितांकरिताच लिहावयाचा. याने समाजाच्या एकाच व लहानशाच भागाची सेवा होई. पण आज महाराष्ट्राभिमानी देशभक्ताला, इंग्रजीतून लिहिण्या बोलण्याचे सोडून, ते समाजाच्या कल्याणाकरिता मराठीतून करावे असे वाटते, तसेच पूर्वी संस्कृत सोडून मराठीतून लिहावे असे ज्ञानेश्वरांना वाटू लागले होते. ' वेद हे जितके एका दृष्टीने उदार तितकेच दुसऱ्या दृष्टीने कृपण ' असे ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे वेद हे स्वतः सर्वज्ञानपूर्ण म्हणून उदार; परंतु समाजातील वरच्या तीन

वर्णांच्याच उपयोगी पडणारे, आणि चौथ्या वर्णाला दूर ठेवणारे म्हणून कृपण अशी नाजूक निंदा त्यांनी केली आहे व ती योग्यच आहे. वेदांचे रहस्य चवथ्या उपेक्षित शूद्र वर्णाला प्राप्त करून देण्याचा पायंडा प्रथम गीतेने घातला हे खरे. तथापि फिरून तो ग्रंथहि संस्कृतातच ! यामुळे कोणी तरी धीटपणे पुढे येऊन मराठीतून धर्मग्रंथ शास्त्रग्रंथ लिहिण्याचा पायंडा पाडून एक प्रकारची क्रांती करायला हवी होती ती ज्ञानेश्वरांनी केली. औषध वैद्याघरच्या पोतडीतून बाहेर पडून अधिकाराने हाताशी उपलब्ध आहे, पण ते कुलूपबंद पेटीत असले तर काय उपयोग ? तथापि क्रांतीला लोकमत अनुकूल करून घेण्याला जसे धैर्य-धारिष्ट तसेच तत्त्वज्ञान व युक्ती याचेही पाठबळ लागते. म्हणून इतिहासातील कोणत्याही काळी कोणत्याही देशात क्रांतिकारक हा जाणूनबुजून परोपरीने आपल्या क्रांतीचे समर्थन करताना आढळतो. ज्ञानेश्वरीत याच दृष्टीने, ज्ञानदानाकरिता मराठी भाषेच्या बोधमाध्यमाचा उपयोग केल्याचे समर्थन केले आहे. जणू काय त्यांचे मन त्यांना या क्रांतीबद्दल जाणवीत असावे. ही क्रांती त्यांनी सहेतुक मुद्दाम केली होती परंतु क्रांतीविषय जी मराठी भाषा तीही तशीच श्रेष्ठगुण आहे असे समर्थनहि त्यांनी उघड छातीठोकपणे केले आहे. याविषयी ज्ञानेश्वरीच्या निरनिराळ्या अध्यायांतून आलेले काही उल्लेख या ठिकाणी देतो. ते असे :–

## मराठीच्या श्रेष्ठत्वाचे समर्थन

माझा मऱ्हाटाचि बोल कौतुकें । परि अमृतातेंहि पैजा जिंके ।
ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ।।
जिये कोंवळिकेचेनि पाडें । दिसती नादींचे रंग थोडे ।
वेधें परिमळाचें बीक मोडे । जयाचेनि ।।
(अ. ६, ओ. १४-१५ )

हें असो शब्दब्रह्म जिये बाजे । मावळलिया निवांतु निजे ।
तो गीतार्थु मऱ्हाटिया बोलिजे । हा पाडु काई ।।
( अ. ९, ओ. २२ )

देशियेचेनि नागरपणें । शांतु शृंगारातें जिणें ।
तरी ओंविया होती लेणें । साहित्यासी ।।
मूळ ग्रंथाचिया संस्कृता- । वरी मऱ्हाटी नीट पढतां ।
अभिप्राय मानलिया उचिता । कवण भूमि हें न चोजवे ।।
जैसें अंगाचेनि सुंदरपणें । लेणिया‍सी अंगचि होय लेणें ।
तेथ अलंकारिलें कवण कवणें । हें निर्वचेना ।।
तैसी देशी आणि संस्कृत वाणी । एका भावार्थाच्या सुखासनीं ।
शोभती आयणी । चोखट आइका ।।

उठाविलिया भावा रूप । करिता रसवृत्तीचें लागे वडप ।
चातुर्य म्हणे पडप । जोडलें आम्हा ॥
तैसें देशियेचें लावण्य । हिंरोनी रसा आणिलें तारुण्य ।
मग रचिलें अगण्य । गीता-तत्त्व ॥ ( अ. १०, ओ. ४२-४७ )

अहो वधुवराचिये मिळणीं । जैशीं वराडियाही लुगडीं लेणीं
तैसें देशियेच्या सुखासनीं । मिरविले रस ॥
तीरें संस्कृताची गहनें । तोडोनि मऱ्हाटिया शब्द-सोपानें ।
रचिलीं धर्मनिधानें । श्रीनिवृत्तिदेवें ॥
म्हणोनि भलतेणें एथ सद्भावें नहावें । प्रयाग माधव विश्वरूप पाहावें ।
येतुलेनी संसारासी द्यावें । तिळोदक ॥
( अ. ११, ओं. ९-१० )

एथ अर्जुनचि काय म्हणों पातला । आवडत याही सुकाळु जाहला ।
जे गीतार्थु आला । मऱ्हाटिये ॥
( अ. ११, ओं. १४ )

साहित्य-सोनियाचिया खाणी । उघडवी देशियेचिया अक्षौणी ।
विवेकवल्लीची लावणी । हों देईं सैंघ ॥
ये मऱ्हाटियाचिया नगरीं । ब्रह्मविद्येचा सुकाळु करी ।
घेणेंदेणें सुखचि वरी । हों देईं या जगा ॥
( अ. १२, ओं. १२ व १६ )

तो कृष्णार्जुनसंवादु । नागरी बोलीं विशदु ।
सांगोनि दावूं प्रबंधु । वोंवियेचा ॥
दावूं वेल्हाळ देशी नवी । जे साहित्यातें वोजावी ।
अमृतातें चुकी ठेवी । गोडसपणें ॥
( अ. १३, ओ. ११५४-११५६ )

आणि तोचि हा मी आता । श्रीव्यासाचीं पदें पहाता ।
आणिला श्रवणपथा । मऱ्हाठिया ॥ ( अ. १८, ओ. १७०८ )

संस्कृत भाषा सोडून मराठीचा स्वीकार करावयाचा तर ती मराठी नियमबद्ध, समृद्ध, चित्ताकर्षक व बोधप्रद झाली पाहिजे. आणि आपण ती तशी करूं असे आश्वासन, आत्मविश्वासपूर्वक, ज्ञानेश्वरांनी वाचकांना दिले तशाच प्रकारचे आश्वासन नव्या पिढीच्या साहित्यिकांनी, इंग्रजी संस्कृति सोडून नव्या भाषा संस्कृतीचा स्वीकार करावयाचा तर, राष्ट्रातील जनतेला देण्याची उमेद बाळगिली पाहिजे.

गौ. म....२

## कवि या नात्याचे स्थान

यानंतर साहित्यगुणाच्या दृष्टीने विचार करतां कोणालाहि हे कबूल करावे लागेल की, ज्ञानदेवांचे कवी या नात्याचे स्थान केव्हाही अढळच राहील. प्रथम थोडी सविनय सलगी करून मी हे म्हणू इच्छितों की, गीताभाष्यच खरें, पण ते कवितारूपाने लिहितांना आपण 'कवी' आहो हा सात्त्विक मानवी अभिमान संत झाले तरी ज्ञानेश्वराच्या मनात जागृत होता. सर्वच संतकवींना हे शब्द लागू पडतील. वास्तविक ज्याला निवळ धर्मोपदेशच करावयाचा त्याला पद्याचीच काय गरज ! तें कार्य गद्यानेहि करता येइलच. पण संतकवी हा धार्मिक दृष्ट्या संत असला तरी साहित्य दृष्ट्या अहंकारी कवीच असतो. एरवी अमुक इतक्या चरणाचे वृत्त किंवा छंद, यमक इत्यादी बंधने तो आत्मोद्‌गाराला का स्वीकारील ? भर्तृहरीला जो एकेक विषय सांगावयाचा होता त्याला शतकच—मोजके शंभर श्लोकच—का आवडले ? नव्याण्णव नाही की एकशे एक नाही ! शंकराचार्यांसारखे संन्यास घेऊन इतर सर्व बंधने तोडणारे, त्यांना 'पद्यबंधनात्मक' स्तोत्रेच का इष्ट वाटावी ? शिवाय त्यांतली काही सयमकहि का रचावी ! आणि अष्टके म्हटली म्हणजे त्यांत आठच श्लोक का असावे ? तसेच आमचे नव्या पिढीचे कवी. सुनीताचा प्रकार त्यांना कोण आवडता ? इंग्रजीत चौदा ओळींच्या कवितेचा एक प्रकार आहे म्हणून त्याचे अनुकरण यांनी केले ! बरोबर चौदाच ओळी असायच्या ! म्हणजे पंधरा नाही की तेरा नाहीत ! अर्थात हे सर्व स्वीकृत कविभूमिकेचे खेळकर चाळे किंवा छंद होत. याचा बोध इतकाच घ्यावयाचा की, अद्वैतवादी ज्ञानसंपन्न सिद्ध किंवा स्थितप्रज्ञ झाले तरी व्यवहारात ती सात्त्विक का होईनात, पण मनुष्येच असतात ! या खेळकरपणाच्या छंदाच्या दृष्टीने मला असेहि वाटते की, ज्ञानेश्वरीचा अध्याय शेवटचा अठरावा म्हणून अठरा या आकड्याची गंमत साधण्याकरिता ज्ञानेश्वरांनी बरोबर अठराशेव्या ओवीवर खरी ग्रंथसमाप्ति केली. ही ओवी अशी आहे :—

'आणि ग्रंथाचे जीवियें । विशेषी लोकीं इयें । दृष्टादृष्ट विजयें । होआवें जी ।।

'जी' या अक्षराने खरी ग्रंथसमाप्ति वाटते. यापुढे आणखी दहा ओव्या आहेत, पण त्यांत वेगळा विषय आहे.

ज्ञानेश्वरांचे कवि या नात्याचें श्रेष्ठत्व अनेक गोष्टींनी दिसून येते :—१. ज्ञानेश्वरी ही गीतेवरील टीका असली तरी केवळ प्रतिशब्दार्थ सांगणारी नाही. भाष्यात त्यांची स्वतंत्र अशी विवेचनशक्ती पुष्कळच दिसून येते. कवीला लागणारी ही त्यांची प्रज्ञा होय. २. फार थोड्या शब्दांत पुष्कळ अर्थ सांगण्याची कला त्यांना पूर्णपणे हस्तगत झालेली दिसते. शब्दाच्या बाबतीत मितव्ययित्व—पाल्हाळ टाळून बोलणे—हा एक मोठा साहित्यगुण आहे व काव्यात तर तो फारच उपयुक्त असतो. अल्पाक्षर पद्य ( उदाहरणार्थ, तुकारामाचे अभंग ) हे मोठे सामर्थ्यवान व प्रभावी असते. जसा

दोरी लावलेला ताठ तीरकमठा-धनुष्य. ३. ज्ञानेश्वराना वाचेची वाणीची योग्यता पटलेली होती, आणि रसिकत्व म्हणजे काय याचेहि उत्तम ज्ञान त्याना होते. रसिकाने काव्यसेवन कसे करावें याविषयी ते म्हणतात– 'जैसे शारदीयेचे चंद्रकळे। माजी अमृतकण कोवळे। ते वेचित मनें मवाळें। चकोरतलगे ॥ तियेपरी श्रोता। अनुभवावी हे कथा।' ( हे कथा म्हणजे उपलक्षणाने 'कोणतेहि' काव्य असेच म्हणाना ! )– अति हळुवारपण चित्ता। आनुनिया ॥ हें शब्देविण संवादिजे। इंद्रियां नेणता भोगिजे। बोलाआदि झोंबिजे। प्रमेयासी ॥ जैसे भ्रमर परागु नेती। परी कमळदळें नेणती। तैसी परी आहे सेविती। ग्रंथीं इये ॥ ( अ. १–५६ ते ५९ ) तसेंच पंधराव्या अध्यायाच्या प्रारंभी त्यानी वाचेचें गुणवर्णन कसें केलें आहे तें पाहा.— 'ब्रह्मीचे विसरणे वरी। उन्मेष लाहे उजरी। जे वाचे ते इये करी। सुधासिंधु ॥ पूर्ण चंद्राचिया कोडी। वृक्तृत्वा धांपे कुरोडी। तैसी आणी गोडी। अक्षरातें ॥ सूर्यें अधिष्ठिली प्राची। जगा राणीव दे प्रकाशाची। तैसी वाचा श्रोतयां ज्ञानाची। दिवाळी करी ॥ नादब्रह्म खुजे। कैवल्यहि तैसे न सजे। ऐसा बोलु देखिजे। जेणें दैवे ॥ ( अ. १५ ओं. १० ते २६ ). इत्यादि.

ज्ञानेश्वरीत साहित्यशास्त्रातले काही काही शब्द आले असले तरी ते घेवून 'हे पहा ज्ञानेश्वरीतले साहित्यशास्त्र !' असे प्रतिपादणे चुकीचे होईल. उदाहरणार्थ शांतरस हा एक श्रेष्ठ रस आहे असे ज्ञानेश्वर मानीत असले, व त्याचा उपयोगहि आपण करीत आहो ही जाणीव त्याना असली, तरी त्या रसाची शास्त्रीय व्याख्या किंवा चर्चा ते करीत नव्हते. तसेच 'श्लेष' हा एक तरी शब्द असा आढळतो की तो ज्ञानेश्वरीत साहित्यशास्त्राहून वेगळया अर्थाने उपयोजिलेला आहे.

## ज्ञानेश्वरांची प्रतिभा

आता ज्ञानेश्वराच्या प्रतिभेकडे वळू. मी तर असे म्हणतो की ज्ञानेश्वराची बरोबरी करणारा प्रतिभासंपन्न कवी गेल्या सहाशे वर्षांत झाला नाही, व आजही नाही. प्रतिभा ही रस आळविण्यापेक्षा अलंकाराच्या योजनेतच अधिक दिसून येऊ शकते. रसनिष्पत्ति ही सहृदयत्वावर अवलंबून असते. आणि ती सर्वस्वी निरलंकृत अशा शब्दातून होऊहि शकते. ते कार्य स्थायीभाव ( भावना ) आळविण्याचे आहे. उलटपक्षी अलंकरणादि कार्य हे कल्पनाशक्तीच्या सामर्थ्यावर अवलंबून असते. प्रतिभेची व्याख्याच अशी आहे :– 'नवनवोन्मेष शालिनी प्रज्ञा प्रतिभा' प्रतिक्षणी नवा नवा उन्मेष करणारी तरी पण प्रज्ञाच–म्हणजे बुद्धिच. तथापि हे उन्मेषकार्य प्रज्ञा कल्पनाशक्तीच्या सहाय्यानेच करते. ज्ञानेश्वरी हे गीताभाष्य असल्यामुळे त्यात सर्वत्र अनुस्यूत असा एकच रस व तो शांत होय. तो पूर्णपणे आळविण्यास त्याना स्वतः ग्रंथविषयाचेच वाटेल तितके साहाय्य होते. तथापि ज्ञानेश्वरी ग्रंथ हा

गीतेच्या अंगावर घेतलेला, व तिचे अंगरक्षण करणारा असला तरी अंगाचा सर्व बांधेसूदपणा यथार्थ प्रकट करून त्याबरोबर शोभा निर्माण करणारा असाहि अंगरखा आहे. कुशल शिंप्याचा गुण हाच असतो. तो अंगरखा असाच करतो की मूळ अंगाचे आकृतिवैशिष्ट्य तर बदलत नाही, किडकोळ तो फुगीर व फुगीर तो किडकोळ असे दिसू देत नाही. पण हे संभाळून, किंवा ते संभाळण्याला सहाय्यभूत म्हणूनहि, साधेल तेथे कलाकुसरीचेहि काम करितो. हे करण्यास प्रतिभा लागते. प्रज्ञेचा गुण स्थायीपणा व प्रतिभेचा गुण चंचलता चवचालपणा. जसा ब्रह्मरूप मूळ पुरुष स्थिर स्थितप्रज्ञ असतो, आणि चंचलतेचे चवचालपणाचे कार्य 'प्रकृती' वर सोपविले जाते, त्याच न्यायाने स्थिरस्वरूपी बोधाचे इष्ट कार्य चंचलस्वरूपी प्रतिभेवाचून उज्वल खेळकर कल्पनाशक्तीवाचून होवूं शकत नाही. ज्ञानेश्वरीतून हे प्रतिभाकार्य काढून टाकल्यावर बाकी काय उरते हे कोणासहि पाहाता येईल. शुद्ध बोध इष्ट खरा. पण निर्बुद्ध माणसाला तो पटविला गेला पाहिजे ना ? ते कार्य ज्ञानेश्वराच्या प्रतिभेतून निघणाऱ्या रूपक-उपमा-दृष्टांतादिकांनी केले आहे.

रूपकादिकांना उपमान-प्रमाण म्हणतात. त्यांचा उपयोग बुद्धीला जो विशेष होतो तो अपरिचिताचा परिचय करून देण्याचा. आणि परिचिताच्या साम्याने अपरिचिताचे ज्ञान करून देणे याचेच नाव उपमानप्रामाण्य. जगात प्रत्यक्ष प्रमाणाने ज्ञान फार थोडे होते. पुष्कळसे शब्दाने म्हणजे आप्तवाक्याने होते. तसेच पुष्कळसे अनुमानाने होते. परंतु काही गोष्टी अशा असतात की त्यांचे ज्ञान उपमादृष्टांत-रूपक इत्यादींशिवाय होतच नाही. उदाहरणार्थ, लहान मुलाने 'हत्ती हा कसा असतो' असे विचारले तर तो मोठ्या डुकरासारखा, पण सोंड अधिक लांब करावी म्हणजे झाले' असे सांगता येते. आपल्या इकडील लहान मुलाने 'पौर्णिमेचा चंद्र कसा असतो' असे विचारले तर 'लोण्याच्या गोळ्यासारखा' असे म्हटल्याने काम भागते. अपरिचिताची ओळख करून द्यायला समर्पक ठरेल अशी कोणती वस्तू घ्यावी हे ठरविण्यातच प्रतिभेचे यश असते. आणि हे यश ज्ञानेश्वरांनी इतके मिळविलेले दिसते की, त्यात त्यांचा हात कोणालाहि धरवणार नाही. अध्यात्मातले सर्वच विषय अपरिचित, केवळ बुद्धिगम्य, अमूर्त ! ते कधीहि प्रत्यक्षात येणारे नव्हत. म्हणूनच ते समजावून देण्याला आयास. ब्रह्म, माया, ईश्वर, प्रकृती, ज्ञान, अज्ञान, त्रिगुण, सिद्धावस्था, इत्यादी सामान्य मनुष्याला काय समजणार ? पण हे समजावून द्यायला तत्काळचे कविसंकेत—पण त्याहूनहि तत्काळचे सर्व विज्ञान व्यवहारज्ञान-हे आपल्या कार्याला, म्हणजे उपमाने व दृष्टांतविषय पुरविण्याला, ज्ञानेश्वरांनी जुपले आहे. समुद्र, प्रतिबिंब, स्वप्न, सुवर्ण, कमळ, आरसा, मृगजळ, सूर्य, चंद्र, आकाश, पतिपत्नी—तात्पर्य जो जो म्हणजे अशिक्षिताला माहीत असेल तो तो पदार्थ त्यांनी उपमेला घेतला आहे. पण घेताना तो त्यांनी साम्य व समर्पकता कशी सिद्ध केली

आहे हे पाहून त्याचे खरे कौशल्य पटते. त्यानी उपमा दृष्टांत देण्याला सुरुवात केली की, एकामागून एक अशा सरी येतात व बुद्धीवर जोराने भडिमार करतात की बोलायची सोय नाही. त्या देऊन जागा किती अडवावी ? नमुन्यादाखल मी दोन तीन उदाहरणे देतो. अध्याय २ व १२ यातील स्थितप्रज्ञतेची लक्षणे, अनन्यभक्ताची लक्षणे, याविषयीच्या उपमा पाहाव्या. ' वोखटें ना गोमटें । या काइसेयाहि न भेटे । राति देवो न घटे । सूर्य जैसा ।। जो खांडावया घावो घाली । का लावणी जेणें केली । दोघां एकचि सावली । दे वृक्ष जैसा ।। साहि ऋतु समानु । जैसे का हें गगनुं । तैसे एकचि मानु । शीतोष्णी जया ।। दक्षिणोत्तर मारुता । मेरू जैसा ।। माधुर्यें चंद्रिका । सरिसीच राया रंका । तैसा जो सकलिकां । भूतांसमू ।। जो निंदेते नेघे । स्तुतीते न श्लाघे । आकाशा न लागे । लेपु जैसा ।। तथा लाभे तोखे । अलाभेंहि न पारखे । पाउसेवीण न सुके । समुद्र जैसा ।। इत्यादि.

एकंदर ज्ञानेश्वरीत कमीत कमी दोन हजार तरी उत्कृष्ट उपमा सापडतील असे वाटते. काही काही उपमा त्याच त्या येतात व पुनरुक्तीने कंटाळवाण्या वाटतात हे खरे. पण काही ठिकाणी, एका मागून एक नव्या अशा उपमा तो उगीच विस्तार असे वाटले तरी प्रत्येक उपमेतला समर्पकपणा वेगळाच चढता असतो. ज्यांनी ज्ञानेश्वरीचा सूक्ष्म अभ्यास केलेला आहे ते प्रत्येक वेगवेगळया उपमेचे स्वारस्य वेगवेगळे दाखवू शकतात. नवव्या अध्यायात खालील उपमा आहेत–' माझेया विस्तारपणें नावे । हें जगचि नव्हे आघावे । जैसें दूध मुराले स्वभावें । तरी तेचि दही ।। का बीज झाले तरु । भांगारचि अलंकारु । तैसा मज एकाचा विस्तारु । तें हें जग ।। यातील पहिल्या दृष्टांतात दुधाचे दही होणे हा दृष्टांत, ब्रह्माचा विस्तार सृष्टीत परिणामवादाने होण्यापुरता ठीक आहे. परंतु सृष्टी परत ब्रह्मात विलीन होते त्याला लागू पडत नाही. यापेक्षा बीजवृक्षाचा दृष्टांत काही बरा; कारण वृक्षातून पुनः बीज निर्माण होते. परंतु सुवर्ण व अलंकार हा दृष्टांत त्याहूनहि समर्पक. ज्ञानेश्वरीची प्रवचने व कीर्तने चालतात तेव्हा अशा चर्चेची मौज पाहून घ्यावी !

## ज्ञानेश्वरांची धार्मिक वृत्ति

यानंतर ज्ञानेश्वराच्या धार्मिक वृत्तीकडे वळू. ज्ञानेश्वर अद्वैती होते याविषयी नागपूरचे प्रा. पेंडसे यानी ' ज्ञानेश्वराचे तत्त्वज्ञान ' या आपल्या ग्रंथात सविस्तरपणे विवेचन केले आहे. पण माझ्या मते इतक्या विस्ताराचे कारणच नव्हते. कारण ज्ञानेश्वर द्वैती होते असा चांगलासा पूर्वपक्ष फारसा कोणी केलेला आढळत नाही. अद्वैताप्रमाणे विशिष्टाद्वैती, शुद्धाद्वैती, पूर्णाद्वैती, केवलाद्वैती व उघड उघड द्वैती असे अनेक पंथ आहेत हे वेगळे. परंतु त्यांनीहि कोणी ज्ञानेश्वर हे अद्वैती नव्हते ते द्वैती होते, असे आग्रहाने प्रतिपादल्याचे आढळत नाही. पण तत्त्वाने अद्वैती

असणारा हा भक्त असू शकतो. द्वैत नाही तर मग उपास्य व उपासक हा भेद कसा हा आक्षेप सहजच येतो. पण अद्वैत ' वाद ' हा अंतिम स्वरूपी बुद्धिगम्य विषय आहे. त्यामुळे प्रत्यक्ष व्यवहारात व त्यापुरते निर्गुणाला सगुण मानून, कोणत्या तरी रूपाने उपास्य कल्पून, त्याची भक्ती करणे हे विसंवादी ठरत नाही. श्रीशंकराचार्य हे सर्व विश्व व संसार मायामय व मिथ्या असे प्रतिपादणारे, पण तेहि भक्त व उपासक होते. सगळे जग मिथ्या असेल तर त्यात आपणहि आलो, व आपली पूजा ही अंतिमस्वरूपी मिथ्या असली तरी काय हरकत, असे म्हणणारेच ते असावे. त्यांचे देवतार्चन होते. त्यांनी सगुणवर्णनपर स्तोत्रे केली आहेत. तसेच ते संन्यासी व संन्यासवादी असता, त्यांनी हिंदुधर्मरक्षणार्थ सर्व भरतखंडभर संचार करून चारहि दिशांना मठ स्थापून वीरवृत्तीने धर्म-नाकेबंदी केली. बौद्धांशी वाद करून वैदिक धर्मांची स्थापना केली. हे जसे अद्वैत-ज्ञानाशी विसंगत नाही तसेच अद्वैतवादी असता उपास्य-उपासक, गुरु-शिष्यभेद ज्ञानेश्वरांनी मानणे हेहि विसंगत नाही.

१. ज्ञानोत्तर काही कर्म नाही. २. ज्ञानोत्तर इतर कर्म नाही पण भक्ती कर्म उरतेच. ३. ज्ञानोत्तर लोकसंग्रहार्थ वर्णाश्रमपर कर्म उरतेच. असे तीन पक्ष दिसतात. प्रत्यक्ष व्यवहारात या तीनहि पथांच्या पुरस्कारकर्त्यांनी कर्मच केले. यामुळे टिळकांचे मतच ग्राह्य ठरते. वाद असेल तो इतकाच की स्वतः गीतेचा अभिप्राय काय आहे ? पण गीतेच्या उपक्रमोपसंहारावरून काय ठरते ? सर्व गीताभर निःष्क्रियकारक अद्वैत सांगून अर्जुनाला अद्वैतपदावर आणला व तो का ? प्रथम अद्वैतोपदेश करून विश्वदर्शनापर्यंत मजल नेल्यावर युद्धाच्या सुरुवातीला नसला तरी, आता विश्वरूपदर्शन झाल्यावर अर्जुन 'ज्ञानी' होण्याचा शिल्लक तो काय उरला ? मग असे असता फिरून, आपल्या व त्याच्या कार्याकरिताच, श्रीकृष्णाने त्याजमध्ये सगुणरूप दर्शनाची व द्वैताची आवड उत्पन्न केली असे ठरत नाही काय ? मग जे कार्य कृष्णाला इष्ट होते त्याच प्रकारचे कार्य सामान्य मनुष्यप्राण्यालाहि त्याच्यापुरते इष्ट असतेच. मग ते कर्म करण्याला बुद्धिगम्य ज्ञानाची आडकाठी का यावी ?

## कर्म हे प्राप्तच ठरते

शिवाय केवळ बुद्धिगम्य ज्ञानाने मनुष्याला पूर्णता येत नाही, किंवा त्याची भूक भागत नाही. कारण बुद्धीप्रमाणे भावना हा एक मोठा महत्त्वाचा मानवी घटक आहे. म्हणून भावनेचा उत्कर्ष करण्याइतके आकर्षकत्व ज्यामध्ये आहे असे काही तरी ध्येय मनुष्याला लागतेच. मग कोणाला परिस्थितीनुरूप ते ध्येय आपल्या सगुण देश-भक्तीत लाभो, कोणाला ते सगुण देवभक्तीत लाभो. ' ज्ञानोत्तर काय ? ' याचे उत्तर ' काही नाही ' असे म्हणणे वाईट दिसते म्हणून ' ज्ञानोत्तर रोकडा मोक्ष, दुसरे काही नाही ' असे उत्तर देण्याची रीत आहे. परंतु मोक्ष याचा तरी अर्थ काय ? भूतप्रकृती

आपली सुटका परात्पर पुरुषापासून करून घेते तो मोक्ष ( बंधनापासून सुटका ) असेल, तर प्रकृतिधर्माप्रमाणे कर्म हे प्राप्तच ठरते. देह शिल्लक असेल तोपर्यंत त्रिगुणात्मक प्रकृतीचे कार्य चालणारच. मग कर्म केल्याने कार्य कसे बिघडले ?

मोक्षासंबंधी शिवगीतेत म्हटले आहे की ' मोक्षस्य न हि वासोस्ति न ग्रामांतर-मेव वा ' म्हणजे मोक्षाचे एखादे राखीव घर किंवा निवासमंदिर नाही. किंवा मोक्ष या नावाचा एखादा गावहि नाही की उठून तेथे गेल्याने तो मिळेल. तर मोक्ष हा, तुकारामाच्या मरणाप्रमाणे, याच देहीं याच डोळा अनुभविण्याचा आहे, व तो निष्क्रियता-रूपाने नव्हे तर कर्मरूपाने. एक ग्राम्य उदाहरण घ्यावयाचे तर असे, मुंबई नावाच्या शहराचा मोह व लोभ अगदी दूरच्या खेडेगावच्या लोकांना असतो. पण त्यांना त्या शहराला जाणे घडू शकत नाही. तेव्हा अशा एखाद्या संबंधाने आपण म्हणतोच की त्याने गावच्या गावी बसून ' जिवाची मुंबई केली ! ' याचा अर्थ मुंबईत मिळणाऱ्या काल्पनिक सुखासारखी सुखे आपल्या गावीच बसून भोगली. तीच गोष्ट मोक्षाचीहि समजावी. मोक्ष म्हणजे देहपतन नव्हे. आणि देहधारित्व म्हटले की सक्रियत्व आलेच. म्हणूनच शंकराचार्यांनी धर्मस्थापनेचे, ज्ञानेश्वरांनी धर्मोपदेशाचे, व टिळकांनी देशसेवेचे कर्म केले. ज्ञानेश्वरीत म्हटलेच आहे की, ' मोक्ष दुरराध्यू कीर होय । परि तोहि आराधी तुझे पाय । म्हणोनी धाडिसी तेथें जाय । पाइकू जैसा ॥ मोक्ष हा ईश्वर पाठवील तेथे चाकरासारखा जातो. अर्थात ज्याचे सत्कर्म ईश्वराला रुजू असेल त्याच्या-कडे बसल्याजागी मोक्ष, ईश्वराच्या आज्ञेने, चालत येतो असे का न म्हणावे ?

## सत्कर्मांची उतारपेठ

ज्ञानेश्वरांनी असेहि म्हटले आहे की, भक्तिभावाने प्रेरित झालेल्याला तीर्थयात्रादीहि करण्याचे कारण नाही. ते म्हणतात–' तीर्थे बाह्यमळु क्षाळे । कर्में अभ्यंतर उजळे । एवं तीर्थे जाण निर्मळें । सत्कर्मेंची. ( १८-१६० )

मोक्ष देउनि उदार । काशी होय कीर ।
परि वेचणें लागे शरीर । तिये गावीं ॥ १२-१७३
हिमवंतु दोष खाये । परि जीविताची हानि होये ।
तैसें शुचित्व नोहे । सज्जनाचे ॥ १७४
शुचित्वे शुचि गांग होये । आणि पाप तापहि जाये ।
परि तेथे आहे । बुडणें एक ॥ १७५
खोलिये चारु नेणिजे । तरी भक्ती न बुडिजे ।
रोकडाचि लाहिजे । न मरतां मोक्षु ॥ १७६
संताचे नि अंगलगे । पापातें जिणणें गंगे ।
तेणें संतसंगें । शुचित्व कैसे ॥ १७७

सत्कर्मांची ही उतारपेठ मध्यवर्ती अशी आहे. ज्ञानी मनुष्य खाली व्यवहाराकडे निघाला तर त्याला या मधल्या मुक्कामाला यावे लागते. आणि अज्ञानी मनुष्य वर ज्ञानप्राप्तीकडे निघाला म्हणजे त्याला येथे मधला मुक्काम करावा लागतो. म्हणून या मुक्कामातली रहदारी कधीच संपत नाही. ज्ञान्याची लक्षणे काय, योग्याची लक्षणे काय, भक्ताची लक्षणे काय–ही सांगावयाची झाली तर ती शेवटी गीताध्याय २ व १२ यांत सांगितल्याप्रमाणे, साम्याची बुद्धी व दृष्टी लाभलेल्या मनुष्याच्या आचरणाच्या उदाहरणांनीच सांगावी लागतात. त्यांत भेद पडत नाही. स्थितप्रज्ञ हा, १ ज्ञानी २ भक्त व ३ कर्मयोगी या सर्वांचा समान प्रतिनिधी आहे. आणि जगातल्या कोणत्याहि देशातल्या तत्त्ववेत्यांनी नीतीची लक्षणे सांगितलेली पाहिली तरी ती वरीलप्रमाणेच निघतात. यावरून हेच ठरते की तत्त्वज्ञानाच्या सिद्धांतापेक्षा सक्रिय आचरणालाच अधिक महत्त्व आहे.

( सह्याद्री – जानेवारी १९४३ )

# स्वामी विवेकानंद

स्वामी विवेकानंद या थोर व्यक्तीविषयी भाषण करण्याचा योग प्रो. दामले ह्यांनी मला आणून दिला, याबद्दल मी आभारी आहे. आताच एका विद्यार्थ्याने भाषणात सांगितले की, अत्यंत गहन निराशेची अशी लाट आज तरुण पिढीवर आली असून, तिची बाधा न व्हावी म्हणून विद्यार्थिवर्ग अनेक करमणुकीच्या मार्गांचे अवलंबन करीत आहे ! रास्त प्रकारची व फारसा खर्च न पडणारी करमणूक करणे हा, निराशेची आठवण बुजविण्याचा एक मार्ग खरा. तथापि माझ्या मते तरुण विद्यार्थिवर्ग स्वामी विवेकानंदांसारख्या विभूतीच्या चारित्राचे मनन करील तर त्याची निराशा जाईल. इतकेच नव्हे तर त्याच्या हातून राष्ट्रोपयोगी कार्यहि हौसेने होईल.

तीसपस्तीस वर्षांपूर्वीचा काळ लक्षात घेता त्या वेळच्या तरुण पिढीच्या धार्मिक व आध्यात्मिक मनोरचनेचे एक प्रतीक म्हणून विवेकानंदांचे उदाहरण देण्याजोगे आहे. खुद्द बंगाल्यात ह्यापूर्वी राममोहन राय, केशवचंद्र सेन, यांसारखे धर्मप्रचारप्रवीण लोक होऊन गेले, पण माझ्या मते स्वामी विवेनंकादांची मनोरचना त्यांच्याहून अधिक स्पृहणीय व अधिक यशस्वीहि ठरली. राममोहन राय हे अत्यंत

विद्वान व धर्माचा तुलनात्मक अभ्यास करणारे होते, परंतु त्याचे बहुतेक कार्य विध्वंसक रूपाने व्हावे लागले. ते कार्य म्हणजे हिंदूंच्या सामाजिक दोषांचे प्रखर आविष्करण! हिंदुस्थानने पाश्चात्य संस्कृती स्वीकारावी इतका मोघम उपदेश त्यांनी केला. केशवचंद्र सेन हे भक्तिमार्गी असून प्रार्थनासमाज स्थापन करण्यास त्यांनी मदत केली; परंतु प्रार्थनासमाज ही धार्मिक संस्था यशस्वी का होऊ शकली नाही याची कारणे महाराष्ट्रातील लोकांना विदितच आहेत.

मी कदाचित असेहि म्हणण्याचे धाडस करीन की, विवेकानंदांचे गुरू रामकृष्ण परमहंस यांचेपेक्षादेखील विवेकानंदांचे यशअधिक मोठे. विवेकानंद न होते तर कदाचित रामकृष्ण परमहंसांची कीर्ती इतकी न पसरती. गुरूची सर्व आध्यात्मिक तपस्या समाधी लावून अध्यात्मसाक्षात्कार घेण्यात खर्च झाली; परंतु तिने व्यवहाराला फारशी मदत केली नाही. रामकृष्णांना मी उज्ज्वल दीपाची किंवा मशालीची उपमा देईन, तर विवेकानंदांना त्या मशालीने चेतविलेल्या दावानलाची म्हणजे वनविध्वंसक अग्नीची उपमा देईन! रामकृष्णांनी स्फूर्ती दिली, विवेकानंदांनी कार्य केले. मग शिष्याचे यश जर अधिक, तर गुरूची स्तोत्रे अशा शिष्याने गावी व अधिक नामस्मरणपूर्वक कोणतेहि कार्य करावे, याची जुळणी कशी होते? असे कोणी विचारील तर त्याला उत्तर हे की, गुरूचे स्तोत्र गाणे हा गुरूला शाबासकी देण्याच्या धिटाईचा एक विनयपूर्ण प्रकार आहे. शाबासकी वडील माणसाने लहानाला द्यावी ही अनुलोम पद्धती खरी; परंतु काही काही शिष्य आपणाकडे लहानपणा घेऊन गुरूलाच मोठा करून दाखवितात. याविषयी ना. गोखल्यांना आपले गुरू म्हणणाऱ्या म. गांधींचे उदाहरण सहज सुचण्यासारखे आहे.

असो. विवेकानंदांचे चरित्र आपण पुष्कळांनी वाचलेच असेल. जन्म १८६२ साली. मृत्यू १९०२ साली. मिळून अवघ्या ४० वर्षांत त्यांनी लोकयात्रा संपविली. त्यांचे वडील एक वकील ( अटर्नी ) होते; परंतु आजे संन्यासी झाले होते. मध्यंतरी एक किंवा अनेक पिढ्या टाकून मागील पूर्वजांचे काही गुण पुढील वंशजांमध्ये आढळतात असे म्हणतात, त्याचे हे उदाहरण असेल काय? बी. ए. च्या परीक्षेला तत्त्वज्ञान या विषयाचा अभ्यास करीत असता विवेकानंदांनी पत्रद्वारे हर्बर्ट स्पेन्सर यांचेशी वादविवाद केला. तथापि कॉलेजातून बाहेर पडताना स्वतः ते अज्ञेयवादीच राहिले; पण पुढे कायद्याच्या अभ्यासाला लागण्यापूर्वीच त्यांची व रामकृष्ण परमहंस यांची गाठ पडली. गुरूला आवडता शिष्य भेटला. शिष्याला आवडता गुरू भेटला व त्यांच्या जीवनचक्राला वेगळी दिशा लागली. हिमालय, तिबेट वगैरे भागांत काही थोडे योगसाधन केल्यावर स्वामीजी हिंदुस्थानात संचारार्थ निघाले.

१८९२ किंवा ९३ साली ते मुंबई-पुण्याच्या बाजूला आले होते; पण तेव्हा

ते मुळीच प्रसिद्ध नव्हते. त्या वेळी मी सातारा येथे एलएल. बी. चा अभ्यास करीत होतो. उन्हाळयाचे सुटीत साताराची काही वकील मंडळी महाबळेश्वरला गेली होती; ती परत आल्यावर सांगू लागली की, " कोणी एक तरुण तेजस्वी बंगाली संन्याशी आम्हाला भेटला. त्याचे इंग्रजी वक्तृत्व अत्यंत सुंदर, मोहविणारे असून, तत्त्वज्ञान-विषयक विचार फारच उमदे व शहाणपणाचे भासले. सातान्यास येण्याविषयी आम्ही त्याला निमंत्रण केले आहे. " पण अखेर ते आले नाहीत; यामुळे त्यांना समक्ष पाहण्याचा योग मला लाभला नाही.

असो. हा संचार करीत करीत स्वामी दक्षिणेकडे त्रिवेंद्रम येथे व तेथून मद्रासला गेले. शिकागो ( अमेरिका ) येथे भरणाऱ्या धार्मिक विश्वपरिषदेची बातमी तिकडे नुकतीच आली होती व अशा परिषदेला आर्यतत्त्वज्ञान शिकविण्यास हिंदी प्रतिनिधी पाठवावयाचा तर स्वामीजी हे फार योग्य असे ठरवून काही धनिक लोकांनी त्यांना अमेरिकेस जाण्याला द्रव्यसाहाय्य दिले.

सीझरच्या पराक्रमाचे ज्याप्रमाणे वर्णन करतात त्याप्रमाणे स्वामीजींनी अमेरिकेत मिळविलेल्या यशाचे वर्णन " गेला, पाहिजे, जिंकले " अशा तीनच शब्दांनी करता येण्यासारखे आहे ! तेथील पत्रांनी त्यांना " जन्मसिद्ध अजिंक्य वक्ता " असे शिफारसपत्र दिले; आणि यापुढे अमेरिकन लोकांनी हिंदुस्थानात ख्रिस्ती धर्मोपदेशक मिशनरी पाठवावे तरी कशाला असा प्रश्नहि केला ! अमेरिकेची ही शंका अद्यापि कायमच आहे. अमेरिकन मिशन सोसायटीतर्फे मिशनरी नसलेल्या ( लेमेन ) अशा गृहस्थांचे एक शिष्टमंडळ मुद्दाम याच महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार करण्याकरिता हिंदुस्थानात आले होते. या शिष्टमंडळाने पुण्यातील इतर काही गृहस्थांप्रमाणे मुलाखतीत माझे विचार समजून घेतले. तेव्हा मीहि त्यांना हेच सांगितले की, " ख्रिस्ती धर्माच्या जाळयात हिंदी सावजे पकडण्याकरिता मिशनरी पाठवावयाचे असतील तर ते यापुढे तुम्ही पाठवू नयेत. त्यात तुमची निराशा होईल. पुढच्या पिढीत या देशात धर्म म्हणून काही उरेल की नाही अशी शंका कोणी घेतात ती घेवोत. मला तसे वाटत नाही; पण एवढे निश्चित वाटते की, यापुढे ख्रिस्ती धर्माला सुशिक्षित हिंदी लोक किंवा सुसंस्कृत हिंदी लोक धर्मांतर करणारे मिळणार नाहीत. दुष्काळासारख्या आपत्तीमुळे तुम्हाला लोक बाटवावयाला मिळतील तितकेच. तथापि अमेरिकन मिशनकडून निरपेक्ष जनतासेवेचे जे उदाहरण घालून देण्यात येते त्याचे आम्ही हिंदी लोकहि कौतुक करतो. सुदैवाने सांस्कृतिक देवघेवीच्या दृष्टीने निरनिराळया देशच्या लोकांची गाठ यापुढे अधिकच पडत जाईल. म्हणून तुम्ही या या दृष्टीने मिशनरी पाठवीत जा. त्यांच्याकडून आम्ही जनतेच्या सक्रिय सेवेची तत्त्वे शिकू, व आर्य धर्माची तत्त्वे त्यांना मोबदल्यादाखल शिकवून परत पाठवू. "

स्वामीजींच्या अमेरिकेतील विजयाची खूण हीच की, ते येताना काही इंग्रज व अमेरिकन शिष्यच बरोबर घेऊन आले व ती परंपरा अजूनहि सुरू आहे. त्यांनी व त्यांच्या गुरुबंधूंनी अमेरिकेत स्थापलेली वेदान्त सोसायटी अजून कार्य करीत आहे. अमेरिकेतून परत आल्यावर स्वामीजींनी कोलंबोपासून हिमालयापर्यंत दौरा काढून जी व्याख्याने दिली ती अत्यंत वाचनीय आहेत. १८९७ ते १९०० या सालात स्वामीजींनी अलमोरा, बेलूर वगैरे ठिकाणी मठाची स्थापना केली; व जनताजनार्दनाची सेवा हाच मुख्य कार्यक्रम त्या मठांतून संन्याशांच्या सांप्रदायाकडून सुरू केला. निष्क्रिय भक्तिमार्गाचे ध्येय टाकून देऊन, कर्मयोगी संन्याशाचे ध्येय आपल्या मठवासी गुरुबंधूकडून मान्य करवून घेण्याला स्वामीजींना कितीतरी प्रयास पडले, पण अखेर त्यांनी ती ध्येयक्रांती कशी घडवून आणली हे रोमां रोलां यांनी लिहिलेल्या स्वामीजींच्या चरित्रात तुम्हाला वाचावयास मिळेल. १९०० साली स्वामीजींनी युरोप-अमेरिकेमध्ये पुन : एकदा संचार केला; पण परत आल्यावर ते फार दिवस जगले नाहीत. हातां घेतलेले कार्य अपुरे असताच, पण त्याला योग्य दिशा लावून, त्यांनी चिरसमाधी घेतली.

स्वामीजींचे हे चरित्र थोडक्यात असे आहे, पण त्यापासून आपण काय बोध घ्यावा हा प्रश्न शिल्लक उरतोच. म्हणून माझ्या समजुतीप्रमाणे त्याचे उत्तर देऊन मी आपले भाषण संपविणार आहे.

स्वामी विवेकानंद यांना दैवी संपत्ती पुष्कळच लाभलेली होती. नुसते त्यांचे स्वरूप पाहिले तर भव्य कपाळ, गरगरीत पाणीदार डोळे, मोह पाडणारे वक्तृत्व, तीव्र बुद्धिमत्ता, अतुल उत्साह आणि लौकिक-अलौकिक विद्यांचा अभ्यास, या गोष्टी लक्षात घेता ते कोणत्याहि उद्योगधंद्यात यश मिळविते यात शंका नाही. निदान बंगाली तरुणांच्या आवडीचा व त्यांना वश असणारा वकिलीचा धंदा व राजकारणाचा उद्योग यांत ते पडते तरी उच्च दर्जाला पोचले असते. स्वामीजी वारले त्या वेळी वंगभंगाची चळवळ सुरू झालेली नव्हती; परंतु लॉर्ड कर्झन यांनी आपले स्वरूप प्रकट केले होते. अर्थात स्वामीजी राजकारणात पडते तर बाबू अरविंद घोष यांचेप्रमाणे ते खचित नांव करते; पण पुष्कळांना हे माहीत नाही की, प्रचलित राजकारण ही फार हलकी गोष्ट ते मानीत ! आणि राजकारणात त्यांनी पडावे अशा सूचना त्यांना झाल्या असताहि त्यांनी नकारच दिला. कारण " देशभक्ती ही केवळ राजकारणातच साठविलेली आहे असे नाही. तिची उपासना करण्याचे इतर अनेक मार्ग मोकळे आहेत " असे ते मानीत. मात्र राजकारणाविषयीची अनादरबुद्धी त्यांनी देशभक्तीला लाविली नाही. ते वेदान्ती होते तरी देशभक्त होते. याचे कारण जग उलथण्याची शक्ती असली तरी ती प्रभावी करण्याला जो आधार लागतो, तो देशभक्तीवर टेकून किंवा स्थिर

होऊनच मिळतो असे त्यांना वाटे. या आधाराला इंग्रजींत ' फलक्रम ' असा शब्द आहे. असे सांगतात की ग्रीक गणितशास्त्रज्ञ आर्किमेडीज याने, सर्व भूगोलच्या भूगोल म्हणजे पृथ्वी उचलून फेकून देता येईल अशी लिव्हर, म्हणजे पहार बनविता येईल असे गणिताने ठरविले; पण त्याला पंचाईत ही पडली की, त्या लिव्हरचे टोक भूगोलाखाली घालून तो उलथून टाकताना ती लिव्हर किंवा पहार टेकून धरावयाची कशावर ? स्वामी विवेकानंद यांनी मनाशी असे ठरविले की, आपण आर्य धर्म जगाला शिकविण्याचे व पटविण्याचे महाकार्य करू, पण त्याला देशभक्तीचा आधार घेतल्याशिवाय भागावयाचे नाही.

असो. स्वामीजींनी राजकारण टाकले, तथापि धर्मप्रसार करण्याचे ध्येय त्यांनी स्वीकारले तरी त्याकरिता संन्याशी होण्याचीच काय गरज होती ? खुद्द गुरू रामकृष्ण परमहंस हे विवाहित होते. पूर्वीचे अनेक धर्मप्रसारकहि विवाहित होते. मग स्वामीजींनी संन्यासच का पत्करला ? याला माझे उत्तर असे की, गीतेतील कर्मयोग जरी त्यांना मान्य होता तरी संन्याशी बनल्याने कर्मयोगी अधिक यशस्वी होतो असेच त्यांना वाटत असावे. शंकराचार्यांच्या मते संन्यासदीक्षा ही ज्ञानाची खूण; व ज्ञानोत्तर कर्म करण्याचे कारण नाही. उलट टिळकांचा कर्मयोगी हा गृहस्थाश्रमी असू शकतो; पण या दोनहि बाजू एकेरी होत. एकीत संन्यासावर जोर तर दुसरीत कर्मयोगावर जोर. किंबहुना संन्यासाविषयी अप्रीति. पण स्वामी विवेकानंद यांनी या दोहोंचा मेळ घालून संन्यास आणि कर्मयोग ही एकत्र केली. इतरांच्या संसारासाठी त्यांचा संन्यास होता. गृहस्थाश्रम हा सांभाळण्याला वास्तविक संन्यासापेक्षाहि कठीण असे काही जाणते लोक म्हणतात. कदाचित स्वामीजींनी हां अडचण ओळखून दोन्ही गोष्टींमध्ये चांगल्यातला चांगला म्हणून संन्यासाचा स्वीकार केला असावा. अर्थात असली निष्ठा किंवा विवेक सांगून येत नाही. तो जातीचाच असावा लागतो; आणि त्यावरूनच मनुष्याच्या तत्त्वज्ञानाची परीक्षा होते.

मनुष्याचा आयुष्यक्रम ही त्यांचे तत्त्वज्ञान ओळखण्याची एक खूण होय. जीवनाकडे दोन वेगवेगळ्या दृष्टींनी पाहणारे लोक तत्त्वज्ञान्यांत आहेत. एक त्यागवादी व दुसरे भोगवादी. भोगवादी लोक हे जगत व जीवन सत्य मानणारे व प्राथमिक स्वरूपात तरी द्वैती असतात. योग्य व न्याय्य प्रकारची सुखे भोगणे, हा जीवनाचा हक्कच आहे असे ते मानतात. सुख भोगण्याला जीवन पाहिजे अर्थात ते सांभाळले रक्षिले पाहिजे, म्हणून ते उद्योगवादी असतात; आणि उद्योगात मधून मधून अपयश पदरात पडले तरी शेवटी इष्ट तेच प्रभावी होईल अशी आशा ते निरंतर बाळगतात. याला भोगदर्शन असे वाटेल तर आपण नाव देऊ; मात्र हे केवळ चार्वाकाचे तत्त्वज्ञान नव्हे. याच्या उलट सिद्धान्त त्यागाचा.

इंग्रजीत त्याला 'ॲसेटिसिझम' म्हणतात. या मताच्या लोकांना जगत व जीवन हे तत्त्वतः खरे नाही, मायामय, आभासमय आहे असे वाटते; व त्याच्या खरेपणाचा अनुभव आला तरी तो दुःखमयच असणार असा त्यांचा सिद्धांत असतो. अशा लोकांना पुढील आशा बाळगण्याचे काय कारण ? अर्थात ते नुसते दैववादीच नव्हे तर, निराशावादी असतात त्यागवृत्ती दर्शविणारे इंग्रजी व मराठी शब्द जवळ जवळ एकाच अर्थाचे कितीतरी सांगता येतील. उदाहरणार्थ, एकोराईट, हर्मिट, मंक, सेंट, सेज, साधु, बैरागी, गोसावी, योगी, ऋषी, यती, संन्यासी इत्यादी. यातील कोणताहि एक शब्द तंतोतंत दुसऱ्याशी अर्थाने मिळणारा नाही. तरी ते एका विशिष्ट वृत्तीचेच द्योतक आहेत, म्हणजे निवृत्तीचे यातील कोणता शब्द विवेकानंदांना लावावा ? मला वाटते संन्यासी हा सर्वसाधारण शब्दच त्यांना लावणे बरे. पण त्यांनी 'आश्रम' या अर्थी संन्यासाचा स्वीकार केला होता, कर्मसंन्यास या अर्थाने नव्हे हे लक्षात ठेवले पाहिजे. स्वतःच्या सुखाविषयीची अभिलाषा त्यांनी सोडली होती. या दृष्टीने ते खरे संन्यासी होते; पण लोकोद्धाराची अनेक कार्ये करण्यात ते गढून गेले होते.

त्यांच्या भाषणांतून-उपदेशांतून त्याग व भोग या दोन शब्दांची जोडी पदोपदी आढळते. ते त्यांचे ब्रीदवाक्याचेच शब्द होत; पण लक्षात ठेवण्याची गोष्ट ही की, त्याग हा स्वतःच्या व्यक्तीपुरताच त्यांनी स्वीकारला होता; आणि आपणाव्यतिरिक्त जग हे भोगाचे अधिकारी आहे असे ठरवून त्याची सेवा करावी म्हणजे त्याला योग्य ते भोग व सुखे प्राप्त करून द्यावी व दुःखापासून त्याची सुटका करावी, असे सजोड तत्त्वज्ञान त्यांनी निश्चित केले होते. स्वतःकरता त्याग व दुसऱ्याला भोगप्राप्ती असे म्हटले म्हणजे त्यागवाद व सुखवाद या शब्दांचा समन्वय होतो. याच समन्वय बुद्धीने त्यांनी हिंदुस्थानला एक प्रकारचा व युरोप-अमेरिकेला वेगळ्या प्रकारचा उपदेश केला. त्याचे मर्म हेच की, हिंदुस्थानने आहे याहून अधिक भोगवृत्ती स्वीकारावी, व युरोप-अमेरिकेने आहे याहून अधिक त्यागवृत्ती स्वीकारावी, हा तो उपदेश होय. उघडच आहे की, जे आहे ते + जे नाही ते = संपूर्णत्व. सोप्या शब्दात सांगावयाचे तर वासना या दुःखमूल खऱ्या; पण त्यामुळे सर्वच वासना निषेधार्ह किंवा विवादास्पद ठरत नाहीत. वासनातहि सद्वासना व असद्वासना असा भेद आहेच. म्हणून स्वतः निःस्वार्थीपणा व संन्यास स्वीकारून, सद्वासनांवर आधारलेले भोग व सुखे जगाने भोगावी, असा उपदेश करण्याला स्वामी विवेकानंदांसारख्या विभूतींना सहजच योग्यता प्राप्त झाली होती.

( ता. १५ जुलै १९३५ – फर्ग्युसन कॉलेजातील व्याख्यान )

• • •

# श्री समर्थ रामदास

रामदास ही व्यक्ती व त्यांचा ' दासबोध ' हा उच्च प्रतीचा ग्रंथ या दोनहि दृष्टींनी आज मी विचार करणार आहे. रामदासांचे चरित्र आपणा सर्वांस माहीतच आहे. त्याची मी पुनरावृत्ति करीत नाही, पण जाता जाता एवढेच सांगतो की, समर्थ रामदासस्वामींनी अवघ्या बाराव्या वर्षी लग्नाचे वेळी बोहल्यावरून पळून जाऊन आपल्या निष्ठुर ध्येयवादित्वाची ओळख सर्वांना करून दिली. त्यांनी जनतेला अध्यात्मज्ञान दिले. गुप्तपणाने संचार करून त्या काळानुरूप देशसेवाहि केली. त्यांनी बहात्तर मठ व अकरा मारुती यांची स्थापना केली. मठांच्या योगाने रामदासांची शिष्यपरंपरा आपणास दिसते. पण रामदासांचा गुरू कोण होता हे आपणास माहीत नाही; यावरून त्यांना मिळालेले ज्ञान हे पढिक नसून स्वयंस्फूर्त होते असे म्हणावयास हरकत नाही. समर्थभक्त श्री. शंकर श्रीकृष्ण देव यांनी आपल्या डोळ्यापुढे एक विवक्षित कार्य ठेवून त्यांनी ते किती तडीस नेले आहे हे पाहिले, म्हणजे त्यांचे जाहीर अभिनंदन करावेसे वाटते. त्यांनी समर्थ–वाङ्मय जमवून प्रसिद्ध करण्याचा जो उद्योग केला आहे व हल्ली करीत आहेत तो महाराष्ट्रात अपूर्व आहे. श्री. देव यांना समर्थांचे जे वाङ्मय

मिळाले ते समर्थांनी स्थापन केलेल्या मठातून मिळाले ही गोष्ट विशेष लक्षात ठेवण्यासारखी आहे.

एकाचे श्रेय काढून ते दुसऱ्याला द्यावयाचे व त्याला पहिल्यापेक्षा अधिक श्रेष्ठ ठरवावयाचे, अशा तऱ्हेचा विनाकारण प्रयत्न आपणास सर्वसामान्यपणे दिसून येतो. शिवाजी श्रेष्ठ की रामदास श्रेष्ठ ? हा वाद बरेच दिवस चालू आहे. एक मनुष्य दुसऱ्या मनुष्याला उच्चपद प्राप्त करून देऊ शकत नाही. गुरूने शिष्याच्या मस्तकावर हात ठेवून त्याला ज्ञानसंपन्न करणाऱ्या गुरुशिष्यांची परंपरा असते हे मला मुळीच पटत नाही. रामदास आणि शिवाजी यांत उपकृत कोण व उपकारी कोण याचा वादविवाद करून, शिवाजी किंवा रामदास यांपैकी श्रेष्ठकनिष्ठ ठरविण्याचा प्रयत्न करणे चूक आहे. कारण रामदास व शिवाजी या दोघांचीहि कार्यक्षेत्रे अगदी भिन्न स्वरूपाची होती. कोणतीहि चांगली कार्ये सुरू असली म्हणजे त्यांची यदृच्छेने गाठ पडते, व काही काळ ती दोन्हीहि एकच आहेत असे भासते. पण तेवढ्यामुळे अशा कार्यकर्त्यांत गुरुशिष्यांचा संबंध कसा येईल ?

खरे कर्तृत्व हे परावलंबी असूच शकत नाही. मठस्थापनेचे सायास समर्थांनी किती केले हे आपणास माहीत आहेच. त्यात त्यांना शिवाजीची मदत नव्हती. श्रीशिवाजीमहाराजांनाहि या स्वराज्यस्थापनेच्या कामी किती संकटांना तोंड द्यावे लागले हे इतिहास दाखवितो. या स्वराज्यस्थापनेच्या कार्यात शिवाजीमहाराजांना रामदासांची प्रत्यक्ष मदत कितपत झाली असेल हे सांगता येत नसले तरी दोघांचे ध्येय एक होते व म्हणूनच परस्परांना परस्परांचे साहाय्य झाले असे म्हणता येईल. श्रीसमर्थरामदासांना धर्मकारणात यश मिळाले व श्रीशिवाजीमहाराजांना राजकारणात यश मिळाले, याचे श्रेय ज्याच्या त्याच्या गुरूला नसून स्वतःच्या त्याच्या कर्तृत्वाला आहे. हेच तत्त्व गणिताच्या भाषेत मांडावयाचे झाले तर पुढीलप्रमाणे मांडता येईल. " ज्याची कल्पना त्याचा उद्योग + दुसऱ्याची सहानुभूती अगर मदत = यशःप्राप्ति किंवा सिद्धी. " शिवाजीने साधुसंत व सज्जन यांना मान दिला व परामर्ष घेतला. रामदासांनी राजकारणी पुरुषांना आशीर्वाद दिला. तात्पर्य, आशीर्वाद व निर्भयतादान यांच्या संयोगाने त्या काळी हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली.

कोणत्याहि ग्रंथाची योग्यता किंवा किंमत ठरविणाऱ्या लोकांमध्ये चार-पाच वर्ग कल्पिता येतात. ते असे—भाविक, चिकित्सक, यथार्थवादी, भावार्थी व वितंडवादी. आता यांपैकी प्रत्येक वर्गाचे लक्षण काय आहे हे पाहू. ( १ ) भाविक हा ग्रंथात काही चुका असल्या तरी त्या चुकाच नाहीत असे प्रतिपादून, सर्व ग्रंथच्या ग्रंथ इतकेच काय पण त्यातले अक्षर न् अक्षर बरोबर आहे असे मानतो. रामदासांचे भाविक भक्त रामदासांना सर्वज्ञानी मानतात. त्यांच्या दासबोध ग्रंथात जर एखादा

वाक्यप्रयोग व्याकरणाच्या दृष्टीने चुकीचा असला तर तो चूक न म्हणता त्यालाच व्याकरणशुद्ध म्हणतील ! इतकेच नव्हे तर दासबोधाची कितीहि पारायणे केली तरी त्यात असलेले गुप्त ज्ञानाचे भांडार कोणालाच आजपर्यंत हाती लागले नाही व पुढेहि हाती लागणार नाही असे सांगतील. ( २ ) दुसरा वर्ग चिकित्सकांचा. या वर्गातले लोक ग्रंथात जेवढा भाग चांगला वाटेल तेवढ्यालाच फक्त चांगले म्हणतील; व वाईटाला वाईट म्हणण्याला भिणार नाहीत. चिकित्सक म्हणेल की, दासबोधात ज्ञानेश्वरासारखे काव्य नाही, एकनाथासारखी विद्वत्ता नाही, तुकारामासारखा प्रेमळपणा नाही; तरी पण दासबोधात रामदासांनी त्यांच्या काळच्या लोकस्थितीचे वर्णन जसे यथार्थ दिले आहे, आणि संसार व लोकस्थिति यांतील मर्म जसे दाखविले आहे तसे ज्ञानेश्वरांना, तुकारामांना किंवा एकनाथांनाहि दाखविता आले नाही. यथार्थ लोकस्थितिवर्णन व ऐहिक–परमार्थिक यांतील मर्मदर्शन हे दासबोधाचे वैशिष्ट्य आहे. ( ३ ) तिसरा वर्ग यथार्थवाद्यांचा. या वर्गातले लोक भिडस्त असतात. ते असे म्हणतील की, दासबोधातील अमुक एका ओवीचा अर्थ आमच्या दृष्टीने असा असा लागतो, मग तो तुम्हाला इष्ट वाटो अगर अनिष्ट वाटो. ( ४ ) चवथा वर्ग भावार्थी लोकांचा. या वर्गातील लोक मुद्याशी गाठ घालतील. ते म्हणतील की तुम्हांला शब्दाशी काय करावयाचे आहे ? त्यातले तात्पर्य पाहा म्हणजे झाले. पण अशी भीड तरी का धरावी ? साधुसंत झाले म्हणजे त्यांना काव्यव्याकरणाची सर्व बंधने माफ असतात असे थोडेच आहे ? वास्तविक परमेश्वराला मानवी भाषा नाही. पण तोच परमेश्वर जर मराठी भाषेत लिहू बोलू लागेल तर त्याला व्याकरणाची शुद्धाशुद्धतेची बंधने पाळावयास नकोत काय ? ईश्वर व साधुसंत इतर अर्थाने ‘ मुक्तछंद ’ असतात तसेच उपदेशिक वाङ्मयातहि का असावे ? श्रीव्यासांना गीता सांगताना संस्कृत भाषा व अनुष्टुप छंद यांचा आश्रय अनिर्वाह्य झाला, तर त्या संस्कृतातील व्याकरणाच्या चुका ( खऱ्या असतील तर ) दाखविणाऱ्या प्रो. राजवाड्यांना दोष का द्यावा ? जो पेशा आपण पत्करतो तो नीट संभाळण्याची जबाबदारी आपल्यावर येतेच. सारांश, कर्मांत जसे नैष्ठिक वर्तन असावयास पाहिजे, तसेच काव्यशास्त्रातहि वर्तन ठेवावयास नको काय ? ( ५ ) आता शेवटचा वर्ग म्हटला म्हणजे वितंडवाद्यांचा. ते दासबोधाला वाङ्मय म्हणणार नाहीत; आणि तत्कालीन वर्गकलह त्यात कोठे आहे असे विचारतील ? इतकेच काय, पण रामदासांनीं दासबोधाच्या द्वारे मुद्दाम भांडवलशाहीचा पुरस्कार केला, असेहि म्हणावयास कमी करणार नाहीत ! मी स्वतः भावार्थवादी पण चिकित्सकहि आहे; दोष दाखवूनहि ग्रंथातील मर्म घेणारा आहे.

दासबोधात अद्वैतवेदांतापासून गुप्तमंडळ्यापर्यंत सर्व गोष्टींचे विवेचन आहे.

गौ. म.... ३

त्या काळचे धार्मिक आचारविचार, राजकारण, लोकव्यवहार यांवर टीका आहे. बहुप्रजाजननामुळे होणाऱ्या तापत्रयाचे " लेकुरें उदंड जहालीं । तों ते लक्ष्मी गेली । निघून बापुडीं भिकेस लागली " अशा तऱ्हेचे आजच्या काळालाहि जुळणारे यथार्थ वर्णन दासबोधात आहे ! ! दासबोधासारख्या ग्रंथात खालील चार गोष्टींपैकी काय आहे असे विचारणे अयोग्य नाही. ( १ ) तात्त्विक भूमिका किंवा तत्त्वसिद्धांत ( २ ) स्वानुभूति ( ३ ) नैष्ठिक नीति व ( ४ ) सदाचार. माझ्या मते या चारहि गोष्टी दासबोधात ठळक आहेत. नीति व सदाचार यांच्या संबंधात तीनशे वर्षांपूर्वीच्या रामदासांचे मत व गेल्या काही वर्षांपूर्वीपर्यंतचे महाराष्ट्र–समाजाचे मत सारखेच होते हे सिद्ध करून देता येईल. स्वानुभूतीसंबंधाने कोणाच्याहिबद्दल बाह्य पुरावा देणे कठीण असते. तथापि मी इतकेच विचारीन की, रामदासासारख्या निःस्पृह तापसाला जर स्वानुभूति थोडीफार तरी नव्हती असे म्हटले, तर ती असणारा मनुष्य सांपडावा तरी कसा ? किंवा ओळखावा तरी कसा ? म्हणून समर्थांची स्वानुभूति मी गृहीतच धरतो. त्यांच्या ग्रंथातील तात्त्विक भूमिका सांप्रदायिक अद्वैत वेदांत्याची आहे. म्हणजे भक्तिविशिष्ट अद्वैत ध्येयाची आहे. तुकाराम कोठे कोठे मी व ईश्वर एकच इतक्या उत्कटतेला पोचतो. पण रामदासाने ईश्वराविषयी सेव्य-सेवक भाव कोठेच सोडलेला नाही. म्हणून त्यांना पूर्ण अद्वैती न म्हणता भक्तिविशिष्ट अद्वैती असे मी म्हणेन.

आज दासबोध वाचून दाखविण्यास वेळ नाही. तथापि लोकभ्रम, बुवाबाजी, संसारतापत्रय, गुरुचिकित्सा, राजकारण, सिद्धांच्या म्हणजे कर्मयोग्यांच्या खुणा, इत्यादींसंबंधाने दासबोधातील समासचे समास वाचनीय व मननीय वाटतील इतके ते मार्मिक आहेत. लोकस्थितीची अशी वर्णने इतर कोणत्याहि प्राचीन मराठी कवींत सहसा आढळणार नाहीत. लौकिक मतसंचारामध्ये प्रकट मतप्रसाराइतकेच गुप्त मतप्रसाराला रामदासांनी महत्त्व दिलेले आढळते. जुन्या काळचे चित्र नव्या काळी तंतोतंत पाहावयास कसे मिळणार ? परंतु मसुराश्रमातील ब्रह्मचाऱ्यांचा मेळा व त्यातील प्रमुखांचे काम पाहिले म्हणजे, जुन्या रामदासी मंडळाची मला आठवण होते मात्र मसूरकरांची एक गोष्ट त्या वेळी नव्हती. ती म्हणजे त्यांचे छापखाने व मासिक पुस्तके व त्यातून केलेला जाहीर मतप्रसार ही होय. कारण खरा रामदासी हा सर्वस्वी अदृश्य नव्हे, पण गुप्त संचार व मतप्रसार करणारा असावा असे मला नेहमी वाटते. आधुनिक राजकारणपद्धतीला मी नावे ठेवीत नाही. त्या पद्धतीत छापखाने व सभागृहे यांचा जो उपयोग करून घेतला जातो तो योग्य असून काही लोकांनी त्याचा अवलंब अवश्य करावा व लोकमताचे बळ वाढवावे. पण समाजाला ध्येयवादी सुविचाराची, तशीच व्यावहारिक तारतम्याच्या सुविचाराची, सामुग्री पुरवणारे काही विचारवंत व गुप्तपणे काम करणारे लोकहि पाहिजे असतात. दहा तासांच्या अभ्यासानंतर जर एक तास मनन केले तर

मेंदूला शांती मिळून, शिवाय नवी बॅटरी भरून घेतल्याप्रमाणे पुढे दहा तास काम करण्याला चैतन्यशक्ती लाभते, असे अनुभविक लोक सांगतात. त्याचप्रमाणे उघड मत-प्रसाराबरोबर गुप्त मत-प्रसाराचा एक कप्पा व खाते सार्वजनिक कार्यकर्त्यांनी जर चांगले संभाळले तर तेहि असेच उपयोगी पडेल. गुप्त मंडळी म्हटली म्हणजे लोकांना बाऊ वाटतो तसा वाटण्याचें कारण नाही. गुप्त मंडळी म्हणजे ती अत्याचारप्रवर्तकच असा अर्थ नाही. अभ्यासाचे मनन हे जसे अत्याचारी नव्हे, तशीच आपले संकेत बाहेर कळू न देता काम करणारी गुप्त मंडळी दूषणीय ठरत नाही.

राजकारणात झाले तरी उघड बोलण्याला सीमा असावी. असो. यावरून मनुष्याने गुप्तपणे लोकसंग्रह कसा करावा याचे वर्णन दासबोधातल्याइतके सरस व समर्पक दुसऱ्या कोणत्याहि मराठी कवीत मला वाचावयाला मिळाले नाही.

( प्रवचन– ता. ६ फेब्रुवारी १९३५ )

• • •

# शिवाजी महाराजांची थोरवी

✤ ✤ ✤

एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः ।
कुरु कर्मैव तस्मात्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् ।।

ऐतिहासिक कालगणनेत शतकाला विशेष महत्त्व देतात. एक शतक पुरे झाले म्हणजे कोणत्याहि गोष्टीने कालाचा एका मोठा टप्पा गाठला असे मानण्यात येते. आता 'शंभर वर्षे भरली' या शब्दातून नाशाची कल्पना सूचित होते; पण तसा अर्थ न घेतला तर त्याच शब्दानी कृतकृत्यतेचाहि बोध होतो. या दृष्टीने १९४५ हे वर्ष महत्त्वाचे ठरते. कारण महाराष्ट्रातील पूर्वीच्या एका मोठ्या ऐतिहासिक घटनेनंतर बरोबर तीन शतके यंदा पुरी होतात. तीनशे वर्षे आपण मागे गेलो म्हणजे १६४५ हे साल येते; आणि मराठ्यांच्या इतिहासात या वर्षाला अपूर्व महत्त्व आहे. कारण त्या वर्षात शिवाजीच्या स्वराज्यस्थापनेच्या कार्याला प्रारंभ झाला.

यापूर्वी सुमारे आठ वर्षे शहाजीने शिवाजीला, बरोबर दादाजी कोंडदेव देऊन महाराष्ट्रातील बीजभूत स्वराज्याचा–जहागिरीचा–मुलूख संभाळण्याला पुण्यास पाठविले.

अनेक स्थित्यंतरानंतर या वेळी शहाजीने विजापूरदरबारी राहून बादशहाची सरदारी कायमची करण्याचे ठरविले होते; व बंगलोराहून तो परत विजापूरला आला होता; शिवाजी एक वेळ बंगलोरास बापाकडे गेला होता. पण फार थोडे दिवस राहून परत पुण्याला आला. शहाजीने याच वेळी दादाजी, शामराज निळकंठ, रघुनाथ बल्लाळ, सोनोपंत इत्यादी मंडळींना अशा विचाराने पुण्यास पाठविले की, शिवाजीने परत आपणाकडे येऊ नये, व पुणे जहागिरीची व्यवस्था शिवाजीच्या नावेच दादाजीने कुलमुखत्यारीने करावी. पुणे जहागिरीच्या मानाने बंगलोरकडे मोठी जहागिरी मिळून जवळ जवळ स्वतंत्र राज्य स्थापण्याइतका वाव तिकडील परिस्थितीमुळे शहाजीला कदाचित मिळण्यासारखा होता. शिवाय एक जहागीर बंगलोराकडे व एक पुण्याकडे अशा दोन झाल्या तर बरेच. कारण शहाजीने दोन लग्ने करून दोन संसार थाटले होते. अर्थात दोनहि बायकांपासून झालेल्या संततीची स्वतंत्र व्यवस्था करणे त्याला प्राप्त होते.

कसेहि असो; दादाजी कोंडदेवाबरोबर शिवाजी परत पुण्यास आल्यापासून ‘ शिवाजी राजे ’ अशा नावाने, म्हणजे शहाजीचे नाव गाळून, पुणे जहागिरीचा कारभार सुरू झाला. आपली जहागिरी विजापूर बादशाहीत मोडत असली, तरी मराठे सरदारांच्या मनात बादशाहीपासून फुटून जाऊन अंशतः स्वतंत्र होण्याची कल्पना अंधुकपणे डोकावू लागली होती. म्हणून शहाजी तिकडे काही करो आपण इकडे आपला हात चालवावा, असे शिवाजीच्या मनात विशेषतः येऊन त्याने विजापूरकरांच्या ताब्यातील ठाणी घेण्यास १६४४–४५ साली मुहूर्त केला. प्रतिष्ठित व प्रबळ अशा बादशाहीच्या विरुद्ध बंडखोरी करण्याची कल्पना हळूहळू मनात बळावते. त्याचप्रमाणे ती शिवाजीच्या मनात आली; मग त्याला दादाजीची संमती असो वा नसो. इतके निश्चित आहे की, शिवाजीप्रमाणे इतर काही तरुण व मध्यम वयाच्या शिपायांना, पाटलांना, देशमुखांना बंडखोरीची कल्पना मनातून थोडी तरी पटली असावी. कारण केवळ एकट्या शिवाजीच्या मनात ती येऊन फलप्राप्ती झाली नसती.

शिवाजीने स्वराज्याची खरी मुहूर्तमेढ, हल्ली भोर संस्थानचा म्हणून जो मुलूख आहे त्यात रोविली. राजगड पंचक्रोशीतील व रायरेश्वर पंचक्रोशीतील विजापूरच्या लोकांना हाकून देऊन काही ठाणी शिवाजीने घेतली व लगेच राजगड घेतला; आणि रायगड ही राजधानी होईपर्यंत राजगड हीच शिवाजीच्या राज्याची राजधानी होती. या बंडखोरीच्या प्रारंभाच्या वेळी आतल्या आत काय चळवळ चालू होती यावर उत्तम प्रकाश पाडणारे दोन-तीन कागद उपलब्ध असल्याचे इतिहासतज्ज्ञ आपणास सांगतात. पैकी एक कागद विजापूर दरबाराकडून रोहिडखोऱ्याच्या देशमुखाला आलेली तंबी. त्यात “ शिवाजी मावळे लोक जमवून दंगा करू लागला आहे, बंदोबस्त तुम्ही देशमु-

त्यांनी केला पाहिजे; न कराल तर शिक्षा होईल " असे लिहिले आहे. यावरून दरबारापर्यंत जाऊन पोचण्याइतका मोठा धक्का शिवाजीच्या चळवळीने दिला होता हे उघड दिसते. दुसरा कागद महत्त्वाचा आहे. कारण ते शिवाजीकडून रोहिडखोऱ्याच्या देशमुखयास गेलेले एक पत्र आहे. त्यात मजकूर असा आहे की, " रोहिडखोऱ्याच्या देवळात देवीला साक्ष ठेवून तुम्ही–आम्ही मिळून स्वतंत्र राज्य स्थापण्याचे आणि बादशहाची सत्ता न जुमानण्याचे ठरविले. या आपल्या बेताला श्रीदेवीची संमती मिळविली व ती मिळालीहि. तेव्हा तुम्ही निर्भय असावे. " प्रथम बंडखोरीचे स्वरूप असलेल्या स्वराज्यस्थापनेच्या बीजातून निघालेला हा पहिला अंकुर होय. शहाजीच्या मनात काय गुप्त विचार घोळत असतील ते असोत, परंतु दक्षिणेत शहाजीने चालविलेला उद्योग व पुण्याकडे शिवाजीने चालविलेला उद्योग याच्यातील भेद सर्वस्वी मूलभूत आहे. शिवाजीच्या भाषेत बोलावयाचे तर 'हिंदवी' व रूढ भाषेत बोलावयाचे तर 'मराठा', स्वराज्यस्थापनेला प्रारंभ १६४५ त झाला; आणि या दृष्टीने १९४५ सालाचे महत्त्व महाराष्ट्रीय जनतेच्या दृष्टीला घालणे व त्याची आठवण करून देणे हे योग्यच ठरेल.

यावर कोणी असा आक्षेप घेतील की, ३०० वर्षांपूर्वी घडलेल्या या गोष्टीची आठवण जागृत करण्यापासून आता काय लाभ होणार ? शिवाजीच काय, आम्ही पुढे जाऊन असेहि म्हणतो की, शिवाजीहून अधिक टिकाऊ ठरलेले त्याचे भुईकोट काय, किंवा डोंगरी कोट काय, किंवा जलदुर्ग काय ते सर्व पाच चार बॉम्ब पडले असता नामशेष होऊन जाण्याइतक्या कुचकामाचे आज ठरत आहेत; पण आज काय झाले असते या दृष्टीने शिवाजी किंवा त्याचे किल्ले याजकडे पाहणे योग्य होणार नाही. तर मराठ्यांच्या जुन्या वैभवाची आठवण करून देणारे ते एक स्मारक या दृष्टीने त्याकडे पाहिले पाहिजे. आजच्या काळात शिवाजीचे उत्सव महाराष्ट्रातील लोक करतात ते काही वेडे-भाबडे-दुबळे म्हणून नव्हे; तर कोणत्याहि राष्ट्रातील लोकांची भावी उत्कर्षाची आशा ही गतवैभवाच्या आठवणीवर उभारलेली असते हे इतिहासाच्या तत्त्वज्ञानातील एक सर्वमान्य तत्त्व आहे; आणि शिवाजीचा उत्सव करताना आम्ही मराठे लोक याच तत्त्वाला अनुसरून वागत असतो.

पण आम्हीचसे काय, जगातील इतर उदाहरणेहि अशीच देता येतील. असा देश किंवा राष्ट्र नाही की ज्यात जुन्या पौराणिक, ऐतिहासिक विभूतींचे असे स्मरणरूपी श्राद्ध करीत नाहीत; आणि फिरून लक्षात ठेवावे की, विपन्न स्थितीचे दुःख घालविण्याचा एक तोडगा असाच काही केवळ त्या राष्ट्राभिमानी कृत्याचा अर्थ नाही; तर संपन्न किंवा उत्कर्षाच्या स्थितीत असणारी राष्ट्रेहि अशीच पितृपूजा करतात.

आज अमेरिका हे राष्ट्र सर्वांत प्रबळ असे वाटत आहे; आणि निदान त्याच्या आर्थिक उत्कर्षासंबंधाने तर वादच नाही. असे असता प्रतिवर्षी ता. ४ जुलै रोजी

अमेरिकेतील लोक तो स्वातंत्र्यदिन हा राष्ट्रीय सण म्हणून पाळतातच की नाही? आणि त्यातल्या त्यात मौज ही आहे की, अमेरिकेने मिळविलेले हे स्वातंत्र्य इंग्लंडशी लढून मिळविलेले! यामुळे 'स्वातंत्र्यदिन' पाळणे म्हणजे आज बरोबरीने सहकारितेने लढत असलेल्या एका दोस्त राष्ट्राला (जुन्या पितृराष्ट्राला) त्याच्या अपयशाची आठवण करून देऊन नाक खाजविण्यासारखेच होत नाही काय? तीन वर्षांपूर्वी, फ्रान्सची झाशीवाली जोन ऑफ आर्क, जिने पूर्वी इंग्रजांचा पराभव केला, तिचे पोवाडे गाण्यात इंग्रजहि सहभागी झाले होतेच की नाही? मग काय त्यांना आपल्या जुन्या अपयशाच्या आठवणीने दुःख न वाटता सुख वाटत असेल? फ्रान्स आता हिशेबातून वगळला जावो! परंतु ता. ५ जुलैचा स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात अमेरिकेची कुचेष्टेची बुद्धी नसते, व जोन ऑफ आर्कचा उत्सव सभारंभ हा इंग्लंडहि आपला अपमान समजत नाही हे खरे ना? प्रस्तुत मुद्दा इतकाच की, आज उत्कर्षाच्या शिखरावर असणारी अमेरिका जर दीड पावणेदोनशे वर्षांपूर्वी मिळविलेल्या स्वातंत्र्याचा उत्सव करिते, तर आज पारतंत्र्याच्या विपत्तीत सापडलेल्या महाराष्ट्राने ३०० च वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या शिवाजीचा व स्वराज्यस्थापनेचा उत्सव चालू ठेवल्यास त्याला कोणास कशी नावे ठेविता येतील?

जुनी ऐतिहासिक आठवण ही एखाद्या नंदादीपासारखी होय. आपण पाहतोच की, नंदादीप म्हटला म्हणजे त्याची ज्योत अखंड तेवत राहणे हेच त्या धार्मिक कृत्याचे मर्म; आणि आज अशी अनेक सनातन घराणी किंवा देवस्थाने दाखविता येतील की त्यातील नंदादीपाची ज्योत शेकडो वर्षांत कधीहि विझली नव्हती. अग्निपूजक पार्शांचेहि उदाहरण असेच सांगता येईल.

पार्शांच्या अग्यारीतल्या अग्नीवर कोणी आपला भात शिजवून घेतो असे नाही, पण हा अग्नी आम्ही अग्नि-उपासकांनी आमच्या मूळच्या देशातून आणलेला, आज अखंड परंपरेने, न विझता, प्रज्वलित होत राहिला आहे; याच त्यांच्या आठवणीमुळे त्या अग्नीला महत्त्व आहे. १९३२ साली पॅरिसमध्ये एका मोठ्या चौकात विजयतोरणाची म्हणून एक कमान उभारलेली असून तिच्यामध्ये एक विद्युद्दीप अखंड प्रज्वलित ठेवलेला मी पाहिला; आणि त्याचा अर्थ काय हे मी विचारिले तेव्हा मला असे सांगण्यात आले की, १९१४-१८ च्या महायुद्धात फ्रान्सने जो प्रचंड विजय मिळविला त्याचे अखंड स्मारक म्हणून त्या विद्युद्दीपाची योजना केलेली होती. दुर्दैवाने चालू महायुद्धात तो दीप नष्ट झाला असेल; पण जर्मनीचा पाडाव होऊन कायम तह झाल्यावर फ्रेंच लोक तो दीप पेटविणार नाहीत कशावरून? पार्श्यांना जसा तो अग्नी, किंवा फ्रेंच लोकांना जसा तो विद्युत्-दीप, तशीच शिवाजीमहाराजांची आठवण ही मराठ्यांच्या राष्ट्राला पूर्ववैभवाचे स्मरण करून देणारी म्हणून प्रिय वाटते.

आणि अशा कामी वर्षांचा हिशेब नाही. कारण तीनशेच काय पण तीन हजार वर्षे होऊन गेली तरी राम व कृष्ण यांची आठवण पुन्हा पुन्हा होण्याकरिता त्यांचे वार्षिक उत्सव आम्ही करतोच की नाही ?

पूर्वपरंपरा हे या जगातील राष्ट्रीय भावनेच्या व्यवहारातील एक प्रकारचे शिष्टमान्य असे भांडवल असते. म्हणून ज्या राष्ट्राला पूर्वी केव्हा वैभव प्राप्त झालेले असते ते त्या वैभवाची आठवण नष्ट होऊ देत नाही. कारण व्यवहारात भांडवलाला जे महत्त्व तेच राजकारणात गतवैभवाच्या आठवणीला. एखादे वेळी या भांडवलावर चालू व्याजाचे टक्के कदाचित मिळणार नाहीत; परंतु मूळ भांडवल गमावून दिवाळखोरी पत्करण्याला कोणी तयार होत नाही !

एखादी इमारत बांधावयाची असल्यास त्या ठिकाणी जर चांगल्या स्थितीतील जुना पाया सापडला, तर नवा पाया खणण्यापेक्षा इमारत उभारण्याला हा जुना पायाच इंजिनीअर लोक पसंत करितात. कारण तो पाया कालांतराने दृढमूल व भक्कम झालेला असतो.

फार काय ? १९१६ साली लखनौ येथील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात, हिंदी राष्ट्राकडून स्वराज्याच्या मागणीचा पहिला उच्चार झाला. त्याशिवाय ठराव मांडताना, बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांनी ठरावाच्या प्रस्तावनेत असे म्हटले की, “ हिंदुस्थानच्या लोकांची संस्कृति ( सामाजिक, धार्मिक, राजकीय ) फार प्राचीन असल्यामुळे आजच्या पिढीचे हिंदी लोक स्वराज्य मागण्याला, मिळण्याला व भोगण्याला सत्पात्रच ठरतात. ” आज इंग्रजांकडे स्वतंत्र स्वराज्याची मागणी करताना महाराष्ट्राला तरी हा आत्मविश्वास वाटतो की आम्ही पूर्वी स्वराज्य केलेले लोक आहो; आणि फिरून आज स्वराज्य मिळाले तर ते करण्या-चालविण्याची पात्रता आमच्या अंगी खचित आहे; आणि याला उत्तम दाखला व आधार हवा तर तो शिवाजी महाराजांचा देता येईल. तात्पर्य, जुन्या दाखल्याचा आधार हा स्वतःच्या मनाला आत्मप्रत्यय वाटण्याला आणि प्रतिपक्षाला वादात उत्तर देण्याला सहजच उपयोगी पडतो.

पात्रतेचा प्रश्न निघाला म्हणजे आजचे आमचे प्रतिपक्षी म्हणून इंग्रज लोक डोळ्यापुढे येतात; आणि त्यांचे सर्वांगीण वर्चस्व डोळ्याला दिपवू पाहते; पण समजा, एखाद्या इंग्रजाला माहीत नसलेल्या म्हणून जर शिवाजी महाराज व तत्कालीन इंग्रज यांच्या संबंधाच्या काही हकीकती– अगदी खऱ्या ऐतिहासिक हकीकती– सांगितल्या तर मला खात्री वाटते की, तो इंग्रज काही वेळ तरी चकित होऊन, डोळे चोळून गर्वाची धुंदी उतरून, किंचित विनयशील दृष्टीने मराठे लोकांकडे पाहू लागेल.

उदा०, त्याला माहीत नसलेली ही गोष्ट सांगावी की, राजापूरच्या बंदरात वखारी घालण्याला, निदान त्या ठिकाणी निर्भय सुरक्षित राहण्याला, ३०० वर्षांपूर्वीच्या इंग्रज व्यापाऱ्यांना शिवाजीचा कौल घ्यावा लागत असे. किंवा हे सांगावे की, शिवाजीने काही इंग्रज व्यापारी पकडून त्यांना खारेपाटणच्या गढीत कैदेत ठेवले होते. कांगावखोर इंग्रज व्यापाऱ्यांनी, वखारवाल्यांनी, शिवाजीकडे काही नुकसानभरपाई अर्जीजीने मागितली; ती पदरात पडण्यासाठी त्यांना तेरा वर्षे थांबावे लागले. त्याला हे सांगावे की, १६७४ साली तुमच्या मुंबई सरकारचे त्या वेळचे प्रतिनिधी शिवाजीच्या राज्यारोहण-प्रसंगी देण्याकरिता मौल्यवान नजराणे घेऊन गेले होते. किंवा दरबारात जाताना त्यांना रुमालाने हात बांधल्यासारखे दाखवून तरी जावे लागत होते. हजारो पॅगोडा-नाणी देऊन फिरंगी लोकांना बंदर जकातीची माफी मिळवावी लागत असे; आणि पेशवाईचा काळ शिवाजीनंतरचा, तरी त्याहि काळी झालेली वडगावची लढाई, पुरंदरचा तह, पहिल्या बाजीरावाकडे मित्रत्वाची भेट मागण्याकरिता आलेले शिष्टमंडळ, इत्यादि गोष्टी त्या अज्ञानी इंग्रजाला सांगण्यासारख्या आहेत.

असो. शिवाजी महाराजांनी हिंदु स्वराज्याची प्रस्थापना केली याविषयी तर अभिमान वाटतोच; परंतु शिवाजी महाराजाविषयी व्यक्तिशः आदरबुद्धी वाटते तिचे कारण त्यांचे अलौकिक व्यक्तिमत्त्व हे होय. व्यक्तिमत्त्वात त्यांची बुद्धिमत्ता, मुत्सद्देगिरी, नीतिमत्ता, धर्मनिष्ठा, सुराज्य व्यवस्थेविषयी आस्थेवाइकपणा इत्यादी गुण तर आहेतच; परंतु शिवाजी खरा वीरशिरोमणी होता ही गोष्ट ठळकपणे लक्षात येते. आजकालच्या सेनापतीसारखा तो सेनापती नव्हता; म्हणजे लढत्या सैन्याच्या पिछाडीला १०० मैलांवर उभे राहून टेलिफोन तारायंत्राने हुकूम सोडणारा, किंवा रेडिओवरून युद्धवार्ता ऐकणारा सेनापती तो नव्हता. शिपाईगिरीचे कोणतेहि काम निघाले असता तो आपल्या सैन्याच्या लढत्या तुकडीपुढे स्वतः हातावर शिर घेऊन लढलेलाच दिसला. अफझुलखान प्रकरणी तर त्याने शत्रूशी समोरासमोर ठाकून हत्यारी कुस्ती जिंकली. शाहिस्तेखानावर हल्ला केला तो रात्री बंदिस्त अशा वाड्यात शिरून. शत्रू पाठीवर घेऊन व प्राण हातात घेऊन त्याने अनेक प्रसंगी मोठमोठ्या मजला मारल्या. आग्रा येथील कैदेतून अत्यंत धाडसाने त्याने आपली सुटका करून घेतली. प्रवासाच्या त्या काळच्या गैरसोयीच्या दिवसांत म्हणजे घोड्यावरून किंवा पुष्कळ वेळी तर पायानेच प्रवास करावा लागत असता, शिवाजीने आग्र्यापासून खाली जिंजीपर्यंत किती पायपिटी केली असेल, याचा हिशेब कोण करणार? १६४६ साली शिवाजीने तोरणा व राजगड घेतले, तेथपासून पुढील ३०-३२ वर्षांत त्याने किती हालचाली केल्या, किती लढाया जिंकल्या, याची याद करून पाहिली म्हणजे त्याच्या उद्योगशीलतेची व चपळतेची पुरी खात्री पटते.

आणि हे सर्व होत असता त्याच्या हातून म्हणण्यासारखे दुष्कृत्य घडल्याचे प्रतिपक्षीय इतिहासकारहि सांगत नाहीत; इतका तो शीलसंपन्न व न्यायबुद्धीचा होता हे उघड ठरते. त्याची तुलना इतिहासातील प्रसिद्ध अशा काही व्यक्तींशी करणारे चौकस लेखक आढळतात. उदाहरणार्थ, अलेक्झांडर, सीझर, नेपोलियन अशा व्यक्तींशी त्याची तुलना करण्यात येते; परंतु वीरश्री व रणसंग्रामपटुत्व या बाबतीत तो या इतरांच्या बरोबरीचा ठरून शीलसंपन्नत्वात तर तो त्यांच्याहून अधिक ठरतो. अशा विभूतीची आठवण शेकडो वर्षे गेली तरी महाराष्ट्राने कशी विसरावी ?

शिवाजीच्या समकालीन वृद्ध–तरुण मराठ्यांत स्वातंत्र्याची भूक लागलेला असा एकटा शिवाजीच का निर्माण झाला याचे उत्तर देणे कठीण आहे; परंतु शिवाजीच्या अंगी व्यक्तिगुण विशेष श्रेष्ठ होते हे उत्तर दिल्यास त्याला जगाच्या इतिहासात अनेक आधार मिळतील. जगाची रीतच अशी आहे की, सामान्य समाजाच्या व्यवहाराची गाडी जोपर्यंत रुळावर फिरणाऱ्या चाकामुळे संथ चालते, तोपर्यंत देशावर कोण राज्य करतो याकडे लोक फारसे लक्ष देत नाहीत; पण समाजात एखादी तरी व्यक्ती असामान्य निघते की, तिचा संसार-व्यवहार ठीक चालला असला, तिला स्वतःला विशेष दुःख असे कोणतेहि नसले तरी आपण वस्तुतः स्वतंत्र आहो की परतंत्र आहो याची चिकित्सा करण्याकडे तिचे मन वळते; आणि स्वातंत्र्यलालसा व श्रेष्ठ प्रकारचा स्वाभिमान यांची तळमळ मनाला लागून तिला स्वतःची सुस्थितीहि गोड लागत नाही. इतकेच नव्हे तर, स्वातंत्र्याचे ध्येय पदरात पाडून घेण्याच्या धाडशी उद्योगात या सुस्थितीला व संपन्नतेला धोका येत असला तरी तो पत्करण्याला ती तयार होते. शिवाजीच्या काळी शिवाजीइतके बुद्धिमान किंवा स्वाभिमानी शूर मराठे कोणीच नव्हते असे कसे म्हणता येईल ? पण त्यांच्या गुणांना राजकारणात कामाला लावणाऱ्या महत्त्वाकांक्षेची आच त्यांच्यामध्ये नव्हती. समाजात एकाच वेळच्या तरुण पिढीत हूड पुंड अशी मुले शेकडो असतात; पण तो हूडपणा, ती पुंडाई ती कोणत्या उद्योगात खर्चतात, आणि शिवाजीने तेच गुण कोणत्या उद्योगात खर्चले हे पाहिले म्हणजे शिवाजीचे वैशिष्ट्य लक्षात येते.

वरील गुण शिवाजीने आपल्या वयाच्या पंधरा-सोळाव्या वर्षीच राजकारणाकडे लावले हे लक्षात घेतले म्हणजे तो असामान्य पुरुष होता हे उघड ठरते. या वयात शिवाजीची निजस्थिती अशी होती : घरी लाख-दीडलाखाची जहागीर. बापाचे छत्र प्रत्यक्ष डोक्यावर नाही; वडील भाऊ-बहीण आळा घालतील, मार्गदर्शन करतील, अशी घरी कोणी नाहीत. आई आहे पण ती परित्यक्ता असल्यासारखी उदास, दुःखी. जहागिरीचा व्यवस्थापक शहाणा तरी सावध व आपल्या व्यवस्थेच्या कार्यात मग्न. तात्पर्य, घरी मिळणाऱ्या या स्वतंत्रतेचा उपयोग शिवाजीने इतर चार तरुणां

प्रमाणे दुर्गुणाच्या उपासनेकडे किंवा नजीकच्या दूरच्या मुसलमान बादशाहीत एखादी नोकरी मनसबदारी मिळविण्याच्या राजनिष्ठ उद्योगाकडे केला असता तर ते स्वाभाविकच झाले असते; पण स्वातंत्र्यप्रेम व महत्त्वाकांक्षा ही त्याच्या मनात प्रबळ ठरल्यामुळे त्याला मामुली सांसारिक व्यक्तिसुख, किंवा राजनिष्ठा प्रकट करून मिळणारी बढती, या गोष्टी त्याज्य वाटल्या.

आणि विशेष हे की, या दोन्ही महत्त्वाच्या बाबतीतले स्वतःच्या बापाचे ( शहाजीचे ) नरम उदाहरण प्रत्यक्ष डोळ्यांपुढे ढळढळीत असता त्याचा पगडा त्याच्या मनावर बसला नाही. शहाजीने जिजाबाई व शिवाजी यांना पुण्याच्या जहागिरीकडेच ठेवले, यात त्याचा हेतू शिवाजीने परस्पर स्वातंत्र्याची चळवळ करावी असा होता असे कित्येकांना वाटते; पण ते तितकेसे खरे नाही. स्वतः शहाजीच्या मनात, स्वराज्य स्थापावे व बादशाही सत्ता झुगारून आपले स्वातंत्र्य जाहीर करावे, या कल्पनेने काही आकार म्हणजे स्पष्ट रूप धरले होते याला बळकट पुरावा नाही. त्याने आपला उत्कर्ष केला तो बादशाही हुकुमतीला, वरिष्ठ अधिकाराला, यत्किंचितहि धक्का न लावता. नोकरी, पगार व प्रभुकृपा सुरक्षित ठेवून आपल्या कामात जेवढा बाणेदारपणा दाखविता येईल तेवढा दाखविणारे सनदी, बिनसनदी गोरे व काळे राजसेवक आपण आज या ब्रिटिश राज्यातहि पाहतो; पण तो बाणेदारपणा म्हणजे कागद तोंडाआड धरून वरिष्ठाला नावे ठेवण्याइतकाच असतो.

शहाजी व शिवाजी यांची तुलना केली तर केवळ जहागिरदार या नात्याने दोघांची एकच प्रत होती. जहागिरीतील किल्ले सर्वस्वी बादशाही मालकीचे. जहागिरीतील इतर पुष्कळ गावचा वसूल करून तो बादशाही खजिन्यात भरावयाचा. काही थोड्या नेमून दिलेल्या गावांचा वसूल खासगीकडे घेऊन त्यातून आपला संसार व इतमाम चालवायचा; पण जहागीरदार म्हणून लोकांत मिरविले तरी वरून येईल त्या हुकमाची अम्मलबजावणी करण्यास दक्ष राहावयाचे, हाच जहागिरदारीचा सेवाधर्म ठरलेला होता. शहाजीने बादशाही मुलुखातले कोणतेहि एखादे ठाणे हस्तगत करून स्वतःकडे घेतले, व तेथील 'बादशाही अधिकारी' हुसकून लावले, असे इतिहास सांगत नाही. शिवाजीने मात्र स्वातंत्र्याचा उपक्रम केला तो बादशाही ठाणी हस्तगत करून व पर्यायाने आपल्या जहागिरीच्या मुलुखाला स्वराज्याचे रूप देऊन. शहाजी आपल्या मृत्यूपर्यंत नवे मुलूख जिंकीत होता, बादशाही राज्याला जोडीत होता; पण स्वतःला बादशाही सेनापती आणि ताबेदार समजून, उलट शिवाजीने पहिले ठाणे मारून हस्तगत केल्यानंतर अमुक एक प्रकारे बादशहाचा हुकूम मानला, त्याचा अम्मल केला व ताबेदार या नात्याने जहागिरीचा कारभार केला असे इतिहास सांगत नाही. स्वराज्यप्रस्थापनेचे शिवाजीचे पहिले कृत्य किरकोळ व लहानच होते, पण त्याला

उघड बंडाचे स्वरूप होते, व ते स्वरूप प्रकट झाल्यानंतर पुढे केव्हाहि त्याचे पाऊल त्या दिशेने मागे पडले नाही.

हे पहिले ठाणे मारून स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवण्याचे काम शिवाजीने १६४५ च्या प्रारंभी केले. म्हणून चालू १९४५ साली त्या गोष्टीला बरोबर तीनशे वर्षे पुरी होतात.

यानंतर पुढील वर्षी शिवाजीने राजगड घेतला व पुढे रायगडास नवी राजधानी वसवीपर्यंत तीच त्याच्या स्वराज्याची राजधानी चालू होती. राजगड व तोरणा हे किल्ले शिवाजीने घेतल्याचा काळ जवळ जवळ येतो. हे किल्ले घेण्याचा शिवाजीचा डौल बादशाही जहागिरदाराने बादशाहीचा मुलूख किंवा सत्ता वाढवून बळकट करण्यासारखा नव्हता, तर स्वतंत्र राज्यस्थापनेसारखा होता. एकदोन किल्ले व त्याखालचा मुलुख हे बादशाही मुलुखाच्या मानाने स्वतंत्र राज्य कसले ? पण ते चिमुकले, अगदी मुलाच्या खेळातले म्हटले, तरी हेतुदृष्ट्या स्वतंत्र स्वराज्य होते; आणि हा भेद लक्षात येण्याकरिता हे सांगता येईल की, दादाजी कोंडदेव यानेहि जहागिरीचा कारभार करताना मावळे जिंकली, पण ती बादशाही मुलुखाला जोडण्याकरिता ! तोरणा, राजगड इत्यादी हस्तगत करण्याचे काम अजून नावाने जहागीरदार असणाऱ्याच शिवाजीने केले; पण ते बादशाही मुलूख वाढविण्याकरिता नव्हे, तर स्वराज्याचा पाया घालण्याकरिता; आणि हे किल्ले घेण्याची जी स्वातंत्र्यबुद्धी तिनेच, शहाजीकडून शिवाजीला आलेल्या व दादाजी कोंडदेवाने वाढविलेल्या, जहागिरीला आपोआप स्वराज्याच्या मुलुखाचे स्वरूप आले.

शहाजीचे एकंदर चरित्र पाहता, विशेषतः त्याची शिपाईगिरी व मुत्सद्देगिरी पाहता, त्याच्या मनात स्वतंत्र स्वराज्य स्थापण्याची कल्पना अगदीच आली नसेल असे निखालस म्हणवत नाही; पण इतके मात्र खास म्हणता येईल की, स्वराज्यस्थापनेची जी कल्पना शहाजीच्या मनात असेल व स्वप्नात येत असेल, ती शिवाजीने मात्र प्रत्यक्ष अनुभवात उतरविली. शहाजीने मोगल बादशाही, अहमदनगरची निजामशाही व विजापूरची आदिलशाही या तीनहि शाह्यांशी आलटूनपालटून स्नेह व वैर केले. तथापि या त्रिकोणभेदात शहाजीची प्रत्यक्ष स्वराज्यस्थापनेची आकांक्षा कोठेच चौरस बसली नाही. तो मोगलांचा मनसबदारच झाला व राहिला. त्याने सहा वर्षेपर्यंत पेमगिरी येथे जवळ जवळ राजासारखे राज्य केले; पण ते निजामशाही जगविण्याकरिता, मुसलमान बाल-बादशहाला मांडीवर घेऊन, आणि जास्तीत जास्त म्हणजे त्याचा दिवाण किंवा मुख्य प्रधान म्हणून. शेवटी विजापुरी बादशाहीचा सरदार म्हणून शहाजी कर्नाटकात वावरत होता त्या वेळी, तो इतका मातबर, वजनदार व प्रबळ होता की, त्याच्या पूर्वीच्या कारकीर्दीत तो केव्हाहि तितका प्रबळ नव्हता; आणि त्याला बादशाही

हुकुमाने दुसऱ्या खेपेला कैद प्राप्त झाली ती या संशयामुळे म्हणतात की, शहाजी कर्नाटकात स्वतंत्र हिंदू स्वराज्य स्थापनेच्या ‘ विचारात ’ आहे; पण या महत्त्वाकांक्षेचा इनकार करूनच शहाजीला आपली सुटका या कैदेतून करून घेता आली. शहाजी हा फार तर ‘ किंग मेकर ’ होता. त्याने इतरांना राजपदे मिळवून दिली. किंवा इतर राजांच्या मागे राहून त्याने त्यांचा पाठपुरावा केला; पण स्वतः राजा होण्याची महत्त्वाकांक्षा त्याने धरली नाही, किंवा धरली असली तरी ती त्याला साध्य करता आली नाही, असे त्याचे वर्णन काही इतिहासकारांनी केले आहे तेच बरोबर आहे. शिवभारतकाराने आपल्या ग्रंथात अशी भलेपणाची मखलाशी केली आहे की, शहाजीला देवीने असा दृष्टान्त दिला होता की, ‘ तुला स्वतःला राजपद न मिळाले तरी तुझ्या मुलाला ते मिळणार आहे ’ आणि तसे घडले खरे. ज्या वेळी शहाजी विजापुरी सरदार म्हणून लढत होता, त्याच वेळी इकडे शिवाजी विजापुरी बादशाहीच्या महाराष्ट्रातील मुलुखावर स्वाऱ्या करून दक्षिणेत ठाणी व किल्ले जिंकीत होता.

इंग्रज कंपनीच्या पत्रव्यवहारावरून असे दिसते की, शिवाजीने अफजलखानाचा वध केलेला ऐकून शहाजीच्या मनात कल्पना आली की, आपण सैन्यासह उत्तरेस जाऊन आपला मुलगा शिवाजी याला मिळावे व दोघांनी मिळून विजापुरावर स्वारी करून आदिलशाही बुडवावी; परंतु हा बेत मनात असला तरी तो फसून शहाजीला कैद भोगावी लागली; आणि बादशहाचे स्वामित्व मान्य करून व कृपा संपादूनच शहाजीला सुटका करून घ्यावी लागली.

तथापि या समकालीन व समांतर अशा पितापुत्रांच्या वेगळ्या धोरणाचा व उद्योगाचा शेवट मात्र मोठा आनंददायक झाला. तो असा की, १६६१ साली विजापुरी बादशहाने, शिवाजी आवरत नाही असे पाहून, त्याच्याशी गुप्त तह करून त्यात शिवाजीचे स्वातंत्र्य मान्य केले, आणि वरती त्याला सबंध कोकणपट्टीचा मुलूख दिला; पण सर्वांत आनंदाची गोष्ट म्हणजे बादशाही सरदार व प्रतिनिधी या नात्याने हा तह घडवून पक्का करण्याच्या कामावर बादशहाने स्वतः शहाजीलाच नेमले.

विजापुराहून बंगलोरचे जे अंतर त्यापेक्षा विजापुराहून पुणे-रायगड यातील अंतर फारच कमी असे असतां बापाने इतक्या दूर मुलुखात बादशहाची नोकरीच केली; व शिवाजीने इतक्या जवळच्या मुलुखात बादशहाशी अठरा वर्षे सतत युद्ध करून प्रत्यक्ष स्वराज्य स्थापले, यावरून शिवाजीच्या खऱ्या योग्यतेची पूर्ण कल्पना येते.

असो. या वेळी शहाजीचा पुण्याच्या बाजूस चार महिने मुक्काम झाला होता; आणि त्या मुक्कामात शिवाजीने आपण जिंकलेले सिंहगड, पुरंदर, राजगड, तोरणा, रायरी ( रायगड ), प्रतापगड, पन्हाळा, विशाळगड, रांगणा हे किल्ले बापाबरोबर

हिंडून त्याला दाखविले. तेव्हा त्या बापाला आपले भाग्य केवढे थोर वाटले असेल याची कल्पना करावी ! पुढील साली ( १६६५ ) शहाजी वारला. पण त्याची पत्नी व शिवाजीची आई रायगडावर शिवाजीला झालेला राज्यारोहण समारंभ पाहाण्यास ( १६७५ ) जगली. म्हणून ती शहाजीपेक्षा अधिक भाग्यशाली म्हटली पाहिजे !

इतिहासाचार्य राजवाडे यांनी राधामाधवविलासचम्पू या ग्रंथाच्या प्रस्तावनेत शहाजीने स्वराज्यविषयक जे उपक्रम केले त्याची बरीच छाननी केली आहे. त्यांच्या मते शहाजीच्या सर्व चरित्रात स्वराज्यस्थापनेच्या कल्पनेचा धागा अनुस्यूत होता. शके १५५१, १५५५, १५६२ व १५७० या चार साली शहाजीने स्वराज्यस्थापनेचे प्रयत्न केले. पैकी पहिला चार-सहा महिन्यांत आटोपला. दुसरा शाहजहान बादशहाने हाणून पाडला. तिसरा कर्नाटकातील 'मांडलिकी' राज्यस्थापनेचा बराच सफल झाला; पण चवथा अंदाजाबाहेर फलद्रूप झाला तो पुण्यातील जहागिरीवर शिवाजीची कायमची नेमणूक करून; पण या सर्व प्रयत्नांना प्रच्छन्न, गुप्त संकल्पित अशी अपूर्णता-दर्शक नावे राजवाड्यांनाहि द्यावी लागली; म्हणजे एक प्रत्यक्षाशिवाय इतर सर्व प्रकारची स्वतंत्र स्वराज्ये शहाजीने स्थापून पाहिली ! शहाजीचा चरित्रकार म्हणतो त्याप्रमाणे स्वधर्म, स्वदेश, स्वभाषा, स्वजन यांचे लालनपालन-संरक्षण हे शहाजी आपले जीवित-साफल्य मानी. आम्ही वर दर्शविल्याप्रमाणे शहाजीने स्वाऱ्या करून अनेक मुलूख जिंकलेहि; पण ते आपण त्यावर राजा म्हणून अधिष्ठित होऊन राज्य करण्याकरिता नव्हे, तर बादशाहीच्या राज्याला जोडण्याकरिता. मात्र त्यावरील कारभार इतका स्वतंत्र की, कोणीहि ते स्वराज्यच म्हणावे. असले राज्य शहाजीने कर्नाटकात व तामिल मुलुखात स्थापले असले तरी, राजवाडे यांनीच दाखविल्याप्रमाणे, ते परकीय कानडी-तामिल लोक यांच्यावर एका मराठ्याने स्थापलेले राज्य होय, पण मराठ्याने महाराष्ट्राचा राजा होऊन, आपणासकट राष्ट्राला दिलेले ते स्वातंत्र्य किंवा स्वराज्य नव्हे. या शेवटच्या प्रकारचे राज्य शिवाजीने स्थापन केले हेच त्याचे वैशिष्ट्य !

आता हेहि खरे आहे की, " आकाशातून पडला आणि धावायला लागला " असा काही प्रकार शिवाजीचा नव्हता. बापाच्या खांद्यावर उभा राहूनच शिवाजी उच्चपदस्थ झाला. त्याच्या यशःसिद्धीची मांडणी आधीच शहाजीकडून पुष्कळशी झाली होती. म्हणजे जहागीर, मोठे नांव, सरदारमंडळात जागा, क्षत्रिय वृत्तीची पूर्व परंपरा, आणि शहाजीने दोनतीन बादशाहींशी एकदम किंवा आलटून पालटून लढण्या-साठी तयार केलेली सेना व सरंजाम.

परंतु काही म्हटले तरी शिवाजीने केलेला प्रत्यक्ष उद्योग आणि शहाजीने केलेला प्रत्यक्ष उद्योग या दोन्हींचे वर्णन केव्हाही एकाच शब्दाने करता येणार नाही. राजगड घेतल्यापासून १६६१ साली विजापूर बादशाहीचा व शिवाजीचा तह घडून

येईपर्यंत शिवाजीचे बंड ' बंड ' या नावानेच चालू होते. या बंडखोराचें पारिपत्य करण्याच्या नावाने बादशाही सरदार वरचेवर शिवाजीवर चालून आले, आणि शिवाजीने बादशाहीच्या मुलुखातील जे किल्ले किंवा ठाणी घेतली ती लढून किंवा ' जिंकून ' घेतली व बादशाही अमलापासून तोडून विलग केली. तात्पर्य, वयाच्या पासष्टीपर्यंत सतत शिपाईगिरी करूनहि स्वराज्यस्थापनेच्या दृष्टीने शहाजीला जे करता आले नाही ते शिवाजीने विशीच्या आंत केले; आणि जे केले ते गुप्त, प्रच्छन्न किंवा आभासात्मक असे काही केले नाही; तर हडसून-खडसून, ठसठशीत व शत्रूच्या छातीवर उघड पाय देऊन केले. बाप आणि लेक यांच्या कर्तृत्वात असा सूक्ष्म फरक काढण्यात ऐतिहासिक सत्यनिर्देशापलीकडे कोणास काय मिळवावयाचें असणार ? तथापि सूक्ष्म दृष्टीने पाहणाराला ज्याचे श्रेय त्याला द्यावेंच लागते.

( सह्याद्रि–मे १९४५ )

• • •

## महर्षि दादाभाई नौरोजी

शिष्टं ध्येयं स्वराज्यस्य, यत्नैः संस्थाप्य भारते
तत्सिद्धयर्थं प्रयतितुं दादाभाई दिवंगतः ।।

आम्हांस कळविण्यात अत्यंत दुःख वाटते की, परमपूज्य महर्षी दादाभाई नवरोजी यांना काल सायंकाळी देवाज्ञा झाली. दादाभाईंच्या वयाला ९२ वर्षे झालेली असल्यामुळे त्यांची प्रकृती अलीकडे सहजच क्षीण झालेली होती. तथापि ईश्वराची त्यांच्यावर विशेष कृपा म्हणून म्हणा किंवा काळालाहि त्यांच्यावर आपले पाश टाकण्यापूर्वी त्यांची चैतन्यमय मूर्ती पाहण्याचे कुतूहलसौख्य जितके अधिक घेता येईल तितके घ्यावे असे वाटल्यामुळे म्हणा, दादाभाईंची देहयष्टी पायावर खडखडीत उभी असून त्यांचे सर्व व्यवहार म्हणजे हिंडणे, फिरणे, बोलणे, चालणे, वाचणे, लिहिणे वगैरे सूक्ष्म प्रमाणात का होईनात, पण चालू होते. केवळ वार्धक्याशिवाय दुसरा कोणताहि विकार त्यांना अखेरपर्यंत जडला नव्हता असे म्हटले तरी चालेल. यामुळे त्यांच्या जन्मदिवसाचा समारंभ असाच आणखीहि कित्येक वर्षे आपणाला साजरा करण्यास सापडेल अशी त्यांच्या भक्तांना फार आशा वाटत होती; पण चित्कलेचे हे घड्याळ कितीहि भक्कम असले किंवा त्याला कितीहि काळजीपूर्वक जपून वागविले तरी वेळ आली म्हणजे केव्हा तरी ते बंद पडावयाचेच !

दादाभाईंच्या मृत्यूमुळे सर्व हिंदुस्थान देश हळहळेल व या टोकापासून त्या टोकापर्यंत तीक्ष्ण दुःखावेगाने हलून जाईल हे सांगावयास नकोच. तथापि त्यांच्या वयाकडे लक्ष देता त्यांच्या मृत्यूमुळे झालेल्या देशाच्या हानीचे दुःख वाटून घेण्यापेक्षा त्यांच्या महानुभाव चरित्राचे खरे मर्म काय होते याचा विचार केल्यापासून विवेकाला मदत होईल, व त्याचबरोबर कोणाच्याहि देशसेवाबुद्धीला स्फूर्ती येईल असे आम्हास वाटते. दादाभाईंचे चरित्र हिंदुस्थानातील आबालवृद्धांना मशहूर असल्यामुळे त्यातील ठळक गोष्टींचीहि सविस्तर माहिती येथे देण्याचे कारण नाही एवढेच सांगितले असता पुरे होईल की, त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक गोष्ट त्यांच्या स्वार्थत्यागाची व स्वदेशभक्तीची खूण पटविणारी अशीच होऊन गेली. सन १८२५ साली दादाभाईंचा जन्म झाला ती वेळ मुंबई इलाख्यात नुकत्याच होऊन गेलेल्या राज्यक्रांतीच्या संधिप्रकाशाची असल्यामुळे, जुने मात्र सर्वस्वी गेले व नवे हाती लागावयाचे ते अद्यापि दूरच होते. यामुळे सामान्य मनुष्याची दिशाभूल होण्याचा तो समय होता; परंतु केवळ आपल्या बुद्धिमत्तेच्या व उद्योगाच्या जोरावर त्यांनी त्यातल्या त्यात मिळणारे उत्तम शिक्षण मिळविले; एवढेच नव्हे तर त्या शिक्षणाचा उपयोगहि तांबडतोब समाजसेवेकडे करण्यास सुरुवात केली. जवळ जवळ ऐंशी वर्षांपूर्वी, म्हणजे इंग्रजी अमलाच्या अव्वलीस, सरकारी नोकरीला किती तेज व मान्यता होती हे लक्षात घेतले म्हणजे त्यांनी हाती प्रत्यक्ष आलेली शिक्षणखात्यातील मोठी नोकरी कशी सोडली याचे सामान्य मनुष्यास आश्चर्य वाटेल. सरकारी नोकरीच्या त्यागासबंधाने त्यांनी असे लिहून ठेवलेले आहे की, '**सरकारी नोकरी सुटणे यासारखा दैवाचा दुसरा मोठा लाभ मला जन्मांत कोणताच घडला नाहीं.**' व त्यांच्या पुढील चरित्रक्रमावरून पाहता त्यांचे हे उद्‌गार सर्वस्वी खरे आहेत असेच म्हणावे लागते. हिंदी लोकांना वरिष्ठ सरकारी नोकऱ्या मिळाव्या अशाविषयी दादाभाईंनी अत्यंत परिश्रम केले. असे असता स्वतः त्यांनीच हाती आलेली सरकारी नोकरी का सोडावी ? या प्रश्नाचे उत्तर इतकेच की, खऱ्या देशभक्तीचे स्वरूपच असे असते. सुखाच्या व सोयीच्या गोष्टी आपल्या देशबांधवांना लाभाव्या या हेतूने कोणताहि खरा देशभक्त जरी खटपट करतो तरी तो स्वतः मात्र त्या सुखाचा किंवा सोयीचा अभिलाष धरीत नाही. इतकेच नव्हे तर त्या प्राप्त झाल्या असल्या तरी त्यांचा मोहहि दूर सारून त्यातून तो बाहेर पडतो. सरकारी नोकरीत शिरणे म्हणजे आपली बुद्धिमत्ता विक्रीला काढून सद्‌सद्विवेकाला कुलूप लावून त्याची किल्ली परक्याच्या हाती देणे होय ही गोष्ट सामान्य प्रतीच्या सरकारी नोकरासहि जाणवते, मग दादाभाईंसारख्या उच्च कोटीतील विभूतीस ती गोष्ट अनुभवाशिवाय केवळ आत्मस्फूर्तीनेहि पटावी यात नवल कोणते ? सेवाधर्मातील हे दोष बडोदे संस्थानच्या दिवाणगिरीसारख्या

गौ. म....४

प्रतिष्ठित व बऱ्याच स्वतंत्र अशा नोकरीत बरेच कमी असणार हे उघड आहे. तथापि एका मोठ्या देशी संस्थानाचे कल्याण करण्याची संधी थोडीबहुत तरी मिळवून देणारी मोठी नोकरीदेखील दादाभाईंनी पोलिटिकल रेसिडेंटचा यत्किंचित उपसर्ग लागताच सोडून दिली!

स्वतंत्र देशसेवा हेच दादाभाईंचे पहिल्यापासून ध्येय होते; व शिक्षणक्रम संपल्यानंतर अवघ्या १०–१२ वर्षांतच त्यांनी समाजसुधारणा, समाजशिक्षण, स्थानिक स्वराज्य, राजकीय शिक्षण वगैरे बाबतीत आपली बुद्धिमत्ता, आपली कल्पकता, आपली उद्योगशीलता, आपली स्वार्थत्यागबुद्धी व आपले नीतिधैर्य इतक्या तऱ्हेने लोकनिदर्शनास आणले की, मुंबईसारख्या शहरी त्यांची पुढारी लोकांत मुख्यत्वाने गणना होऊ लागली. वयाच्या ३० व्या वर्षीच दादाभाईंनी लंडन येथील एका स्वदेशी व्यापारी पेढीवर नोकरी धरली व तिचाहि हेतू स्वतः पैसा मिळवून गबर होण्याचा नसून, ब्रिटिश राज्याचे केंद्रस्थान जे लंडन शहर तेथे राहून, आपल्या देशाचे हित जेणेकरून होईल असा उद्योग करण्याचाच होता. लंडन येथे लंडन इंडियन सोसायटी, ईस्ट इंडिया असोसिएशन वगैरे संस्थांचे काम त्यांनी नावारूपास आणले, हिंदी लोकांना वरिष्ठ सरकारी नोकऱ्या मिळण्याविषयींची अतिशय खटपट केली व हिंदुस्थानातून विलायतेत शिक्षणाकरता जाणाऱ्या तरुण पिढीची सोय लावून दिली; अशा रीतीने वयाच्या ४४ व्या वर्षाच्या आत दादाभाईंनी हिंदुस्थानात व विलायतेतहि महत्त्वाची कामगिरी करून राष्ट्राची कृतज्ञता संपादिली; व १८६९ साली मुंबई शहराच्या लोकांनी त्यांना कृतज्ञतापूर्वक मानपत्र समर्पण केले.

यानंतर दादाभाईंच्या उच्च प्रतीच्या राष्ट्रीय कामगिरीस खरी सुरुवात झाली. लोकशिक्षण, समाज सुधारणा वगैरे विषय त्यांच्या आवडीचे असताहि ते सर्व त्यांनी बाजूस ठेवून, राष्ट्राच्या दुर्दशेची खरी मीमांसा काय व ती घालविण्यास खरा उपाय कोणता याची आपल्या मनाशी कसून चौकशी केली. या चौकशीत त्यांना असे दिसून आले की, हिंदुस्थान देश हा निर्धन व इतर अनेक बाबतीत विपन्न होण्याचे खरे कारण त्यावरील परकीय अम्मल व विशेषतः त्यातील एकतंत्री राज्यपद्धती ही होय. ही गोष्ट बोलून दाखविणे त्या काळच्या स्थितीत अत्यंत धैर्याचे किंबहुना धाडसाचेच काम होते. कारण राज्यकर्तृत्वाच्या अभिमानाने स्वतः अधिकाऱ्यांची दृष्टि तर अंध झाली होतीच; पण ब्रिटिश अमदानीतील पहिल्या तकलुपी भरभराटीची झिलई लोकांच्याहि डोळ्यांना अद्यापि दिपवून टाकीत होती. तथापि मनाला पटणारी गोष्ट स्पष्ट शब्दांनी बोलून दाखवावयाचीच, मग त्यात कोणाचीहि मर्जी जावो किंवा कोणी आपला कितीहि उपहास करो, असा त्यांचा बाणा असल्यामुळे देशस्थितीचा सूक्ष्म व परिश्रमपूर्वक विचार करून काढलेले सिद्धांत, हिंदुस्थानात हो वा इंग्लंडात हो

खाजगी लोकात हो, वा प्रत्यक्ष अधिकाऱ्याच्या तोंडावर हो, बोलण्यास दादाभाईंनी केव्हाहि कमी केले नाही. त्यांच्या या नवीन सिद्धांताचे तेज सामान्य लोकांच्या बुद्धीस सहन न होऊन पुष्कळांनी त्यांची पुष्कळ दिवसपर्यंत विक्षिप्त म्हणून टवाळीहि केली; पण सत्याचाच अखेर विजय होत असल्यामुळे, फक्त ब्युरॉक्रसीशिवाय इतर सर्व लोकांची आपल्या सिद्धांताविषयी त्यांनी खात्री करून दिली. दादाभाईंच्या समकालीन असलेल्या सुशिक्षित, किंबहुना राजकारणातहि पडणाऱ्या, हिंदी गृहस्थांत स्वतः दादाभाईइतक्या किंबहुना त्यांच्याहून काकणभर अधिक बुद्धिवान अशा व्यक्ती काही थोड्याथोडक्या नव्हत्या; पण दादाभाईंचे सूक्ष्म निरीक्षण, परिस्थितीचा भेद करून जाणारी त्यांची बुद्धिमत्ता, व सर्व जग एका बाजूस असले तरी आपला सत्सिद्धांत त्यांच्यापुढे प्रतिपादन करण्यास लागणारे मनोधैर्य हे गुण एकट्या दादाभाईंच्याच अंगी होते. यामुळे हिंदी राजकारणातील एका श्रेष्ठ तात्त्विक सिद्धांताचे संस्थापक व प्रवर्तक अशा तऱ्हेची म्हणजे आचार्यांची पदवी सर्व जगाला त्यांना द्यावी लागली. या त्यांच्या सिद्धांतावर प्रचलित सर्व राष्ट्रीय राजकारणाचा पाया रचला आहे व या पायाच्या भक्कमपणावर स्वराज्याच्या मागणीची इमारत रचली गेली आहे व टिकेलहि. कोणतीहि गोष्ट आमच्या सरकारास समजून सांगितली म्हणजे समजते व समजली की लगेच उमजते, अशी त्यांची प्रथम प्रथम भोळी समजूत असल्यामुळे आपल्या वयाची पुष्कळ मौल्यवान वर्षे त्यांनी निव्वळ आकडे-मोडीत घालविली. तसेच ब्रिटिश जनतेच्या सौजन्यावर व स्वातंत्र्यप्रियतेवर त्यांचा बराच विश्वास असल्यामुळे त्यांनी विलायतेत पुष्कळ दिवस राहून पाहिले. तेथील मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन, विवेचनपूर्ण पत्रे लिहून व त्यांच्या औदार्य-बुद्धीस पाझर फुटावा म्हणून करुणाष्टके आळवून पाहिली. ब्रिटिश जनता झाली तरी पार्लमेंटच्या द्वारेच काम करणार ! अर्थात् तेथे प्रवेश करून घेतल्याने प्रत्यक्ष देवदर्शन घडून हिंदुस्थानचे दुःखनिवारण होईल या हेतूने त्यांनी पार्लमेंटमध्ये प्रवेश करूनहि पाहिला. एवढेच नव्हे तर, केवळ आपल्या कर्मकटकटीचा विलायतेतील लोकांना वीट आणून त्यांनी अनेक कमिशने बसविली, कमिट्या नेमविल्या व त्यांच्यापुढे साक्षीदार या नात्याने पुरावा मांडून किंबहुना कमिशने व कमिट्या यांचे स्वतः एक सभासद होऊन तक्रारी मिनिटेहि लिहून पाहिली. तात्पर्य, ज्याला सनदशीर चळवळ असे प्रौढ व उदात्त नाव देण्यात येते तिचा असा एकहि प्रकार नाही की जो दादाभाईंनी केवळ नुसता गमतीखातर नव्हे तर अनेक वर्षे रात्रंदिवस परिश्रम करून, आतड्याला पीळ पाडून, रक्त आटवून व स्वार्थत्याग पराकाष्ठेला पोचवून करून पाहिला नाही. एका शब्दात सांगावयाचे तर सनदशीर चळवळीच्या तत्त्वाचे ५० वर्षेपर्यंत त्यांनी परीक्षण केले, व शेवटी नाइलाजाने सनदशीर चळवळीचे सत्त्वहरण झाले, असेच त्यांना मोठ्या दुःखाने जगजाहीर करावे लागले !

दादाभाईंना हिंदी राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष होण्याचा मान तीन वेळा मिळाला व या तीन वेळी अध्यक्ष या नात्याने त्यांनी केलेली भाषणे जो लक्षपूर्वक ताडून वाचील त्याला दादाभाईंचे खरे चरित्र कळल्यावाचून राहणार नाही. १८८६ साली कलकत्ता येथे ब्रिटिश जनतेच्या औदार्याची स्तुती करून त्यावरच भिस्त ठेवण्याचा त्यांनी बहुधा उपदेश केला. १८९३ साली लाहोर येथील भाषणात ब्रिटिश जनतेच्या औदार्याच्या आत्मस्फूर्तीवरील त्यांचा विश्वास किंचित ढळलेला दिसून आला. कारण केवळ या औदार्यावर भिस्त न ठेवता त्यांनी असे प्रतिपादले की, अमुक एक गोष्ट युक्तिसिद्ध आहे अशी ब्रिटिश जनतेची खात्री करून दिली म्हणजे कोणतीहि मागणी ती सहसा नाकारणार नाही. १८९३ साली आत्मनिष्ठा व स्वावलंबन यांकडे वळलेली त्यांची दृष्टी १९०६ साली कलकत्ता येथील भाषणात त्या दिशेला संपूर्ण वळली व स्वराज्य हेच ध्येय व स्वावलंबन हेच त्याचे साधन वगैरे सुप्रसिद्ध चतुःसूत्रीचा त्यांनी उच्चार केला; व एका अर्थाने या सत्य सिद्धांताचा पुण्योच्चार करिता करिता "जनपदहितकर्ता" या नात्याची आपली कारकीर्द संपविली. ते म्हणाले, "मी इतके निराशेचे प्रसंग सोसले की, त्यामुळे कोणाचेहि काळीज फुटून गेले असते व तो निराशेच्या वेडाने बंड करण्यास प्रवृत्त झाला असता." याच भाषणात स्वदेशाला स्वराज्याचा आशीर्वाद देताना दादाभाईंना नोकरशाहीला शाप द्यावा लागला. ते म्हणाले, "मी फार झगडलो व अनेक वेळ झगडा करून यशाचा पेला ओठासहि नेऊन लाविला; पण केवळ या नोकरशाहीने तो पेला उडवून दिला!" दादाभाईंचा आशीर्वाद व त्यांचा शाप यांच्या अंगी काहीतरी दिव्य तेज खचित असले पाहिजे. कारण त्यांच्या भाषणानंतर अवघ्या १० च वर्षांत स्वराज्याच्या चळवळीला इतके तेज आलेले आम्ही पाहतो!

१९०६ च्या राष्ट्रीय सभेनंतर दादाभाईंनी जवळ जवळ योगनिद्रा स्वीकारली होती असाच भास होतो. ते क्वचित एखादा जाहीर शब्द बोलत, पण त्यातूनहि त्यांच्या सात्त्विक देशप्रीतीचा व त्यांच्या आशावादित्वाचा पूर्वीसारखा खणखणीत आवाज ऐकू येत असे. वरसोवा येथे समुद्रकिनाऱ्यावर पश्चिमेकडे डोळे लावून विचारमग्न होऊन बसलेले त्यांना पाहिले असते म्हणजे शरासनावर पडून प्राणोत्क्रमणासाठी उत्तरायणाची वाट पाहात बसणाऱ्या भीष्माची आठवण झाल्याशिवाय राहिली नसती.

सर्व आयुष्यभर निराशाशल्ये अंगात रुतून राहिली होतीच; तेव्हा राजकारणातल्या क्षात्रधर्माचे ते पुण्य फळ असे मानून औषधोपचाराकरीता येणाऱ्या डॉक्टराला भीष्माप्रमाणे

एवंगते मयेदानीं वैद्यैः कार्यमिहास्ति किम् ।

एभिरैव शरैश्चाहं दग्धयोऽग्नौ नराधिपाः ॥

असे विनोदाने म्हणत आहेत, किंवा आपल्या प्रिय राष्ट्राला उद्देशून भीष्माप्रमाणेच

प्रशमे हि कृतो यत्नः सुमहान्सुचिरंमया

न चैव शकितः कर्तुं यतो धर्मःस्ततो जयः ॥

असा गंभीरपणाने निर्वाणीचा उपदेश करून राष्ट्राला कार्यप्रवृत्त करीत आहेत, अशी काव्यमय कल्पना प्रतिभानष्टालाहि सुचली असती !

दादाभाई आपले इहलोकीचे कर्तव्य करून निजधामाला गेले खरे; पण त्यांच्यासारख्या पुरुषाची गणना परमेश्वराने या जगात काही गोष्टी घडवून आणण्याकरिता जन्मास घातलेल्या "अधिकारिक" पुरुषांत होत असल्यामुळे त्यांचा आत्मा हिंदुस्थानाकरिता त्यांनी स्थापलेले जे ध्येय ते हिंदुस्थानास प्राप्त होईपर्यंत सायुज्यमुक्तीची अपेक्षा न धरता परमेश्वराची प्रार्थना करण्यास चुकणार नाही, किंबहुना त्यातच आनंद मानून जरूर लागल्यास त्यासाठी पुनर्जन्म घेऊनहि पुनः अवतरेल असा आमच्या शास्त्राज्ञेप्रमाणे आम्हास विश्वास आहे. तथापि त्यांच्या अधिकाराप्रमाणे त्यांनी चालविलेला उद्योग सफल होण्यास इतका काल न लागता त्यांच्या निरपेक्ष व निरलस सत्कर्मांनी प्राप्त होणारी सद्गती त्यास लवकरच प्राप्त होवो, अशी परमेश्वरापाशी आमची प्रार्थना आहे.

(केसरी, जून–१९१७)

• • •

## न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे

टिळकांच्या पूर्वीच्या निकट पिढीचे प्रख्यात राजकीय पुढारी म्हटले म्हणजे कै. महादेव गोविंद रानडे हे होत. एका अर्थाने ते नुसते पुण्याचे गुरु नसून सर्व हिंदुस्थानचे गुरु होते असे म्हणता येईल. असा कोणताहि प्रांत नाही की, ज्यातील सुशिक्षित लोक त्या काळी रानड्यांना विद्वत्ता, राजकारणाचे ज्ञान व स्वदेशप्रीती या बाबतीत प्रत्यक्ष गुरुस्थानी मानीत नव्हते. किंबहुना, गेल्या वीस-बावीस वर्षांत अनेक नवीन राजकीय पुढारी या भूमीत निर्माण झाले व त्यांनी हा देश अकल्पित अशा उन्नतीप्रत नेला, तरी रानड्यांचे नाव घेताच त्यांच्या योग्यतेचे स्मरण होऊन अजूनदेखील प्रत्येक समंजस मनुष्य मनाने त्यांना वंदनच करितो. "अलौकिक बुद्धिमत्ता, दीर्घ व सतत व्यासंग, देशाबद्दलची खरी कळकळ, विद्यार्जनाचे स्वाभाविक जडलेले व्यसन, अचूक कल्पकपणा वगैरे अनेक गुणांनी माधवरावजींचे चरित्र बोधप्रद असून महत्त्वाचे झाले आहे" अशा प्रकारची सामान्य स्तुति तर टिळकांनी रानड्यांच्या मृत्युलेखात केलीच आहे; पण टिळकांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे त्यांनी

रानड्यांचे म्हणून जे वैशिष्ट्य पुढे दाखविले आहे ते खरोखरच मार्मिकपणाचे आहे. ते असे की, "महाराष्ट्रातील तेज अनेक कारणांनी सर्वस्वी नष्ट होऊन तो एक थंड गोळा बनला असता, त्यात फिरून जिवंतपणाची ऊब कशी येईल, व तो गोळा आपले हातपाय कसे हालवू लागेल याचा रात्रंदिवस विचार करून, आणि ते दुर्धर काम स्वतः अंगावर घेऊन त्याकरिता जिवापाड मेहनत जर कोणी केली असेल तर ती प्रथम माधवरावजींनी केली असे म्हटले पाहिजे." महाराष्ट्रातील जुन्या थोर घराण्यातील लोक घरच्या सुखवस्तुपणामुळे आयदी बनले व पुणे पाठशाळेतून तयार झालेले बहुतेक सर्व नवे विद्वान नोकरीत शिरून निस्तेज झाले. अशा स्थितीत रानडे यांनी केलेल्या कामगिरीचे महत्त्व व त्यांच्या स्फूर्तीचे तेज सहजच विशेष ठरते, आणि मौज ही की हा सर्व पराक्रम त्यांनी सरकारी नोकरीत राहूनच केला!

रानडे यांच्या सर्वमान्यतेच्या आड येण्यासारखी एक गोष्ट होती ती अशी की या देशाची सुधारणा सर्वच अंगांनी झाली पाहिजे असे मनाने घेतल्यामुळे त्यांनी प्रार्थनासमाज, विधवा-पुनर्विवाह, धर्मसहिष्णुत्व वगैरे गोष्टींवर विशेष भर दिला; पण या तीनहि गोष्टी तेव्हां समाजात अप्रिय असल्यामुळे त्यांच्या राजकीय कर्तृत्वासहि संसर्गदोषाने लोक नाके मुरडीत. तथापि लोक आपणास काय म्हणतील याविषयी सर्वदा पूर्णपणे उदासीन राहून, बारा आणि बारा चोवीस तास हरएक प्रकारच्या चळवळीची चर्चा व उद्योग यांनी आजन्म ठेविला होता. लोकमताची जशी त्यांनी पर्वा केली नाही, तशीच सरकारच्या अवकृपेचीहि त्यांनी पर्वा केली नाही. इंग्रज लोकांचा गुण घेतला तरी व्यक्तिशः त्यांच्याशी केव्हाहि लगट करावयाची नाही, फाजील स्नेहसंबंध ठेवावयाचा नाही, उदारमताचा दिमाख दाखविण्याकरिता त्यांचे घरी जेवणाखाणास जाणे किंवा स्वतःच्या घरी त्यांना जेवणाखाणास बोलावणे या गोष्टी होता होईतो टाळावयाच्या, त्यांजकडून अपमान होईल असे सर्व प्रसंग युक्तीने टाळावयाचे, त्यांच्याशी मतभेद असेल तो लिहून, बोलून स्पष्ट दाखवायचा; तात्पर्य, दुसऱ्याचा उपमर्द तर करावयाचा नाही व स्वतःचा प्रतिष्ठितपणाहि गमवावयाचा नाही अशी जी मध्यम स्वभावाच्या थोर मानी मनुष्याची वागण्याची ढब असते ती रानडे यांना सर्वस्वी साधली होती. तेलंग-भांडारकरांना युनिव्हर्सिटीचे व्हाइस चान्सेलर सरकारने नेमले; पण रानड्यांना तो मान सरकारने केव्हाहि दिला नाही, याचे कारण त्यांची विद्वत्ता कमी असे नसून त्यांच्याबद्दल सरकारची मनातून इतराजी अधिक हेच होय. तसेच तेलंगांनंतर त्यांना सरकारने हायकोर्टातील हिंदी न्यायाधीशाची जागा दिली ती देखील केवळ नाइलाज म्हणून. त्यांनी एलएल. बी. व ॲडव्होकेट या दोन्ही परीक्षा दिलेल्या असताहि वकिली करण्याचा त्यांना मनापासून कंटाळा एवढ्याकरिता ते सरकारी नोकरीत शिरले. त्यांनी दादाभाईप्रमाणे पोटाचा स्वतंत्र धंदा केला असता, किंवा विष्णुशास्त्री व टिळक यांसारखा स्वार्थत्याग करून एखादी शिक्षणसंस्था काढली

असती तर त्यांच्या लौकिकांत अर्थात अधिकच भर पडली असती; पण त्यांनी अमुक केले असते तर त्यांची कीर्ती अधिक झाली असती असे म्हटले तरी, सरकारी नोकरी करून त्यांतच त्यांनी जी देशसेवा केली तीहि सर्व देशाने गुरूच्या स्थानी मानण्याइतकी अलौकिक ठरली, हीच विशेष कौतुकाची गोष्ट होय. नोकरीचे बंधन रानडे इतकेच समजत की, अगदी उघडपणे सरकारी नोकराने राजकीय चळवळ करू नये; किंचित सूक्ष्म पडदा ठेवला म्हणजे काम झाले. शिवाय ते जी चळवळ करीत तीहि अशा उत्कृष्ट पद्धतीने करीत की खुद्द सरकारलाहि उघड नाव ठेवण्यास त्यात जागा सापडू नये. खुद्द राष्ट्रीय सभेचे जनकत्व ज्या दोनचार गृहस्थांच्या योजकतेकडे दिले पहिजे त्यांत रानडे यांची प्रमुखत्वाने गणना होते; व त्यापूर्वीहि पुण्यात जी दंगलीची चळवळ झाली तिलाहि कारण रानडे आहेत अशी सरकारची समजूत होण्याइतका त्यांचा आणि पुण्यातील चळवळींचा संबंध निकट होता.

माधवरावांच्या पूर्वीच्या व बरोबरीच्या पिढीत विद्वान पुष्कळ झाले व त्यांतील कित्येकांनी सार्वजनिक कार्यात लक्ष घालण्याचा थोडाबहुत प्रयत्नहि केला. पण " यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्वतः " या न्यायाने देशसेवेचे मर्म रानडे यांनीच खरे करून दाखविले. लोकांप्रमाणे सरकारलाहि माधवराव यांच्या बुद्धीचा उपयोग हायकोर्टापेक्षा वरच्या दर्जाच्या एखाद्या ठिकाणी करिता आला असता; पण तो करिता आला नाही हा सरकाचा दोष होय, माधवरावजींचा नव्हे असे टिळकांनी म्हटले आहे, व ते योग्यच आहे. अडचणींची सबब सर्वांनाच असते; तीतून कोणीच सुटलेला नाही. तथापि त्यातूनहि राष्ट्रसेवेचा भगवा झेंडा हाती घेऊन रानडे यांनीच महाराष्ट्राला सार्वजनिक कार्यकर्तेपणाचा धडा घालून दिला. सुदैवाने त्यांच्या मागून येणारी सुशिक्षित लोकांची पिढी स्वार्थत्यागाच्या दृष्टीने त्यांच्याहि पुढे गेल्याने महाराष्ट्राचे पाऊल रानड्यांच्या मृत्यूनंतर मागे न येता पुढेच पडले. त्यांपैकी गोपाळराव गोखले हे तर रानड्यांचे प्रत्यक्ष शिष्यच होते; आणि टिळक जरी अनेक बाबतीत रानड्यांचे प्रतिपक्षी होते, तरी उत्कर्षाच्या शिखराला टिळक पोचले असताहि रानडे यांच्या गुणासंबंधाने बोलण्याचा प्रसंग आल्यास तेहि कृतज्ञता व पूज्यबुद्धी मनात ठेवूनच बोलत असत.

ज्ञानाच्या बाबतीत, टिळक रानड्यांना पूर्वकालीन हेमाद्री किंवा माधवाचार्य यांची उपमा देत असतच; पण ज्ञानाप्रमाणे, रानडे यांनी उत्तेजन देऊन पुढे आणलेल्या संस्थाहि अशाच विविध स्वरूपाच्या होत्या. वक्तृत्वसमारंभ, वसंतव्याख्यानमाला, औद्योगिक परिषद, प्रदर्शन, फीमेल हायस्कूल, प्रार्थनासमाज, लायब्ररी, सार्वजनिक सभा—तात्पर्य, पुण्यात अशी कोणतीहि सार्वजनिक संस्था नव्हती की जिच्या उघड किंवा गुप्त चालकांत रानडे नव्हते. सरकारला ही गोष्ट पुष्कळ दिवस कळून

चुकली होती, व टेंपलशाहीत रानड्यांवर राजद्रोहाचा खटला न झाला तरी आरोप आल्याशिवाय राहिला नाही. १८७४ पासून ७९ पर्यंत राजकीय चळवळीच्या महोदयाचा पूर्वरंग पुण्यात अनेक अंगांनी दिसून येत होता. सन १८७४–७५ साली बडोद्याचे अधिपति मल्हारराव गायकवाड यांच्यावर तेथील रेसिडेंट कर्नल फ्रेअर यांना विषप्रयोग करण्याचा आरोप ठेवून कमिशनमार्फत त्याची चौकशी करण्यात आली होती. या प्रकरणातील सर्वच गोष्टी अजब होत्या. मल्हाररावासारखा बेबंद, तऱ्हेवाईक, सुलतानी संस्थानिक. रेसिडेंट तेहि कातडीने गोरे पण सुलतानच. त्याची इतकी सुल्तानी अजब की दादाभाई नौरोजींसारख्या सात्त्विक मनुष्याला वैतागून बडोद्याची दिवाणगिरी सोडून द्यावी लागली; व आरोपहि असला भयंकर की त्याची जाहीर रीतीने चौकशी झाल्याखेरीज समाधान कोणालाच नाही. एवढ्या बड्या संस्थानिकाला आरोपी करून इन्साफ करण्याचा हा इंग्रजी राज्यात दुसरा प्रसंग. या प्रकरणाचा गवगवा सर्व हिंदुस्थानभर झाला; पण महाराष्ट्राने त्या प्रसंगी आपले वैशिष्ट्य दाखविले. तो प्रकार असा– कमिशन नेमले तेव्हा चौकशी व्हावयाची ती अर्थात दुतर्फा. सरकारच्या बाजूला कायदेपंडिताचा तोटा नव्हता; कारण पैशालाहि तोटा नाही; पण मल्हारराव अटकेत असल्यामुळे पैशाचे बाबतीत ते सर्वस्वी पराधीन. पुढे काहीतरी प्रसंग येणार असे पाहताच महाराजांनी बऱ्याच मोठ्या रकमा लांबविण्याचा प्रयत्न केला होता, पण तो फसला. लाखो रुपयांच्या नोटा, खाजगी तिजोरीतील शिलका, जड-जवाहीर वगैरे सर्व इंग्रज अंमलदारांनी जप्त करून मोहोरबंदीत टाकून दिल्यामुळे वकील-बॅरिस्टर वगैरे करण्यास लागणाऱ्या पैशाकरिताहि महाराजांना सरकारच्या तोंडाकडे पहावे लागले. महाराजांना या कामी पैसा किती द्यावा याची घासाघीस सुरू झाली. मल्हाररावांतर्फे जेफर्सन व पेन हे सॉलिसिटर काम करीत होते. त्यांनी डिफेन्स-करिता एकंदर चार लक्ष बत्तीस हजार रुपयांचे अंदाजपत्रक केले होते; पण सरकार एवढी रक्कम देण्यास तयार होईना. अखेर मल्हाररावांनी व्हाइसराय साहेबांना अशी तार केली की गाठी पैसा नसल्यामुळे माझ्या बचावाचे काम लोळत पडले आहे. तरी मला बडोद्याच्या खजिन्यातून दोन लक्ष रुपये तरी ताबडतोब द्यावेत, त्यांचा हिशेब सॉलिसिटर देतील.

"Deeply pained to learn from my solicitors that preparations for my defenee are at a standstill for want of funds, their requirements for legitmate expenses not granted. Promises of ample opportunity for vindicating my innocence thus practically ignored. Private purse attached. Rani's marriage ornaments and money seized. My character, liberty and kingdom at stake." ही तार खाजगी होती; परंतु अशा तारेचा गवगवा झाल्याशिवाय कसा राहणार? तारेचा सुगावा लागताच

सर्व महाराष्ट्रभर गोंधळ उडून गेला. मल्हाररावाबद्दल व्यक्तिशः विशेष सहानुभूति होती असे नाही; पण आरोप ठेवून बचावाकरिता जरूर तो पैसाहि न देणे हा उलट सरकारी कटाचाच एक प्रकार आहे असे सर्व लोकांच्या मनाने घेतले; पण या खऱ्या अगर मानीव कटाचा सक्रिय निषेध करण्याची स्फूर्ती फक्त पुण्यानेच दाखविली. पुणेकरांनी बडोद्यास व व्हाइसरॉय साहेबांना एकदम तार केली की महाराजांच्या बचावाकरिता महाराष्ट्र एक लक्षपर्यंत वर्गणी देण्यास तयार आहे; त्यांना जरूर ती कायदेपंडितांची मदत द्यावी. पुढे सरकारने दोन-अडीच लक्ष रुपये खर्चास दिले; विलायतेहून मोठा बॅरिस्टर येऊन कमिशनपुढे बचावाची जी योग्य तजवीज व्हावयाची ती झाली; व पुण्याला एक पै सुद्धा खर्च पडला नाही. या कामी पुण्याचे जसे बाहेर नाव झाले तसेच सरकारच्या डोळ्यात पुणे खुपूहि लागले. पुण्यात गुप्त पोलिसांचा सुळसुळाट झाला. तार वास्तविक राजरोसपणे सहीनिशी गेली होती पण कोणत्याहि गोष्टीच्या मुळाशी काय आहे हे उलथून पालथून पाहण्याची सरकारची वानरवृत्ती प्रसिद्धच असल्यामुळे त्यांनी बारीक शोध चालविला होता. असल्या शोधात प्रमुख माणसावर संशय यावयाचाच, तसा तो माधवरावजी रानड्यांवर आला; व फार दिवस पुण्यास राहिल्याचे निमित्त करून त्यांची बदली नाशकास करण्यात आली.

श्रीमती रमाबाईसाहेब रानडे यांनी आपल्या पुस्तकात या वेळच्या एका संभावित गुप्त पोलिसाची हकीकत दिली आहे ती फार मनोरंजक वाटते. या भल्या प्रतिष्ठित गृहस्थाने पुण्यास श्रीमंतीचा थाट करून आणि अनेक करमणुकींच्या साधनांनी आपल्या घरी अड्डा पाडून पुष्कळ सद्गृहस्थ नादी लावले होते. ही बातमी सीतारामपंत चिपळूणकरांच्या उदाहरणाने रानड्यांना कळल्यानंतर, त्यांनी याची पत्रे कोठून येतात जातात याचा छडा लावण्याकरिता गुप्त शोध चालविला. तेव्हा तो गुप्त पोलिस असे ठरले. " तिसरे दिवशी सकाळी सीतारामपंत चिपळूणकर येऊन म्हणाले की परवा व काल मी टपालाचा सगळा शोध लावला. त्या गृहस्थाचे टपाल शिपाया-बरोबर येत नाही. ते पहाटे उठून फिरावयास म्हणून बाहेर जातात, ते प्रथम एका रस्त्याने निघून वाकडीतिकडी वळणे घेऊन शेवटी जनरल पोष्ट ऑफिसमध्ये जाऊन टपाल आपल्याच हाती घेतात, व पाठविण्याकरिता तयार केलेले टपाल बरोबर नेऊन आपल्या हातानेच पेटीत टाकतात. काल त्यांच्या मागोमाग पुष्कळ अंतरावर मी होतो, त्यामुळे येताना वाटेत मला हे फोडलेल्या पत्राचे कव्हर सापडले. त्याजवर सिमल्याचा छाप आहे. एकंदर गोष्टींवरून आपण घेतलेल्या संशयाला जागा पुष्कळ आहे असे आम्हालाहि आता वाटू लागले आहे. पोस्ट ऑफिसातील एका मित्राने मला आताच सांगितले की या गृहस्थांचा पत्रव्यवहार कलकत्ता व सिमला येथील गव्हर्नमेंट सेक्रेटरींशी असावा असे दिसते. कारण त्यांच्या नावावर याची बरीच पत्रे जातात. "सीतारामपंत चिपळूणकरात गुप्त पोलिसाची हुशारीहि होती असे उघड दिसते!

गुप्त पोलिसाचा संशय व मेलेल्या उंदराची घाण दोन्ही सारखीच; कारण दोन्ही येताच लोक घरे टाकून जातात. या सिमलेवाल्या गुप्त पोलिसाच्या पुणेकर मित्रांनी एका दिवसात त्याचे घर वर्ज्य केले, व तोहि एका रात्रीत बिऱ्हाड आटोपून अदृश्य झाला.

पण दुसऱ्याच्या टपालावर नजर ठेवण्याची रानड्यांची ही विद्या स्वतः त्यांना लवकर फळास आली. नाशकाहून त्यांची बदली धुळयास झाली तरी त्यांच्यावरचा संशय दूर झाला नव्हता. १८७९ साली वासुदेव बळवंत फडके याच्या बंडाची धामधूम सुरू होती. तीतच ता. १६ मे रोजी रानडे पुण्यास असता, बुधवारवाडा व विश्रामबागवाडा हे दोन्ही रानडे याच नावाच्या एका गृहस्थाने जाळले; पण तेवढ्यावरून पुढे कैक महिने, त्यांचे टपाल सरकारी हुकमाने फोडण्यात येऊ लागले; आणि ही केवळ संशयाची गोष्ट नसून, स्वतः पत्रे फोडणारे डॉ. पोलन यांनीच सांगितली आहे. रानड्यांच्या नावे पत्रे येत त्यांत दंगे, लुटालुटी, कारस्थाने वगैरे अनेक गोष्टी असत. वासुदेव बळवंत फडके किंवा हरी रामोशी हे बिचारे धुळयास रानड्यांना पत्रे कशाला पाठवतील? त्यांना असली पत्रे लिहविणार पोलीस व फोडविणार सरकार; पण रानड्यांनी ती सर्व जशीच्या तशी परत पोलिसाकडे पाठवावी. असा क्रम अनेक दिवस चालू होता. कालांतराने रानड्यांविषयी सरकारची दृष्टी निवळली, पण महाराष्ट्रातील चळवळीचे सूत्रचालक म्हणून त्यांच्यावरचा राग सर्वस्वी गेला नाही. रानडे पुढे धुळयाहून पुण्यास आले, पुण्याहून मुंबईस गेले व त्यांनी प्रथमपासून आरंभिलेला कार्यक्रम तसाच शेवटास नेला. रानडे व टिळक यांच्या स्वभावात पुष्कळ फरक होता तरी टिळकांना रानड्यांपासून पुष्कळच स्फूर्ती मिळाली यात शंका नाही.

(लो. टिळकांचे चरित्र–खंड १ ला)

• • •

# सर फेरोजशहा मेथा

✤ ✤ ✤

सर फेरोजशहा मेथा यांचे थोडक्यात वर्णन करावयाचे तर आम्ही असे म्हणू की त्यांच्याइतका दणदणीत पुढारी मुंबई शहराला आजवर लाभला नव्हता. त्यांचे वय मरणासमयी सुमारे सत्तर वर्षांचे होते; पण त्यापूर्वी सतत चाळीस-पंचेचाळीस वर्षे त्यांनी देशसेवा केली होती. त्यांचा जन्म १८४५ साली झाला. मेथा यांनी विद्यार्थी-दशेत दाखविलेली बुद्धिमत्ता पाहून सर अलेक्झांडर ग्रँट हे त्यांच्यावर खुष झाले आणि त्यांनी यांना विलायतेस जाण्यास मदत केली. १८६८ साली मेथा हे बॅरिस्टर होऊन परत आले. विलायतेत असतानाच त्यांनी काही निबंध लिहून, काही व्याख्याने देऊन आपल्या कामगिरीला सुरुवात केली होती व तेच काम त्यांनी इकडेहि सुरू केले. प्रारंभीच काही खटल्यात त्यांना चांगले यश आल्यामुळे बॅरिस्टर म्हणून त्यांची चांगली प्रसिद्धी झाली आणि कोल्हापूर प्रकरणात आगरकर व टिळक यांच्यातर्फे त्यांनाच वकीलपत्र देण्यात आले होते. वकिलीच्या धंद्यात पुढे त्यांना गुजराथ काठेवाडमधील संस्थानिकांचा आश्रय लाभला आणि पैसेहि भरपूर मिळू लागले. त्यामुळे आणि जात्या थोडेसे आळशी असल्यामुळे हळू हळू ते मिजासी बनले; पण काही नियमित वेळ

सार्वजनिक कार्याकडे देण्याची पद्धती त्यांनी चालू ठेवल्यामुळे ते केव्हाहि पुढारीपणात मागे पडले नाहीत. लॉर्ड रिपन यांच्या कारकीर्दीत स्थानिक स्वराज्याची प्रगती झाली तेव्हा बदरुद्दिन तय्यबजी व तेलंग यांच्याबरोबर त्या प्रगतीची लाट उचलून धरण्याला त्यांनी बरीच खटपट केली; पण ही नुसती वरची खटपट नसून मेथा यांना स्थानिक स्वराज्याची खरी आवड होती. यामुळे ते मुंबई म्युनिसिपालिटीत लवकरच शिरले आणि तेथील धुरीणत्व त्यांनी आजन्म आपणाकडे टिकविले. नावाचा अध्यक्ष कोणीहि असो, पण केव्हा विरोधी चळवळीची तर केव्हा अधिकाऱ्यांनी उपस्थित केलेल्या योजनेची सूत्रे त्यांच्या हाती येत असत. शिवाय त्यांच्या अंगी एककल्लीपणा नसल्याने त्यांचे साहाय्य आपणास मिळावे असे सर्व पक्षांना वाटे आणि ते तारतम्य पाहून असे साहाय्य देतहि. १९०६ साली म्युनिसिपालिटीतील काही सभासदांनी त्यांच्या वतनदारी-विरुद्ध मोठा गवगवा केला पण त्यात मेथा हेच यशस्वी झाले. कायदेकौन्सिलात मुंबई म्युनिसिपालिटीला एक प्रतिनिधी निवडण्याचा हक्क मिळाला तेव्हापासून अनेक वर्षे त्या जागेवर त्यांच्याशिवाय दुसऱ्याकोणाची निवड झाली नाही पण हे वर्चस्व मिळण्याला त्यांचा एक गुण विशेष कारणीभूत झाला तो हा की, कॉरपोरेशनमधील सभांना नियमित-पणे हजर राहून काम करण्याविषयी त्यांनी दक्षता ठेवली, आणि या सभांच्या दिवशी लाभदायक अशी वकीलपत्रे आली तरी ती ते नाकारीत व आठवड्यातील हे दिवस रोजनिशीत प्रायः मोकळे राखून ठेवीत. वरिष्ठ कायदेकौन्सिलात निवडणुकीचा अधिकार मिळाला तेव्हा प्रथम त्यांचीच निवडणूक झाली; आणि पुढेहि अनेक वर्षे ते निवडले जात; पण गोपाळराव गोखले यांना संधी देऊन त्यांनी तरुण पिढीविषयी गुणग्राहकता दाखविली. कायदेकौन्सिलात लोकपक्षाला बहुमत नसल्याकारणाने मेथासारख्यांनाहि टीका करण्यावरच आपले कर्तव्य व हौस भागवून घ्यावी लागे; पण ही टीका करण्यात त्यांनी जो बाणेदारपणा व धीटपणा दाखविला तो वाखाणण्यासारखा होता. सरकारी सेक्रेटरी, मेंबर वगैरे लोक त्यांचे टीकेला नेहमी भीत असत. कारण ते कोणावर तुटून पडले म्हणजे त्याची काही बाकी ठेवीत नसत. राजकारणात तात्त्विकदृष्ट्या ते नेमस्त असत; पण स्वाभिमानाची गोष्ट आली म्हणजे ते जहालाहून जहाल होते. वरिष्ठातल्या वरिष्ठ युरोपियनांना ते बरोबरीच्या नात्याने वागवीत आणि वेळ पडली असता त्यांना ते तोडून टाकीत. त्यांच्या तात्त्विक नेमस्तपणावरून अधिकाऱ्यांना असे वाटे की, स्वराज्य पक्ष व नवीन मताचे लोक यांचेविरुद्ध मोहीम करण्याला मेथा हे आपणास मदत करतील; आणि त्यांनी ही मोहीम केली ही गोष्टहि खोटी नाही; पण ' मला वाटेल ते मी करीन, माझ्या लोकांना मी बोलेन; परंतु या कामात तुमचे-माझे संगनमत होणे शक्य नाही, किती केले तरी ते लोक माझे आहेत आणि तुम्ही लोक तरी काय गुणवान आहात ? ' असे ते अधिकाऱ्यांना बजावीत. या त्यांच्या वृत्तीमुळे लॉर्ड सिडेनहॅमवा व त्यांचा उघड बेबनाव झाला होता. मुंबई

युनिव्हर्सिटीमध्येहि त्यांनी बरेच काम केले; आणि सरकारने तेलंग, चंदावरकर, भांडारकर यांच्याप्रमाणे त्यांना जरी कधी व्हाईस-चॅन्सेलरची जागा दिली नाही तरी म्युनिसिपालिटीप्रमाणे युनिव्हर्सिटीतहि ते पुढारी म्हणूनच गाजत असत. तेथेहि अधिकाऱ्यांचा व त्यांचा खटका उडे. राष्ट्रीय सभेचे ते प्रारंभीच्या वर्षांतच अध्यक्ष होऊन गेले; आणि सुमारे वीसबावीस वर्षे काँग्रेसची सूत्रे मुंबईस त्यांच्याकडूनच हलविली जात. इतर प्रांतात त्यांच्या बरोबरीचे पुढारी प्रायः नव्हते व जे होते तेहि त्यांना दबून वागत. मुंबई शहराची आघाडी राजकारणात ठेवण्याचे पुष्कळसे श्रेय मेथा यांच्याकडेच आहे. गोखले यांना ते एखाद्या शिष्याप्रमाणे किंवा मुलाप्रमाणे वागवीत; पण राजकीय विषयाच्या अभ्यासात, परिश्रमात आणि विशेषतः स्वार्थ-त्यागात त्यांची मजल आपल्यापुढे पुष्कळच आहे हे ते ओळखून असत आणि त्याबद्दल गोखल्यांना ते बहुमानहि देत. टिळक हे गोखल्यांपेक्षा वडील असले तरी मेथांपेक्षा बारा वर्षांनी लहान. यामुळे त्यांनाहि मेथा हे तरुण पिढीच्या माणसाप्रमाणे वागवीत. मेथांचे व टिळकांचे केव्हाहि फारसे बनले नाही. याचे कारण त्या उभयतांचा संबंध म्हणजे लोखंड-गारगोटीच्या संयोगासारखा असे. दोघेहि टणक, मानी, हट्टी. तथापि प्रतिपक्षातील झाले तरी टिळकांची योग्यता ते जाणून होते. राष्ट्रीय सभेत ते हळूहळू मागे पडण्याचे खरे कारण असे की, टिळकांचीच काय पण गोखल्यांचीहि झडप पुढे पुढे त्यांना झेपेनाशी झाली. वर्षांतून एक वेळ जमून राजकारणाचा आढावा घ्यावा, समालोचन करावे ही त्यांची राष्ट्रीय सभेची कल्पना गोखले यांनाहि मान्य नव्हती. तसेच गोखले यांनी राजकारणाचा मार्ग म्हणून घालून दिलेले स्वार्थत्यागाचे उदाहरण त्यांच्या बुद्धीला पटत नसे; पण तात्त्विक राजकीय मतांपेक्षाहि सामान्य लोकांना मेथा अप्रिय होण्याचे खरे कारण म्हटले म्हणजे सामान्य जनतेपासून नेहमी तुटक व अलिप्त राहणे हा त्यांचा अवगुण होय. आधी मुंबई शहरात बारमास वसती. सुट्टी मिळाली की थंड हवेत राहण्यास नित्य जात. यामुळे भेटणे हे देखील सामान्य मनुष्याला मोठे मुष्किलीचे होई; आणि त्यातूनहि त्यांचा दरारा विशेष, यामुळे त्यांची भेट घेणे म्हणजे आधी डोंगर तुडवीत जावा आणि शेवटी वाघाची गाठ पडावी असे होई! आपल्या वकिलीच्या खोलीत रोज तासभर संध्याकाळी बसून त्या वेळात आपली हस्तक मंडळी बरोबर घेऊन त्यांना सल्लामसलत द्यावी, त्यांना कामाला पिटाळावे व आपल्या आज्ञा त्यांच्या उद्योगाने अमलात आणाव्या याशिवाय अधिक घासाघीस त्यांना सोसत नसे; पण अशा रीतीने राजकारण व्हावे तसे सिद्ध होत नाही. पुढे पुढे तर त्यांनी राष्ट्रीय सभेला जाण्याचेच टाकून दिले आणि एखाद्या बिकट प्रसंगी हजर राहण्याविषयी गळ घालून जेव्हा त्यांची आराधना करावी तेव्हा ते हजर राहावयाचे. त्यांची व्यवस्था ठेवणे हा कोठल्याहि स्वागतमंडळाला एक मोठा पेचच असे; पण पुढारी होण्याला जी बुद्धिमत्ता लागते ती असून शिवाय जे काही बाह्य स्वरूपाचे गुण

लागतात तेहि त्यांच्या ठिकाणी होते. पाहताच रुबाबदार दिसणारा मनुष्य त्यांच्यासारखा हजार-पाचशेतहि मिळणार नाही. एकाच राजकीय मताचे असताहि गोखले हे जितके सौम्य वाटत तितकेच मेथा हे उग्र वाटत. त्यांची उंची, विशाल भालप्रदेश, उन्नत नासिका, भरदार मिशा, ऐटदार कल्ले, उंची पोशाखाची ढब, उठण्या-बसण्या-बोलण्यातला ताठरपणा, भाषेतील जोर, ठासून बोलण्याची ऐट आणि या सर्वांना शोभणारा एखाद्या खोल दरीतून झालेल्या भुभुःकारासारखा आवाज या सर्वांची छाप स्वकीय-परकीय कोणावरही पडे. थोडक्यात थट्टा करून प्रतिपक्षाला पातळ करून टाकण्याची विद्याहि त्यांच्याजवळ असे. एवढेच काय पण प्रसंगविशेषी मिस्किलपणाने कोणाकडे डोळे मिचकावून, कोणाला शाबासकीने मोठेपणा देऊन, कोणाला तात्पुरती ममता दाखवून जवळ बोलावून अशा रीतीनेहि ते आपले कार्य साधीत. त्यांना पाहण्याऱ्या प्रत्येकाला हा ' पुरुषसिंह ' आहे असेच त्यांचे वर्णन करावेसे वाटे. पण वरचे पुष्कळसे गुण असूनहि ते लोकांना अप्रिय होण्याला कारण त्यांचा मानी स्वभाव. जो त्यांचा गुण साहेब लोकांशी वागताना परिणामकारक होई तोच स्वकीयांशी वागताना अप्रीति उत्पन्न करी. टिळकांनी त्यांच्यासंबधाने असे म्हटले आहे की, त्यांचा हा बेसुमार आढ्यताखोर ताठरपणा व मानधन स्वभाव यांचा अतिरेक होत असला तरी या गोष्टी आम्हा लोकांच्या स्वभावात इतक्या कमी आहेत की त्यांच्या अवगुणाची गणना कदाचित गुणातहि करावी लागेल. मुंबईतील ' पंच ' हा त्यांचे चित्र काढताना नेहमी सिंहाची आयाळ लावून काढी; आणि लिओ म्हणजे सिंह आणि फेरोजशहा मेथा हे शब्द जवळ जवळ समानार्थक ठरले होते.

( लो. टिळकांचे चरित्र खंड ३ रा )

• • •

## डॉ. ॲनी बेझंट

गेल्या शे-दोनशे वर्षांमध्ये या हिंदुस्थानात हजारो-लाखो इंग्रज येऊन वा राहून गेले. त्यापैकी ज्यांचे स्मरण आपण आदरबुद्धीने किंवा आनंदाने करितो असे किती थोडे ? पण त्यापैकी मिसेस बेझंट या एक अवश्यमेव होत असे मी नेहमी मानीत आलो आहे. मी त्यांना प्रथम प्रत्यक्ष अशा १९०५ साली पाहिल्या. या सालच्या डिसेंबरात मी घरच्या सर्व वडील-लहान माणसांसह काशीयात्रेला व बनारस कॉंग्रेसला मिळून गेलो. त्या प्रवासात अलाहाबाद येथे माझा मुक्काम झाला, त्यात एक दिवस अलाहाबाद टाऊन हॉलमध्ये बेझंटबाईंचे व्याख्यान होते. ते ऐकण्याची संधी मी सहजच उत्सुकतेने साधली आणि त्यांच्यासंबंधाने ऐकीव माहितीवरून मी मनाशी जी कल्पना केली होती ती प्रत्यक्ष अनुभवायला मिळाली. बेझंटबाईंना पाहून मला वाटले की जुन्या काळी भारतभूमीत योगिनी विदुषी म्हणून कोणी होऊन गेल्या त्या बहुधा अशाच काही तरी असतील. त्यांचा वेषपेहराव अर्थात तेव्हांच्या भारतीय थाटाचा असेल इतकेच अधिक. मी त्यांना पाहिले त्या वेळी बेझंटबाईंनी जो वस्त्रप्रावरण प्रकार आदरिला होता तो बहुतांशी हिंदी थाटाचाच होता. शुभ्रवर्ण असे जरीकाठी पातळ त्यांनी परिधान केलेले असून अंगात लांब हाताचे पांढरे बनियन घातले होते. पायात

अर्थातच पायमोजे व बूट हे परदेशी थाटाचे होते; परंतु उभे राहण्याची त्यांची धाटणी, डोक्यावर साधेपणाने बांधलेले पांढुरके केस, मुखावरील गंभीर वृत्ति, आत्मविश्वास, विनयशीलता एवढ्याच गोष्टी प्रथमच त्यांच्यविषयी कौतुकादर उत्पन्न करण्याला मला पुरे होत्या; आणि मग त्यांचे भाषणच ऐकले तेव्हां त्या माझ्या आदरबुद्धीत किती मोठी भर पडली असेल, याची कोणीहि कल्पना करावी.

यापूर्वी पुष्कळ इंग्रज व्याख्यात्यांची भाषणे ऐकण्याचा योग मला आला होता; परंतु त्या दिवशी मी जसे ओघवते अस्खलित विद्वत्ताप्रचुर ठसठशीत आणि अध्यात्मज्ञानमिश्रित भाषण ऐकले तसे मला पूर्वी केव्हाहि कोणाहि युरोपियनाच्या तोंडून ऐकावयास मिळाले नव्हते; आणि त्यातल्या त्यात सांगण्यासारखी गोष्ट ही की, बेझंटबाई या ठरीव मर्यादित वेळात भाषण संपविणाऱ्या वक्त्यांचा एक उत्कृष्ट नमुना होत. अशी त्यांची कीर्ती मी पूर्वी ऐकल्यामुळे, त्या आपले भाषण एक तासात संपवितात की नाही हे मुद्दाम पाहण्याकरिता मी हातात घड्याळ काढून घेतले होते; आणि खरोखरच एक तासाला एक मिनिट कमी असतानाच त्यांनी भाषण संपविले. हे पाहून मला फार मौज वाटली. वास्तविक ठराविक वेळेत भाषण संपविणे यांत वर्णन किंवा कौतुक करण्यासारखा असा मोठा गुण काय आहे असे कोणी म्हणेल; परंतु खरोखरच तोहि एक गुण आहे या मताचा मी आहे. कारण देशी-विदेशी शेकडो वक्त्यांची भाषणे ऐकण्याचे प्रसंग मला येत; आणि भाषण त्रोटक आखुडते संपवून किंवा निष्कारण चऱ्हाट वळून कंटाळा आणून, ज्यांनी माझा अपेक्षाभंग केला अशीच त्यांतली पुष्कळशी भाषणे असत. म्हणून बाईंचा गुण मी घेतला. शिवाय बाईंच्या त्या दिवसाच्या भाषणात मी हे पाहिले की, त्यात जाणते म्हणजे मुद्दाम होऊन केलेले असे वक्तृत्व काहीच नव्हते. विषय उच्च विचारयुक्त, मांडणी पद्धतशीर-प्रमाणबद्ध, शब्दयोजना अचूक व उचित, हे सर्व पाहून मी थक्कच होऊन गेलो; व त्यानंतर बाईंचे भाषण ऐकण्याची संधी मी पुढे केव्हाहि दवडली नाही.

बेझंटबाईंनी जिचे कार्य आयुष्यभर केले त्या थिऑसॉफिकल सोसायटीचा सभासद मी स्वतः नाही. तथापि या संस्थेने हिंदुस्थानाकरिता काय केले याची जाणीव मला आहे. तसेच बेझंटबाई यांच्या मतप्रसारकार्यातील क्वचित काही गोष्टी माझ्या बुद्धिवादाला पटण्यासारख्या नसल्या तरी त्यामुळे त्यांच्या इतर आध्यात्मिक धर्मसेवेविषयी माझ्या मनात जी आदरबुद्धी आहे तिजमध्ये काही कमीपणा आलेला नाही. तीच गोष्ट त्यांच्या राजकारणविषयक जीवनाविषयी समजावी. माझ्याप्रमाणेच याविषयी ज्यांची मनःस्थिती असेल अशी दुसरी एक व्यक्ती मला दिसते. ती म्हणजे सर सी. पी. रामस्वामी अय्यर, त्रावणकोर संस्थानचे सेवानिवृत्त दिवाण हे होत. आजचे कृष्णमूर्ती हे लहानपणी बेझंटबाईंच्या हाती राहावे म्हणून झालेले प्रयत्न, व विशेषतः

गौ. म....५

कृष्णमूर्ती हे भावी अवतार असे केलेले बेझंटबाईचे भविष्य, या वादांत सर सी. पी. रामस्वामी अय्यर यांनी बाईंच्या विरुद्ध वकीलपत्रच कोर्टात घेतले होते. तसेच मीहि 'अवतारकृत्याचा पोरखेळ' या मथळयाखाली केसरीत एक कडक लेख लिहिला होता असे आठवते. तथापि आज बेझंटबाईंच्या जन्मशताब्दीला उद्देशून जगभर होणाऱ्या समारंभात सर सी. पी. व मी दोघांनीहि भाग घेण्याचे मान्य केले आहे; पण याहिपूर्वी बरीच वर्षे सर सी. पी. व मी होमरूल लीगच्या चळवळीत एकत्र येऊन बेझंटबाईंशी सहकार्य केले होते. याचे कारण हेच की, काही काही धार्मिक गोष्टीं-विषयी कोणा दोघांची मते जुळत नसली, किंबहुना नावडण्यासारखी असली, तरी इतर गोष्टींत परस्परांना परस्परांविषयी प्रामाणिकपणे आदर राहू शकतो अशी विवेचक-बुद्धी नसणारी माणसे एकांधळी, केवळ एका डोळयाने पाहणारी असतात.

बेझंटबाई प्रथम हिंदुस्थानात आल्या, त्या राजकारणात भाग घेण्यासाठी नाही हे निश्चित होय. त्यांच्या पूर्वचरित्राकडे पाहिले असता त्यांच्या मनावर आत्म-स्वातंत्र्याची छाप उघड दिसते. मते बदलण्याचा त्यांना संकोच वाटत नाही. त्या प्रथम मनाने ख्रिस्ती व ईश्वरवादी असता, पुढे काही कारणाने बुद्धिवादी भूमिका घेऊन, ईश्वराने 'हे का असे केले ?' 'ते का तसे केले नाही ?' असे प्रश्न स्वतः त्यांचे त्याला विचारावेसे त्यांना वाटले; आणि त्या निरीश्वरवादी बनल्या; पण पुढे त्याच पूर्ण सेश्वरवादी झाल्या. तसेच आपल्या धर्माधिकारी नवऱ्याशी भांडून त्याची व आपली जन्माची सोडवणूक त्यांनी करून घेतली; परंतु एकंदरीने पाहता त्यांनी आपले चरित्र सच्छील, सत्प्रवृत्त, उद्योगशील व जगाला हितकारक असेच ठेवले असे कोणीहि म्हणेल. थिऑसॉफीमध्ये त्यांचा प्रवेश झाला त्यातून मात्र त्यांचे पाऊल कधीहि मागे पडले नाही; आणि हिंदी राजकारणात त्या प्रत्यक्ष लक्ष घालू लागेपर्यंत त्या या राजकारणात पडतील अशी कोणाची अपेक्षा नव्हती. हिंदुस्थानात अधिकारावर असणाऱ्या किंवा नसणाऱ्या युरोपियन लोकांना थिऑसॉफिअस्ट म्हणून त्या कधीहि प्रिय नव्हत्या. ते त्यांजकडे नेहमी साशंकवृत्तीने पाहात. त्यांना बाई ही एक ब्याद वाटे; पण एकदा राजकारणात पडल्यावर त्यांनी ते अखेरपर्यंत सोडले नाही.

राजकारणात त्यांना नेमस्त किंवा मवाळपक्ष हाच अधिक आवडे. लोकमान्य टिळकांविषयी त्यांच्या मनात आदर असला तरी स्नेह असा फारसा केव्हा नव्हता. टिळक हे फाजील जहाल किंबहुना क्रांतिकारक अत्याचारांना साहाय्य करणारे असेहि त्यांना वाटे. मात्र टिळक १९१४ साली मंडालेहून परत आल्यावर काँग्रेसमध्ये त्यांचा प्रवेश व्हावा याविषयी बाईंनी खटपट केली; आणि पुढे होमरूल लीगची चळवळ निघाली तेव्हा तर ते व त्या एकमेकांच्या होमरूल लीगमध्ये सभासदत्वानेहि एकरूप झालेल्या लोकांना काही काळ दिसल्या. १९१९ साली बेझंटबाई आपल्या होमरूल

लीगतर्फे व टिळक आपल्या होमरूल लीगतर्फे पार्लमेंटरी सिलेक्ट कमिटीपुढे साक्ष द्यावयाला गेले, तेव्हा एकाच सभेत त्यांची भाषणेहि झाली; परंतु नंतर सोलापूरच्या प्रांतिक सभेत बाईंचे नेमस्त पक्षाशी अधिक जुळते, टिळकांशी तितके जुळत नाही, हे दिसून आले. मात्र स्वतः मी टिळकांचा अनुयायी किंवा पाईक हे त्यांना माहीत असताहि त्यांनी व्यक्तिशः माझ्याशी सर्वस्वी संबंध स्नेहबुद्धीचा ठेवला होता. पुण्यात एक-दोन वेळा त्यांच्या सत्कारसमारंभात मी भाग घेतला होता. त्यांना अटक होऊन मद्रास सोडावी लागली तेव्हा मी टिळकांच्या वतीने त्यांच्या भेटीला मद्रास येथे गेलो. व्यक्तिशः त्यांचे माझे संबंध चांगले राहिले होते. कारण टिळक व बेझंटबाई यांच्यामध्ये, कॉंग्रेसमध्ये व बाहेर राजकारणाच्या क्षेत्रात, बरोबरीच्या नात्याने स्पर्धा चाले; पण मी बाईंकडे वडील माणूस या दृष्टीने पाही. त्यांच्या कर्तृत्वाविषयी मला कौतुक वाटे. टिळक दिवंगत झाल्याने १९२० नंतर टिळक पक्षाचे पुढारीपण मजकडे आले. बाईंनाहि कॉंग्रेसची असहकारितेची चळवळ मान्य नव्हती. प्रथम दोन-तीन वर्षे त्यांच्या मनावर गांधींच्या व्यक्तिमत्त्वाची छाप पडली होती. परंतु ती लौकरच निघून गेली. आम्ही काही मंडळी कॉंग्रेसमध्ये राहून काही दिवस झगडलो; परंतु बाईंनी कॉंग्रेसमधून लौकरच अंग काढून घेतले. यानंतर मी दिल्ली येथील असेंब्लीचा सभासद झालो तेव्हा ओळीने काही वर्षे दिल्लीस सर्वपक्षीय म्हटली जाणारी परिषद भरत असे. तिला बेझंटबाई उपस्थित राहात. त्या प्रत्यक्ष कामात फारसा भाग घेत नसत. या सभांत त्या पाच पाच तास एकासनस्थ अवधानपूर्वक पुतळ्यासारख्या तटस्थ राहू शकत व बोलल्या तर अगदी मोजके बोलत.

हिंदुस्थानाला स्वराज्य मिळाले तर ते केवळ क्रांतीने मिळणार नाही, युद्धाने मिळणार नाही, तर पार्लमेंटरी कायद्यानेच मिळेल अशी त्यांची खात्री होती व तीच आता अखेर खरी ठरली आहे की नाही! आज हिंदुस्थान स्वतंत्र झाले ते पार्लमेंटच्या कायद्याने झाले आहे. विधायक राजकारणावर विश्वास आणि पार्लमेंटरी पुढाऱ्यांशी स्नेहसंबंध व ओळखी जागत्या ठेवण्याची आवश्यकता बाईंना वाटे. यापुढे बाईंच्या मनात कल्पना आली की, इकडे कॉंग्रेसची प्रतिकारी चळवळ काय चालावयाची ती चालू दे; पण विलायतेतील हिंदी राजकारण बंद राहू नये. यासाठी बेझंटबाईंनी 'कॉमनवेल्थ ऑफ इंडिया' नावाचे एक स्वराज्यविषयक बिल तयार करण्याचे ठरविले. बाईंच्या दृष्टीने त्यांच्या होमरूल लीगपक्षाच्या कार्याची ही सहजच पुढची पायरी होती.

मनात येताच बाईंना काय कमी? त्यांनी हिंदुस्थानातील व इंग्लंडातीलहि चांगल्या कायदेपंडितांचा सल्ला घेतला, व या कामी मुद्दाम माणसे नेमून लौकरच बिलाचा मसुदा तयार करविला, आणि १९२६ च्या जून महिन्यात ह्या बिलाचा मसुदा

घेऊन त्या विलायतेस निघाल्या. इंग्लंडात बाईंची कीर्ती फार, त्यांचा स्नेहपरिवार अति विस्तृत, नवोदित मजूर पक्षाशीच इतरांपेक्षा त्यांचा स्नेहसंबंध अधिक आणि त्यांनी कोणतेहि कार्य अंगावर घेतले म्हणजे त्याला युरोपातील सर्व देशांतून थोडाबहुत पाठिंबा हटकून मिळावयाचा.

आता पार्लमेंटमध्ये कोणा खाजगी सभासदाने एखादे बिल मांडले असता ते मंजूर होण्यास फारच अडचणी असतात. त्यातून या बिलाचा आशय तर फारच जाडा. अर्थात स्वतः अधिकारारूढ पक्ष किंवा थेट समोर बसणारा विरोधी पक्ष यांपैकी कोणीतरी वजनदार व्यक्तीने असे बिल पुढे मांडले तरच त्याचे पहिले वाचन तरी पार पडावयाचे. या सर्व अडचणी बाईंच्या लक्षात होत्या. तथापि बिल पार्लमेंटात प्रविष्ट होऊन पहिल्या वाचनाची मजल गाठता येईल अशी आशा वाटण्याइतका त्यांनी मजूरपक्षाचा पाठिंबा मिळवून ठेविला होता. बाई हे बिल घेऊन विलायतेस निघाल्या तेव्हा त्यांना खरोखरीच पुष्कळ आशा वाटत होती; आणि बिल मंजूर न झाले तरी त्यांच्या निमित्ताने विलायतेत हिंदी स्वराज्याची चळवळ चालू राहील व राहावी हा त्यांचा मुख्य उद्देश होता.

टिळक पक्षात बाईंना व्यक्तिशः मान्यता न देणारे असे काही लोक नेहमीच होते. उदाहरणार्थ, दादासाहेब खापर्डे हे एक वेळ सांप्रदायिक थिऑसॉफिस्ट असताहि ते बाईंपेक्षा टिळकांना अधिक चाहात. यामुळे त्यांचा व बाईंचा ऋणानुबंध तुटत चालला होता. तथापि टिळक पक्षाने एकंदरीने परराष्ट्रीय राजकारण मनाने कधीहि सोडून दिले नसल्याने त्याने बाईंच्या बिलाला पाठिंबा दिला. बाई विलायतेला गेल्या पण त्यांच्या बिलाचे कार्य फारसे झाले नाही. तथापि बेझंटबाईंना जोपर्यंत लिहिता बोलता येत होते तोपर्यंत त्यांनी हिंदी स्वराज्याच्या राजकारणाचा प्रचार कधीहि टाकला नाही. इतक्या वृद्धपणी त्यांनी या बिलासारखी योजना केली, व ते पार्लमेंटमध्ये मांडण्याची आकांक्षा धरली, यावरून त्यांच्या मनाची व शरीरशक्तीची झेप केवढी मोठी होती हे ध्यानी येईल. थिऑसॉफिकल सोसायटीचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी केलेले शिक्षणकार्यहि प्रचंड आहे. त्यांची साधने मोठी तसेच त्यांचे कार्यहि मोठेच होते. आजच्या प्रचंड बनारस हिंदू युनिव्हर्सिटीचे मूळ बाईंनी स्थापलेल्या बनारस हिंदू कॉलेजमध्येच रुजले. असो. ज्यांच्या नावाची सांगड शतकाशी घालता येते अशा व्यक्तींपैकी बेझंटबाई ह्या एक होत्या, एवढे सांगून केवळ स्थलाभावामुळे मी हा लेख संपवितो.

( सह्याद्री–१९४६ )

• • •

## लो. बाळ गंगाधर टिळक

[ १ ]

### राष्ट्रीय प्रक्षोभाचा आद्यगुरु

✦ ✦ ✦

हिंदुस्थानातील सर्व आबालवृद्धाना टिळकांचे नाव जे केवळ परिचित नव्हे तर प्रियहि झाले होते त्याचे कारण त्यांच्या अंगचे अनेक गुण होत. हे गुण म्हटले म्हणजे मुख्यतः देशभक्ति, धैर्य, करारीपणा, स्वार्थत्याग हे होत. या गुणांपुढे त्यांचे लेखनचातुर्य, वक्तृत्व ही केव्हाहि फिकीच पडतात. राष्ट्रीय दृष्टि व मर्मज्ञान ही सोडली तर टिळकांच्या लेखात चित्ताकर्षक असे फारसे उरत नाही असे म्हणणारे अनेक टीकाकार आम्ही पाहिले आहेत. तसेच त्यांचे वक्तृत्व प्रसंगोपात्त त्यातील आवेशामुळे व मनाच्या निर्भयतेमुळे फारच परिणामकारक होत असले तरी खऱ्या वक्तृत्वकलेचे ढंग किंवा नटवेपणा त्यामध्ये नव्हता म्हणून प्रसिद्ध वक्त्यांच्या मालिकेतून त्यांचे नाव वगळणारे त्यांचेच काही स्नेही आम्हांला आढळले आहेत. पण त्यांच्या उपरिनिर्दिष्ट गुणचतुष्टयासंबंधाने त्यांच्या मित्रातच काय पण शत्रूंतहि मतभेद नाही ही गोष्ट प्रसिद्ध आहे. सरकारी अधिकारी सरकारी नात्याने अर्थातच त्यांची कोणत्याहि गुणाकरिता स्तुति करू शकत नाहीत हे ठीकच आहे. पण खाजगी रीतीने बोलण्याचा प्रसंग आला असता वरील किंवा इतर अनेक गुणासंबंधाने अधिकाऱ्यांनी आदरच दर्शविलेला आहे, असे अनेक प्रत्यक्ष माहितगार माणसांच्या तोंडून आम्ही ऐकले आहे. इतकेच नव्हे तर ही गोष्ट स्वानुभवाने आम्हांसहि माहीत आहे. मुंबईच्या 'टाईम्स' पत्राने टिळकांच्या मृत्यूसंबंधाने एक स्फुट लेख लिहिला आहे. त्यात अर्थात

टिळकांच्या राजकीय चारित्र्याबद्दल वाटेल ती अद्वातद्वा व प्रस्तुत प्रसंगाला अत्यंत अनुचित अशी विधाने केली आहेत. पण खुद्द टाइम्सला तो कट्टा शत्रू होऊनहि टिळकांचे काही गुण नाकबूल करता आले नाहीत. त्याबद्दल कबुलीच द्यावी लागली आहे. टाइम्स म्हणतो, " टिळकांची बुद्धिशक्ति वाखाणण्यासरखी होती. त्यांच्या संशोधक ग्रंथांची मोठमोठ्या प्रसिद्ध विद्वान पंडितांनी मान्यतादर्शक स्तुतीच केली आहे. जे चळवळीचे काम त्यांनी जन्मभर केले त्यात त्यांचे धैर्य, धाडस व अखंड उत्साह दिसून आला. त्यांची भाषणे व लेख ऐकणारांना व वाचणारांनाहि त्यांच्या पुनः पुनः आवृत्त्या किंवा रूपांतरे झाली तरी त्यांच्या मनावर परिणाम किती होतो याचे कोणालाहि आश्चर्य वाटते. त्यांची भाषापद्धति अननुकरणीय आहे. " अशा कर्तृत्ववान, धैर्यशील व उद्योगी पुरुषाच्या हातून ( टाईम्सकाराच्या मताप्रमाणे ) अनेक अनिष्ट गोष्टी घडाव्या याबद्दल त्याने खेद प्रदर्शित केला आहे. तसे तो म्हणणारच, व त्यास उत्तर देणेहि फारसे कठीण नाही. प्रस्तुत आपणाला ग्राह्य मुद्दा हाच की, टिळकांच्या वैऱ्यांना देखील त्यांच्या काही बिनमोल गुणांची स्तुति केल्याशिवाय आपल्या निंदेला यावा तितका उठाव येत नाही असे वाटते, यावरूनच त्यांचे गुण किती खरे व सर्वसंमत होते हे दिसून येईल.

अशा गुणांचा उपयोग कशा प्रकारे व्हावा हा मुद्दा अर्थात वादग्रस्तच असणार. किंबहुना टिळक व त्यांचे प्रतिपक्षी यांच्या दरम्यान जे आजन्म युद्ध चालू होते त्याचे कारण हा मतभेदच होय. सरकारला वाटे की असला बुद्धिमान, धाडसी व कर्तृत्वान पुरुष आपल्याला लाभता तर काय बहार झाली असती. किंबहुना सरकार व टिळक यांच्यामधील मतैक्याचा क्षणिक व किंचिन्मात्र स्पर्श ज्या एखाद्या विषयाला चुकून कधी काळी झाला, त्यात सरकारने या मतैक्याला किंमत देऊन त्याचा प्रत्यक्ष उपयोग करून घेण्याचीच इच्छा दर्शविली. समाजसुधारकांना समाजसुधारणा हा विषय प्रिय असल्यामुळे त्यांनाहि सहजच वाटे, की अशा धीट व कर्तबगार मनुष्याने सुधारणांचा प्रश्न हाती घेतला असता तर त्याने त्याची अपूर्व प्रगती केली असती. सरकाराप्रमाणे समाजसुधारकहि प्रसंगविशेषी टिळकांविषयी आदर प्रदर्शित करीत व त्यांच्याकडून चुकून लाभणाऱ्या सहनुभूतिलेशाचा शक्य तो उपयोग करून घेत. फार काय, स्वतः टिळकांना असे अनेक वेळा म्हणताना आम्ही ऐकले आहे की " सुधारणा का होईना, पण तिचाहि फैलाव करण्याचा उद्योग यशस्वी होण्यास जो उत्साह व चिकाटी लागते ती सुधारक दाखवीत नाहीत; हे गुण अंगी असणाऱ्या लोकांच्या संख्येच्या मानाने सुधारणेचे पाऊल बरेच पुढे पडले आहे असे त्यांनी मानले पाहिजे. मी स्वतः सामाजिक सुधारणेच्या उद्योगात पडलो असतो तर त्यासहि मी काम करून दाखविले असते. सुधारकांचे मिळून एखादुसरे वर्तमानपत्र, पण त्यालाहि यशस्वी करण्यास जो संघटित उद्योग व उत्साह लागतो तो त्यांच्यात दिसून येत नाही.

यामुळेच केवळ सुधारणामतवादी वर्तमानपत्रे मागे पडतात. '' इत्यादि. पण टिळकांनी सरकारी नोकरी न करण्याचे जे कारण तेच त्यांनी समाजसुधारणा हाती न घेण्याचे कारण. या मतभेदामुळे त्यांचे चरित्र सरकारला व समाजसुधारकांना अनेक प्रसंगी व अनेक बाजूंनी अत्यंत अप्रिय झाले; व कित्येक प्रामाणिक मताच्या व सच्चारित्र्याच्या सुधारकांना टिळकांशी निकट स्नेहसंबंध ठेवता आला नाही ही गोष्ट अगदी खरी. तथापि टिळकांवर एकांगी उद्योगाचा आरोप करणाऱ्या लोकांनाहि, टिळक हे टिळकांनी ग्राह्य मानलेल्या देशभक्तीच्या साध्याकरिताच आपले आयुष्य खर्चीत होते हे नाकबूल करता आले नाही. उदाहरणार्थ, सर नारायणराव चंदावरकर यांचीं व टिळकांची मते जुळण्याचा योग साऱ्या जन्मात क्वचितच आला असेल, तथापि अलीकडे त्यांच्याहि तोंडून टिळकांविषयी ' ग्रेट ' म्हणजे ' महानुभाव ' असे व्यक्तीवर्णन निघे. त्याचे कारण हेच की, टिळकांच्या अंगी दोष असले तरी ते मोठ्या माणसाचे दोष आहेत व त्यांचा हा मोठेपणा त्यांच्या देशभक्तीवर व स्वार्थत्यागावर अधिष्ठित झालेला आहे !

लोकोत्तर देशभक्तीला लोकमत ' शंभर खून माफ ' करीत असते. खून याचा अर्थ ढोबळ चुका. टिळकांवर प्रेम करणाऱ्या लोकांना ते निर्दोष दिसतात व त्यांच्या हातून आजवर एकहि चूक झाली नाही असे प्रामाणिकपणाणे वाटते ही गोष्ट प्रसिद्ध आहे. उलट टिळकांच्या प्रतिपक्षांना ते दोषपूर्ण दिसतात. पण लोकमताची डोळे फिरविणारी ही उच्च दोनहि टोके सोडून देऊन स्थिर बुद्धीच्या भूमीवर उभा राहून कोणी विचार करू लागला तर, त्याला टिळकांच्या अंगचे गुण त्यांजवर आरोपित झालेल्या दोषापेक्षा किती तरी पटीने अधिक भरतात असे दिसून येईल; इतकेच नव्हे तर या लोकोत्तर, गुणसंपन्न, बुद्धिमान, देशभक्त मनुष्याच्या अंगी सद्यःस्थितीत देशाला सर्वांत अत्यंत उपयोगी पडणारा आणि खरोखरच दुर्मिळ असा एक गुण होता असेहि त्याला कबूल करावे लागेच. हा गुण म्हणजे सरकाराशी वागताना टिळकांनी दाखविलेला पराकाष्ठेचा निर्भीडपणा. सरकाराविषयी प्रजाजनांच्या मनांत अनेक वर्षांच्या सवयीमुळे भिनलेली फाजील नम्रता व फाजील आदबशीरपणा नांगरून टाकून, टिळकांनी राष्ट्रीय स्वाभिमानाच्या वाढत्या वृक्षांच्या मुळ्यांना मनोभूमी हवी तशी उलथीपालथी करून दिली ही त्यांची कामगिरी बिनमोल व बिनतोड आहे. टिळक लेखांत व व्याख्यानांत सरकारचा अधिक्षेप करीत तेव्हा लोकांना असे कधीच वाटले नाही की हा अधिक्षेप अयोग्य आहे. पण त्यांना नेहमी एकच नवल वाटे व ते हेच की आजपर्यंत इतके लोक होऊन गेले, विद्वान झाले, पंडित झाले, व्यवहारज्ञ झाले, समयज्ञ झाले, देशभक्तहि झाले, तरी पण सरकारला असे निर्भीडपणे व टाकून बोलणारा मनुष्य हाच पहिला. सरकारविरुद्ध स्पष्ट बोलण्याचे व्रत टिळकांनी प्रथमपासून धरले ते अखेरपर्यंत पाळले होते. टाइम्सकारांनीहि टिळकांचे दोष

दाखविताना त्याच्या चरित्राचे वर्णन 'A life of campaigning terrorism to which we know no parallel in constitutional history अशा शब्दांनी केले आहे. याचा सोप्या शब्दांत अर्थ असा की, "टिळकांच्या राजकीय मोहिमेचा दरारा फार मोठा कठीण. कोणत्याहि देशाच्या राजकीय घडामोडीच्या इतिहासात त्याला तोड सापडावयाची नाही." आपल्याहून वेगळ्या दृष्टीने का होईना, पण टाइम्सकारांनी केलेले टिळकांचे हे वर्णन खरोखरच अत्यंत भूषणास्पद आहे असे आम्ही तरी मानतो. राजकीय चळवळीची मोहीम करावी तर सर्व हिंदुस्थानात एक टिळकांनीच करावी. सरकार इतर अंगांनी सामर्थ्यवान असेल, पण टिळकांच्या राजकीय मोहिमेची त्याच्या मनात धडकी भरत असे. टाइम्सने याचा अजाणता पुरावाच वरील वर्णनात दिला आहे. सरकार प्रबळ असता या मोहिमांची भीति वास्तविक त्यांना इतकी का वाटावी? त्याचे कारण हेच की त्या मोहिमेत निर्भयता व धाडशीपणा ही तर असतच, पण कायद्याच्या दृष्टीने अत्यंत सुबक असे कौशल्यहि त्यात असे. सरकाच्या बाजूला सर्व साधने भरपूर, पैसा वाटेल तितका, पैशाने वश होणारी बुद्धिवान व धाडशी मनुष्ये पदरी हवी तितकी, अधिकाराचे शस्त्रागार नेहमी भरलेले, हिंदुस्थानच्या आंत बाहेर सद्दी जोरावर, साम्राज्याचे ग्रह उच्चीचे आलेले व बिचाऱ्या हिंदुस्थानचे ग्रह नीचेचे व पुरे अधःपतन पावलेले; याच्या उलट बिचाऱ्या टिळकांजवळ काही नाही. येऊन जाऊन डोके, जीभ व एक लेखणी; असे असता या निर्धन, निशस्त्र, निःसैनिक वीराच्या मोहिमेचे भय टाइम्सने म्हटल्याप्रमाणे कोणाला का वाटावे? पण ते वाटत होते खरे. सरकार अशा गोष्टी स्वतः तोंडाने बोलून न दाखविता नेहमी आपल्या हस्तकांच्या किंवा तिऱ्हाइतांच्या तोंडून बोलून दाखविते. ध्वनिभ्रम उत्पन्न करण्याची ही जी कला त्यांना पुरी साध्य झाली होती तिला अनुसरून त्यांनी टाइम्सकाराप्रमाणे इतर अनेकांच्या तोंडून त्यांचे वर्णन केलेले आहे. चिरोलसाहेबांनी आपल्या "हिंदुस्थानातील असंतोष" या प्रसिद्ध पुस्तकात टिळकांना "Father of Indian Unrest" म्हणजे "एकंदर हिंदुस्थानातील प्रक्षोभाचे जनक" अशी पदवी दिली आहे. तसेच रौलेट कमिटीच्या रिपोर्टातहि क्रांतिकारक चळवळीचे मंथन करून त्यातून काढलेल्या श्रीखंडाचा टिळा टिळकांच्या कपाळी लावून त्यांचीच अग्रपूजा केली आहे. यावर फिरून आमचे म्हणणे हेच, की दोष देण्याच्या हेतूने जरी हे वर्णन करणाराने केले तरी, राष्ट्राच्या दृष्टीने आणि टिळकांच्या अभिमानी भक्तांच्या दृष्टीने खरोखरच हे वर्णन टिळकांना बहुमानाचे पदक दिल्याप्रमाणे आहे. हिंदुस्थानांत असा एकहि मनुष्य आज नसेल की कर्तृत्वाच्या दृष्टीने अशा प्रकारच्या स्तुतीचा हा उंची दागिना, बहुमानाची ही थोर पदवी मिळणार असेल तर त्याबरोबर सरकारकडून येणारे हे व असले इतर शेकडो दोषारोप खुषीने पत्करणार नाही! टिळक व सरकार यांजमधील संबंधाची ही

गोष्ट ज्याने जाणली नाही व तिचे कौतुक केले नाही त्याला टिळकांच्या चरित्रातील मर्मच कळले नाही असे आम्ही म्हणतो ! सरकारकडून अशी निंदा करून घेण्याचे भाग्य अनेक शतकांतून एखाद्यालाच लाभते. ज्याने आपले चारित्र्य परीटघडीप्रमाणे संभाळून सरकारशी व इतर अनेक शत्रूंशी जन्मभर युद्ध करून एकंदर राष्ट्रीय प्रक्षोभाचा जन्मदाता किंवा आद्यगुरू ही पदवी सरकारकडून मिळवून आमरण टिकविली, त्याची स्तुति करण्याला त्याच्या मित्रांनी निराळे शब्द कधी खर्ची घालण्याचा प्रयत्नहि करू नये असे आम्हाला वाटते. लोकमान्य ही पदवी एका अर्थाने स्पृहणीय आहे; पण 'राष्ट्रीय चळवळीचे आद्य कारण' ही पदवी तिच्याहूनहि अधिक स्पृहणीय नाही काय? "Father of Indian Unrest" हा शब्द टिळकांना स्वतःलाहि स्पृहणीयच असला पाहिजे. त्यांनी चिरोलसाहेबावर फिर्याद मांडली तेव्हा वरील शब्दांनी आपली बदनामी झाली अशी तक्रार केली नाही. केवळ खाजगी चारित्र्यावर शितोडे उडविण्यासारखी व त्यातूनहि खोटी अशी जी विधाने चिरोलसाहेबांच्या बुकात ग्रथित आहेत त्यापुरतीच त्यांची फिर्याद होती. "फादर ऑफ इंडियन अनरेस्ट" "राष्ट्रीय प्रक्षोभाचे आद्य गुरु" हे शब्द कोणी कितीहि घोळघोळून म्हटले तरी त्यातून निंदेचा लवलेशहि निघू शकत नाही. कोणी कितीहि लावून बोलण्याच्या अर्थाने ते म्हटले तरी त्यांनी टिळकांच्या कीर्तिरूप देहाला टाचणी टोचण्याइतकीहि इजा होऊ शकत नाही. लोकमान्य हा शब्द प्रौढ असला तरी तो लिबलिबीत (Passsive) आहे आणि "फादर ऑफ इंडिअन अनरेस्ट" या शब्दांत टिळकांच्या पराक्रमाचे जे खोल व गंभीर गुणवर्णन आहे, ते 'लोकमान्य' या शब्दात खचित नाही. या चार इंग्रजी शब्दांतून निघणारा जोरकस अर्थ समर्पक रीतीने प्रकट करणारा एकच सुटसुटीत व ठसठशीत शब्द कोणी सुचवील तर आम्ही महाराष्ट्रातील राष्ट्रीय पक्षातर्फे त्यांचे ऋणी होऊ; व यापुढील टिळकांचा उल्लेख लोकमान्य या शब्दांनी न करता त्याहूनहि उज्ज्वल अशा नवीन पदवीनेच शक्य तर करीत जावा अशी महाराष्ट्रास विनंति करू. राष्ट्राच्या स्वभिमानबुद्धीचा त्यांनी क्षोभ उत्पन्न केला म्हणूनच ते लोकमान्य झाले ही गोष्ट खरी; परंतु मान्यता, व मान्यतेचे कारण जो पराक्रम यांचा जो दूरान्वय या सध्या नावात घडतो तो आमच्या मनाला पटत नाही. तरुण महाराष्ट्रापुढे टिळकांचे उदाहरण ध्येयरूपाने राहिले पाहिजे. पण ते ठेविताना टिळकांना मिळत असलेल्या बहुमानापेक्षा त्यांनी राजकारणात जो पराक्रम केला तोच तरुण पिढीच्या नजरेपुढे त्यांच्या पदवीच्या रूपाने विशेष ठळकपणे आला पाहिजे.

(केसरी–ता. ३ ऑगष्ट १९२०)

## लो. टिळकांच्या यशाचे मर्म

लो० टिळकांइतका 'यशस्वी' पुरुष महाराष्ट्रांत गेल्या शे-पन्नास वर्षांत झाला नाही याविषयी बहुधा एकमत आहे. पण त्या यशाचे मर्म काय ? असा प्रश्न निघाला असतां त्याची उत्तरे मात्र निरनिराळी येण्याचा संभव आहे. याचे कारण यश या शब्दाचा सर्वांचा अर्थ एकच असत नाही. यश याचा अर्थ कोशकार कीर्ति असा देतो. पण मनुष्याची कीर्ति ज्यावरून होते तेंहि यशच असते. कार्यदर्शक शब्द कारणालाहि लक्षणेने लागतो. यश या शब्दाचा हा दुसरा अर्थ अपूर्व कार्यसिद्धी असा आहे. टिळकांचे कार्य अपूर्व व त्याची सिद्धीहि अपूर्व !

कीर्ति या अर्थाने यश हा शब्द मनात आणून टिळकांच्या यशाचे मर्म काय या प्रश्नाचे जे उत्तर मिळते ते, कार्यसिद्धि हा अर्थ घेऊन येणाऱ्या उत्तराहून वेगळे आहे. टिळकांचे यश म्हणजे कीर्ति सर्व हिंदुस्थानभर काय पण इतर काही देशांतहि पसरली होती. हिंदुस्थानातल्या रानाजंगलांतल्याहि मनुष्यांनी टिळकांचे नाव कर्णोपकर्णी ऐकले होते. आणि टिळक म्हटले म्हणजे कोणी तरी एक 'फार मोठा माणूस' इतकेच ज्ञान त्यांना असे. देव, भूत, राक्षस यांचे वस्तुरूप कोणीच पाहिलेले नाही. हे तीनहि आहेत किंवा असावेत अशी कबुली मन आतून देते; पण या तिघांचेहि स्वरूप कोणी पाहिलेले नसते. त्यांची कल्पना मन करावयासच बसले तरी प्रत्येकाची वेगवेगळी होईल. किंबहुना, त्याच एकाच माणसाने निरनिराळ्या वेळी कल्पना चालविली तरी ही कल्पनारूपे वेगवेगळी असू शकतील. पण भक्तिभावना हे जसे ईश्वराचे अस्तित्व मानण्याला सबळ कारण, तशीच भुते व राक्षस यांचे अस्तित्व मानण्याचे खरे कारण भीति हे असते.

कीर्तिमान टिळकांची हजारो लोकांची कल्पना त्यांच्या भौतिक स्वरूपाच्या कल्पनेइतकीच वस्तुस्थितीला सोडून असण्याचा संभव होता. ज्यांनी टिळक कधी पाहिले नव्हते अशांनी त्यांच्या स्वरूपाविषयी चालविलेल्या कल्पना ऐकण्याचा प्रसंग मला अनेक वेळा आला. त्यांनी मुद्दाम होऊन टिळकांचे वर्णन केले नाही, पण त्यांच्या बोलण्याच्या ओघावरून ते वर्णन न कळत बाहेर पडत असे. सामान्य लोकांची कल्पना अशी की, टिळक हे कमीत कमी सहा सात फूट उंच, भले लठ्ठ, कदाचित गुलमिशावाले, हातात एखादे भले मोठे दांडके वापरणारे, असे पुरुष असावे. पण हे वर्णन वस्तुस्थितीला अगदी सोडून होते. दुसऱ्या कित्येकांची कल्पना अशी की, टिळकांना एखादा साहेब दिसला न दिसला पुरे, ते त्याच्या अंगावर खेकसत असतील, त्याला तोंडावर शिव्याशाप देत असतील, त्याचे आईबाप उद्धरीत असतील,

किंवा हातातले सोडगेहि त्याच्या अंगावर उगारीत असतील. ही कल्पनाहि वरच्या-इतकीच वस्तुस्थितीला सोडून होती हे सांगणे नकोच. टिळक हे कोणी मोठे विरागी म्हणजे साधुसंतांसारखा पोशाख केलेले, किंवा अंगाला भस्म फासलेले, किंवा कपाळाला लाल शेंदराचे बोट लावलेले, अशी जी कित्येकांची कल्पना तिचीहि गत वरीलप्रमाणेच. आणि टिळक हे देवासारखे होते, ते नवसाला पावत, किंवा मनातले ओळखीत, किंवा भविष्य सांगत, किंवा रोग बरे करीत अशाहि ज्या कल्पना—अर्थात फार थोड्या लोकांचे ठिकाणी— दिसून येत होत्या त्याहि खोट्या होत्या हे सांगावयास नको.

पण पूर्वी सांगितल्याप्रमाणे, देव-भूत-राक्षस यांची भौतिक कल्पना प्रत्येकाची वेगवेगळी असली तरी भक्ति व भीति या भावना जशा सर्वसामान्य व सत्यस्वरूप असतात, तशीच कीर्तीने टिळकांना ओळखणाऱ्या दूरदूरच्या लोकांच्या मनात त्यांज-विषयी एक भावना सर्वसामान्य होती. ती अशी की, टिळक हे मोठे देशभक्त असून देशाच्या शत्रूपासून त्याला सोडविण्याचा प्रयत्न करीत असतात. अर्थात टिळक हे आपले मित्र, उपकारकर्ते व आपल्या शत्रूंचे शत्रू. अशा लोकांना देश किंवा त्याची सुटका या शब्दांच्या व्याख्या बरोबर करिता आल्या नसत्या; पण देशाची व त्याच्या सुटकेची कल्पना प्रत्येकाची वेगळी असली तरी, या सर्व कल्पना ज्यात बसू शकतील असा काही गुण टिळकांमध्ये होता, म्हणूनच त्यांच्या मोठेपणाची कीर्ति पसरली व मान्य झाली.

अशा कीर्तीचे निर्णायक कारण असामान्यत्व. कीर्ति ही समुद्राच्या लाटांसारखी आहे. एक लाट उठली म्हणजे ती दुसऱ्या लाटेला उठविते, दुसरी तिसरीला, असा क्रम पुढे सुरू होतो. पण पहिली लाट उठण्यालाहि काही तरी सबळ क्षोभ-कारण लागतेच. टिळकांच्या कीर्तीची लाट प्रथम महाराष्ट्रात उठली व मग ती हळूहळू इतर प्रांतांत पसरली हे खरे; पण मूळ महाराष्ट्रात तरी ही लाट उठण्याला कारण काय झाले? टिळकांवरील खटले व त्यांना झालेली शिक्षा हे त्यांच्या अखिल भारतीय कीर्तीचे खरे कारण आहे असे कित्येक टीकाकार म्हणतात. ठीक आहे. खटले होणे, शिक्षा सोसणे, आणि या दोहों प्रसंगी निर्भय, धीरोदात्त अशी वृत्ती ठेवणे यामुळे होणारी कीर्ति क्रमाक्रमाने वाढणारी असून सर्व हिंदुस्थानाला एकदम पटणारी अशा प्रकारची आहे ही गोष्ट मान्य करण्यास हरकत नाही. परंतु यात देखील वर दर्शविलेले टिळकांचे काहीतरी असामान्यत्व हेच कारण मानले पाहिजे. राजकीय गुन्ह्याकरिता टिळकांहून अधिक शिक्षा झालेले किंवा तुरुंगात अधिक दिवस काढलेले लोक आहेत; पण त्यांच्या खटल्यांच्या व शिक्षांच्या 'बातमी' ने त्यांची 'कीर्ति' सर्व हिंदुस्थानभर पसरली नाही किंवा टिकूनहि राहिली नाही. अर्थात हे असामान्यत्व कोणते? याचा विचार करिता यश या शब्दाचा जो दुसरा म्हणजे कार्यसिद्धी हा अर्थ, त्याकडे वळावे लागते. टिळकांची कार्यसिद्धि काही विशेष होती म्हणूनच त्यांची कीर्ति काही विशेष

झाली. मग ही कार्यसिद्धि कोणती ? तर **सरकारशी राजकारणाचे भांडण सतत भांडत राहून, त्या भांडणात जास्तीत जास्त लोक सामील करून घेऊन, त्याची दहशत सरकारास बसविणे हे होय.** आणि ही कार्यसिद्धि कां झाली, तर टिळकांच्या अंगचे **लोकोत्तर गुण या एका कार्यावर खर्च झाले** म्हणून.

कार्यसिद्धि या शब्दामध्ये क्रियापूर्णत्वाचा ध्वनि असला तरी टिळकांनी देखील केलेले कार्य शेकडा शंभर इतके पूर्णत्वाला गेले होते असे कोणीच म्हणत नाही. किंबहुना १९२१ साली असा एक क्षण खचित आला होता की, राजकारणाची चळवळ टिळकांच्या चळवळीपेक्षाहि अधिक तीव्रतेला पोचली होती. टिळकांच्य चळवळीपेक्षा त्या चळवळीत त्या वेळी अधिक लोक सामील होते, आणि टिळकांच्या कोणत्याहि चळवळीपेक्षा त्या वेळच्या चळवळीची सरकारला क्षणभर अधिक दहशता वाटली. पण या गोष्टी झाल्या, तरी क्षणभर झाल्या ! त्या तशा टिकल्या नाहीत. त्यामध्ये सातत्य राहिले नाही. उलट टिळकांविषयी सरकारची जी शत्रुत्वाची भावना १८९५–९६ साली होती तीच १९२० सालापर्यंत एकसारखी टिकली. चिरोलसाहेबाने टिळकांचे ' Father of Indian unrest ' हे जे वर्णन केले आहे ते त्यांच्या कारकीर्दीच्या प्रारंभाला जसे लागते तसे, ' सरकारचे शत्रू ' हे जे त्यांचे वर्णन सरकाराने केले ते त्यांच्या कारकीर्दीच्या जवळ जवळ अखेरच्या काळात उद्भवलेले होते. म्हणजे अशा रीतीने टिळकांच्या कारकीर्दीचे आद्यंत हे सुसंवादी स्वर असून या कारकीर्दीच्या मध्यभागी झालेले त्यांच्यावरील खटले हे अनुवादी-स्वराने टिळकांचे धोरण एकाच प्रकारचे राहिले असे सांगतात. ग्रंथपरीक्षा जशी उपक्रमोपसंहार व मध्यवर्ती सिद्धान्त यांच्या साहाय्याने करितात, त्याच रीतीने टिळकांच्या चरित्राचे परीक्षणहि या तीन प्रकारच्या कसोट्यांनी करावे लागते. सरकारशी झुंज ठेवणे, केव्हाहि त्या झुंजेत जास्तीत जास्त लोक सामील करणे, व सरकारास दहशत वाटेल अशा रीतीने झुंज लढवणे, या तिहींनाहि अवश्य लागणारी अशी एक गोष्ट म्हणजे धोरणाचा सुसंगतपणा व उद्योगसातत्य हे होय. सतत सुसंगतपणे अधिकात अधिक लोक मिळवून सरकारला दहशत पडण्यासारखी राजकीय झुंज करणे हेच टिळकांच्या यशातील खरे मर्म होय, असे विचारांती कोणासहि समजून येईल. लो. टिळकांची कीर्ति क्रमाने वाढत गेली, केव्हाहि कमी झाली नाही. पण त्याचे कारणहि हे की, वरील अर्थाची कार्यसिद्धीहि यथाप्रमाण वाढत गेली, आणि या कार्यसिद्धीला टिळकांच्या अंगचे सर्व गुण एकाग्रतेने खर्ची पडले.

वरील कसोटी लावून पहिली असता टिळक हे त्यांच्या आधीच्या, समकालीन व नंतरच्या त्यांच्या बरोबरीच्या लोकांहून वेगळे पण अधिक यशस्वी कसे ठरले ते कळून येईल. आपण निरनिराळी उदाहरणे घेऊ म्हणजे कळेल. महाराष्ट्र घेतला तर

कृष्णशास्त्री चिपळूणकर बुद्धिवान, पण त्यांना राजकारणाची दृष्टीच नव्हती. विष्णुशास्त्री चिपळूणकरांना राजकारणाची दृष्टी भरपूर होती. टिळकांनी त्यांचीच दृष्टी व स्फूर्ति घेतली. पण शास्त्रीबोवांमध्ये टिळकांच्याइतकी उद्योगशीलता, बहुजनसमाजात मिळून-मिसळून वागण्याची आवड आणि राज्यकारभाराचे किरकोळ वाद हे चळवळीच्या चरांत इंधनासारखे घालून स्वयंपाकासारखे प्रत्यक्ष कार्य करून देणारी आग पेटत ठेवणे ही कला नव्हती. ते अवघ्या बत्तिसाव्या वर्षीच वारले हे खरे. तथापि त्यांची समक्ष माहिती असलेले लोक सांगतात त्यावरून टिळकांसारखा चालू राजकारणाचा राडा उरकण्याला लागणारा स्वभाव शास्त्रीबोवांच्या ठिकाणी नव्हता. प्रो. जिनसीवाले हे विद्वान बहुश्रुत, पण ते अगदीच एककल्ली. हातून कधी एक अक्षरहि हुकमी लिहून व्हावयाचे नाही; आणि कोणी एक विषय पुढे आणला तर दुसराच काहीतरी काढून मुळावर काहीच उरू न देण्याची त्यांची वादपद्धति असे राजकारणात विधायक सूचना करून कानामात्राइतके सूक्ष्म पाहून प्रतिपक्षाशी धावते युद्ध करण्याची कला जिनसीवाले यांना मुळीच अवगत नव्हती; डॉ. अण्णासाहेब पटवर्धन यांची बुद्धी अत्यंत कुशाग्र. पण ते चालू राजकारणात मुळी पडलेच नाहीत, व पडले तरी त्यांची दिनचर्या आणि स्वभाव यांच्यामुळे त्यांच्या हातून चालचलाऊ काम चारदोन दिवस देखील झाले नसते. कोणास कधी न सुचतील असेहि मुद्दे एखादे वेळी ते काढीत; पण पुष्कळ वेळा कोणी कधीहि मानणार नाहीत असेच ते असत. डॉ. नानासाहेब देशमुख यांची बुद्धिमत्ता जबर आणि त्यांचे अंतःकरण राष्ट्रीयत्वाने पूर्ण भरलेले. परंतु राजकारणातील प्रत्यक्ष पुढारीपण टिळकांवर सोपवून आपला आशीर्वाद आणि सल्ला-मसलतीची व इतर हरएक प्रकारची मदत त्यांना देऊन, नानासाहेबांनी चालू राजकारणा-पासून स्वतःस मोकळे ठेवले होते.

आता दुसऱ्या पक्षातील महाराष्ट्रीय पुढारी घेऊ. रा. ब. गोपाळराव हरि देशमुख हे बहुश्रुत व लेखनव्यासंगी. परंतु त्यांचा बहुतेक जन्म सरकारी नोकरीत गेला. उरलेल्या वेळात देखील त्यांनी जे लिहिले सवरले त्याचा रोख आधुनिक शास्त्रे, कला, भौतिक सुधारणा वगैरेविषयी आपल्या समाजात अभिरुचि उत्पन्न करणे व जुन्या धार्मिक, सामाजिक कल्पनांचे मनावरील बंधन कमी करणे यातच गेला. हे काम त्यांच्या परीने चांगलेच होते. पण राजकारणात इंग्रजांची सत्ता व शहाणपण यांनी त्यांची दृष्टी दिपून व बुद्धी थिजून गेल्यासारखी झाली होती. यामुळे राजकारणातील झगडा करण्यास ते फारसे पात्र नव्हते. रावबहादुर रानडे यांची बुद्धी टिळकांच्या बुद्धीइतकी किंवा तिजहूनहि अधिक विशाल होती. आणि त्यांची व्यापक कामगिरी, एकदर समाजला उद्योगशील बनविण्याविषयीची आतुरता, विषयाभ्यासाची आस्था, तात्त्विक विचारांचा खोलपणा, सार्वजनिक पुढाऱ्याला लागणारी मनःसमता यांविषयी लो. टिळक स्वतः इतके आदरयुक्त उद्गार काढीत की, त्यांच्या मते अखिल हिंदी

पुढाऱ्यात श्रेष्ठपणाचा मान एकट्या रानड्यांना मिळतो. परंतु रानडे यांचेहि सर्व आयुष्य नोकरपेशात गेले आणि राष्ट्रीयत्वाची प्रखर भावना जनतेत उत्पन्न करण्याला जो तापटपणा अवश्य असतो तो त्यांचे अंगी मुळीच नव्हता. रानड्यांना ' फादर ऑफ पॉलिटिक्स इन् महाराष्ट्र ' हे नांव यथार्थ देता येईल. पण हे वर्णन, आणि चिरोलसाहेबांनी केलेले टिळकांचे वर्णन ही जोडून पाहिली-अर्थात राजकारण व असंतोष या दोन शब्दांतील सूक्ष्म व गहन फरक लक्षात घेतला—म्हणजे रानडे व टिळक यांच्यातील फरक कोणाच्याहि तेव्हाच लक्षात येईल. आणि रा. ब. रानडे यांचीहि कीर्ति जरी सर्व हिंदुस्थानभर पसरलेली आहे तरी त्यांच्यापेक्षा टिळकांची कीर्ति समाजाच्या वरिष्ठ वर्गाप्रमाणे मध्यम व कनिष्ठ वर्गांतहि का अधिक पसरलेली होती हे समजेल. अधिकात अधिक जनता आपल्याबरोबर सामील करून घेण्याची कला रानड्यांपेक्षा टिळकांनाच अधिक हस्तगत झाली होती यात शंका नाही. कै. गोखले व टिळक हे दोघे तर पुढारी या नात्याने एकाच काळी समाजात वावरत होते. त्या दोघांचे चरित्र मागच्या पिढीच्या डोळ्यांपुढे ढळढळीत असल्यामुळे दोघांतील फरक काय व गोखल्यांपेक्षा टिळकांचे कीर्तिरूप यश देशात अधिक का पसरले हे त्या पिढीस चांगले माहीत आहे.

मुंबईच्या पुढाऱ्यांपैकी कीर्तिमत्तेच्या दृष्टीने टिळकांशी फक्त फिरोजशहा मेथा यांचीच तुलना करता येईल. मेथा हे रानड्यांपेक्षा अधिक तापट व राजकारणाची झुंज कसून खेळणारे होते पण त्यांचे वास्तव्याचे ठिकाण, भाषा, राहणी, स्वभाव, सर्वच गोष्टी, त्यांचे राजकारण व सामान्य जनता यांचा संबंध जुळण्याला प्रतिकूल होत्या. इतर प्रांतांतील पुढाऱ्यांपैकी लाला लजपतराय हे टिळकांच्या बरेचसे जवळ येतात; पण पंजाबाची स्थितीच अशी होती की, तेथे लजपतरायांसारख्या पुढाऱ्यांसहि हवा तेवढा अनुयायीवर्ग संघटित असा मिळूच नये. त्यातल्या त्यात लजपतराय यांच्या सेवेचा कल राजकारणापेक्षाहि धार्मिक सामाजिक बाबींकडे अधिक असे, आणि राजकारणात आपणासहि दोन गोष्टी अधिक सांगण्यासारखे टिळक होते असे स्वतः लजपतरायच म्हणत. पं. मदन मोहन मालवीय हे उद्योगः [illegible]ीत कदाचित टिळकांनाहि मागे सारण्यासारखे आणि ·हिंदुसमाजापुरते पाहिले [illegible]निदान उत्तर हिंदुस्थानात टिळकांची जी कीर्ति तिच्याहून पंडित मालवीय यांच[illegible] कीर्ति अधिक प्रसूत आहे यात शंका नाही. पण दीर्घसूत्रीपणा, अनिश्चितता वगैरे व्यक्तिगत अवगुण पंडितजीं-मध्ये असून, शिवाय त्यांचे मन जात्या मृदु असल्याकारणाने राजकारणात टिळकां इतकी तीव्रता ते आणू शकले नाहीत. अगदी अलीकडच्या काळापर्यंत त्यांची वृत्तीहि बरीचशी नेमस्तपणाकडे असे. बंगालचे पुढारी सुरेंद्रनाथ बानर्जी यांनी टिळकांप्रमाणेच आपल्या प्रांतात अनभिषिक्त राजसत्तेचा उपयोग घेतला; परंतु निःस्वार्थीपणात त्यांच्या प्रांतातलेहि लोक सुरेंद्रबाबूंना टिळकांइतका मान देत नसत. आणि उपयुक्ततेहून

अधिक वयोमान त्यांना मिळाल्यामुळे सुरेंद्रबाबूंची कीर्ति त्यांच्या हयातीतच उताराला लागलेली पाहण्याचा त्यांना प्रसंग आला. टिळकांच्याइतकी सर्व हिंदुस्थानभर कीर्ती झालेला एकहि पुढारी मद्रास इलाख्यात झाला नाही. पूर्वी जी. सुब्रह्मण्य अय्यर व अलीकडे न्या. सू. सुब्रह्मण्य अय्यर यांना लोकप्रियता पुष्कळच लाभली; पण ती बरीचशी प्रांतिक होती. बिहारप्रांत, मध्यप्रांत यांजमध्ये टिळकांशी तुलना करण्यासारखा कीर्तिवान पुढारी झालाच नाही.

गुजराथेत म. गांधींच्या पूर्वी नाव घेण्यासारखा कीर्तिमान राजकारणी पुढारी कोणीच झाला नव्हता. पण म. गांधी यांनी त्याचा सगळा वचपा भरून काढून, आपल्या प्रांताला कीर्तीमान पुढाऱ्यांच्या गणनेत सर्व हिंदुस्थानात अग्रमान मिळवून दिला. टिळकांपेक्षाहि म. गांधी हे एके वेळी अधिक कीर्तीमान ठरले यात शंका नाही. मी अन्यत्र एके ठिकाणी सांगितलेच आहे की, १९२१–२२ च्या सुमारास एक काळ असा येऊन गेला की, तीव्रतेच्या दृष्टीने म. गांधींचे राजकारण टिळकांच्या राजकारणापुढे बरेच गेले होते. सर्वसाधारण विद्वतेच्या दृष्टीने टिळक हे गांधींपेक्षा श्रेष्ठ असले तरी, इंग्रजी भाषा लिहिण्याबोलण्यात गांधींनी टिळकांवर ताण केली. शिवाय जनतेचे साहाय्य मिळविण्याच्या दृष्टीने परप्रांताची कोणतीहि देशभाषा अवगत नसणे ही एक टिळकांच्याहिमध्ये मोठी उणीव राहून गेली होती, ती म. गांधी यांनी भरून काढली. निर्भयतेत टिळक व गांधी यांजमध्ये डावे उजवे काहीच म्हणता येण्यासारखे नाही. राहणीच्या साधेपणात गांधींनी टिळकांच्याहि पुढे मजल मारली व एखाद्या विशिष्ट गोष्टीविषयी आग्रहाची व करारीपणाची कड, एका विशिष्ट क्षणी कोण अधिक पोचवू शकला ही बाब घेतली तर टिळकांपेक्षा गांधीच अधिक मान्यता पावतील. पण विशिष्ट प्रसंगी टिळकांपेक्षाहि जनतेचे अधिक पाठबळ मिळविण्याची पात्रता म. गांधी यांनी सिद्ध केली असली तरी ती टिकविण्याची पात्रता त्यांनी सिद्ध केली नाही असेच म्हणावे लागते. गांधींच्या करारीपणाबद्दल लोकांना जितका विश्वास वाटे तितकाच, ते आपले राजकारणी धोरण लहरीपणाने वेळोवेळी केवळ आत्मसंतोषार्थ बदलू शकतील असा संशयहि जनतेला येत असे. आपल्या धोरणाला प्रसंगानुसार मुरड घातली पाहिजे असे टिळकांचे मत व कृतीहि होती. पण फरक असा की, म. गांधी यांची मुरड इतकी ढोबळ असणे संभवनीय की, तिने मूळच्या वस्तूचे स्वरूपच सर्वस्वी पालटल्याचा भास व्हावा; आणि टिळक देखील मुरड घालीत पण ती इतकी सूक्ष्म-बेमालूम असे की, त्यांच्या मूळच्या धोरणाचे स्वरूप फारसे बदलले असे सहसा कोणास म्हणता येत नसे. यामुळे टिळकांनी सरकारशी सुरू केलेली राजकारणी झुंज म. गांधी यांनी परिणत स्वरूपाला आणली व एकवेळी टिळकांपेक्षा अधिक जनतेचे पाठबळ चळवळीत मिळवून टिळकांपेक्षाहि त्यावेळेपुरती सरकारला अधिक दहशत उत्पन्न केली तरी, चळवळीच्या तीव्रतेचे सातत्य व दहशत म. गांधी यांना

टिळकांप्रमाणे राखता आली नाही. येवढ्याच बाबतीत टिळक व महात्मा गांधी यांच्या यशाच्या मर्मांत फरक पडतो. म. गांधींच्या गुणांच्या अंगभूत असलेले जे प्रतियोगी दोष तेच कदाचित या गोष्टीला कारणीभूत असतील. किंवा उलट कोणीकोणी असेहि म्हणतात की, टिळक आणखी पाचसात वर्षे जगते तर त्यांच्याहि लोकप्रिययतेचे काय झाले असते कोणास ठाऊक ? पण काल्पनिक गोष्टी सोडून प्रत्यक्ष घडून आलेल्या गोष्टीपुरते पाहिले तर, टिळक व गांधी यांच्यामध्ये जो फरक वर दर्शविण्यात आला तो मान्य केल्याशिवाय, माझे मते, गत्यंतर नाही.

असो. अशा रीतीने टिळकांच्या कीर्तिरूपी यशाची मीमांसा करता येते. यश म्हणजे कार्यसिद्धि या अर्थाने टिळक काय, गांधी काय, कोणासहि ती सिद्धी सोळा आणे आपल्या पदरात पडली किंवा आपले कार्य पूर्ण होऊन आपण कृतार्थ झालो असे यथार्थतेने म्हणता आले नाही. दोघांच्याहि कार्यसिद्धीची कल्पना विशाल असल्याने, इतरांपेक्षा स्वतः त्यांनाच आपल्या कार्यसिद्धीची अपूर्णता व आपल्या कर्तृत्वाचा उणेपणा भासत असला पाहिजे व भासत होताहि. पण एका माणसाला देशाच्या विद्यमान बिकट परिस्थितीत जितके करता आले तितके टिळक व गांधी या दोघांनी केले यात शंका नाही. त्यातल्यात्यात टिळकांचा भर प्रत्यक्ष राजकारणावर विशेष होता, व गांधीचा भर सद्गुण-संवर्धनावर होता ही गोष्ट जनतेला दिसत असल्याकारणाने, म. गांधींइतकेच टिळकांना आपले व आपल्या देशाचे मित्र असे जनता मानीत असली, तरी आपल्या शत्रूंचे शत्रू या दृष्टीने गांधींपेक्षा टिळकांस जनता अधिक मान्यता देत होती व आहे असे मला निःसंशय वाटते. कित्येकांच्या दृष्टीने शत्रुत्वाच्या कसोटीने देशभक्तीची किमत करणे हे हीनतेचे ठरेल, व सात्त्विक गुणांचे जे एकांतिक समर्थनकार असतील त्यांनी असे म्हटले असतां त्यात वावगे काही नाही. पण जनता ही जशी आहे तशी सामान्यपणे घेतली असता टिळकांच्या यशाचे मर्म काय अनुमानिता येते इतकेच दर्शविण्याचा मी येथे प्रयत्न केला आहे.

टिळकांपेक्षा निरनिराळ्या एकेकट्या गुणांनी श्रेष्ठ असे अनेक लोक हिंदुस्थानात होऊन गेले. पण टिळकांमध्ये जो गुणसमुदाय संघटित झाला होता तो इतर थोड्यांमध्ये होता, व तो असाच होता की, त्यामुळे टिळकांची कीर्ति इतरांपेक्षा अधिक व्हावी.

('रत्नाकर'–ऑगस्ट १९२६)

• • •

# विष्णुशास्त्री चिपळूणकर

✤ ✤ ✤

[ १९३२ साली श्री. केळकरांचा ६१ वा वाढदिवस झाला, त्या सुमारास त्यांनी चिपळूणकरांबद्दल यथार्थ गौरवोद्गार काढले. " चिपळूणकरांना दुर्दैवाने आयुष्य लाभले नाही. अवघ्या बत्तीस वर्षांत जे त्यांनी केले ते पाहता, माझ्यासारखे साठ वर्षांचे आयुष्य त्यांना लाभते तर, त्यांनी कितीतरी अधिक केले असते. " टिळक म्हणत—" भाषा·हे राष्ट्राचे हत्यार आहे व ते ज्याने राष्ट्राला मिळवून दिले त्याचे उपकार· किती मानावे ?" चिपळूणकरांचे मोठेपण यातच आहे. पुढील उतारा श्री. केळकरांच्या भाषणाचा आहे. ]

" केसरी–मराठा संस्थेचा प्रतिनिधि या नात्याने मी बोलावयास उभा आहे. आजच्या सभेला दिवाणबहादूर गोडबोले हे अध्यक्ष लाभले ही अभिनंदनीय गोष्ट होय. जिवंत किंवा जिव्हाळ्याची स्मृति जो उत्पन्न करील असाच अध्यक्ष अशा प्रसंगी असणे यातच स्वारस्य आहे. ' मी शास्त्रीबुवांबरोबर काम केले, त्यांच्याबरोबर बोललो, त्यांच्याबरोबर वागलो, इत्यादी अध्यक्षांनी सांगितलेल्या आठवणीत अद्भुत-पणा काही नसूनहि त्यात जिवंतपणा व जिव्हाळा असल्याने ती माहिती विशेष

गौ. म.... ६

आनंददायक वाटते. गेल्या ५० वर्षांचा जसा काही इतिहास बोलतो आहे, असे त्यांच्या भाषणावरून अनुभवास आले. मनुची नावाच्या युरोपियन प्रवाशाने शिवाजीच्या वेळची एक हकीकत लिहून ठेवली असून तीत ' मी दक्षिणेवर चालून आलेल्या जयसिंगाबरोबर होतो. एके दिवशी आम्ही गंजिफा खेळत बसलो असता रात्रीच्या वेळी शिवाजी आला. त्याचे आमचे बोलणे झाले व नंतर तो निघून गेला ' असे वर्णन आहे. वर्णन किती साधे, परंतु ते मी जेव्हा वाचले तेव्हा त्यापासून मला किती आनंद वाटला हे मी शब्दाने सांगू शकत नाही. या दृष्टीने आज आपणाला ८५ वर्षांचा पुराणपुरुष विष्णुशास्त्र्यांसारख्या विभूतीची माहिती सांगण्यास लाभला, यात मोठेच स्वारस्य आहे. आताच श्यामकवि यांनी विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी स्वराज्याची गुढी उभारली असे त्यांच्या कार्याचे महत्त्व गाइले परंतु स्वराज्याच्या कार्यापेक्षा ग्रंथनिर्मितीच्या कार्यामुळेच शास्त्रीबोवांचे नांव अधिक प्रसिद्ध आहे.

लोकमान्य टिळकांचे ग्रंथकर्तृत्व व त्यांची मराठीची कामगिरी ही शास्त्रीबुवांच्या ग्रंथकर्तृत्वापेक्षा काकणभर अधिक भरेल. तरीसुद्धा राजकारणामुळे त्यांचे नाव विशेष प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणे शास्त्रीबुवांचा लौकिक हा त्यांच्या ग्रंथनिर्मितीमुळेच अधिक आहे. ग्रंथकर्तृत्व व राजकारणकर्तृत्व यांचा विचार करता शास्त्रीबुवांनी मराठीचा जो पायंडा घातला त्याबद्दल आपण आपली कृतज्ञता व्यक्त करीत आहो व तेच उचित आहे. शास्त्रीबुवांच्या काळी इंग्रजी भाषेचा जुलमाने स्वीकार झाला होता. नोकरीसाठी ती भाषा शिकावी लागत असल्याने लोकांच्या मनावर तिचा एवढा पगडा बसला होता की, नोकरीपायी ते आपली भाषाहि विसरू लागले होते. बाप मेल्यावर मुलाचे पालन आई करील व आईहि मेल्यावर त्याचे संगोपन दुसरा कोणी करील. परंतु मातृभाषाच मेल्यावर राष्ट्राने जगावे कसे ? खुद्द शास्त्रीबुवा किंवा टिळक हेहि आपली खाजगी पत्रे प्रायः इंग्रजीत लिहीत. एवढी त्या भाषेची सवय त्या पिढीला लागली होती; त्या वेळच्या लोकांचे सर्व लेखन जेथे इंग्रजीत चाले तेथे त्यांचे विचारहि प्रथम इंग्रजीतच येत असले पाहिजेत हे काय सांगावयाला पाहिजे ? कारण मानसशास्त्राचा असा सिद्धांत आहे की, भाषेवाचून विचार होऊच शकत नाहीत.

आजहि कॉलेजातील मुलांचा खाजगी पत्रव्यवहार पाहिला तरी तो इंग्रजीतून चालतो. ही खोड अत्यंत वाईट आहे. इंग्रजीतून विचार असल्यामुळे शहाण्या शहाण्याची कशी फजिती उडते याचे एक गमतीचे उदाहरण घडून आले. एकदा हायकोर्ट जज्जाच्या जागेपर्यंत वाढलेल्या एका महाराष्ट्रीय गृहस्थाला सभेत मराठीतून बोलण्याचा प्रसंग आला. सभेची वेळ झाल्यावर जज्जसाहेब बोलावयास उठले व म्हणाले, " सभ्यस्त्री–पुरुषहो, आज आपण या ' रंगमहालात ' कशाकरिता जमलो आहोत हे तुम्हांस विदितच आहे ! " व्याख्यात्यांच्या डोक्यात ' Ladies and gentlemen, you know why we are assmbled today in this hall )

असें विचार आले व त्यांनी ‘ Hall ’ चे भाषांतर ‘ रंगमहाल ’ करून सभेत हशाचा रंग मात्र उधळला ! ‘ Hall ’ चा अर्थ सभागृह व रंगमहाल असे दोनहि असल्याने बिचाऱ्याला मराठी शब्दातील स्वारस्य कळले नाही व त्याने भलताच शब्द वापरला. ही गेल्या दहापंधरा वर्षांतील स्थिति. परंतु आता काळ पालटत चालला आहे. सध्या विद्यापीठात मराठीला स्थान मिळाले असून तिचा अभ्यास होऊ लागला आहे. प्रतिक्रियेला प्रारंभ झाला आहे. खेड्यापर्यंत ज्ञानाचा प्रसार करावयाचा असल्याने मराठीची प्रवृत्ति वाढत चालली आहे.

शास्त्रीबुवांना मी स्वतः पाहिले नाही. परंतु मी १० वर्षांचा असताना मिरजेस हरिभाऊ आपटे यांनी तयार केलेले ‘ शिष्यजन–विलाप ’ हे काव्य वाचले. आमच्या वेळी रा. ब. रानडे, रा. कुंटे व चिपळूणकर अशी तीनच नावे ऐकू येत. मोठा माणूस कोणता हे आपल्याला पाहावयाचे असेल तर ‘ इन्डक्टिव्ह ’ पद्धतीने आपण लहान मुलांना विचारावे व ज्याचे नाव तो सांगेल तो खरा मोठा पुरुष असे म्हणण्यास हरकत नाही. हा नियम शास्त्रीबुवांच्या बाबतीतहि खरा ठरतो. शास्त्रीबुवांचे मराठीवर प्रेम होते तरी इंग्रजीबद्दल त्यांना द्वेष वाटत नसे. त्यांचे ग्रंथ जो वाचील त्याला त्यांच्या संस्कृत व इंग्रजी अध्ययनाची चांगली कल्पना येईल. शास्त्रीबुवांचे इंग्रजी वाङ्मयाचे अध्ययन होते तरी त्या भाषेबद्दल मात्र त्यांची नावड होती; आणि ती भाषाहि तशीच unreasonable नियमरहित आहे. तिला समानाधिकरण कसे ते नाहीच. सुप्रसिद्ध फ्रेंच लेखक व्हॉल्टेर याची एक अशी गोष्ट सांगतात की, तो इंग्लंडमध्ये गेल्यावर इंग्रजी शिकू लागला. तेव्हा इंग्रजी स्पेलिंग व उच्चार हे किती अयुक्तिक आहेत हे त्याच्या नजरेस आले. एके दिवशी त्याने आपल्या शिक्षकाला ‘ Plague ’ व ‘Ague’ या दोन शब्दांतील ‘ प्लेग ’ याचे एक सिलेबल कसे व ‘ ॲग्यू ’ यांत दोन सिलेबले कशी असा प्रश्न विचारला. त्यावर शिक्षक थोडा विनोदीच असल्याने त्याने ‘ Let the Plague take one half, and let the Ague take the other half !’ असे उत्तर दिले. इंग्रजी भाषेची ही नियमबाह्यता जेथे व्हॉल्टेर याला नडली तेथे सामान्य लोकांची स्थिती काय होत असेल ?

इंग्रजांनी आम्हांवर इंग्रजी भाषा लादली. शिक्षण हे इंग्रजीतूनच देण्यात येत असल्याने इंग्रजीचे वर्चस्व साहजिकच वाढून मराठी भाषा मागे पडली. पण या बाबतीत इंग्रजांना तरी दोष का द्यावा ? ‘ जिताच्या डोक्यात धोंडा ’ असाच जगाचा नियम दिसतो. याचे उदाहरण द्यावयाचे तर ते बार्बेरियन लोकांचे देता येईल. बार्बेरियन लोकांनी रोमवर स्वारी केली व तेथे त्यांनी मनस्वी धुमाकूळ माजविला. ‘ आपण परत जा ’ अशी तेथील लोकांनी विनंती केली असता ‘ भारंभार सोने देत असाल तर परत जातो ’ असे त्यांनी उलट कळविले. शेवटी सोने भारंभार भरत आले असे पाहून त्यांनी वजनाच्या पारड्यात ते खाली बसावे म्हणून आपली तलवार टाकली. त्याप्रमाणे

इंग्रजांनी इंग्रजी भाषा आम्हांवर घातली आहे. सर्व जगात त्या त्या देशातील शिक्षण मातृभाषेतून दिले जाते. परंतु इंग्रजांनी मात्र हिंदुस्थानात शिक्षण मातृभाषेतून देण्यास अजूनहि सुरुवात केली नाही व म्हणूनच त्यांच्यावर एवढा माझा राग. आमच्या भाषेची माहिती इतर देशीयांना असल्यास मनाला तेवढेच समाधान वाटते. परंतु त्याहि बाबतीत निराशाच.

नुकतेच ऑक्सफोर्ड विद्यापीठाचे प्रो. टॉमसन हे येथे आले असताना त्यांनी माझी भेट घेतली व मला मराठी भाषेची ऐतिहासिक दृष्ट्या ते माहिती विचारू लागले. तेव्हा मी त्यांना साहजिक महाराष्ट्रातील प्रसिद्ध लेखकांची माहिती आहे का हे पाहिले. परंतु दुःखाची गोष्ट अशी की, एकाहि मराठी लेखकाची माहिती त्यांना सांगता आली नाही. स्वराज्य तर नाहीच परंतु आमची संस्कृती, भाषा, आमचा खरा इतिहास यांचा गंधहि परदेशस्थांना नाही हे समजल्यावर मला मेल्याहून मेले झाले. अशा स्थितीत आपल्या भाषेची प्रतिष्ठा वाढवावयाची असेल तर त्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना होणे आवश्यक आहे. माझ्या मते तरी शास्त्रीबुवांचे तेच खरे स्मारक होय. आनंदाची गोष्ट अशी की, ही विद्यापीठाची कल्पना महाराष्ट्रात निघालेलीहि आहे. मग ती प्रत्यक्ष स्वरूपात केव्हा उतरेल तेव्हा उतरो. पण एक गोष्ट मात्र सत्य की, कल्पना एकदा निघाली की, ती पाताळात शिरून शेषाची टाळू फोडून बाहेर आल्याशिवाय राहणार नाही. शास्त्रीबुवांचा मोठेपणा विशेषणांनी वर्णन करण्यापेक्षा अवघ्या ३२ वर्षांत त्यांनी जी कार्ये केली ती मनात आणली म्हणजे त्यांतून त्यांचे महत्त्व उमटल्याशिवाय राहात नाही. शाळा, चित्रे, इतिहास, छापखाना व वर्तमानपत्रे इतके प्रगमनशील बुद्धीचे पैलू मनात आल्यावर त्यांचा मोठेपणा आपोआपच सिद्ध होतो. ''

—केसरी ५ एप्रिल १९३२

• • •

# लोकहितवादी

✤ ✤ ✤

जुन्या काळच्या नमुनेदार गृहस्थात गोपाळराव हरि देशमुख हे प्रमुख होते. यांचे शिक्षण मूळ थोडे असताहि ते त्यांनी स्वतःच्या प्रयत्नाने पुष्कळच वाढविले. किंबहुना जन्मभर त्यांनी विद्यार्थी या नात्याने ज्ञान संपादण्याचा अविरत उद्योग केला. त्यांना लेखक किंवा ग्रंथकार असे म्हणता येत नाही. त्यांचा कोणताहि लेख टिपणा-च्याच स्वरूपाचा आढळतो. म्हणजे त्यात काही तरी नवीन माहिती मिळवून ग्रथित केलेली दिसून येते. पण ही टिपणे त्यांची त्यांना स्वतःला उपयोगी असली तरी ती तशीच ठेवून त्यांच्या साहाय्याने निष्कर्षभूत असा एखादा निबंध केव्हा तरी लिहावा असा त्यांचा प्रघात नव्हता. टिपणे जसजशी तयार होतील तसतशी ती लोकांच्या माहिती-करिता प्रसिद्ध करण्याचा क्रम त्यांनी ठेविला होता. जो कोणी भेटेल त्याला विचारून माहिती मिळवावी, इंग्रजी ग्रंथ वाचून त्यावरूनहि टिपणे करावी, व एखाद्या वर्तमान-पत्रांत ती माहिती प्रसिद्ध करावी असा त्यांचा नित्य परिपाठ असे. 'लोकहितवादी' या नावाने त्यांनी लिहिलेले बहुतेक लेख जवळ जवळ अशाच स्वरूपाचे आहेत. विद्यार्जनाच्या दुकानातील रोजकीर्द असेहि नाव त्यांच्या ग्रंथांना देता येईल. टिपणे प्रसिद्ध करणे हे दिसण्यात कसेसेच दिसते. पण छापखाने व वर्तमानपत्रे ही गोष्ट तेव्हा

अगदीच नवी म्हणून कौतुकाची असल्यामुळे वर्तमानपत्रात कोणी काय छापावे याला नियमच नव्हता; व जे काय छापले जाईल त्याची वाचणारास अपूर्वाईच वाटे. इतर देशांतूनहि मुद्रणकला नवी सुरू झाली तेव्हा निघालेली वर्तमानपत्रे व मासिक पुस्तके यांतूनहि असेच टिपणाच्या स्वरूपाचे लेख लिहिलेले आढळून येतात.

चर्चा, वादविवाद ही गोष्ट तेव्हा सर्वस्वी नवीन असली तरी, वर्तमानपत्रांतून ती माजण्याइतकी पुष्कळशी वर्तमानपत्रे नसत; व सार्वजनिक चळवळ ही गोष्ट तर माहीत नव्हतीच नव्हती. ज्ञानार्जनाचा व्यापार व विनियम हल्ली घाऊक होतो तो तेव्हा किरकोळ होत असे. एखाद्या प्रांतात एकच लहानसे वर्तमानपत्र असले तर त्याला दुसऱ्याशी वाद करण्याला जागा किंवा प्रसंगच असत नाही. आज वर्तमानपत्रांतील लेखांना जाहीर व्याख्यानाचे, संभाषणाचे किंवा पंडितसभेतील वादाचे स्वरूप आहे तसे या जुन्या काळी नसून, ते केवळ आत्मगत भाषणाचे होते. त्या वेळची वर्तमानपत्रें ही ' वर्तमानपत्रे हे नांव आजच्याहून अधिक सार्थ करणारी होती. बाजारात, गुजरीत, चव्हाट्यावर, अड्ड्यावर, गर्दीत, माणसे भेटली असता, मुंग्यांप्रमाणे क्षणभरच तोंडास तोंड देऊन एकमेकांना नुसती बातमी सांगून जशी पुढे जातात, त्याच रीतीने तेव्हाची वर्तमानपत्रें संक्षिप्त हकीकत लिहून जाता जाता क्वचित एखादे वाक्य टीकेचे लिहीत. अशाहि वेळी लिहिणारांना मते नव्हती असे नाही, तर मते प्रतिपादन करण्याचा जसा आखाडा हल्ली पडला आहे तसा तो पडलेला नव्हता. फार तर मत ओघाने बोलून जात. पण त्याची साधकबाधक चर्चा होत नसे. तेव्हाची वर्तमानपत्रे म्हणजे खाणीतून उकरून काढलेल्या अनगड हिऱ्याच्या दगडासारखी म्हटली तर, हल्लीची वर्तमानपत्रें त्याच दगडाला घासून हजारो पैलू पाडलेल्या व किरणांचे जाळे पसरणाऱ्या गुलाबी फुलाच्या हिऱ्यासारखी ठरतात. तेव्हाचे वर्तमानपत्र वाचणे म्हणजे एखाद्या अंधाऱ्या बोगद्यातून दुसऱ्या टोकास दिसणाऱ्या उजेडातील वस्तू न्याहाळण्यासारखी असे. हल्लीचे वर्तमानपत्र वाचले म्हणजे प्रदर्शनात कित्येक वेळा कृत्रिम आरसेमहाल तयार करतात त्यात उभे राहिल्यासारखे वाटते ! ते असे की, जिकडे पाहावे तिकडे एकाच्याच अनंत मूर्ती चकचकतात.

असो. गोपाळराव हरि हे ' क्षणशः कणशश्चैव ' या सुप्रसिद्ध न्यायाने कणाकणानी विद्या स्वतः मिळवूनन लोकांना ती देणारे उपकारी गृहस्थ कसे होते हे त्यांची पुस्तके वाचली असता कळून येईल; व त्यांचा विद्याव्यासंग आणि बहुश्रुतपणा यांचे कौतुक करताना विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी त्यांजवर केलेली बहुधा सगळी टीका लक्षात न घेतली तरी चालण्यासारखी आहे. सरकारी नोकर, रावबहादुर, सुधारकच नसले तरी सुधारणाप्रिय, इत्यादी अनेक बाजू लक्षात घेऊन शास्त्रीबोवांनी त्यांच्यावर टीकेचा मारा केला; पण लोकहितवादींची बुद्धी शुद्ध असून त्यांच्या मनातहि खरोखर

नाव ठेवण्यासारखे असे फारसे काही नव्हते. आपल्या लोकांना जगाचे ज्ञान फार थोडे आहे, ते आपली दृष्टी जितकी व्यापक करतील तितके हितच होईल, जुन्या समजुतीत व चालीरीतीत फरक झालाच पाहिजे, व प्रत्यक्ष कार्य हातून झाले न झाले तरी मनुष्याने ज्ञानसमृद्ध तरी असले पाहिजे हाच मुख्यतः गो. ह. देशमुखांचा उपदेश असे. ते आपल्या बुद्धिमत्तेवर जिल्हा जज्जांच्या जागेपर्यंत चढले, व १८६० व ६२ चे सुमारास हिंदुधर्मशास्त्रातील आधुनिक निर्णयांचा डायजेस्ट किंवा व्यवस्थित संग्रह करण्याचे काम सरकारने त्याजकडे दिले असल्याचेहि आढळते. १८८८–८९ साली म्हातारा अगदी पिकला तरी, पुणे शहरात जर कोठे एखादी लहानशी सभा, किंवा वाकडेवाड्यातील स्माल साहेबांचे साप्ताहिक मिशनरी व्याख्यान असले तरी त्यालाहि काठी टेकीत ते आलेले आम्ही पाहिले आहेत. तात्पर्य, गोपाळराव हरि देशमुख म्हणजे ज्ञानार्जनाच्या हौसेची त्या कालातील ती एक प्रत्यक्ष मूर्तीच होती असे म्हणता येईल. लोकहितवादींविषयी विष्णुशास्त्री चिपळूणकरहि लिहितात :—

" लोकहितवादी हे स्वदेशहितार्थ उद्योग करू लागल्यास आज सुमारे चाळीस वर्षे होत आली. इतक्या काळात देशस्थिति सुधारण्याच्या निमित्ताने ज्या ज्या उलाढाली झाल्या त्या सर्वांत हे आपल्या नामाभिधानाप्रमाणे प्रमुखत्वाने वागत आले आहेत. अद्यापिहि त्यांचे उतार वय झाले असता व राजसेवेचा भार त्यांच्या डोईवरून उतरला असता त्यांचा लोककल्याणनिमित्तक उद्योग अव्याहत चालू आहे......ऐन साठीच्या अमलातहि प्रस्तुत ग्रंथकाराचे ठिकाणी नाउमेदीचे व सुस्तपणाचे उद्गार आढळत नाहीत. देशहितार्थ उलाढाल करण्याविषयी हव्यास, ग्रंथरचना, सभापांडित्य वगैरेविषयी त्यांची हौस ही सर्व नव्या दमाच्या तरुण बाडातहि आढळणार नाहीत अशी या वयातीत पुरुषाचे ठायी आज घटकेला तरतरीत आहेत. लोककल्याणाच्या-निमित्त सतत दीर्घकाळ परिश्रम करणे व कामाविषयी सदोदित उत्साह बाळगणे या गोष्टींच्या संबंधाने सर्वांनी व विशेषतः आमच्या अलीकडील कमकुवत मंडळीने रावबहादुरांचा कित्ता घेणे अत्यंत उचित होय. "

( टिळक चरित्र खंड १ ला )

• • •

## गोपाळराव आगरकर

✤ ✤ ✤

[ आगरकर व टिळक हे जिवलग मित्र. केसरी, न्यू इंग्लिश स्कूल या संस्था त्यांनीच काढल्या व कोल्हापूर–प्रकरणी दोघांनी कारागृहवासहि भोगला. " आधी राजकीय व मग सामाजिक " या वादामुळे मतभेद होऊन आगरकरांनी निराळे ' सुधारक ' वर्तमानपत्र काढले. तत्कालीन वादाची संपूर्ण हकीकत टिळक चरित्र खंड १ यात आढळेल. खालील उतारा श्री. केळकर यांचे व्याख्यानातील आहे. ]

आगरकरांच्या व्यक्तिगुणांची चढती श्रेणी मी अशी लावीन:—( १ ) उत्कृष्ट गद्यलेखक. ( २ ) राष्ट्रीय संस्थांचे संस्थापक. ( ३ ) नवमतप्रचारक. ( ४ ) धैर्यशील पुढारी. ( ५ ) स्वार्थत्यागी महानुभाव. पैकी काही गुण व्यक्तिदृष्ट्या आदर्शभूत व इतर किंचित् कमी मानाचे म्हटले तरी परिणामदृष्ट्य समाजाला अधिक उपयोगी. महाराष्ट्रात १८८२ ते १८९४ या १२ वर्षांत आगरकरांचे प्रमुख गद्य-लेखक या नात्याचे स्थान अविवादित होते. विष्णुशास्त्री चिपळूणकरांपूर्वी मराठी गद्यलेखन पन्नास वर्षे सुरू झाले होते तरी ते अगदी सामान्य विषयावर व केवळ शालोपयोगी दृष्टीने झाले. विष्णुशास्त्री यांनीच प्रथम त्याला राष्ट्रीय ध्येयवादी वळण देऊन उच्च कोटीला नेले.

आगरकरानी ती उच्च ध्येयवादी दृष्टि राजकारणात ठेवून शिवाय वाङ्मयाचा उपयोग समाजसुधारणेकडेहि केला. महाराष्ट्रातील जुने वाङ्मय सर्व पद्यात्मक व त्यातले काही थोडे चांगले काव्यात्मक. पण हे दोनहि प्रकारचे वाङ्मय धार्मिक भावनांवर अधिष्ठित होते. पण गद्याचा खरा उपयोग हाच की, ते भावनेविषयी आदर व जिव्हाळा ठेवीत असले तरी एक प्रकारे ती भावना कुशलतेने आच्छादून सर्व उघड विचार–व्यवहार बौद्धिक व तार्किक पद्धतीने मुख्यतः करते; शिवाय त्यातच भावनेचे दर्शन मधूनमधून यथायोग्य दिल्याने गद्याला काव्याचेहि रूप येऊ शकते.

आगरकरानी आपल्या लेखात भावना अशाच रीतीने प्रायः गुप्त ठेवून पण मधूनमधून तिचे यथोचित दर्शनहि देऊन गद्याचा उत्कृष्ट उपयोग केला. आणि विष्णुशास्त्र्यांच्या लिखाणात जो एकांगीपणा होतो तो काढून टाकून आपली बुद्धि वा तर्कशक्ति यांचा ‘ सर्चलाईट ’ समाजातील अगदी बारीकसारीक गोष्टीपर्यंत नेऊन सामाजिक हित व सुखसोयी यांची उत्तम चर्चा केली. विष्णुशास्त्री व टिळक यांच्या-बरोबर त्यांनी ‘ केसरी–मराठा ’ व न्यू इंग्लिश स्कूल या संस्था स्थापल्या व स्वार्थत्यागाचे व्रत स्वीकारले ही गोष्ट देखील अलौकिकच होय. या संस्थांनी गेल्या पन्नास वर्षांत काय कार्य केले हे लोकांपुढे आहेच. पण आगरकरांनी आणखी एक विशेष कामगिरी केली ती सामाजिक बाबतीत नवमतप्रसाराची. त्यांची मते सकृद्दर्शनी अप्रिय होण्यासारखी होती तरी त्यांनी लोकापवाद सोसण्याचे धैर्य दाखविले. व खरी निर्भीडपणाची स्पष्टोक्ती त्यांच्या लेखात दिसते तशी इतर कोणाहि लेखकाच्या लेखात क्वचित आढळेल. त्यांच्या स्वार्थत्यागाचे वर्णन तर टिळकांनीच आपल्या उज्ज्वल भाषेने केले आहे. त्याबद्दल वेगळे सांगण्याचे कारण नाही.

त्यांचे सामाजिक सुधारणेचे लेख वाचल्यामुळेच सुधारणा घडून आली असेच केवळ म्हणता येत नाही. कारण तसे पाहिले तर त्यांचे लेख किती लोकांनी प्रत्यक्ष वाचले असतील ? पण ज्या सामाजिक सुधारणेची आवड लोकांच्या मनात उदित होऊन भीत भीत बाहेर डोकावीत होती तिला त्यांनी मोठ्याने वाचा फोडली. अशी वाचा फोडणारा पुढारी लेखक समाजाला हवा असतो व आगरकरांच्या वेळी समाजाला तो मिळाला.

त्यांच्या सामाजिक विषयांचा विस्तार सांगावयाचा तर ईश्वर व मोक्ष यांच्या-पासून बहिर्दिशेला पाणी न्यावे की इतर रीतीने स्वच्छता संपादवी येथपर्यंत होती असे सांगितले म्हणजे खरी कल्पना येईल. देव, धर्म, जातिभेद, यात्रा, स्पृश्यास्पृश्यता, सोवळेओवळे, ज्योतिष, ग्रहबळ, इतर लोकभ्रम, प्रेतसंस्कार, शिमगा इत्यादी गोष्टींतील आचार व विचार यांवर त्यांनी बरीचशी तार्किक बुद्धीने पण अत्यंत सूक्ष्म छाननी केली. सामाजिक विषयांपैकी त्यातल्या त्यात स्त्रीशिक्षण व स्त्रियांचे

समाजातील आणि कुटुंबातील स्थान हा त्यांचा आवडता विषय होता. असंमत वैधव्य, केशवपन, विवाहकाल, ऋतुशांति, सासुरवास इत्यादी उपांगभूत विषयांवरहि त्यांनी मार्मिक टीका केली आहे. तथापि, एकंदरीने ते वेछूट व मोकाट सुधारक नव्हते. उदाहरणार्थ, मद्यपानाचा तर त्यांनी निषेध केलाच, पण मांसाहार, अंडी खाणे व इतर प्रकारचे स्वैर वर्तन यांचाहि त्यांनी निषेध केलेला पाहून भावी पिढी आगरकरांना कदाचित सुधारक या पदावरून खाली ओढण्याला तयार व्हावयाची ! तसेच धर्मांतराकडे त्यांनी उपेक्षा बुद्धीने पाहिले नाही. हिंदुधर्मातच हिंदूंनी राहावे पण तो धर्म बौद्धिक दृष्टि लावून सुधारावा आणि समाजाच्या आचारविचारात योग्य अशा सुधारणा घडवून आणाव्या असेच त्यांचे मत होते. अविभक्त कुटुंबाचा सर्वस्वी उच्छेद व्हावा असे त्यांचे म्हणणे नव्हते, तर अविभक्त कुटुंबपद्धति थोडीबहुत राहिली तरीहि बरी, पण त्यात स्त्रियांना हल्लीहून अधिक उच्चपद लाभावे, ज्याला सासुरवास म्हणतात तो निघून जावा व सासवा-सुना, दीर-भावजया, भाऊ बहीण या सर्वांनी आई–बापांसमवेत मोकळेपणाच्या आनंदात वागावे, हे त्यांना इष्ट वाटत होते. ही सर्व चर्चा मोठ्या नाजुकपणाने करावी लागते, पण नाजुकपणा संभाळण्यापेक्षा स्पष्टोक्तीच अधिक बरी असे त्यांचे मत असल्याने त्यांनी या दुसऱ्या मार्गाचा अवलंब केला होता.

समाजहिताच्या मोठ्या गोष्टींबरोबर लहान गोष्टींचीहि चर्चा करणे अवश्यच असते. अशा बाबतीतील त्यांच्या स्पष्टोक्तीचे एक नमुनेदार उदाहरण म्हटले म्हणजे ' न्हाविणी पाहिजेत ' हा त्यांचा लेख. माझ्या मते या त्यांच्या लेखाने त्यांनी विध्वंसकाबरोबर उत्कृष्ट प्रतीची विधायक बुद्धी दाखविली. जुन्या चालीप्रमाणे होणारा विधवांचा प्रासंगिक केशवपनाचा प्रसंग मनात आणावा, म्हणजे या लेखाचे स्वारस्य कळेल इतकेच मी सहृदय लोकांना कळवितो. व तो प्रसंग त्यांनी लक्षात आणल्यास न्हाविणींचा धंदा सुरू व्हावा ही सूचना अत्यंत समर्पक आहे हे कोणीहि कबूल करील. बांगड्या भरण्याचा धंदा कासाराप्रमाणे कासारणीहि करतात. भाजी विकण्याचा धंदा माळ्याप्रमाणे माळिणी करतात. दूध विकण्याचा धंदा गवळ्याप्रमाणे गौळणीहि करतात. याशिवाय फेरीवाले मजूर यांचे धंदे पुरुषाप्रमाणे स्त्रियाहि करतात हे आपण पाहतो. या उघड व्यवहारात स्त्रिया हव्या, तर विधवांच्या केशवपनासारख्या अत्यंत नाजुक गुप्त अशा व्यवहारात स्त्रियांचीहि मदत झाली तर ती केवढी होय ! व त्यात कोणाला कसला कमीपणा ? केशवपनाची चाल नाहीशी व्हावी हे पहिले ध्येय, मग ती आहे तोपर्यंत त्या नापितकार्याला स्त्रिया असाव्या असे म्हणण्यात काहीच चूक नाही. पण हे म्हणावयाला म्हणणारा बुजतो आणि ऐकणारा बुजतो हा अनुभव असल्यामुळे, ती स्पष्टोक्ती काढणारे आगरकरच प्रथम भेटले हा त्यांचा एक ठळक

गुण होय. तात्पर्य, विध्वंसक, विधायक व विनोदी, तीनहि पद्धतींचा यथोचित उपयोग करून आगरकरांनी सामाजिक सुधारणेचे मोठे कार्य केले.

असो. शेवटी आगरकर व पुणे यासंबंधाने दोन शब्द सांगतो. व्याख्यात्यांनी पुण्यात आगरकरांचा छळ झाला असे म्हटले, ते काही एका मर्यादित अर्थानेच घेतले पाहिजे. वर्तमानपत्रांतून व पुराणमतवादी लोकांच्या तोंडून जी त्यांची शाब्दिक निंदा झाली असेल ती हिशेबातून वगळल्यास प्रत्यक्ष छळ असा आगरकरांचा झालेला माझ्या ऐकिवात नाही. विशिष्ट वर्गातील अप्रियता हाच त्यांचा छळ होता. एरवी बहिष्काराच्या दृष्टीने पाहिले तर टिळकहि कित्येक वर्षे बहिष्कारातच होते. दुर्दैवाने जुन्या आठवणीत टिळक व आगरकर यांच्यातील विरोध व कलह हेच डोळ्यापुढे मुख्यतः वावरतात. पण सुदैवाने आज लोकांच्या तोंडातून या दोघांविषयी एकत्र प्रेमोद्गार निघू लागले आहेत. कालांतराने या अप्रिय आठवणीहि नाहीशा होतील. रस्त्याच्या पुढील टोकापर्यंत गेलो म्हणजे मागील टोकाशी असणारी घरे एकमेकांना चिकटलेली दिसावी इतकी ती वस्तुतः जवळ असतात. नदीच्या पात्रात उभे पाहून मागे पाहणारास दोन्ही नदीतीरांवरील वृक्ष व खुणा एकमेकांना चिकटलेल्या दिसून पलीकडे प्रवाहच नसेल व हे सर्व एक तळेच आहे असे भासते. **तसेच जुन्या लोकांच्या आठवणींसंबंधाने व्हावे.** त्यांच्यातील विरोध दिसण्यात मोठा दिसतो तो त्यांच्या अनुयायांकडून त्या भेदाचे ढोल वाजविले जातात त्यामुळे. पण स्वतः पुढारी वाटतात त्याहून अधिक जवळ असतात व हे सिद्ध करण्याकरिता मी स्वतः आगरकरांनी काढलेले टिळकांविषयीचे शब्द व स्वतः टिळकांनी काढलेले आगरकरांविषयीचे शब्द वाचून दाखवून भाषण संपवितो.

ता. ४ जुलै १९१६ रोजच्या केसरीत टिळकांनी आगरकरांविषयी खालीलप्रमाणे लिहिले आहे. " श्री. आगरकर यांनी दारिद्र्यात राहून एकनिष्ठपणे देशसेवा केली. आपल्या कर्तबगारीने व्यावहारिक उन्नती करून घेऊ असा निश्चित भरंवसा असता, आगरकरांप्रमाणे मनोदेवतेस साक्ष ठेवून संकटे, विपत्ती, हालअपेष्टा सोसूनहि मी आपल्या देशाचे मनोगत पूर्ण करीन असे म्हणणारे पुरुषच खरे धीर पुरुष होत. मनुष्याचे मोठेपण त्याच्या मनावर आहे, केवळ वृत्तीवर नाही. "

" सुधारणेची मते त्यांनी निर्भीडपणे व कित्येकदा उच्छृंखलपणेहि प्रतिपादन केली. पण हे काही त्यांच्या मोठेपणाचे लक्षण नव्हे. पण परिस्थितीचा गुलाम न बनता परिस्थितीला यथासंभव यथाशक्ति आपल्या ताब्यात आणावयास जो मनोनिग्रह, निर्लोभीपणा आणि धैर्य लागते ते ज्याच्या अंगात आहे आणि दुःखाची, संकटाची भीती अगर पर्वा न बाळगता जो आपल्या ठायी असणाऱ्या सद्गुणांचा लोकोपयोगार्थ उपयोग करतो तोच मोठा म्हणावयाचा. गोपाळराव आगरकर हे याच कोटीतले होते."

आता आगरकर टिळकांविषयी काय लिहितात पाहा—

" या लेखकाच्या ( आगरकर ) मनांत व रा. टिळक यांच्या मनांत, काही लोक म्हणतात, त्याप्रमाणे, जमीन–अस्मानाचे अंतर असते तर नोकरीचा मार्ग सोडून सामान्य देशकार्यासाठी आम्ही एके ठिकाणी कधीच आलो नसतो; व बऱ्या-वाईट रीतीने गेली दहा वर्षे आमच्या हातून एकत्र निघाली नसती. पण वारंवार होते काय की, जसजसे वय वाढत जाते तसतसा मताभिमान आणि आग्रह वाढत जातो म्हणून म्हणा, किंवा कोणत्याहि दोन व्यक्तींत केवढेहि मतसादृश्य असले तरी ती मते अमलात आणण्यासाठी ज्या उपायांची योजना करावयाची, त्याच्याविषयी त्यात जो मतभेद उत्पन्न होतो तो कधी कधी मूळ मताच्या सादृश्याहून प्रबलतर होऊन बसतो म्हणून म्हणा, जे एकदा सामान्य संकल्प करून, स्वार्थाचे किंवा परमार्थाचे काही कृत्य हाती घेतात त्यांचा पुढे बेबनाव होऊ लागतो व शेवटी त्यांची फुटाफूट होण्याचाहि प्रसंग येतो.

" रा. टिळकांच्या आणि त्यांच्या प्रतिपक्षाच्या विचारात व स्वभावात केवढाहि भेद असला, तरी त्यांना एवढे कबूल करणे भाग आहे की, जी गोष्ट एकदा टिळकांच्या मनास रास्त अशी वाटली तिचा ते कितीहि नुकसान झाले किंवा केवढाहि लोकापवाद आला तरी, प्रत्यादेश करणार नाहीत, हा त्यांचे अंगी प्रशंसा करण्यासारखा गुण आहे. "

हे उतारे वाचल्यावर मग उभयपक्षाच्या अनुयायांनी टिळकांवर सवंग लोक-प्रियतेचा आणि केसरीवरील व्यापारी धोरणाचा आरोप केलेला जितका खोटा तितकाच आगरकरांवर राजकारणातील नेमस्तपणाला उद्देशून भ्याड भित्रेपणाचा केलेला आरोपहि खोटा हे कोणीहि कबूल करील. टिळक सवंग लोकप्रियता संपादणारे, पण ती किती सवंग होती हे टिळकांनी एकंदर किती वर्षे तुरुंगवास सोसला हे पाहूनच ठरवावे ! आणि आगरकर हे तुरुंगवासाला भिणारे ही गोष्ट तर धादान्त खोटी होती. स्वीकृत कार्यात टिळक लोकापवाद सोसण्याला मागे घेणार नाहीत असे आगरकरांनीच टिळकांना सर्टिफिकेट वर दिले आहे व उलट टिळकांनी आगरकरांची निर्भयता वर्णिली आहे. असे असता विरोध दिसतो तो केवळ एकाने एक कार्य उचलून नेटाला लावले व दुसऱ्याने दुसरे उचलून नेटाला लावले त्यामुळेच होय. टिळकांनी स्वराज्याचे राजकारण इतके नेटाला लावले की, त्यांनी इंग्रज बादशहाला ' स्वराज्य ' हा संस्कृत शब्द उच्चारण्याला शिकविले. उलट आगरकरांनीहि महाराष्ट्राला ' स्त्री–शिक्षण ' हा शब्द इतक्या आस्थेने पढविला की, तो आता ज्याच्या त्याच्या तोंडातून लीलेने, आनंदाने व हौसेने निघतो.

• • •

## नामदार गोपाळ कृष्ण गोखले

✤ ✤ ✤

शुक्रवार ता. १९ फेब्रुवारी रोजी रात्री गोपाळराव गोखले यांना मृत्यू आला. त्यांची प्रकृती अलीकडे बरेच दिवस खालावली होती. काळजाच्या एका विकाराने ते आजारी असत व त्यांचे हे दुखणे दिवसेंदिवस वाढत चालले होते. काळजाचा विकार हा दोन-चार वर्षांचा जुना असून विलायतच्या एका प्रवासात जहाजावरील एका दाराचा धक्का छातीला लागून तो अधिकच वाढला होता. त्यातच परिश्रम करण्याची त्यांना अनिवार हौस असल्यामुळे आणि ते विश्रांती अशी थोडी घेत असल्यामुळे पुढे पुढे त्यांना रात्री झोप येत नसे; आणि आली तरी फार वेळ टिकत नसे. म्हणून त्यांनी सोसायटीतल्या एखाद्या गृहस्थाला अवेळीच उठवून आणून त्याच्याशी गोष्टी बोलत बसावे किंवा काही खेळ काढून खेळत बसावे आणि अशाने रात्र घालवावी. अशा रीतीने पळापळीने अंतकाळ जवळ येत आहे हे गोखल्यांना दिसत होते; पण त्याला त्यांचा किंवा डॉक्टरांचा काही इलाजच नव्हता. काळाचा विकार मनुष्याला केव्हा दगा देईल याचा नेम नसतो. तरी पण ते इतक्यात जातील असे कोणास वाटले नाही. शेवटी शेवटी त्यांनी कामाचा हात थोडा आखडला

होता व डॉक्टर लोक सक्त पहारा ठेवून त्यांना कोणाशी फार बोलू देत नव्हते; पण त्यांच्या प्राणाला ओहोटी लागलीच; आणि इतके दिवस ते जगले हे तरी काम करण्याच्या हौसेनेच जगले असेहि म्हणता येईल. मरणसमयी गोखल्यांचे वय अवघे ४९ वर्षांचे होते. एका दृष्टीने ते आगरकर, आपटे वगैरे समव्यवसायिकांपेक्षा अधिक जगले; परंतु हे काहीतरीच समाधान होय. टिळकांसारखे त्यांना साठपासष्ट वर्षे आयुष्य लाभते तर त्यांच्या हातून किती तरी काम झाले असते; पण जेवढे आयुष्य त्यांना लाभले त्यातच त्यांनी इतर अनेक लोकांपेक्षा फार अधिक काम करून दाखविले. म्हणून टिळकांनी केसरीतील त्यांच्या मृत्युलेखावर 'मुहूर्तं ज्वलितं श्रेयः न च धूमायितं चिरं' असे जे अवतरण लिहिले तेच खरे.

गोपाळराव गोखले हे एका गरीब कुळात जन्मले. कागल येथील त्यांच्या वडील भावाने त्यांचे एकंदर शिक्षण केले आणि अल्पवयात ते बी. ए. झाले; पण स्वार्थत्यागाची वृत्ति मनात असल्यामुळे टिळकांच्या उज्ज्वल उदाहरणाने मोहून त्यांच्याच बोलाविण्यावरून ते न्यू इंग्लिश स्कूलला येऊन मिळाले व लाइफ मेंबर झाले. पुढे त्यांचे व टिळकांचे ग्रह जमले नाहीत ही गोष्ट वेगळी. शिक्षकाचे काम थोडे दिवस केल्यावर त्यांची बुद्धिमत्ता, इंग्रजी लिहिण्याबोलण्याची हातोटी, कोणत्याहि विषयाचा अभ्यास करण्याची इच्छा आणि मर्मग्राहकता, व सर्वांत विशेष म्हटले म्हणजे विनयशीलता हे त्यांचे गुण पाहून माधवराव रानड्यांनी त्यांना निवडून आपल्या आवडत्या शिष्यवर्गात सामील केले; आणि तेव्हापासून त्यांनी रानड्यांच्या ठिकाणी जी गुरुनिष्ठा ठेवली ती यावज्जन्म; आणि या गुरुनिष्ठेचे फळहि त्यांना तसेच मिळाले. कारण 'आपणासारिखे करिती तात्काळ' ही म्हण या ठिकाणी खरी ठरली. गोखले यांचा बी. ए. च्या परीक्षेचा विषय गणित असला तरी इंग्रजी भाषेच्या आवडीने त्यांनी तिचा परिश्रमाने अभ्यास करून ती चांगली हस्तगत केली. स्मरणशक्ती खूप कमावलेली असल्याने त्यांचे इंग्रजी भाषेचे पाठांतर फार चांगले होते; पण पुढे हळूहळू इंग्रजी हा शिक्षणाचा विषय सोडून देऊन त्यांनी इतिहास व अर्थशास्त्र घेतले आणि शिक्षकाचे काम सोडून देईपर्यंत त्यांनी त्या विषयांतील आपली प्रवीणता जशी वाढविली त्याप्रमाणे आपल्या उत्कृष्ट व्याख्यानांनी शिष्यांचेहि कल्याण केले. हे दोन विषय त्यांना सार्वजनिक आयुष्याच्या प्रवेशद्वारासारखे उपयोगी पडले. १८८७ पासून रानड्यांनी त्यांचा सार्वजनिक सभेत प्रवेश करविला; आणि सीतारामपंत चिपळूणकरांनंतर ते सभेचे चिटणीस व त्रैमासिकाचे संपादक झाले. या सुमारास आगरकरांबरोबर त्यांनी 'सुधारक' पत्र काढले पण पुढे लवकरच त्यांनी त्याचा संबंध सोडला. टिळक त्यांच्याहून नऊ वर्षांनी वडील; तथापि दोघांचेहि सार्वजनिक चरित्र बरोबरच सुरू झाले व प्रथम बरीच कामे उभयतांनीं भागीदारीने केली. एका बाजूने टिळक हे

चिटणीस निवडून द्यावे द्यावे तर दुसऱ्या बाजूने गोखले; पण थोड्याच दिवसांनी त्यांची जोडी फुटली आणि दोघांनीहि दोन मार्ग आक्रमिले.

सन १८९२ किंवा १८९३ साली मुंबईस एका सभेत लष्करी खर्चाच्या विषयावर गोखल्यांचे मुख्ये वक्ते म्हणून भाषण झाले अध्यक्ष मेथा व उपवक्ते वाच्छा हे होते; पण आपल्या वक्तृत्वाने व विषयप्रतिपादनाच्या शैलीने गोखल्यांनी दोघांवरहि ताण केली आणि हे पाहून मेथा व वाच्छा या दोघांच्याहि चेहऱ्यावर गोखल्यांविषयीच्या कौतुकाचे तेज चमकत होते हे सर्वांनी पाहिले. या वेळी गोखले अवघे सव्वीस किंवा सत्तावीस वर्षांचे असावे. सार्वजनिक कामात त्यांचे पाऊल जे एकदा पुढे पडले ते कधीच मागे आले नाही. १८९६ साली हिंदुस्थानतर्फे वेल्बी कमिशनपुढे त्यांना साक्षीदार म्हणून पाठविण्यात आले आणि तेथे झालेली त्यांची प्रश्नोत्तरे पाहिली म्हणजे कोणालाहि त्यांच्या बुद्धिमत्तेबद्दल अभिमान वाटेल. १८९९ साली ते मुंबईस कायदेकौन्सिलात शिरले पण तें क्षेत्र त्यांच्या कर्तृत्वाला अपुरे असे तेव्हाच दिसून आले. १९०२–०३ साली सर फेरोजशहा मेथा यांनी वरिष्ठ कौन्सिलातील आपली जागा खाली करून त्यांना दिली, तेथपासून सतत अकरा-बारा वर्षे तेथे होते, पण त्यांची जागा घ्यावी असे दुसऱ्या कोणाला वाटेना व द्यावी असे कोणास म्हणवेना. कौन्सिलातील त्यांची भाषणे वाचली म्हणजे ती माहितीने पूर्ण भरलेली व अत्यंत परिणामकारक अशी सहज दिसतात. शिवाय त्यांची वाणी मृदु, मोहक असल्यामुळे आणि त्यांच्या बोलण्यात सच्चेपणा व कळकळ ही मूर्तिमंत प्रगट होत असल्याने त्यांची छाप तज्ज्ञ व निष्णात अशा अनुभविक व हुशार अधिकाऱ्यांवरहि पडे. त्यांच्या भाषणात मुख्य गुण म्हटले म्हणजे भाषण लहान असो मोठे असो, त्यात प्रमेय व अनुमान ही एखाद्या सुंदर इमारतीप्रमाणे प्रमाणबद्ध असत. आधार व आकडे पाहून पारखून घेतलेले असावयाचे. विषयांतर कोठेहि नसावयाचे. शब्द मोजके रेखीव तोलीव असे असावयाचे. प्रत्येक वाक्यागणिक उद्दिष्टाचे पाऊल पुढे पडत असावयाचे; आणि या सर्वांवर प्रांजलपणा व मृदुलपणा ही बारीक हाताने पसरलेली असावयाची; पण उलट त्यांच्या भाषणात विनोद सहसा कोठे आढळावयाचा नाही. ज्याप्रमाणे डॉ. रासबिहारी घोष वगैरेंच्या भाषणात अभिजात वाङ्मयाचे संदर्भ व रुचिर ध्वनि पदोपदी उमटलेले दिसतात तसे यांच्या भाषणात आढळत नसत. वक्तृत्वाची जी एक ठरीव कल्पना आहे त्या दृष्टीने गोखल्यांना कदाचित वक्तेहि म्हणता येणार नाही; पण मन वळविणे किंवा दुसऱ्यांना आपलेसे करणे हा जो वक्तृत्वाचा हेतू व परिणाम तो सिद्ध करण्यात इतर नामांकित वक्त्यांपेक्षाहि गोखल्यांचा हातखंडा असे. याचे कारण एकच की, त्यात प्रसाद, प्रांजलपणा, बुद्धिमत्ता व कळकळ ही खेचून भरलेली असत. यातच त्यांचा वर्ण व बाह्यरूप यांची भर पडे व त्याहिपेक्षा

खरा गुण म्हटला म्हणजे त्यांच्या भाषणात ज्यांना एकदा गुरुजन किंवा नेते त्यांनी मानले त्यांच्याविषयीच काय पण समोरच्या प्रेक्षकांविषयीहि त्यांची विनयबुद्धी प्रगट होई. त्यांच्या भाषणात आवेश असला तरी अपशब्द नसे आणि मर्मज्ञपणा असला तरी कुचाळी नसे. हे जे त्यांचे गुण सभापंडित्यात तेच खाजगी संभाषणातहि दिसून येत. यामुळे नेमस्त पक्षाकडून परदेशी पाठविण्याला जर कोणी एकच मनुष्य योग्य असेल तर ते गोखले असे त्या पक्षाने कायमचे ठरवून टाकले होते आणि ते सार्वजनिक कार्याला दिवसभर वाहिलेले व पडेल ते काम अंगावर घेण्याला तत्पर असे असल्यामुळे इतर धंदेवाईल वकील, सॉलिसिटर, व्यापारी, कारखानदार, शाळुमुत्सद्दी व पर्यंकपंडित यांना त्यांच्यापुढे हारच खावी लागे.

पण इतके गुण असूनहि त्यांच्या ठिकाणी होती तशी उज्ज्वल देशभक्ति, कर्तव्यनिष्ठा व स्वार्थत्यागबुद्धि नसती तर त्या गुणांचे तेज जनतेवर पडले नसते. त्यांच्या प्रतिपक्षांना देखील त्यांचे दुहेरी गुण मान्य होते. पक्षाभिमानामुळे टिळकांचे गुण उघडपणे मान्य करण्याला नेमस्त हे खळखळ करीत व त्यांची जीभ किंवा लेखणी होईल तितके अंग चोरी. तोच प्रकार गोखल्यांच्या संबंधाने राष्ट्रीय पक्षाचाहि होत असे. आणि दुर्दैवाने जन्मभर या दोन पक्षांच्या मूर्धाभिषिक्त पुढाऱ्यांचे धावते युद्ध चालू राहिल्यामुळे आणि परस्परांनी परस्परांविषयी मर्यादेबाहेर अनादर दाखविल्यामुळे अनुयायांच्या वर्तनात अनादराला अप्रीति व द्वेष यांचेहि स्वरूप आले होते. पुष्कळांना असे वाटे की हे दोन पुढारी एका बाजूला राहून एकच धुरा मानेवर घेऊन काम करतील तर काय बहार होईल ? पण अशी अपेक्षा करणे म्हणजे सूर्यचंद्र एकाच वेळी आभाळात राहून सारखेच प्रकाशमान व्हावे अशी अपेक्षा करण्याताखेच व्यर्थ होते. एका क्षितिजाच्या दोन टोकांवर राहूनच त्यांनी आपापले काम आपापल्या निम्म्या भागापुरतेच करावे असाच ईश्वरी संकेत होता. आता हे दोघेहि कालवश झाल्यानेच त्यांची नावे जनतेच्या मुखात एकत्र नांदू शकतात. त्यांच्यातील वाद दुष्ट स्वप्नाप्रमाणे लोक आनंदाने विसरले. व राजकारणी महाराष्ट्राची स्मृति जोपर्यंत कायम राहील तोपर्यंत हे दोन राष्ट्रपुरुष एकदम सारखेच डोळ्यापुढें आल्याशिवाय राहणार नाही.

पुण्याच्या दुखवट्याच्या सभेत एका वक्त्याने केलेले त्यांचे वर्णन येथे दिले असता अप्रस्तुत होणार नाही. “ ॲरिस्टॉटल याच्या व्याख्येप्रमाणे गोखल्यांनी अवगुण व गुणातिरेक या दोहोंमधल्या सुवर्णबिंदूचा बरोबर वेध केला होता. त्यांच्या अंगी धारिष्ट नव्हते पण धैर्य होते. तीव्र मतभेदपात्रता होती पण भांडखोरपणा नव्हता. शब्दात गोडी किंवा मवाळी होती. पण तोंडदेखलेपणा किंवा तोंडपुजेपणा नव्हता. त्यांचा शब्दस्पर्श मृदु पण तत्त्वाला ते कठोर होते. त्यांनी हातात मखमलीचे हातमोजे घातलेसे वाटले तरी आत वळलेली मूठ लोखंडी किंवा पोलादी असे. ते सुविनीत असत पण भिऊन वागत

नसत. " ता. २३ फेब्रुवारीच्या केसरीत टिळकांनी अग्रलेख लिहून गोखले यांचे जे गुण-वर्णन केले त्यातील एक दोन उतारे येथे देऊन हे गुणवर्णन संपवू. " एका गरीब ब्राह्मणाच्या मुलाने अभ्यास करून परीक्षा पास झाल्यावर थोड्याच वर्षात हत्ती, घोडे, संपत्ति, सत्ता किंवा अशी दुसरी बाह्य साधने जवळ नसता सर्व देशात आपले नाव आबालवृद्धांचे तोंडी ठेवून जावे हे काही लहानसहान काम नव्हे. गोखल्यांच्या अंगी अनेक गुण होते; पण मुख्य गुण म्हटला म्हणजे निर्लोभ अंतःकरणाने वेळीच देश-कार्याला वाहून घेणे हा होय. तरुणपणी संसार यथास्थित करून मंदावलेल्या कायिक व मानसिक शक्ति इतर कर्तव्याच्या अभावी लोकोपयोगाला वाहणारे पुरुष आढळ-ल्यास त्यांच्याबद्दल विशेषशी आदरबुद्धि मनात उत्पन्न होत नाही; पण इंद्रियशक्ति शाबूद आहेत, स्वार्थासाठी उद्योग करण्यास शरीर समर्थ आहे, वार्धक्य अजून दूर आहे; आणि संसारातील सुखाचे स्वरूप अद्याप मनोहर असून तिकडे चित्ताची प्रवृत्ति होणे साहजिकच आहे अशा वेळी आणि विशेषकरून या दिशेने गेले असता आपणास यश मिळण्याचा संभव इतरांपेक्षा काकणभर अधिक आहे अशी मनास खात्री वाटत असतानाहि या सर्व मनोहर देखाव्यावरून दृष्टि मागे ओढून यथाशक्ति आपल्यास देशकार्याला वाहून घेणे, त्यात आलेली संकटे सोसण्यास कबूल असणे किंबहुना त्यातच आनंद मानून त्यासाठी सतत परिश्रम करण्यास तयार होणे याला एकप्रकारचा बळकट मनोनिग्रह लागतो; आणि तो मनोनिग्रह ज्याने दाखविला व नुसता दाखविला नव्हे तर आमरणान्त कायम ठेवला तोच पुरुष धन्य होय. मनुष्य कोणत्या कोणत्या बुद्धीने प्रवृत्त होतो हे लक्षात ठेवूनच प्रत्येकाची किंमत करावी लागते त्यांचा स्वभाव सौम्य असल्यामुळे हाती घेतलेले काम सौम्य उपायांनीच पार पाडण्याकडे त्यांची प्रवृत्ती असे आणि आमच्यासारख्या कित्येक लोकांस हे सौम्य उपचार अनाठायी आहेत असे वाटे; पण पथ्य आणि उपचार यांच्या तीव्रतीव्रतेसंबंधाने दोन वैद्यांमध्ये जरी मतभेद झाला तरी वैद्य या नात्याने गोपाळरावजींची जी योग्यता होती ती आम्हांसहि मान्य आहे. "

(टिळक चरित्र-खंड ३ रा)

• • •

गौ. म....७

## महर्षि धोंडो केशव कर्वे

✤ ✤ ✤

श्री. अण्णासाहेब कर्वे यांच्यासारखे समाजहितकर्ते शंभर वर्षेपर्यंत जगावे, वाचावे, कार्यक्षम राहावे अशी इच्छा असणे स्वाभाविक होय. अण्णासाहेबांना आज ऐंशी वर्षे पुरी झाली व इतके कार्यनिष्ठ आणि प्रसंगी खडतर जीवन घालवूनहि ते आयुष्याचा इतका पल्ला गाठू शकले ही त्यांची कर्तबगारीहि लहानसहान नाही. आजही कर्वे यांची कामाची शक्ति व उरक पुष्कळ प्रमाणात कायम आहे. वयोमानाप्रमाणे त्यात थोडीबहुत मंदता व क्षीणता ही यावयाचीच; पण अण्णासाहेबांपेक्षा कितीतरी पटीने अधिक सुखासीन असे आयुष्य घालवूनहि साठी ओलांडताच ज्यांच्या शरीराची व मनाची ताकद अगदी कमजोर झाली आहे असे महाभाग कितीतरी भेटतात; नव्हे हा नियमच झाला आहे, व अण्णासाहेब कर्वे यांच्यासारखे सतत कार्यरत असणारे, तऱ्हेतऱ्हेचे प्रसंग नेटाने निभावून नेलेले व तरीहि ऐंशीच्या घरात आपली कार्यशक्ति कायम ठेवणारे पुरुष वरील नियमाला अपवाद म्हणूनच समाजात आढळतात. आपल्या समाजातील कर्ते पुरुष स्वतःचे शरीरस्वास्थ्य, वैयक्तिक आरोग्य यांकडे फारसे लक्ष देत नाहीत. ही गोष्ट क्षुल्लक मानली जाते पण त्यामुळे समाजाचे नुकसान होते. अण्णासाहेब कर्वे यांनी अत्यंत शिस्तबद्ध व आरोग्याच्या

नियमानुसार जीवन व्यतीत करून दीर्घायुष्य मिळविले, हे त्यांचे वैशिष्टय सर्वांना आदरणीय व अनुकरणीय असेच आहे.

तथापि केवळ दीर्घायुष्य लाभणे हीच स्वतः एकंदरीने फार महत्त्वाची गोष्ट आहे असे कोणी समजत नाही; म्हणून ही बाजू सोडून इतर रीतीने प्रो. कर्वे यांच्या मोठेपणाची थोडीशी चिकित्सा करू ही करताना मोठी गणली जाणारी पण लहान-मोठ्या वयाची अनेक माणसे सहजच डोळ्यापुढे येतात. कारण खऱ्या मोठेपणाचा वयाशी काहीच संबंध नसतो. 'गुणिषु न च लिंगं नच वयः' 'तेजसां हि न वयः समीक्ष्यते', 'मुहूर्तं ज्वलितं श्रेयः' इत्यादी अनुभवसिद्ध वचने हेच दर्शवितात. अर्थात वयनिरक्षेप मोठेपणा एकाच मार्गाने लाभत नाही. कोणी बुद्धीने मोठा, कोणी ध्येयाने मोठा, कोणी कर्तृत्वाने मोठा, कोणी चारित्र्याने मोठा असे प्रकार असतात.

पण ही निरनिराळी अंगे ज्या एकाची असा अंगी म्हणून एक मुख्य गुण मानला जातो, त्याच्या कसोटीवर या विविध गुणांची परीक्षा होऊन निकषावर घासलेल्या सुवर्णाप्रमाणे त्याची प्रत ठरविली जाते. त्या सर्व गुणांचा समावेश करून त्यांच्याकरवी उचित कार्य करवून घेणारा असा एक व्यापक गुण आहे. तो म्हटला म्हणजे निःस्वार्थी समाजसेवेचा भाव.

मग या भावाला जे कार्यक्षेत्र मिळेल त्या दृष्टीने त्या मोठेपणाला नाव मिळते. म्हणूनच महात्मा, लोकमान्य, महर्षि वीराग्रणी, लोकबंधू, धर्मात्मा, देशभक्त अशी निरनिराळी महत्त्वदर्शक नावे रूढ होतात. वास्तविक निःस्वार्थीपणाची जात एकच; तसेच समाजसेवा, परोपकारबुद्धि यांचीं जात एकच; पण प्रत्येक मोठा मनुष्य आपले कार्य आपणच पसंत करतो व ठरवून घेतो ते रुचिभेदाने व स्वभावभेदाने. तसेच बाह्य परिस्थित्यनुरूप या गुणांच्या साहाय्याने केलेल्या कार्याला दिसण्यात महत्प्रमाण किंवा अल्प प्रमाणात असे प्रत्यक्ष फल येऊ शकेल; पण 'राजा तुष्टो ग्राममेकं ददाति' या न्यायाने एक गाव धर्मार्थ दिल्याने राजा जितका उदार म्हणता येईल, तितकाच खरोखर एक मूठभर पीठ धर्म म्हणून देणारा वाणीहि उदार ठरेल. कारण मुळातली धर्मबुद्धी तीच. फक्त दोन वस्तूंच्या स्वरूपात व प्रमाणातच कमीअधिकपणा काय तो आला.

पण कर्मफळावरून किंवा विषयभेदावरून कर्मबुद्धीची प्रत लावणाराला खरे तत्त्वज्ञान किंवा साधे व्यवहारज्ञानहि नाही असेच कष्टाने म्हणावे लागते. कारण तो मोठ्या माणसाची न होणारी अशी तुलना करू लागतो, व हा श्रेष्ठ हा कनिष्ठ असे ठरवू पाहतो आणि या अज्ञानात द्वेषाची भर पडली म्हणजे मग, जे आहे ते जमेस न धरता जे नाही तेच नेमके त्याने पुढे ओढले म्हणजे कोणीही मनुष्य मोठा म्हणायला

उरणारच नाही ! पंडिताला ‘ हा वैदिक नाही ’ असे म्हणून आणि वैदिकाला ‘ हा पंडित नाही ’ असे म्हणून क्षुद्र ठरविण्याची सनातनी कोटी प्रसिद्धच आहे ! आधुनिक काळातहि ती गोष्ट करणारे भेटतातच. वास्तविक ‘ कोठे काही । एक आहे एक नाही’ हेच संपूर्ण सत्य-प्रतिपादक संपूर्ण वाक्य होय. उदार बुद्धीचा गुणग्राहक ‘ कोठे काही, कोठे काही ’ ( पण काही तरी आहे ) हा त्या वचनाचा अर्धा भाग घेईल, तर कृपणबुद्धीचा निंदक ‘ एक आहे ’ हेही न घेता ‘ एक नाही ’ इतकेच घेऊन, द्वेषबुद्धी प्रभावी करील. तात्पर्य, विवक्षित एखाद्या गोष्टीवरच सर्व महत्त्व रचून ती न करणाराचे मोठेपण अमान्य करणाराला खरे तारतम्य नाही असेच ठरेल. हिमालयाच्या शिखरात फूटपट्टीनेच मोजले असता कमीअधिक उंचीची शिखरे दिसतील, परंतु काही एका विशाल उंचीवर गेल्यानंतर शिखराचा तुलनात्मक उच्चनीचपणा ठरवीत बसण्याच्या उपद्व्यापात काहीच स्वारस्य उरत नाही.

असो. कर्वे यांचा मोठेपणा इतका निर्विवाद व उघड आहे की, त्याचे वर्णन करण्याला त्यांना कोणतेहि विशेषण लावण्याचें कारण नाही. कर्वे यांच्या कार्यावरून त्यांचे मोठेपण प्रतीत होण्यासारखे आहे. म्हणून आम्ही कार्याचे स्थूल दिग्दर्शन करतो. प्रथम कर्वे हे कोणत्या परिस्थितीतून वर आले हे पाहिले म्हणजेच त्यांच्या कर्तृत्वाचा अचाटपणा सहज लक्षात येतो. जन्मभर केवळ स्वार्थसाधनात घालवून श्रीमंती, लौकिक, संसारसुख, सर्व काही यथास्थित मिळवून त्यानंतर मग लोकसेवेला प्रारंभ करणाराला मोठेपण प्रमाणाबाहेर मिळते. उघडच आहे की, मोठ्या उंच बैठकीवर लहानसाच पुतळा उभा केला तरी तो लोकांच्या डोळयात सहजच भरतो. राजकारण ही देखील अशीच एक उंच बैठक आहे की, तिजवर आरूढ झालेली लहानशी मूर्तीहि मोठ्या पुतळयासारखी वाटावी; पण कर्वे यांना दोनहि गोष्टी प्रतिकूल होत्या. त्यांनी सर्व जन्म दारिद्र्यात घालविला, आणि उद्योग केला तोहि सामाजिक सुधारणांचा. म्हणजे प्रगतिविमुख समाजाला स्वभावतः अप्रिय असणाऱ्या गोष्टींचा. पाण्यात पोहण्याला पडणाराने अंगात चिलखत घालून शिरावे अशी त्यांची स्थिती होती. म्हणून संपत्तीच्या बडेजावाचे साहाय्य नाही, आणि अद्भुतपणाने डोळे दिपविण्यासारखे लोकप्रिय राजकारणी वातावरण नाही ! पण त्यामुळेच त्यांनी मिळविलेल्या यशाला न्यायबुद्धीने कोणीहि अधिक मोठेपण दिले पाहिजे.

प्रो. कर्वे यांनी आपले एक लहानसे आत्मचरित्र लिहिले आहे. तो जो वाचील त्याला आमचे म्हणणे पटेल अशी आम्हाला खात्री आहे. पुण्यास येऊन फर्ग्युसन कॉलेजात ते प्रोफेसर झाले. तेथून पुढे त्यांना किंचित स्थैर्य लाभले; पण यापूर्वीची त्यांची परिस्थिती काय होती हे लक्षात येण्यासाठी काही गोष्टी सांगतो. वयाच्या १६ व्या वर्षापर्यंत त्यांना साधे मराठी शिक्षण पुरे करता आले नाही !

मराठी सहाव्या इयत्तेची परीक्षा देण्याकरिता त्यांना शंभर–दीडशे मैल पायाने प्रवास करावा लागला. पहिली नोकरी केवळ पाच रुपयांची धरली. विद्यार्थीदशेत हाताने स्वयंपाक केला. शिकवण्या धरल्या. खानेसुमारीत गणतीदाराचे काम केले. मुंबईस कॉलेजात असता दरमहा चार रुपयात उदरनिर्वाह केला. पावणेचार रुपयांच्या भाड्याच्या खोलीत संसार केला; पण शिक्षणाप्रीत्यर्थ झालेले दोनशे रुपयांचे कर्ज प्रामाणिकपणे तावडतोब फेडले. बी. ए. झाल्यावर सरकारी नोकरी मिळत असता ती धरली नाही. रोज सात-आठ शिकवण्या मुंबईच्या लांबलांबच्या भागातील करण्याकरिता मैलोगणती पायपीट केली. एखाद्या मजुराप्रमाणे दिवसभर राबून संध्याकाळी रिकामपण मिळे तेव्हा ते स्नान करीत. अखेर फर्ग्युसन कॉलेजात प्रोफेसरची जागा मिळाली तरी पगार पंचाहत्तरच ! तात्पर्य, घरची गरीबी म्हणून शिक्षण काय किती होईल याची कल्पनाहि नाही. असे असता शेवटी कर्वे प्रोफेसर झाले ! पण हे सर्व होत असता त्याबरोबरच सक्रिय परोपकार व समाजसेवा यासंबंधी त्यांचे कार्य सुरू होते. या कार्याचे धडेहि त्यांनी स्वयंस्फूर्तीनेच घेतले. सांगण्यासारखी गोष्ट ही की. मिळकतीच्या पहिल्या रुपयातून त्यातला काही तरी अंश समाजसेवेकडे खर्च करण्याचे काम त्यांचे व्रत कमीत कमी ६५–७० वर्षे अबाधित चालू आहे.

कर्वे यांना नुसत्या स्वार्थत्यागाचेच बाळकडू त्यांच्या मातेच्या अमृतमय करांगुलीने घातले होते असे नव्हे, तर ते विधायक स्वरूपाच्या समाजसेवेचेहि होते; आणि त्यातहि त्यांची समाजसेवा प्रथमपासून संघटित स्वरूपाची होती हे ध्यानात ठेवण्यासारखे आहे. कोणतीहि विधायक कार्याची कल्पना मनात आली की, प्रथम संस्था स्थापूनच ते प्रारंभ करीत; पण अशा संस्थेचे पहिले सभासद स्वतः ते असावयाचे, आणि पहिलीच नव्हे तर शेवटची वर्गणीहि व्यक्तिशः त्यांचीच असावयाची. शिवाय संस्था अत्यंत काटकसरीने चालवून तिचे जमा-खर्चहि आपल्याच हाताने चोख ठेवावयाचे; आणि तिचे काम स्वतः अंगमेहनतीने करावयाचे असा त्यांचा नियम असल्यामुळे त्यांना इतरांमध्ये सहकार्याची स्फूर्ती उत्पन्न करता येई आणि संस्थेला यश लाभे.

हे मुद्दाम इतक्याकरिताच सांगावयाचे की, महाराष्ट्रातसंस्था-संस्थापकांचा दुसराही एक प्रकार लोकांच्या पुऱ्या माहितीचा आहे ! तो असा की, नवीन संस्था स्थापन होण्याच्या आधीच ती स्थापन झाल्याचे नुसते जगजाहीर करावयाचे. स्थापना झाल्यावरहि कोकिळेने आपले अंडे कावळ्याकडून उबवून घ्यावे, त्याप्रकारे संस्थेचे अंगमेहनतीचे काम दुसऱ्यावर टाकावयाचे. दुसऱ्यांची वर्गणी घ्यावयाची, पण स्वतःची मागे ठेवावयाची. हिशेब नीट ठेवावयाचे नाहीत किंवा जाहीर करावयाचे नाहीत. संस्था चालेल तोपर्यंत ते सर्व यश आपले, आणि बुडाली ( ती बहुधा लवकरच बुडवावयाची ) तर ते अपयश दुसऱ्या कोणाचे ! अणि वरती जन्मभर संस्था-संस्थापक

म्हणून स्वतः मिरवावयाचे ! पण कर्वे यांची पद्धति याहून अगदी वेगळी होती. बालविद्यार्थीदशेत स्थानिक ' मुरुड फंड ' त्यांनी स्थापिला. तेथपासून दोन वर्षांपूर्वी ग्रामशिक्षणसंघ स्थापन करीपर्यंत त्यांनी दहा-पंधरा संघटित संस्था स्थापन केल्या. त्या सर्वांचा हेतू शिक्षण, दुःखविमोचन, चारित्र्यसंवर्धन अशा म्हणजे उदात्त प्रकारचा होता, आणि हा हेतू बऱ्याच अंशांनी सफल झालेला पाहण्याचे भाग्यहि सुदैवाने त्यांना लाभले.

कर्वे यांनी केलेले कार्य भरीव समाजसेवेचे असले तरी त्यातल्या त्यात ते बरेच अवघड होते. समाज हा प्रायः शक्य तितकी पूर्वपरंपरा चालू ठेवण्याची इच्छा करणारा असतो. त्यातूनहि समाजातील स्त्री विभाग सुधारणा हे कार्य नाजूक, जोखमीचे, जबाबदारीचे आणि अनेक पथ्ये संभाळून केले तरी, बहुजनसमाजाला प्रायः अप्रिय असते. कर्वे यांच्या हातून जे स्त्री-समाजसेवेचे कार्य झाले त्याचा प्रारंभ त्यांनी स्वतःच्या पुनर्विवाहापासून केला. एका दृष्टीने व्यक्तिशः सक्रिय कार्यारंभ हा शुभारंभ असला तरी कर्वे यांचे कार्य इतर रीतीने या आरंभामुळेच अप्रिय होण्याचा संभव होता. त्यामुळे त्यांना प्रारंभीच लोकांच्या दूषित ग्रहाची बाधा झाली; पण त्यांच्या स्त्री-समाजसेवेची कल्पना वैधव्य-दुःखनिवारणाहून पुष्कळच अधिक व्यापक आहे हे पुढे दिसून आले. त्याचा विकास सर्वांगीण स्त्री-शिक्षणात होताच लोकांची अप्रीति जाऊन त्या कार्यास लोकप्रियता लाभू लागली. स्वतः पुनर्विवाह केला तरी पुनर्विवाहाच्या प्रत्यक्ष प्रचाराचे कार्य त्यांनी केले नाही. उलट स्त्री-शिक्षणाचे कार्य मनाने आणि कृतीने त्यांनी पुनर्विवाहाच्या प्रचारापासून बरेचसे अलिप्त ठेवले. नव्या रूढी पाडाव्या, मान्य कराव्या असे त्यांना वाटत असले तरी समाजाशी शक्य तितका संबंध ठेवावा, बंडखोरी करावी लागली तरी ती उनाडगिरीची हौस भागविण्या-करिता करू नये तर तत्त्वनिष्ठेकरिता व अवश्य तितकीच करावी आणि समाजाला विनाकारण डिवचू नये अशीच आचरणपद्धती कर्वे यांनी ठेविली होती. म्हणूनच त्यांच्या कार्याला वाढती मान्यता लाभत गेली.

गेल्या चाळीस वर्षांपूर्वी स्त्रीशिक्षण आणि स्त्रीविषयक सामाजिक सुधारणा यांचेकडे पाहण्याची महाराष्ट्राची दृष्टी कोणती होती आणि तीच आज कोणती आहे यातील भेद पाहिला म्हणजे महाराष्ट्रीय समाज हा मुख्यतः बुद्धिवादी आहे, अंधभावनावादी नाही हेच दिसून येते. करणारा भेटला तर कोणत्याहि चांगल्या गोष्टीचा उपयोग वाईट हेतूने व अनिष्ट दिशेने करता येतो. ज्या अग्नीवर वैश्वदेवाचा भात शिजू शकतो त्याने सज्जनांची घरे जाळता येतात; परंतु केवळ दुरुपयोगाच्या संभवाला बुजून-भिऊन सदुपयोगहि त्याज्य मानावा असा तारतम्यशून्य हा महाराष्ट्र नाही. म्हणूनच हिंदुस्थानातल्या कित्येक प्रांतांतील समाजापेक्षा महाराष्ट्रीय समाज

स्त्री-शिक्षणाच्या बाबतीत पुढे गेला आहे. पुनर्विवाहाच्या बाबतीत तो उत्साही नसला तरी सहिष्णु बनला आहे. स्त्रियांच्या हक्कांच्या अधिकारांच्या बाबतीत त्याने उदारमतवादित्व स्वीकारले आहे. या सर्व गोष्टी स्वाभाविक परिणतीने घडून येणाऱ्या होत्या व तशाच घडून आल्या आहेत हे जरी खरे, तथापि कोणत्याहि मतपरिवर्तनाची चळवळ म्हणून व्हावी लागते आणि चळवळ म्हटली म्हणजे तिला पुढारी लागतो. त्याप्रमाणे स्त्री-शिक्षणाच्या चळवळीला खरा सक्रिय व विधायक पुढारी कर्वे हीच व्यक्ती लाभली हे कोणालाहि मान्य करावे लागेल. ही चळवळ करून त्यांनी रानड्यांचे तत्त्वज्ञान आणि आगरकरांची तळमळ ही दोन्ही फलद्रूप केली.

समाजसेवा म्हटली म्हणजे ती समाजाच्या कोणत्याहि एकाच अंगाच्या जोपासनेने परिपूर्ण होत नाही हेच खरे आहे. कारण अर्थशास्त्रातील श्रमविभागाचे तत्त्व समाजसेवेलाहि लागू पडते. यामुळे आपल्या निष्ठेनुरूप, आवडीनुरूप व अनुकूलतेनुरूप जो तो पुढारी आपले कार्य आखून घेतो. यामुळे तो एकडोळ्या माणसासारखा दिसतो; पण खरोखर तो तसा असत नाही. त्याचा दुसराहि डोळा उघडा असतो. देशहिताकरिता चाललेल्या इतर कार्यांकडे त्याची दृष्टी तर असतेच पण सहानुभूतीहि असते. हे आपलेहि काम; पण ते केवळ सोईकरिता दुसऱ्याकडे सोपविले आहे असे तो मानतो. कर्वे हे जन्मभर सामाजिक सुधारणेच्या कार्यात गढून गेले असले तरी राजकीयदृष्ट्या होत असणारे काम त्यांना असंमत नव्हते, इतकेच नव्हे तर ते मनाने त्याला आशीर्वादच देत असतात. ते कोणत्याहि राजकीय संस्थेचे सभासद आजवर झाले नाहीत. ते राष्ट्रीय सभेच्या एखाद्या तरी सभेला हजर राहिले असतील की नाही याची शंकाच आहे; पण यावरून ते राजकारणाला भीत होते असा एखाद्या निंदकाला सहज सुचणारा आक्षेप मात्र मूर्खपणाचा ठरेल. **दारिद्र्य, देहदंडन, उपासमार, स्वयंसेवा, लोकनिंदा किंवा अप्रियता** ही सोसण्याची पात्रता इतके गुण ज्याच्या अंगी कर्वे यांच्याइतके तीव्रतेने वसत असतील तो मनुष्य सरकारच्या रोषाला भिईल हे संभवतच नाही. तात्पर्य, समाजसेवेत श्रमविभागाचे तत्त्व लागू पडते इतकाच बोध कर्वे यांच्या एकध्येयी, एकनिष्ठ चरित्रावरून घेण्यासारखा आहे. राष्ट्रोत्कर्षाच्या उपासनेतहि ' साधनानाम् अनेकता ' हाच सिद्धान्त खरा !

निष्कलंक चारित्र्य हा जो गुण सार्वजनिक कार्य करणाऱ्या कोणत्याहि पुढाऱ्यात पाहिजे तो कर्वे यांच्या ठिकाणी पूर्णपणे होता, हे त्यांचे एक अतुलनीय वैशिष्ट्य म्हणून सांगता येईल. विशेषतः समाजसुधारणा— त्यातूनहि स्त्रीसमाजाची सुधारणा करण्याचे व्रत ज्यांनी स्वीकारले त्यांचे खाजगी व सार्वजनिक आयुष्य अगदी धुतल्या तांदळासारखे असले पाहिजे. दुर्दैवाने या बाबतीत पुष्कळदा चमत्कारिक परिस्थिति आढळून येते. अण्णासाहेब कर्वे यांच्या स्त्रीशिक्षणाच्या कार्यावर जुन्या मताच्या

मंडळींनी पुष्कळदा टीका केली असेल; पण त्यांचे चारित्र्य व निष्ठा यांवर शिंतोडा उडविणे या महाराष्ट्रात कोणालाहि शक्य झाले नाही. कीर्ती, पैसा व इतर सर्व तऱ्हेचे मायामोह यांच्यापासून कर्वे हे निग्रहाने दूर राहिले. त्यामुळेच त्यांच्या अंगीकृत कार्याला इतकी स्थिरता व यश प्राप्त झाले आणि 'अनाथबालिकाश्रम', 'विधवा आश्रम' अशा त्यांनी काढलेल्या संस्थांतून व त्यांच्या शिक्षणसंस्थांतून लोकांनी आपल्या मुलीबाळी निःसंकोचपणे पाठविल्या; हा जो समाजाचा विश्वास कर्वे यांनी संपादन केला, तो खरोखरच अपवादच म्हणावा लागेल व त्यातच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची महानता दिसून येते.

(केसरी ता. १५ एप्रिल १९३८)

• • •

## महर्षि अण्णासाहेब पटवर्धन

महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांचे चरित्र आजच्या पिढीला सर्वस्वी अज्ञात आहे. केसरीच्या जन्मापूर्वी त्यांचे सार्वजनिक कार्य होऊन गेले. अण्णासाहेब ज्या घराण्यात जन्मास आले ते घराणे पेशवाईनंतरच्या काळात खानदानीचे समजले जात असे. त्यांचे वडील हे पुण्यातील सुप्रसिद्ध वकील असून, अव्वल इंग्रजीतील प्रेक्षकांना ते मेण्यात बसून कोर्टात वकिली करण्यास जाऊ लागले म्हणजे कौतुकाने दाखविण्याचा विषयच होते. वडिलांनी कीर्ती व पैसा चांगलाच मिळविला व दोनहि बाबतीत अण्णासाहेबांना गर्भश्रीमंतच म्हणता येईल. गर्भश्रीमंतीची ही झाक विरक्त स्थितीतहि त्यांच्यातून सर्वस्वी लोपलेली होती असे नाही. पण त्याने त्यांच्या वैराग्यसंपन्न स्थितीला कमीपणा न येता लोकांच्या कौतुकाला ते एक विभावस्थानच होत असे. अण्णासाहेबांच्या चरित्राचे दोन भाग होतात; त्यातला पहिला जितका प्रवृत्तिपर तितकाच दुसरा निवृत्तिपर होता. त्यामुळे त्यांच्या समग्र चरित्राचे अवलोकन करणारास तो एक अगम्य असा विरोधाभासच वाटेल. तथापि ज्यांना त्यांच्या पूर्वापार चरित्राची अंतस्थ माहिती आहे त्यांना स्वदेशाभिमानाच्या रेडियमचा

लॅकेटबंद केलेला असा हा एक परमाणूच नाहीसा झाला असे वाटल्याशिवाय राहणार नाही.

अण्णासाहेबांचा जन्म सन १८४७ साली झाला. त्यांनी पुणे–हायस्कुलात असताच कारख्यामसाहेबांकडून असामान्य बुद्धिमत्तेची शिफारस मिळविली. कॉलेजातहि प्रिन्सिपाल वर्डस्वर्थ, प्रो. क्यांडी, मार्टिन हौ, प्रो. केरुनाना छत्रे वगैरे गुरूंचे त्यांच्यावर विशेष प्रेम होते. बी. ए. ची पदवी घेतल्यावर ते एलएल. बी. च्या अभ्यासाकरिता मुंबईस जाऊन राहिले. मुंबईस त्यांच्या वडिलांनी त्यांना एखाद्या संस्थानिकाच्या मुलाप्रमाणे ऐश्वर्यात ठेवले होते. पण श्रीमंतीत न मुचणारे असेच विचार त्यांच्या मनात लहानपणापासून येत असत. विद्यार्जन व सार्वजनिक हितबुद्धि याविषयी त्यांची आकांक्षा इतकी प्रबळ होती की, वकिलीचा अभ्यास करताना त्याबरोबरच ग्रँट मेडिकल कॉलेजात वैद्यकीय अभ्यासहि ते करू लागले. संसाराकरिता वकिली, पण लोकोपयोगाकरिता वैद्यकी हे सजोड ध्येय त्यांनी प्रथमपासूनच ठरविले होते. एलएल. बी. व एल. एम. या दोन परीक्षांचा अभ्यास एकदम चालू ठेवल्यामुळे त्यांच्यासारख्या बुद्धिमान विद्यार्थ्यांसहि पुष्कळ परिश्रम करावे लागले. दिवाणखान्यात प्रत्येक खांबाला कंदील बांधून झोप न येण्याकरिता उभ्याने फेऱ्या घालीत ते रात्रीहि वाचन करीत, आणि दिवसा व रात्री मिळून सोळा सोळा अठरा अठरा तासहि ते अभ्यास करीत अशी आख्यायिका आहे. त्यांचा करारीपणा लहानपणापासून दिसून येत असे; व अभ्यासाकरिता रात्रीच्या रात्री झोपेशिवाय त्यांना काढताना पाहून त्यांच्या सुदृढ शरीरप्रकृतीइतकीच त्यांच्या निश्चयी मनाचीहि विद्यार्थी तारीफ करीत. आपल्या हेतूप्रमाणे अण्णासाहेब हे एलएल. बी. तर पास झालेच ! पण डॉक्टरची अखेरची परीक्षा होण्यापूर्वीच त्यांना वैद्यक–शिक्षणाचा क्रम संपवावा लागला. त्याला विशेष कारण हेच झाले की, मेडिकल कॉलेजात विद्यार्थी अभ्यास करीत असताना त्यांनी वैद्यक विषयावर एक इंग्रजी मासिक पुस्तक सुरू केले होते; त्यांच्या विद्याविषयक महत्त्वाकांक्षेचे कौतुक करणाऱ्या कित्येक प्रोफेसरांनीहि त्यांना या कामी उत्तेजन दिले होते; पण तात्त्विक चर्चेत आपल्या गुरूंची भीड न ठेवता अण्णासाहेबांनी ' जर्नल ' मध्ये पाश्चात्य वैद्यकावर कडक टीका केल्यामुळे प्रिन्सिपाल सिल्हेस्टर व डॉ. हंटर वगैरे प्रोफेसरांचा आणि त्यांचा बेबनाव झाला. त्यामुळे शेवटची परीक्षा देऊन वद्यैकीय पदवी घेण्याची कल्पना सोडून देऊन त्यांनी आपल्या हेतूप्रमाणे मुंबई हायकोर्टात वकिली व डॉ. सखाराम विठोबा यांच्या दवाखान्यात धर्मार्थ औषधोपचाराचे काम सुरू केले. त्यांची डॉक्टरची परीक्षा पुढे व्हावयाची होती, पण त्याच्या आधीच त्यांच्या वैद्यकचातुर्याची पुण्यास व मुम्बईत ख्याती झालेली असून खुद्द रावसाहेब महादेव गोविंद रानडे हे अण्णासाहेबांचेच औषध घेत असत.

पण केवळ लोकांना धर्मार्थ औषध दिल्याने आपल्या सार्वजनिक कर्तव्याची परिसमाप्ति होते असे अण्णासाहेब मानीत नसल्याने त्यांनी विद्यार्थीदशेतच ‘ स्वदेशी ’ व्रत घेतले आणि त्या वेळचे पुण्याचे एक प्रसिद्ध पुढारी गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका यांच्या सहकारितेने ‘ कौशल्योत्तेजक ’ नावाची सभा व सल्फ्युरिक ॲसिडाचा एक लहानसा कारखाना स्वतःच्या भांडवलावर काढला. अण्णासाहेब हे रावसाहेब रानड्यांपेक्षा पाच वर्षांनी लहान होते; आणि जो कोणी होतकरू मुलगा दिसेल त्याला सार्वजनिक कामात ओढावयाचे व सहकारितेने त्याच्या हातून होईल तितके सार्वजनिक कार्य घडवून आणावयाचे हा रानड्यांच्या अंगचा गुण प्रसिद्धच असल्यामुळे अण्णासाहेब व रावसाहेब यांची गट्टी जमण्यास फारसा वेळ लागला नाही. हायकोर्टात वकिली करण्याचे काम अनेक कारणांनी अप्रिय वाटू लागल्यामुळे ते काही दिवस पुण्यास येऊन राहिले व लवकरच ‘ किरण ’ नावाचे एक इंग्रजी–मराठी पत्र त्यांनी सुरू केले. राजकीय बाबतीतील विचारांचा जहालपणा आजच्या पिढीसच मक्त्याने दिला आहे अशी पुष्कळांची समजूत दिसते. पण बुद्धिमान व स्वदेशाभिमानी असा तरुण मनुष्य जहाल नसेल तरच ते आश्चर्य होय ! विद्यार्थिदशेत लिहिलेल्या शिपायांच्या बंडावरील आपल्या निबंधात निर्भीड व कडक उद्‌गार काढून खुद्द रावसाहेब रानड्यांनी वरील नियम जसा सिद्ध करून दिला होता तसाच तो अण्णासाहेब यांनीहि सिद्ध करून दिला होता. कारण ‘ किरण ’ पत्राच्या पहिल्याच अंकात “ History shows that the tree of liberty was ever watered by the blood of despots ” ’ ( या वाक्याचे भाषांतर आम्ही मुद्दाम देत नाही. ) असले वाक्य लिहून त्यांनी आपल्या समकालीन मवाळ लोकांना चकित करून सोडले होते असे सांगतात. असो; रावसाहेब व अण्णासाहेब यांची मनोरचना इतर अनेक बाबतींत वेगळी होती. विशेषतः धार्मिक व सामाजिक बाबतीत या दोघांचे पटण्या-सारखे नव्हते. ह्यामुळे दोघांचे भाग हळू हळू वेगवेगळे होऊ लागले हे स्वाभाविकच आहे. तथापि प्रथम प्रथम तरी पुण्यातील बरेचसे सार्वजनिक काम या उभयतांच्या सहकारितेनेच झाले. उभयतांनाहि सारखीच प्रिय असलेली सार्वजनिक सभा हे त्यापैकी एक काम होय. बडोद्याचे मल्हाररावमहाराज गायकवाड यांच्या पदच्युतीच्या वेळी धीटपणे पुढे येऊन सरकार क्षणभर चकित होईल असे जे धैर्य पुणेकरांनी दाखविले त्यात आणि पुण्यातील वाडे जळाल्याने सरकारचा पुणेकरांवर जो बंडखोरीचा अस्थानी आरोप आला त्यात रावसाहेब रानड्यांप्रमाणे अण्णासाहेब पटवर्धन हेहि अंशभागी होते. रावसाहेबांच्या खालोखाल हरतऱ्हेच्या सार्वजनिक कामांत अण्णासाहेबांचेच नाव घेत. रानड्यांना नोकरपेशामुळे पुण्याबाहेर जावे लागले तर धुरीणत्वाचे त्यांचे काम, जणू काय त्यांचा उजवा हात अशा रीतीने, कोणी पार पाडील तर ते अण्णासाहेबच होत अशी लोकांची समजूत होती.

मुंबईमध्ये वकिली व वैद्यक ही दोनहि अण्णासाहेबांनी निरनिराळ्या हेतूंनी चालू ठेवलीच होती. वकिलीपेक्षा वैद्यकाकडे, म्हणजे स्वार्थापेक्षा परार्थाकडेच त्यांचे लक्ष अधिक झुकते होते, हे वकिलीकडे, लोकांच्या दृष्टीने किंचित दुर्लक्ष करूनहि 'वैद्यसुधा' नावाचे जे आयुर्वेदिक मासिक पुस्तक त्यांनी चालविले त्यावरून, दिसून येण्यासारखे होते. अशा प्रकारच्या परार्थैक बुद्धीचे चीज झाल्याशिवाय राहत नाही; व या बुद्धीला विश्वासुकपणाची जोड मिळाल्यामुळे लवकरच त्यांचे नाव मुंबई-पासून मद्रासपर्यंत झाले. हैद्राबादचे सुप्रसिद्ध दिवाण सर सालेरजंग यांच्याशी अण्णा-साहेबांचा पत्रव्यवहार सुरू होऊन, वऱ्हाड प्रांताच्या गहाणाचे कर्जफेडीकरिता खास संस्थानची अशी बँक काढून वऱ्हाडचे मुलकी वसुलाचे काम सदर बँकेकडे सोपविण्यात यावे अशा तऱ्हेची कल्पनाहि मुक्रर झाली. तसेच मद्रासकडील कारव्हटनगर या संस्थानच्या राजानेहि संस्थानी बँकेची कल्पना पसंत केली. या दोनहि बँकांचे काम एतद्देशीय लोकांच्या हातूनच करवावयाचे, मात्र मुंबई-लंडन येथे जो पैशाचा व्यवहार चालणार त्या बाबतीत अण्णासाहेबांचे एक पूर्वीचे अध्यापक व स्नेही डॉ. स्मिथ यांच्या मार्फतीने काम करावयाचे असे ठरवून सन १८८० साली अण्णासाहेब हे प्रथम कारव्हटनगरच्या राजेसाहेबांस भेटण्याकरिता मद्रासेस गेले. परंतु दुर्दैवाने थोड्याच काळाच्या अवधीत राजेसाहेब व सर सालरजंग हे दोघेहि वारल्यामुळे अण्णासाहेबांनी उभारलेल्या देशाभिमानपूर्ण व कुशल कल्पनेचा सर्व डोलारा‌च्या डोलारा ढासळला. सार्वजनिक कामात निराशा नाही तर त्यात गंमत कसली? असे मानून चारचौघांच्या रीतीप्रमाणे अण्णासाहेबांनी आपल्या स्टेट बँकेच्या कल्पनासिद्धीचा फिरून निराळ्या रीतीने प्रयत्न करावयाचा होता; निदान पुण्यास परत येऊन आपण आरंभिलेले वकिली-वैद्यकीचे सजोड काम त्यांनी पूर्ववत चालू करावयाचे होते, पण निराशेचे परिणाम जगात सर्वांवर सारखेच होत नाहीत. निदान एवढी गोष्ट खरी की, कित्येकांच्या मनोरचनेत दैववादित्व हे कमानीतील मुख्य म्हणजे 'चावी' च्या दगडाप्रमाणे गुंतले गेलेले असते; व त्याला अकस्मात धक्का बसल्याबरोबर त्यांचा सर्व प्रवृत्तिमार्ग कोसळून पडतो आणि ते निवृत्तिमार्गी बनतात. अण्णासाहेबांच्या प्रवृत्तिमार्गाचीहि अशीच गोष्ट झाली असली पाहिजे असे मानल्याशिवाय त्यांचे पूर्वचरित्र व उत्तर चरित्र यांचा मेळ कोणासहि कधीच घालता येणार नाही. कारण १८८० साली अण्णासाहेब हे मुंबई सोडून गेले. ते नंतर जवळजवळ पाच वर्षेपर्यंत अज्ञातवासातच होते असे म्हटले तरी चालेल; व पुढे १८८५ साली ते जे पुण्यास परत आले तेहि अशा स्थितीत की हे पूर्वीचे अण्णासाहेब असे कोणासहि ओळखता येईना. परोपकारबुद्धी व देशाभिमान याखेरीज बाकी त्यांच्या सर्व गोष्टी पार बदलल्या होत्या. त्यांच्या घरची स्पृहणीय श्रीमंती काही आपोआप या अवधीत गेलीच होती, व जी बाकी उरली होती तिलाहि

अण्णासाहेबांनी जाणूनबुजून त्याच मार्गाने पाठवून सात्त्विक त्यागाचे सुख यथेच्छ अनुभविले. मेण्यातून जाणाऱ्या-येणाऱ्या पटवर्धनांच्या घरी तो पूर्वीचा थाट काहीच दिसेनासा झाला ! मद्रासजवळ तिरुत्तनी नावाच्या गावी राहून या पाच वर्षांत अण्णासाहेबांनी एकच गोष्ट यांच्या मोबदला संपादन केली व ती एक प्रकारची तपश्चर्या ही होय.

ही तपश्चर्या त्यांना-त्यांच्या आयुष्याचा उरलेला म्हणजे तीस-बत्तीस वर्षांचा काळ समाधानाने घालविण्यास उपयोगी पडली. या अवधीत त्यांनी प्रवृत्तिपर कामे अगदीच केली नाहीत असे नाही. त्यांच्या प्रेमळ व भिडस्त स्वभावाचा फायदा अनेकांनी स्वार्थाकरिता तर इतर अनेकांनी केवळ सार्वजनिक हिताच्या दृष्टीने घेऊन त्यांना कामकाजात घातले ही गोष्ट खरी. तथापि या अवधीत त्यांनी केलेल्या सर्व कामकाजांत बुद्धीचे तेज जरी पूर्वीसारखेच चमके तरी प्रवृत्तीच्या उल्हासापेक्षा निवृत्तीच्या उदासीनतेचीच छटा अधिक पडत असे. कित्येकांकरिता त्यांनी कायदेशीर अर्ज वगैरे लिहून दिले; १८९५ पासून १९१२ पर्यंत ते पुणे म्युनिसिपालिटीचे सभासद होते; १८९६ साली त्यांना सार्वजनिक सभेचे चेअरमन निवडण्यात आले व मरणसमयी त्या सभेचे ते अध्यक्ष होते; पहिल्या पहिल्या वर्षांत सभेकडून जे अर्ज वगैरे गेले त्यांतील कित्येक अण्णासाहेबांनी स्वतः लिहिलेले होते; पण ही सर्व कामे त्यांच्या परिस्थितीशी विसंगत म्हणून खंडक्रम अशीच होत. पण त्यांच्या खास आवडीचे जे केवळ निर्भेळ परोपकाराचे काम ते मात्र त्यांचे अखंड चालू होते; रोगी सरास पाहण्याचे त्यांचे दिवस जरी निश्चित होते, तरी कोणी रोगी कधी त्यांच्या घरी गेला व त्यांची गाठ पडल्यावर विन्मुख परत आला अशी गोष्ट कधी घडलीच नाही. त्यांच्या औषधोपचाराच्या कामाचे सर्व अधिष्ठान परोपकार-बुद्धी असल्यामुळे रोगी जितका अधिक दरिद्री किंवा निराश्रित तितका ते त्याचा कळवळा अधिक करीत.

अण्णासाहेबांच्या स्वदेशाभिमानासंबंधाने वर दिग्दर्शन करण्यात आलेच आहे. त्यांच्या अंतःकरणात स्वदेशाभिमानाची ज्योत नेहमी प्रदीप्त होती, व परमार्थाइतकेच राजकारणहि त्यांना प्रिय होते. उष्णतेशिवाय नुसत्या प्रकाशाला किंमत न देणारे व उष्णतेचीहि तिच्यावर किती शेर भात शिजतो एवढ्यावरूनच गणती करणारे लोक अर्थात पुष्कळ असणार. परंतु अबाह्यगमक अशीहि एक क्रिया मनात चालू असते; आणि तिच्या दृष्टीने पाहिले तर देशहिताचा निदिध्यास करणारी अण्णासाहेबांसारखी माणसे शेकड्यांनी मोजता येणे शक्यच नाही. वडिलार्जित खानदानीच्या बुद्धीप्रमाणे, पूर्ववयात अल्पकाळामध्ये मिळविलेले स्वकष्टार्जित असे त्यांचे राजकारणातील तपस्येचे ऐश्वर्य त्यांच्या मनात नित्य जागृत

होते; व अलीकडे पुण्यात ज्या अनेक राजकीय चळवळी झाल्या त्या करणारांना अण्णासाहेबांची संमती, त्यांचा अशिर्वाद, हे यशःप्राप्तीच्या साधनसामुग्रीपैकी एक मोठे कलम होय असे वाटत असे. कर्मधर्मसंयोगाने राजकारणाचे स्वरूपच आज असे होऊन बसले आहे की नित्य क्रिया, नित्य वाग्रणकंदन, व नित्य नवीन उपक्रमाचा खटाटोप केल्याशिवाय ते रूप उजळ राहातच नाही. किंबहुना तरवारीचे पाते शंभर नंबरी पोलादाचे असले तरी त्याला नित्य घासूनपुसून धार लावल्याखेरीज तिचा जसा उपयोग होत नाही, तसेच राजकारणाच्या क्षत्रियकर्माचा अंगिकार करणाराचेहि असते. पण कोणाचा स्वदेशाभिमान पारखण्याची मात्र ती एकच कसोटी खास नव्हे. कर्मकांडाची रोजची जिगजिग सर्वांच्या मनःप्रकृतीला सारखीच मानवते असे नाही; व क्रियाविषयक उदासीनतेचा बांध अवचित आडवा आल्याने सर्व आयुष्याच्या प्रवाहाचा प्रवाहच, उगमस्थान शाबूत असता, अनपेक्षित दिशेला झुकलेला पुष्कळ वेळा आढळतो. ही गोष्ट व हा सिद्धांत जितका परमार्थात तितकाच राजकारणातहि दिसून येतो. कर्मकांडाच्या अप्रियतेमुळे जितके अस्सल परमार्थज्ञानी आजवर अन्यायाने नास्तिकाच्या सदरात ढकलले गेले असतील, तितकेच स्वदेशाभिमानी लोकहि त्याच कारणाने मुत्सद्यांच्या सदरांतून वगळले गेले असले पाहिजेत असे आमचे तरी मत आहे. धार्मिक विधीच्या नित्यनैमित्तिक आचाराच्या ओझ्याखाली दडपून गेलेली स्वदेशभक्ति, व उलट स्वदेशभक्तीच्या नित्यनैमित्तिक उपासनाविधीच्या गहन कवचामुळे अदृश्यप्राय झालेली धर्मश्रद्धा या दोनहि गोष्टी हिंदुस्थानात आज मुबलक पाहावयास सापडतात. घाटमाथ्यावर पुष्कळ ठिकाणे अशी दाखविता येतील की जेथे एका बोटाच्या अंतराने पडलेले पावसाचे पाणी निम्मे अखेर पूर्व समुद्रास तर निम्मे अखेर पश्चिमसमुद्रास जाऊन मिळालेले असते ! क्रियात्मक राजकारण व क्रियात्मक परमार्थ यांचीहि गोष्ट अशीच आहे.

अण्णासाहेबांच्या स्वदेशाभिमानविषयक उद्योगासंबंधाने लिहिताना त्यांचे पूर्वचरित्रच मुख्यतः डोळ्यात भरते ही गोष्ट जरी खरी, तरी त्यांच्या उत्तरचरित्रात निदर्शनास आलेले कित्येक गुणहि महाराष्ट्रास भूषणभूत असेच आहेत. आम्ही बाकीच्या सर्व गोष्टी सोडून देतो; परंतु केवळ अण्णासाहेबांची व्यक्ती ही एकच गोष्ट घेतली तरी त्यांच्यासारख्या व्यक्ती महाराष्ट्रात गेल्या पाचपन्नास वर्षांत किती दाखविता आल्या व आजहि दाखविता येतात ? अण्णासाहेबांसारखा तेजस्वी पुरुष खरोखरच विरळा ! त्यांचा उत्तम गौरवर्ण, त्यांचे पाणीदार डोळे, नित्य देहदंडनाने खूप कमावलेले त्यांचे सुदृढ शरीर, व त्यांची ती प्रशांत मुद्रा, ही केवळ बाह्य लक्षणे पाहून ते एखादे योगी किंवा साधू असावे असेच कोणासहि वाटे व त्यांची धर्मश्रद्धा व त्यांच्या परोपकारित्वाचा अव्याहत ओघ या गोष्टी लक्षात घेणाराची ती भावना सहजच दृढ होई. आजच्या या प्रवृत्तिमय व व्यवहारकुशल जगात सिद्ध किंवा योगी कोणास

म्हणावे याविषयी वाद माजून राहणे स्वाभाविकच आहे. पण वैराग्य, निर्लोभता व परोपकारबुद्धी यापैकी कोणतेहि एक साधुत्वाचे गमक म्हणून आजहि जर मान्य होण्यासारखे असेल तर अण्णासाहेबांना आजच्या महाराष्ट्रातील एक साधु पुरुष म्हणणाराची यत्किंचितहि चूक नाही हे संसारमग्न व प्रवृत्तिप्रिय मनुष्यासहि कबूल करावेच लागेल. पण आजच्या काळापेक्षा कदाचित ऐतिहासिक काळच त्याच्या कृतीस व गुणास एकंदरीने अधिक अनुकूल असा झाला असता. हिंदुस्थान हे इंग्लंड असते तर रानडे ग्लॅडस्टन होऊ शकते हे म्हणणे जितके खरे आहे, तितकेच पुणे हे जुन्या काळचे पॅरिस असते तर अण्णासाहेब पटवर्धन हेहि कार्डिनल रिचलियो होऊ शकते; किंवा पुणे हे जर जुने विजयनगर असते तर अण्णासाहेब पटवर्धन हेहि विद्यारण्य किंवा माधवाचार्य होऊ शकले असते हेहि खरे आहे. विद्या, वैराग्य व यशस्वी राजकारणाच्या द्वारे साधणारे समाजहित या तिहींचा मेळ ज्या थोड्या ब्राह्मणव्यक्तींनी पूर्वी घातला, अशामध्ये अण्णासाहेब यांची गणना केल्यास त्यात मुळीच अतिशयोक्ती होणार नाही असे आम्हास वाटते. आधीच वर्तमानकाळ हा चष्म्याशिवाय पाहणाऱ्या मनुष्याप्रमाणे क्षुद्रदृष्टि असतो. मग त्यातच आमच्या हल्ली सारख्या विपरीत राजकीय परिस्थितीची भर पडलेली ! तेव्हा ऐतिहासिक योग्यतेचा मनुष्य आमच्यात आज निपजला तरी तो आम्हाला दिसणार कसा ? पण सहृदयतेने पाहू जाणारास राष्ट्रीय खाणीच्या तळास दडून बसलेलीहि रत्ने तळहातावर घेतल्या-सारखी स्वच्छ दिसू शकतात. पाहणाराच्या अंगी तितकी सहृदयता मात्र पाहिजे !

( केसरी ता. ६ फेब्रुवारी १९१७ )

● ○ ●

# बाबू सुभाषचंद्र बोस

❧ ❧ ❧

सुभाष बोस यांस–

सुभाष–होय, एवढाच शब्द पुरे! तुम्हांला हाक मारून बोलायला हे साधे संबोधनच पुरे! ' प्रिय ' हे विशेषण लावावे तर ते इतके दिखाऊ, कोडगे व औपचारिक होऊन बसले आहे की, मनातून शिव्या देत असताहि इंग्रजी पत्रव्यवहार करणारा ते खुशाल लावतो. उद्या म. गांधी तुम्हांला पत्र लिहावयास बसले तरी ते ' डिअर = प्रिय ' हा शब्द तुम्हांला खास लावतील! बरे, प्रेम व्यक्त करायला ' प्रिय ' हे विशेषण लावलेच पाहिजे असे नाही. तुम्हांला ' बाबू ' म्हणावे तर तुम्ही केवळ बंगाली भावनेचे नाही. आणि तुम्ही महाराष्ट्राशी समरस होऊ शकता तरी तुम्हांला राव किंवा पंत हे उपपद लावणे कानाला कसेसेच लागेल. ' महाशय ' म्हणावे तर तो शब्द कोणी कोणी विनोदार्थीहि घेतात! खऱ्या देशभक्ताला देशभक्त म्हटलेले आवडत नाही. त्याला वाटते की, आपल्या देशसेवेच्या मानाने हा भारी वजनाचा शब्द आपल्याला लावून व्यर्थ खर्ची घातला जातो. महात्मा म्हणावे तर ' द्वितीयगामी

नहि शब्द एष नः' असे म्हणून गुरकावतील असे अंध सांप्रदायिक या देशात बोकाळले आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करता तुम्हाला नुसत्या सुभाष या नावानेच हाक मारावी हे बरे. त्या नावात तरी काय कमी आहे? ते नुसतेहि कानाला गोड लागते. पूर्वी तुमच्याशी प्रत्यक्ष बोलण्याचे प्रसंग मला आले, त्यात तुमचे विनयशील स्तिमित सुभाषित्व माझ्या मनाला पटले होतेच. म्हणून त्या साध्या नावाने हाक मारून तुमच्याशी हे दोन शब्द बोलतो.

तुम्ही अद्यापि जिवंत आहा की मृत्यू पावला याविषयी लोकात वाद चालू आहे. तुम्हाला तोंडच्या शब्दाने मारणारे मारीत आहेत, व जिवंत ठेवणारे जिवंत ठेवीत आहेत, हे पाहून तुम्हाला किंवा तुमच्या आत्म्याला मौज वाटत असावी. पानिपतचे वीर भाऊसाहेब पेशवे यांच्यासंबंधाने पुष्कळ दिवस अशीच उलटसुलट चर्चा चालली होती. तशीच आज तुमच्याविषयी चालू आहे. यात एकच गोष्ट बरी वाटते ती ही की, होय–नाही, आशा–निराशा, संभव–असंभव यांच्या दोल्यावर बारा वर्षे झोके खात राहिल्यामुळे जिवाची दुर्दशा, विटंबना व छळणूक झालेल्या पार्वतीबाईसारखी पत्नी तुमच्यामागे उरलेली नाही. बरे, पार्वतीबाईसारखी साध्वी मागे न राहता, भावल संन्यासी प्रकरणातल्या रमेशच्या पत्नीसारखी दुर्बळ मनाची, कुलटा पत्नी तुम्हाला लाभून मागे राहती, तर तुम्ही जिवंत असताहि तुम्हाला तोतया ठरवून पुनर्विवाह करून ती तुमची विटंबना करती! तुम्ही ब्रह्मचर्य स्वीकारून सर्व आयुष्य व जीवन स्वदेशाच्या चरणी वाहिले यामुळे ही आपत्ति टळली दृष्टीने पाहता धाडसी देशभक्ताने अविवाहित राहणेच बरे असे वाटते. तसे म्हटले तर निष्ठावंत ब्रह्मचारी हा लग्न न केल्यामुळे केवळ एकलकोंडा जन्म काढतो असे नाही. कारण, संन्याशाला–ब्रह्मचाऱ्याला हा घरचा नाही तर तो दुसरा सार्वजनिक संसार असतोच. ब्रह्मचाऱ्यालाहि मुले होतात, मात्र त्या मुली असतात! कारण त्या संस्थारूपाने निर्माण होतात. मी पोतदारांना म्हणत असतो की, भारत इ. स. मंडळ–संस्था ही तुमची मुलगी आहे. तशीच सुभाष! तुम्ही परदेशात निर्माण केलेली 'राष्ट्रीय सेना' ही तुमची कन्याच नव्हे का?

तुम्ही खरोखर मृत्यू पावला असला तरी मी दुःखी होणार नाही. कारण, मृत्यूच्या मुक्कामाला हजार वाटा आहेत अशी म्हण आहे. आणि तुम्हाला यापैकी जी वाट भेटली असे लोक सांगतात ती तुम्ही अंगीकारलेल्या धाडसी महत्कृत्याला शोभेशीच आहे. वीरासारखे इतर कोणाला मरण शोभत नाही. ज्याने सेना निर्माण केली त्याला वीर हे नाव यथार्थतेने लावता येते. पण तुम्ही सेना नुसती निर्माण केली असे नाही; तर हातात तरवार घेऊन तिच्या अग्रभागी राहून तिचे नेतृत्व केले. हिंदुस्थान ब्रिटिशांकडून जिंकला जाण्यापूर्वी किंवा त्यानंतरहि हिंदभूमीत वीर निपजले नाहीत असे

गौ. म.....८

नाही. पहिल्या प्रकारच्या वीरानी इतिहासात आपली कीर्ती उज्ज्वलाक्षरानी लिहून ठेवलीच आहे. आणि त्या वीराविषयी आपलेपणा वाटतो. इंग्रजानी हिंदुस्थान जिंकल्यावरहि या देशात वीर निपजले, पण त्यानी इंग्रजांची नोकरी पत्करून जी वीरवृत्ति गाजविली ती स्वदेशाला उपकारक न होता त्याच्या पायातल्या दास्यशृंखला घट्ट करण्याचा अपकारच तिने केला. पण तुमच्या राष्ट्रीय सैन्यात ज्यानी वीरवृत्ति प्रकट केली त्यानी मात्र इंग्रजांपूर्वीच्या हिंदी वीरवृत्तीशी आपला नवा धागा जोडला; आणि हे सिद्ध केले की, हिंदभूमीतून शिपाईगिरी व सरदारी अजून—म्हणजे ब्रिटिश राज्यकर्त्यांनी दीडशें वर्षे खच्ची केली तरी—ती नामशेष झाली नाही. वसंतऋतु आला की पर्वत जसा तांबड्या पळसाच्या फुलांनी बहरून जातो त्याप्रमाणे देशभक्तीने लढण्याचा प्रसंग आला असता ते सगळे क्षात्रवृत्तीचे गुण पुन्हा जागृत होऊ शकतात. इंग्रजांनी हिंदी लोकांच्या हातून हजारो तरवारी काढून घेतल्या त्या सर्वांची भरपाई तुमच्या कमरेला स्वातंत्र्यसंग्रामासाठी लटकविलेल्या एका तरवारीने झाली !

पण तुम्ही जिवंत आहा की गमावला या वादात 'तुम्ही जिवंत आहा, मरण पावला नाही,' असे मानणारा मी आहे. हिटलर–मुसोलिनी मेले असतील, पण रूझवेल्ट–चर्चिल जिवंत राहिलेच की नाही ? मग तुम्हालाहि जिवंत असण्याला काय हरकत ? रूझवेल्ट–चर्चिल हे मुत्सद्दीच काय, पण आयसेनहोवर, मॉंटगोमेरी, मॅकार्थर हे रणवीर जिवंत आहेतच की नाही ? हिटलर–मुसोलिनी मेले हेच एका अर्थाने बरे झाले. नाही तर रोम–बर्लिन, पॉट्सडम, येथील ऐश्वर्यसंपन्न इमारतींत गुरखे शिपाई परेड करीत असलेले त्यांना पाहावे लागले असते ! पण तुमचे तसे नव्हते. तुमच्या स्वतःच्या सेनेचे विसर्जन करावे लागले तरी हिंदुस्थानवर जपानी आक्रमणाचे संकट टळले ! न जाणो विजयी जपानने पुढे तुमच्याशी कसे वर्तन ठेवले असते ! आणि तुमचे सेनापतित्व संपले तरी या युद्धाच्या शेवटच्या घटनेतून हिंदुस्थान स्वातंत्र्याच्या मार्गाला लागला. आणि तो त्या मार्गाच्या शेवटाला पोचलेला पाहावयाला तुम्ही अवश्य जगले पाहिजे. म्हणजे तुमचे धाडस, कर्तृत्व व परिश्रम यांचे पारितोषिक तुम्हाला मिळेल. तुमचा जन्मभरचा उद्योग पाहिला म्हणजे तुम्ही बसलेले विमान कोठे तरी चट्दिशी आपटून फुटावे आणि तुमचा अंत व्हावा हा मनाला ईश्वराघरी अन्याय वाटतो; म्हणून हल्ली तारांतून वार्ताहर लोक काही काही बातम्या पाठवू लागले आहेत त्या वाचून आनंद होतो. 'सुभाष जिवंत आहेत ! ते हिंदुस्थानच्या मार्गाला लागले आहेत ! प्रवासी तिबेट यात्रेकरूंच्या मेळयात ते राहिले असून त्या मेळयाबरोबर त्यांनी हिंदुस्थानात प्रवेश केला आहे !' हे सर्व वाचून मनाला किती आनंद होतो म्हणून सांगू !

सुभाष ! तुम्हाला ईश्वराने दीर्घयुषी करावे ! पण एक गोष्ट तुम्हाला सुचवावीशी वाटते. आणि ती चमत्कारिक वाटली तरी सुचविण्याचे धाडस मी करतोच.

ती ही की, तुम्ही हिंदुस्थानात परत येऊ नका ! परदेशात राहूनच करता येईल ते कार्य करा. याविषयी माझी कारणे अशी : तुम्ही हिंदुस्थानातून बाहेर जाऊन जी अपूर्व कामगिरी केली आहे तिने तुम्हाला एक प्रकारे विभूतिमत्त्व प्राप्त झाले आहे. पण विभूतिमत्त्व म्हणजे ते असे असते व असावे की, ग्राउंड ग्लास ( घासलेली काच )-मधून प्रकाश दिसतो, पण ज्योत दिसत नाही, असे एक प्रकारचे तेजाचे चमत्कारिक ऐश्वर्य विभूतीच्या भोवती निर्माण व्हावे; आणि तुम्ही हिंदुस्थानात येऊन प्रत्यक्ष व्यवहारात वावरू लागल्यास हे अभेद्य तेजोवलय तुमच्याभोवती राहणार नाही. तुम्ही इकडे आलात तर प्रथम एवढ्या जंगी लोकसमुदायाच्या सभा भरतील की, त्यात शे–पन्नास लोक चुरडून जातील. लाऊड–स्पीकर अपुरे पडतील. वर्तमानपत्रांचे रकाने भरतील. पोलिसांच्या कामाचे तास वाढतील. आणि गर्दी–दंगे मोडण्याकरिता काही सरकारी दारूगोळाहि खर्ची पडेल !

प्रथम काही वेळ हे सर्व होईल. पण तुम्ही पुढे काय कराल हा प्रश्न सहजच मनात येतो. तुम्ही आपणाला फॉरवर्ड ब्लॉक पक्ष स्वतंत्र निशाणाखाली उभा करून काँग्रेसच्याहि पुढे जाऊन स्वातंत्र्याच्या मागणीत किंवा प्रत्यक्ष चळवळीत एखादी मजल माराल ? की काँग्रेसमध्येच समाविष्ट व्हाल व बुडून जाल ? पैकी पहिली गोष्ट केल्यास तिने आज काँग्रेस जे प्रत्यक्ष कार्य करीत आहे त्यात थोडासा अडथळा येण्याचा संभव आहे. वास्तविक आयर्लंड व इजिप्त यांचे उदाहरण घेतले तर एका पक्षाच्या पुढाऱ्याने इंग्रजांशी समझौता करून राज्यशकट चालविला असता त्यासमोर त्याच वेळी त्याला प्रतिस्पर्धी अधिक जहाल, अधिक पुरोगामी, असा दुसरा एक पक्ष केव्हाहि असतो. आणि देशाचे पाऊल पुढे पडण्याला कदाचित त्याची थोडीबहुत मदत होते असे म्हणता व दाखविताहि येऊ शकेल. परंतु आज हिंदुस्थानात पक्षोपपक्षांची गर्दी झाली असून, कोणत्याहि लहानशा मतभेदाचा फायदा करून घेण्याला विलायतेतील मुत्सद्दी टपून बसलेले आहेत. हे लक्षात घेता, काँग्रेसला तूर्त एकतंत्री धोरण पुरे करण्याची संधी मिळावी, मग काँग्रेसनेहि इतर पक्ष हळूहळू आपणात सामील करून घ्यावे, आणि संयुक्त पक्षघटनेने मुस्लिम लीगच्या पाकिस्तानी चळवळीला विरोध करीत करीत राज्यघटनेचा रिपोर्ट व इंग्लंडशी स्वातंत्र्याचा तह या गोष्टी शक्य तितक्या लवकर हस्तगत व्हाव्या हे एका परीने इष्ट वाटते. तुम्ही हिंदुस्थानात आल्याबरोबर तुम्हाला प्रेमालिंगन देऊन एकदम ‘ काँग्रेसचे अध्यक्षस्थान घ्या ’ म्हणून गांधींनी निमंत्रण द्यावे, किंवा हंगामी सरकारातील संरक्षणमंत्र्याच्या जागेवर एकदम तुमची नेमणूक व्हावी, या दोहोंपैकी एखादे तरी होईल अशी खात्री वाटेल तर तुम्ही हिंदुस्थानला परत यावे असे मी म्हणेन. पण तसे न झाले तर तुम्ही काय कराल ? तुम्हाला स्वतंत्र सेना उभारता येणार नाही, काँग्रेस कमिट्यातील निवडणुकी यशस्वी करता येणार नाहीत, आणि

कॉंग्रेसशी नुसत्या झगड्याचा देखावा मात्र होत राहील. बरे, यापैकी काही न होता तुम्ही विझलेल्या निखाऱ्याप्रमाणे राहिला तर त्यात तरी काय शोभा? अशा विझलेल्या निखाऱ्यांची उदाहरणे आजहि काही डोळ्यापुढे आहेतच. आणि ते स्वाभाविकहि आहे.

तुमच्या आझाद फौजेचे अधिकारी सरकारने पकडून इकडे आणले व यांच्यावर खटला भरला तेव्हा त्यातून ते सुरक्षित बाहेर पडले त्याक्षणी त्यांच्यावर पुष्पवृष्टी झाली. त्यांजकडे पाहून अनेकांचे डोळे दिपले. त्यांच्या मिरवणुकी निघून यांनी मोठमोठी भाषणेहि केली. पण पुढे काय? त्यांच्या जुन्या मार्गाने त्यांना काहीच करिता येत नाही. आणि त्यांचा जो मोठेपणा मनाला भासला त्याला साजेसे नवे काम त्यांना चालू व्यवस्थेत कोठे मिळाले नाही. यामुळे सामान्य माणसाप्रमाणे त्यांनी दारोदार हिंडावे, किंवा साध्या गण्या-गणप्याप्रमाणे काही तरी करीत बसावे, असे पाहिले म्हणजे उदात्त भावना तोंडघशी पडल्याशिवाय कशी राहील? तसेच कॅप्टन लक्ष्मीने तिकडे काय पराक्रम केला असेल तो असो, पण परवा तिच्या नवऱ्याने तिच्याविरुद्ध घटस्फोट मिळविला ही बातमी ऐकल्याबरोबर तिच्या विभूतिमत्त्वाचा पारा लोकांच्या मनातून किती अंश खाली उतरला हे लक्षात आल्याशिवाय कसे राहील? एका म्यानात दोन सुऱ्या मावत नाहीत. त्याप्रमाणे तुम्ही व जवाहरलाल नेहरू आज एकाच कार्यक्षेत्रात चौरस बसू शकणार नाही असे उघड दिसते. कारण, स्वभावाच्या लकबी असतातच. पक्षनिष्ठाहि आडवी येते. आणि मी असेहि म्हणण्याचे धाडस करतो की, तुमच्याशी वागताना गांधीजींनी जी खुनशी वृत्ती पूर्वी दाखविली तीच आज दाखवून आपल्या महात्म्याला डाग लावण्यासहि ते मागे घेणार नाहीत. अर्थात तुम्ही व गांधी यांचा झगडा सुरू झाल्यास काय होईल हे लोकांना दिसत आहे.

तात्पर्य, एकेका अवताराचे एकेकच अवतारी कृत्य असते आणि ते घडून आले म्हणजे फिरून तेच कार्य करण्याला त्याला अवसर नसल्यामुळे, अवतारसमाप्ति हाच त्याचा स्वाभाविक शेवट ठरतो. श्रीकृष्णाचा शेवट कसा झाला हे वाचले म्हणजे वाईट वाटते. वामनाने बळीला पाताळात दडपले पण स्वतः त्याचे काय झाले? रामाचे पूर्व-चरित्र व उत्तर-चरित्र यांची तुलना केली तर त्यातले लोकांना कोणते आवडते? व त्याचे खरे अवतारकृत्य त्यापैकी कशात दिसून येते? पुराण वाचणारे लोक प्रायः राम-कृष्णचरित्रांचे शेवटचे अध्याय कधी वाचीतच नाहीत म्हणून बरे! सुदैवाने तुम्ही प्रथमपासूनच देशभक्तीबरोबरच वैराग्यवृत्ति स्वीकारली. यामुळे तुम्ही लग्न केले नाही, तुम्हाला संतति नाही. तुमचे जनक-जननी आज जिवंत नाहीत. अशा रीतीने सामाजिक व सांसारिक पाशांतून तुम्ही मुक्तच आहा. मग इकडे येऊन निकट-वर्ती अशा कोणाच्या सहवास सुखाचा आनंद भोगणार? आणि जिवात जीव असेपर्यंत तुम्ही जी हिंद-राष्ट्रसेवा करणार ती परदेशात राहूनच तुम्हाला इकडच्यापेक्षा अधिक

करता येणार नाही काय ? मला वाटते, काँग्रेस सरकाराने तुम्हांला कायमचे बिन-सरकारी परराष्ट्रीय वकील नेमावे. तुम्ही जसे पूर्वी हिटलर-मुसोलिनी-टोजो यांच्या मुलाखती घेत होता, तशाच आज स्टालिन-ट्रूमन चँगकैशेक यांच्या दरबारी जाऊन भेटी घ्याव्या. हिंदुस्थानचे गाऱ्हाणे त्यांना जाऊन सांगावे. परदेशातून कुमक करावी. हिंदी लोकांच्या प्रत्यक्ष दृष्टीला न पडता परस्पर जे बाहेर राहून करता येईल ते करावे. अशानेच तुमचे विभूतिमत्त्व कायम राहील. आमच्या पुराणातून वर्णन केलेले चिरंजीव आत्मे आहेत—अश्वत्थामा, बलि, व्यास, हनुमान, बिभीषण इत्यादि. ते आहेत, पण दिसत नाहीत यातच काय ते खरे स्वारस्य आहे. कारण, आज व्यास प्रत्यक्ष आला तर त्याच्याजोगा आश्रम कोठून आणावा ? आणि तो आजच्या भारताचे काय महाभारत लिहील ? आणि अश्वत्थामा जर डोक्यातील जखम भरण्याकरिता तेल मागायाला आला तर आम्ही कोणी ' कंट्रोल असल्यामुळे घरात खोबरेल तेल नाही ' म्हणून त्याला सांगू. एकूण काय, तुम्ही—सुभाष—जिवंत असा, चिरंजीव व्हा ! तुमच्या पराक्रमाच्या वार्ता आमच्या कानी येवोत. पण तुम्ही मूर्तिमंत हिंदुस्थानात येऊ नका, असे सांगण्याचे मी धाडस करतो. इटली स्वतंत्र करून रोम शहर राजाच्या स्वाधीन करणारा ग्यारीबाल्डी हा रोममध्ये घर करून राहिला नाही किंवा परत रोमलाहि कधी गेला नाही असे म्हणतात. रोमन योद्धा सिन्सिनेटस् याने युद्ध जिंकून स्वदेशाला चिंतामुक्त केल्यानंतर तो अज्ञात स्थळी शेतकरी म्हणून राहून जमीन नांगरीत बसला. अशाच रीतीने पराक्रमी माणसे स्वतःला नामशेष करून घेतात !

( वाङ्मयशोभा—नोव्हेंबर १९४६ )

• • •

## दे. विनायकराव सावरकर

श्री. विनायकराव सावरकर यांचे चरित्र त्यांच्या हयातीत लिहिले जाईल असे मला वाटले नव्हते. परंतु ते लिहून आज छापलेहि जात आहे. इतकेच नव्हे तर त्याची प्रस्तावना लिहिण्याविषयी मला विनंती करण्यात येत आहे हे मी आश्चर्यातले आश्चर्य मानतो. चरित्रकारांनी देऊ केलेला हा मान नाकारणे हे मला जड का वाटले, व दुसरेपक्षी प्रस्तावना लिहिणे हेहि जड का वाटते, याची कारणे मी सांगत बसत नाही. सावरकरांची व माझी काही काही मते न जुळण्यासारखी त्यांची व माझी मनोरचना आहे, हे मला माहीत आहे. पण ती जुळतात वा न जुळतात हे संभाषणात पडताळून पाहण्यासारखा त्यांचा माझा प्रत्यक्ष संबंध ते तुरुंगातून सुटण्यापूर्वी कधीच आला नव्हता. माझी आठवण बरोबर असेल तर मला असे वाटते की, १९०७ साली सार्वजनिक सभेत भरलेल्या ज्या एका जाहीर सभेचा मी अध्यक्ष होतो, त्या सभेत सावरकर हे एक वक्ते होते; व सभेतून परत जाताना त्यांच्या तेजस्वी वक्तृत्वाची वाखाणणी मी मनात करीत असता, परदेशी कपड्याची होळी करण्यासारख्या कृत्याविरुद्ध मी बोललो याबद्दल ते मला मनातून नावे ठेवीत परत जात असावे. सावरकर व मी यांचे प्रत्यक्ष भाषण असे सर्व जन्मात ते परवा तुरुंगातून सुटून रत्नागिरीस

जात असता मुद्दाम मला भेटण्याकरिता माझे घरी आले त्या वेळीच प्रथम झाले; व हे सावरकर असे त्यांना मी आजपर्यंत प्रत्यक्ष दुसऱ्यांदा याच वेळी पाहिले !

पण सावरकरांशी माझे पूर्वी प्रत्यक्ष भेटणे झाले नसले तरी त्यांची कीर्ति मी ऐकलीच होती; व त्यांची माझी मते जुळणारी नसली तरी त्यांच्या धाडसी बाणेदार स्वभावाचे कौतुक करणारांपैकीच मीहि एक होतो. त्यांच्या देशभक्तीचा थाट आयरिश देशभक्तांच्या देशभक्तीसारखा होता. स्वतः मी आयर्लंडचा इतिहास लिहिलेला आहे. व दूरच्या आयरिश देशभक्तांचे जर आम्ही कौतुक करितो तर जवळच्या व आपल्याच समाजात उत्पन्न झालेल्या अशा देशभक्तांचे कौतुक आम्ही न करणे हा गुन्हा होय असे मी पूर्वी मानीत होतो व आजहि मानतो. कै. गोखले यांना सावरकरांचा बिनसनदशीरपणाचा जुना मार्ग शंभर टक्के नापसंत होता हे सांगावयास नकोच. परंतु सावरकरांच्या इतर गुणांबद्दल गोखले यांनीहि स्वतः मजजवळ अनेक वेळा प्रशंसापर उद्गार काढल्याचे मला पक्के स्मरते. असो; आमचा स्वभावभेद कायमचा असला, व त्यामुळे साधनाविषयी त्यांचा व माझा पूर्वी मतभेद असला तरी आता तो उरलेला नाही. आणि पूर्वीचे त्यांच्याविषयीचे माझे कौतुक मात्र तसेच शिल्लक आहे. म्हणूनच ही प्रस्तावना लिहिण्याचे मी कबूल केले.

श्री. सावरकर यांच्या पूर्व-चरित्रावर त्यांनीच आपल्या अलीकडील जाणत्या उद्गारांनी पडदा टाकला असल्यामुळे, या पूर्व चरित्रास आता पदार्थसंग्रहालयातील काचेच्या कपाटातील वस्तूचे स्वरूप प्राप्त झाले आहे. प्रत्यक्ष व वर्तमान यांच्याशी संबंध न येणाऱ्या हकीकतीकडे कोणीहि निर्विकार मनाने पाहू व बोलू शकतो. पण ही मनःस्थिती अशी केवळ इतरांचीच असते असे नाही, तर स्वतः ज्याची त्याचीहि असू शकते. मोठ्या मनुष्याला त्याच्या लहानपणाच्या खोडकर स्थितीतला एखादा फोटो दाखविला तर त्याविषयी त्याची जी भावना होईल तीच सावरकर यांची त्यांच्या पूर्वचरित्रासंबंधाने असेल. समकालीन तरुण पिढीला त्यांचा देशभक्तीभरित खोडकरपणा सर्वस्वी अनुकरणीय नसला तरी स्पृहणीय वाटला खास !

पर्वताच्या माथ्यावर अशा जागा असतात की त्यावर पडलेले पावसाचे पाणी जर पूर्व समुद्राला जाऊन मिळते, तर जवळच एका बोटाच्या अंतरावर पडलेले पाणी पश्चिम समुद्राला जाऊन मिळते. मनुष्याच्या उन्नत भावनांचाहि असाच प्रकार असतो; देशभक्तीची उत्कटता तीच असता, स्वभावभेदामुळे काही देशभक्त सद्यःपरिणामी क्रांतिकारक मार्गाला लागतात. तर दुसरे सनदशीरपणाचा कंटाळवाणा मार्ग चोखाळीत जन्मभर अंतःकरण पिचवीत असतात. अर्थात दोघांचीहि निष्ठा एकच पण मार्ग मात्र वेगवेगळे असल्याकारणाने त्यात अनुभवहि वेगळे; व प्रत्येकाला वेगवेगळ्या प्रकारच्या कीर्तीचे फळ मिळते. पण त्यातल्या त्यात सावरकरांना मात्र दोन्ही मार्गांचा अनुभव व

दोनहि प्रकारची फळे लाभण्याचा संभव दिसतो. पहिला म्हणजे क्रांतिकारक मार्ग त्याचा चोखाळून संपला व हिंदुस्थानला स्वराज्याची घटना मिळाल्यामुळे यापुढे बंडाला अवसर उरत नाही हे उद्गार काढल्यापासून त्यांच्या दुसऱ्या मार्गाचे आक्रमण सुरू झाले. त्यांच्या एका जवळच्या मित्राने मला नुकतेच असे निक्षून सांगितले की, प्रतियोगी सहकारितेच्या धोरणावर सावरकरांचा पूर्ण विश्वास आहे आणि दैवालाहि घटना करणेच असेल तर तुरुंगवासामुळे त्यांना जडलेली अपात्रता ( Disqualification ) धुऊन निघून, पुढेमागे प्रांतिक कौन्सिलात शिरून, मुंबई इलाख्याला प्रांतिक स्वातंत्र्य मिळाल्यावर ते प्रधानहि होतील ! विलायतेतली उदाहरणे घेतली असता लँडलीगच्या चळवळीत तुरुंगवास भोगलेले आयरिश देशभक्त टिमथी हेली हे नव्या आयरिश स्वराज्यात गव्हर्नर झाले. मजूर पक्षाच्या पहिल्या चळवळीत कैद भोगलेले व खडी फोडलेले जॉन बर्नस हे इंग्लंडच्या प्रधानमंडळात प्रधानपद पावले. आणि एकोणिसाव्या शतकाच्या मध्यभागी बंडखोरीच्या चळवळीत फाशीची शिक्षा दिली गेलेले सर चार्लस गॅव्हन डफी हे आस्ट्रेलियात मुख्य प्रधान झाले. ' पुरुषस्य भाग्यं ' ही म्हण प्रसिद्धच आहे. गॅरीबाल्डीला फाशीची शिक्षा झाली असता कालांतराने सिसिली बेट जिंकून राजास अर्पण करण्याचा मान त्याला मिळाला; आणि जो गॅरिबॉल्डी पूर्वी फासावर चढावयाचा तो पुढे इटलीचा उद्धारकर्ता म्हणून स्वराज्यविषयक मिरवणुकीत एकाच गाडीत राजाच्या डाव्या हातास बसून मिरवतो हे पाहणाराला पुढे काय वाटले असेल ? विलियम ओब्रायन या आयरिश पुढाऱ्यानेहि अशा स्थित्यंतराला अनुलक्षून आपल्या ' आयरिश आयडियाज ' या पुस्तकात खालील अनुभव लिहिला आहे.

The ingenuity which had formerly to be employed to shake of the nightmare in the dark gray coats and rifles has now only to be applied to the more innocent, if more difficult, task of evading " the little addresses " and the " few words " with which popular hospitality will insist upon enlivening the road.

उलटे सुलटे खेळ करणे ही दैवाची लीला सुप्रसिद्धच आहे. दादाभाई नौरोजी यांनी वयाच्या ऐंशीच्या वर्षी ' मी तरुण असतो तर बंड केले असते ' असे उद्गार कलकत्यास काढले. विनायकराव सावरकरांना बंडखोरीचा अनुभव घेऊन प्रतियोगी सहकारितेचा गौरव करण्याचा प्रसंग पसतिशीच्या सुमारासच आला.

तथापि अद्भुत रम्यत्वाच्या दृष्टीने पाहता सावरकर हे उद्या प्रधान झाले तरी त्यापेक्षा त्यांनी विलायतेहून परत येताना जो पराक्रम केला तोच भावी तरुण पिढीच्या दृष्टीने अधिक सरस वठेल यात शंका नाही. प्रधान पुष्कळ होतात; पण जिवावर उदार होऊन पराक्रम करण्याचा प्रसंग थोड्यांना येतो; व आला तरी तो साधणारे त्याहूनहि

थोडे असतात. युद्धानंतर लीग ऑफ नेशनच्या दरबारात हिंदुस्थानला आम्ही जागा दिली अशी बढाई सरकार मारते. पण जहाजाच्या पोर्ट होलमधून समुद्रात उडी टाकून, " बोला हो, बोला हो, बोला हो, सर्व सभ्य बोला हो " असा सवाल जगातील सर्व राष्ट्रांना करून विनायकराव सावरकरांनीच ते स्थान हिंदुस्थानाला महायुद्धाच्या आधी पाच वर्षे मिळवून दिले होतें !

असो. सावरकर सुटून आले आहेत व त्यांना थोडीशी स्वतंत्रताहि लाभली आहे. परंतु त्यांच्या अज्ञातवासाची अजून चार-साडेचार वर्षे जावयाची आहेत. तेव्हा हेहि दिवस लौकर निघून जावोत व तुरुंगवासात घालविली तितकी वर्षे तरी त्यांना या नव्या मार्गाने देशाची सेवा करण्याला मिळोत अशी आशा प्रदर्शित करून ही प्रस्तावना पुरी करितो.

( रानडेकृत सावरकर-चरित्र–प्रस्तावना–१९२४ )

• • •

[ २ ]

## मृत्युंजय सावरकर

विनायकराव सावरकर यांचे वयाला साठ वर्षे पुरी झाली याबद्दल त्यांचे अभिनंदन महाराष्ट्रातील व भारतातील सर्व देशप्रेमी नागरिक करीतच आहेत. मीहि हर्षभराने त्यांच्यात सामील होतो. सावरकरांचे चरित्र ' असाधारण, असामान्य, अलौकिक, लोकविलक्षण, अद्‌भुत ' ही विशेषणे त्याला यौगिक अर्थाने लावण्याला अनेक दृष्टींनी योग्य आहे. सावरकरांना ' देशभक्त ', ' स्वातंत्र्यवीर ' ही विशेषणे जपून लावली, तर खचित शोभण्यासारखी आहेत. मला स्वतःलाहि ती मान्य आहेत. पण ती आडनावासारखी उठल्यासुटल्या लावणे मात्र मला पसंत नाही. एखाद्याने प्रसंगविशेषी शालजोडी किंवा जरीकाठी वस्त्र वापरले तरच त्याची शोभा किंवा त्याचे महत्त्व. पण रोज वापरून त्याचा बोळा केला तर ते महावस्त्र नव्हे. मीहि या प्रस्तावनेत, सावरकरांच्या चरित्रातल्या काही गोष्टींचा प्रथम उल्लेख करून त्या लोकांना पटवू

शकलो, तरच मी त्यांना लावलेली उज्ज्वल विशेषणे सार्थ ठरतील. म्हणून मी तीं विशेषणे या लेखाच्या शेवटपर्यंत राखून ठेवतो !

सामान्य गोष्टींच्या संबंधात सावरकरांचे बालपण, तरुणपण, प्रौढपण ही सर्व इतर चार लोकांसारखीच ठरतात. कारण सावरकर झाले तरी मनुष्यस्वभावाच्या पुष्कळ गोष्टींत सामान्यच आहेत. पण मनुष्याचे सामान्यत्व किंवा असामान्यत्व हे अशा गोष्टींवरून न ठरविता, काही इतर विशेष गोष्टींवरून ठरवावे लागते. अशा गोष्टी थोड्या असतात, पण त्याच महत्त्वाच्या असतात. आणि सावरकरांत अशा असामान्य गोष्टी कोणत्या याचे थोडेसे विवेचन करू.

सावरकरांचे वक्तृत्व, लेखन व काव्य ही सर्वच असामान्य कोटीतील आहेत. आणि काव्यप्रतिमा व देशभक्ति यांचा संगम घडलेली किती तरी सुंदर स्थळे सावरकर-वाङ्मयात दाखविता येतील. मग ते गद्य असो वा पद्य असो. पण तुमच्या मते उत्कृष्ट असे त्यातले एक स्थळ निवडून द्या असे जर कोणी मला म्हटले, तर सावरकरांनी ब्रिस्टल तुरुंगातून आपल्या स्नेह्यांना पाठविलेल्या ‘ शेवटचा रामराम ’ या उद्गारांची शिफारस मी करीनः—

“ मित्रांनो, ईश्वराने आपल्यापैकी प्रत्येकाची भूमिका ठरवून टाकली आहे. आपण प्रत्येकाने आपली भूमिका वठवावी यासाठी आपली तातातूट होत आहे. ईश्वराने नेमून दिलेली भूमिका वठवीत असताना प्रसंगी जळत्या खड्कांना बांधून कोंडून पडावे लागेल. प्रसंगी कीर्तीच्या उसळणाऱ्या लाटांच्या शिखरावर स्वार होता येईल. कधी आपण लोकांना दिसू, तर कधी अदृश्य राहू. कधी आपण अवनत होऊ, तर क्वचित उन्नत होऊ ! जगन्नियंत्याने कोणत्याहि परिस्थितीत ठेवले तरी ती परिस्थिति सर्वोत्तम आहे असे मानून आपण असे समजले पाहिजे की, आपले जीवितकार्य एकाकी पार पाडणे हेच आपल्या वाट्याचे कार्य आहे.

“ एखाद्या उदात्त पौर्वात्य नाटकात भरतवाक्याच्या वेळी नाटकात मेलेली व न मेलेली सर्व पात्रे एकत्र जमतात. आपण सगळे इतिहासाच्या अफाट रंगमंदिरातील असंख्य नटच आहोत. आपल्या कृतीची प्रशंसा करणारे मानवजातिरूपी प्रेक्षक टाळ्या वाजविण्यासाठी आपल्यासमोर बसलेले आहेत. हे प्रेक्षक कृतज्ञ व आनंदी बनून जोरजोराने टाळ्या वाजवतील, तेव्हा त्या टाळ्यांचा गरजणारा आवाज दऱ्याखोऱ्यां-पर्यंत जाऊन दुमदुमेल !

“ प्रेमळ मित्रांनो, तो क्षण येईपर्यंत रामराम !

“ माझा देहपात होऊन माझ्या अस्थि आणि रक्षा कोठे पडतील याचा नेम नाही. अंदमानचे वातावरण आधीच निर्जन व भेसूर आहे. तेथे वाहणाऱ्या नदी-

नाल्याचा उदासवाणा आवाज तेथील मूळच्या निर्जनपणाला अधिकच भेसूर बनवीत असतो. कदाचित माझ्या अस्थि नि रक्षा त्या उदास नदीनाल्याच्या जवळ पडून राहतील. किंवा असेहि घडेल की, मध्यरात्री आपला नियत खेळ आकाशात खेळणाऱ्या तारकांचे प्रतिबिंब पोटात सामावून घेणाऱ्या गंगामातेच्या स्फटिकशुद्ध प्रवाहाच्या शेजारी कोठे तरी माझ्या अस्थि नि रक्षा पडून राहतील ! त्या कोठेहि पडलेल्या असोत ! श्रीरामाने आपल्या आवडत्या लोकांचा पक्ष विजयधवल ठरविला आहे, दुष्टांना माघार घ्यावी लागली आहे, आणि त्यांचा पाय जेथून पुढे पडला तेथवर त्यांना मागे हटविण्यात आले आहे. आपला हा भारतवर्ष वैभवात उभा आहे. मानवजातीचे मार्गदर्शन करणारा दीपस्तंभ म्हणून यापुढे तो तेजस्वितेने तळपत राहील असा पुकारा झाला, आणि " हौतात्म्य गाजविणाऱ्या विचारवीरांनो नि कृतिवीरांनो, तुम्ही ज्या संग्रामात लढलात आणि पडलात तो संग्राम यशस्वी झाला, उठा ! " अशी घोषणा झाली की, त्या वेळी, त्या पडून राहिलेल्या अस्थि आणि ती पडून राहिलेली रक्षा यांच्यात फिरून तेज आणि चैतन्य सळसळू लागेल.

" तोवर, प्रिय मित्रांनो, राम राम ! "

बाळपणीच झालेली काव्यस्फूर्ति व काव्यशक्ति या गोष्टी सावरकरांमध्ये असामान्य कोटीपैकी होत्या असे खचित म्हणता येईल.

सावरकरांची मनोरचना पाहिली तर तीत कवित्व व स्वातंत्र्यवादी देशभक्ति यांची सरमिसळ पूर्णपणे झाली आहे. त्यांच्या देशभक्तीच्या भावनेला चटकन काव्याचे स्वरूप येते, व त्यांच्या काव्यात स्वातंत्र्याची आवड कोठे ना कोठे चमकल्याशिवाय राहत नाही. संकटमय अशा जीवनातहि त्यांनी किती व कशी काव्यरचना केली हे पाहून कौतुक वाटते. रा. मायदेव यांच्या प्रसिद्ध होणाऱ्या ' सावरकर-काव्यसंग्रहा ' त त्यांच्या काव्यबुद्धीचे स्वरूप वाचकांना पाहावयास मिळेलच. पण त्यांना या कामी आलेल्या अडचणींची कल्पना मात्र ती काव्ये वाचून येण्यासारखी नाही. शिवाय या अडचणींमुळे त्यांचे सर्व काव्य उपलब्धहि नाही. तुरुंगवासात लेखनसाहित्य किती मिळणार ? शिवाय त्या साहित्याने लिहिलेल्या कवितांचे काही विषयहि असे राजकीय स्वरूपाचे की, त्या कविता तुरुंगाबाहेर पडण्यास प्रतिबंधच व्हावयाचा ! म्हणून काही काही कविता त्यांना आपल्या आपण पाठ करून संग्रही ठेवाव्या लागल्या, व काही तुरुंगातील इतर कैद्यांकडून पाठ करवून त्यांच्याबरोबर बाहेर धाडाव्या लागल्या ! लेखनसाहित्य भरपूर मिळते, व कविता करण्याला सुचणारे विषय कमी राजकीय स्वरूपाचे असते तर, सावरकरांचे हातून एखाददुसरे ' महाकाव्य ' खचित निर्माण झाले असते. ' लेखण्या मोडून साहित्यकांनी तरवारी हाती घ्याव्या ' अशा तऱ्हेच्या एकांगी दिसणाऱ्या त्यांच्या उद्गारांचे खरे मर्म न समजल्यामुळे त्यांच्यावर कित्येकांनी

आक्षेप घेतले आहेत. पण ते निवळ वावदुकी ठरतात. सावरकरांनी साहित्यिकांना केलेला हा प्रसिद्ध उपदेश केवळ नैमित्तिक स्वरूपाचा होता, नित्याचा नव्हता. स्वतंत्र जीवनाच्या काळी देशभक्तीच्या प्रवासात जिने साहाय्य केले, व पारतंत्र्यातहि जिने जिवाला समाधान मिळवून दिले त्या लेखणीवर बहिष्कार घालण्याइतके ते कृतघ्न नाहीत हे कोणासहि सहज समजण्यासारखे आहे. माझ्या समजुतीप्रमाणे, वरील उपदेश करताना, सावरकरांच्या डोळ्यांपुढे काही ठळक अशी 'वीर-कवीं'ची किंवा 'कविवीरां'ची उदाहरणे असावीत. अशी उदाहरणे युरोपच्या इतिहासात अनेक दाखविता येतील. ग्रीक इतिहासात अनेक नाटककार कवि असेच झाले. गेल्या महायुद्धात युरोपात अशीच काही उदाहरणे घडली. एकच उदाहरण सांगावयाचे तर इटालियन कवि डी. आनन-झिओ याचे असे की, नित्य स्वरूपात तो राष्ट्रीय शाहीर असता व्हर्सायच्या तहात इटलीला फ्यूमचे बंदर दिले नाही, तेव्हा त्याने, पूर्वीच्या गॅरीबाल्डीसारखी, हाती तरवार धरून स्वयंसेवकाचे पथक उभारून, बंदरावर हल्ला करून ते हस्तगत केले! आजच्या युद्धात त्या सैन्यामध्ये शिरणाऱ्या हिंदी तरुणांची स्थिती अशी भूषणास्पद नाही हे खरे. तथापि लेखणी टाकून तरवार घेण्याच्या उपदेशाचे मर्म उघडच होते. लेखणीतून वीररस स्रव-विणे हे तरवारीने रक्तपात करण्यासारखेच आहे. नांगर व तरवार ही त्यांतील पोलादा-मुळे परिवर्तनशील असतात. वावदूक अक्षेपकांनी येवढे तरी ध्यानात ठेवावे की, सावरकरांचा हा उपदेश 'परोपदेशे पंडित्य' असा नव्हता व नाही. त्यांनी काव्यलीले-प्रमाणे शस्त्रलीलाहि रंगविली आहे! म्हणून प्रसंगविशेषी एक, सोडून केवळ दुसरे करावे असा उपदेश करण्याचा हक्क त्यांना सहजच प्राप्त होतो.

उत्कट देशभक्ति आणि स्वातंत्र्याच्या ध्येयाची निर्भय घोषणा करण्याचे धैर्य हा सावरकरांच्या अल्प वयातलाच गुणविशेष ठरतो. तो त्यांच्या कॉलेजातील जीवनापासून दिसून येतो. पण कॉलेज सोडल्यानंतर विलायतेला जाण्याच्या उद्योगापासून त्यांच्यात, व त्यांच्या वयाच्या आणि त्यांच्याचप्रमाणे विलायतेला जाणाऱ्या तरुणात,खरा फरक दिसून येतो. विलायतेला जाऊन आय. सी. एस. ची परीक्षा पास होण्याचे ध्येय डोळ्यापुढे ठेवणाऱ्या, बुद्धिमान तरुणांच्या दोन पिढ्या त्यांच्यापूर्वी होऊन गेल्या होत्या. आपण विलायतेला गेलो तर आय. सी. एस. परीक्षेची तयारी करण्याला लागणारी तीव्र बुद्धिमत्ता आपल्यामध्ये नाही असे सावरकरांनी कधीहि कबूल केले नसते. आणि ते ध्येयच त्यांच्या डोळ्यापुढे असते तर त्यांनी अवश्य ते द्रव्यसाहाय्य मिळविण्याची यशस्वी खटपट केली असती. पण त्यांना सिव्हिल सर्व्हंट होण्याकरिता विलायतेला जावयाचे नव्हते. किंवा केवळ बॅरिस्टरीची परीक्षा देण्याकरिताहि जावयाचे नव्हते. तर तिकडे जाऊन हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या मतप्रसाराचा एक नवा अड्डा किंवा आखाडा हिंदी तरुणांमध्ये निर्माण करावयाचा होता!

१९०५ साली शामजींनी ' इंडियन होमरूल सोसायटी ' ही संस्था काढली होती. आणि त्या सोसायटीच्या काही सभासदांच्या राहण्याजेवण्याच्या व्यवस्थेसाठी ' इंडिया हाउस ' नावाचे बोर्डिंग काढले होते. पण या ' परतंत्र ' संस्थेत प्रवेश केल्यावर, स्वतःचे असे जे उद्योग सावरकरांनी केले तेच त्यांचे खरे वैशिष्ट्य दाखवितात. कारण विलायतेस जाणाऱ्या तरुणांच्या वृत्तीचा ओघ देशकार्याकडे वळविणे ही गोष्ट सोपी नव्हती; पण त्याच गोष्टीत त्यांनी आपले लक्ष घातले. या अवधीत सावरकरांनी विलायतेत काय पाहिले व काय केले याची चांगली कल्पना येण्याला त्यांची ' लंडनची बातमीपत्रे ' हा ग्रंथ फार उपयोगी पडेल. त्यांनी स्वतः केलेल्या गोष्टींप्रमाणेच इतरांनी केलेल्याहि कोणत्या गोष्टीत सहकारिता केली, यावरून त्यांना ध्यास कोणता लागला होता हे कळून येते. विलायतेस जाण्यापूर्वी त्यांनी स्वातंत्र्याच्या ध्येयाचा उच्चार केला होता. परदेशी कपड्यांच्या होळ्या केल्या होत्या. गुप्त मंडळ्या स्थापल्या होत्या. स्वातंत्र्याचे पोवाडे रचले होते. अर्थात हिंदुस्थानच्या कोंदट राजकीय हवेतून निघून ते विलायतेच्या मोकळ्या हवेत गेल्यावर, आणि तेथे अनेक देशांच्या स्वातंत्र्यवादी लोकांचा सहवास त्यांना घडल्यावर, त्यांनी ती पूर्वपरंपरा नुसती चालविली इतकेच नव्हे, तर अधिक पुष्ट व सुदृढ केली यात आश्चर्य नाही.

साम्राज्यसत्तेला प्रतिकार करणे या कल्पनेला स्वातंत्र्यवादी राजकारणातली साक्षरता म्हटले तर, गांधींच्या अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या ' ओनाम्या ' पासून सुरुवात करून सशस्त्र बंडाच्या प्रतिकाराच्या ' क्ष-ज्ञ ' या अक्षरांपर्यंत सर्व साक्षरता सावरकर तोंडाने शिकले व त्यांनी हातांनी गिरविली.

टिळकांनी माधवराव अणे यांच्याशी एकदा जी तात्त्विक चर्चा केली ती येथे लक्षात ठेवण्यासारखी आहे. ते म्हणाले, " परोपकारी वृत्ति ही निरनिराळ्या प्रकृतींच्या मानाने निरनिराळ्या रूपाने प्रकट होत असते. परोपकारी वृत्तीच्या मनुष्याने देशाच्या सांप्रतच्या विपन्नावस्थेचा विचार करावयास सुरुवात केली, तर त्याच्या प्रकृतिमानाने तो तीन मार्गांपैकी एका मार्गाचा स्वीकार करतो. दया, करुणा, श्रद्धा इत्यादि गुण ज्याच्या ठिकाणी निसर्गतः विशेषत्वाने वास करतात, व प्रापंचिक सुखाविषयी जो स्वभावतः उदासीन असतो तो साधुत्वाच्या मार्गास लागतो व देशावरील संकटपरिहारार्थ परमेश्वरी कृपेची याचना करितो. ज्यांच्या स्वभावात मूळचीच तामसी वृत्ति अधिक व क्रोधादिकांचा आविर्भाव विशेष असे जे लोक ते अराजक मार्गाने व अत्याचारी कृतीने आपला कार्यभाग साधण्याच्या उद्योगास लागतात. परंतु ज्यांच्या ठिकाणी सर्वच वृत्ति काही प्रमाणबद्ध अतएव व्यवहारसन्मुख स्थितीत असतात, अशी माणसे सद्यःप्राप्त साधनांनीच प्रस्तुत संकट निवारण्याचा प्रयत्न करतात. या सर्वांचा हेतु एकच असल्यामुळे, या मध्यम मार्गाने जाणाऱ्या माणसावर दोन्ही बाजूंच्या प्रमुख व्यक्तींचा प्रसंगविशेषी रोष होतो ! परंतु कार्याची गति जशी वेगवान होत जाते तशी सर्वांचीच आक्रमण-

कक्षाहि कमी कमी दूर होत जाते, व एक काळ असा येतो की, या तीनहि मार्गांचे लोक मध्यम मार्गाला प्रामुख्य देऊन त्याच्याच आश्रयाने व नेतृत्वाखाली आपापले उद्योग त्या मार्गाला पोषक होतील अशा रीतीने करावयास लागतात." या विवेचनात टिळकांच्या राजकारणातील मार्गांचे व नित्यनैमित्तिक आचरणाचे मर्म आहे असे म्हणण्यास हरकत नाही.–लो. टिळक-चरित्र, खंड ३, भाग ८, पृ. ४६-४७.

टिळकांनी केलेल्या मीमांसेची उदाहरणे प्रत्येक राष्ट्राच्या इतिहासात आढळतात. कारण प्रत्येक पुढाऱ्याला जन्मभर एकाच मार्गाने स्वतः जाता येत नाही, किंवा दुसऱ्याला जाण्याचा उपदेश करता येत नाही. त्याला नित्य व नैमित्तिक हा भेद, हा विवेक करावा लागतो. हे तारतम्य संभाळावे लागते. परंतु नैमित्तिक किंवा प्रासंगिक धोरण ठरविताना त्याच्या मनाची चिलबिल झाल्याशिवाय राहत नाही. म्हणून त्याच्या वर्तनात आज एक सांगितले, उद्या एक सांगितले, किंवा आज एक केले, उद्या एक केले, असा विसंगतीचा सूक्ष्म दोष दाखविता येतो. म्हणून पुढाऱ्या-मुत्सद्द्याच्या धोरणाला जिवंतपणी नक्की विशेषणे लावण्याच्या भरीला न पडणे बरे. एकच विशेषण त्यांना अबाधित रीतीने लावता येण्यासारखे असते ते 'देशभक्त' हे विशेषण. पण हे विशेषण लोकांनी सरसकट मानण्याइतके जेव्हा लागते, तेव्हा त्या व्यक्तीच्या नित्य व नैमित्तिक, तात्त्विक व व्यावहारिक, अशा दीर्घकालीन वर्तनाचा–आचरणाचा विचार करूनच ते लावण्यात येत असते. मात्र सशस्त्र प्रतिकाराच्या बाबतीत, कोणत्याहि देशातील राष्ट्रभक्त पुढारी मुत्सद्दी घेतले तरी, त्यांनी सशस्त्र प्रतिकाराला तात्त्विक विरोध केला नाही, इतकेच नव्हे तर ते धोरण न्यायाचे, ते न्यायनिष्ठ व नीतिनिष्ठ असेच मानले.

सावरकरचरित्र जो वाचील त्याच्या एक गोष्ट लक्षात येईल की, सावरकरांची राजकीय मते आज चाळीस वर्षांच्या दीर्घ काळात स्थिर आहेत. दुसऱ्या बाजूचे, म्हणजे अशा मताच्या चंचलपणाचे, उदाहरण द्यावयाचे तर ते लाला हरदयाळ यांचे देता येईल. दोघेहि देशभक्त, स्वार्थत्यागी, साहसी. तथापि दोघांच्या मनोधारणेत किती फरक! सावरकरांविषयी बोलावयाचे तर असे म्हणता येईल की, त्यांची अंतिम ध्येये अढळ होतीच; पण ती पदरात पाडून घेताना बाजारी व्यवहाराप्रमाणे आणाभर अरतापरता करून मध्यम क्रम स्वीकारण्याचीहि तयारी त्यांना पसंत होती. तसेच राष्ट्र-स्वातंत्र्यार्थ शस्त्रप्रतिकाराच्या अंतिम मार्गाचे समर्थन ते केव्हाहि सारख्याच आग्रहाने करीत असले, तरी 'निष्कारण' व्यक्तिवध त्यांना केव्हाच मान्य नव्हता. अंदमानात बारीसाहेबाशी बोलताना ते म्हणाले, "इंग्रजांच्या कित्येक गुणांचा मी चाहता आहे ··· मी हत्येचा पक्षपाती आहे हे तुम्हाला कोणी सांगितले?"

गेल्या महायुद्धाच्या वेळी (१४ सप्टेंबर १९१४) सावरकरांनी अंदमानाहून हिंदुस्थान सरकारला एक आवेदनपत्र धाडले. त्यात ते म्हणतात–" हिंदुस्थानास

स्वतंत्र राष्ट्राच्या पदवीस पोचविणे हे आमचे ध्येय होते व आहेहि. तथापि या ध्येयाच्या सिद्धीसाठी रक्तपाताचा–सशस्त्र प्रतिकाराचा–मार्गच काय तो अवलंबून करावयाचा अशी काही आम्ही शपथ घेतलेली नाही. इतकेच नव्हे तर इतर कोणताहि उपाय जर सफल होण्याचा संभव असता तर आम्ही सशस्त्र प्रतिकाराचा अवलंब केलाच नसता ! जी गोष्ट साधनाची तीच साध्याची...उभ्या मानवजातीचे राजकीय सात्त्विक एकीकरण हेच ज्याचे अंतिम ध्येय आहे, त्या आम्हास त्या ध्येयाच्या सिद्धीसाठी तदनुकूल असलेल्या सर्व संस्था त्या ध्येयाकडे जाणाऱ्या मार्गावरील टप्पे म्हणून ग्राह्यच वाटतात...आज ज्यास ब्रिटिश साम्राज्य म्हटले जात आहे त्यात अंतर्भूत असणाऱ्या हिंदुस्थानादि देशास जर स्वस्वप्रकृतिप्रमाण आणि तत्तत्परिस्थितिप्रमाण स्वातंत्र्य उपभोगू देण्यात येईल, तर आम्ही त्या साम्राज्याशी एकनिनिष्ठ राहणे हेच आमचे कर्तव्य समजू. अशा रीतीने आयर्लंडपासून हिंदुस्थानापर्यंत सर्व देशास एकसूत्रीपणात गोवण्याचे कार्य करणारे ते साम्राज्य ‘ ब्रिटिश साम्राज्य ’ हे नाव देखील त्याज्यच मानील–इतर नाव प्राप्त होईतो त्यास ‘ आर्य साम्राज्य ’ असे पाहिजे तर म्हणावे.

“ ह्या साम्राज्याच्या प्रस्तुत चालकांच्या अंगात जर तसे सात्त्विक साहस करणारे धैर्य असेल, तर तदंतर्गत असलेल्या हिंदुस्थानच्या विस्तृत आणि प्रमुख राष्ट्रास तरी त्यांनी ते स्वातंत्र्य उपभोगिता येईल असे अधिकार त्वरित देऊन टाकले पाहिजेत. युद्धाच्या धांदलीत इतर काही करता न आले, तरी औपनिवेशिक स्वायत्तता ( कोलोनिअल सेल्फ-गव्हर्मेंट ) जर हिंदुस्थानास देण्यात येईल आणि वरिष्ठ विधिमंडळात हिंदी प्रतिनिधींचे निरपवाद बहुमत स्थापित करण्यात येईल, तर आम्ही व आमच्या मताचे क्रांतिकारक आपला पूर्वीचा सशस्त्र प्रतिकाराचा मार्ग स्थगित करून या युद्धात इंग्लंडचा पक्ष मनःपूर्वक एकनिष्ठेने अवलंबू.

“ आमचे हे विधान मनःपूर्वक आहे की नाही हे सिद्ध करून दाखविण्याची संधी आम्हास देण्यासाठी आणि इंग्लंड खरोखरच हिंदुस्थानाच्या दास्यशृंखला तोडण्याला इच्छित आहे याविषयी हिंदी लोकांच्या मनात विश्वास उत्पन्न करण्यासाठी सरकारने प्रथमतः आम्हा राजबंदिवानांसहि त्वरित मुक्त केले पाहिजे. आम्ही असे वचन देतो की, जर आम्हास या वेळी मुक्त करण्यात येईल तर आम्ही, हिंदुस्थानवर स्वारी करून येण्याची शक्य ती खटपट करणाऱ्या अफगाणतुर्कादिक आशियातील विदेशी मुसलमानी टोळधाडीपासून, स्वदेशाचे संरक्षण करण्यासाठी सैन्यात भरती होऊन हिंदुस्थानाच्या सीमासमरावर किंवा इतर तदनुषंगिक अशा कोणत्याहि रणक्षेत्रात जाण्यास कचरणार नाही. ”

अंदमानाच्या बंदिवासातून सुटका करून घेण्याकरिता सरकाराला लालूच दाखवावी म्हणून हे नेमस्तपणाचे धोरण सावरकरांनी स्वीकारले होते, असे म्हणणाराला

उत्तर हेच की, आज ते पूर्ण स्वतंत्र असताहि आजच्या महायुद्धात वरील धोरणच त्यांनी स्वीकारले आहे; आणि सैन्यभरतीचा उपदेश हिंदी तरुणांना ते करीत आहेत. त्या काळी सावरकर सैन्यभरतीला तयार होते ते शत्रुपक्षात मुसलमान ( तुर्क-अफगाण ) होते म्हणून त्यांच्याशी असणाऱ्या वैरबुद्धीने, असेहि कोणाला म्हणता येणार नाही. कारण आज शत्रुपक्षात सरहद्दीपलीकडची मुसलमान राष्ट्रे नाहीत असे असता ते सैन्यभरतीचा तोच उपदेश करीत आहेत. तसेच त्या उपदेशाचे कारण ते आज इंग्रजांचे विशेष मित्र आहेत असे नव्हे, तर युद्धाच्या निमित्ताने आपल्या हिंदी तरुण देशबांधवांना युद्धकर्माचा, क्षात्रकर्माचा, परिचय होण्याची ती एक संधी आहे, व पुढे कधी काळी प्रसंग गाठी पडलाच, तर या परिचयाचा उपयोग होईल म्हणून ! मला वाटते १९२९ सालापर्यंत राष्ट्रीय सभेने जे ध्येय, सामोपचारार्थ म्हणून सरकाराशी स्वीकारले होते तेच आजहि स्वीकारण्यास सावरकर तयार होतील. कारण कर्जफेडीला हप्तेबंदी होऊ शकते, व कर्जफेडीची सर्व रक्कम ऋणको पदरात रोख घेऊनच आला असता त्याला थोडी सूट देखील मिळू शकते हे सावरकर जाणतात. मात्र ' हे माझ्या परमप्रिय मित्रा व्हाइसरॉया, मी बंड करण्यास निघालो आहे ' असल्या लोचट मित्र-शत्रुत्वाच्या हास्यास्पद मिश्रण चे प्रदर्शन त्यांनी कधी केले नसते !

सशस्त्र प्रतिकार हा राजकारणात तत्त्वतः मान्य असला, तरी त्याचा प्रत्यक्ष प्रयोग किंवा उपयोग सहसा कोणी करीत नाही. याचे कारण हे की, एकट्यादुकट्या राज्यकर्त्या व्यक्तीचा वध करण्याने स्वराज्य हस्तगत होत नाही. आणि ती व्यक्ती स्वतः सात्त्विक, निरपराधी व निरुपद्रवी असली, तर तो वध निंद्यहि वाटतो. बरे, सामुदायिक सशस्त्र बंड करावे, तर त्याला जनतेची आयत्या वेळी एकदम तयारी होत नाही व शस्त्रास्त्रादि साधनेहि मिळत नाहीत. यामुळे सशस्त्र प्रतिकार हा मान्य असणारेहि देशभक्त स्वतः अनुकूल काळाची वाट पाहात बसतात व इतरांनाहि त्यांना तसेच सांगावे लागते. याच्याहि उपर एखाद्या प्रसंगाने, विशेष कारणाने, व्यक्तिवध करून भावनेला पाट फोडणारा एखादा निघतो. किंवा व्यक्तिवध अमान्य पण बंडखोरी मान्य असे असणारे लोक, आपला प्रयत्न यशस्वी होणार नाही अशी जाणीव असताहि, धोका पत्करून, बंडाचा उपक्रम करून, ' करूनच झाले तर होईल ' ' केल्याने होत आहे रे ' या विश्वासाने, ' आपण आपल्यापुरते केले, मग काहीहि होवो, ' अशा विचाराने व कृतीने आपली तळमळ शांत करतात. पण हे अपवाद सोडले, तर बंडाच्या अव्यवहार्यतेची कल्पना पटून केवळ मनात धुमसत राहणारे देशभक्तच पुष्कळ. ' मुहूर्तं ज्वलितं श्रेयः न च धूमायितं चिरं ' असे म्हणून दैवाचे नाव घेऊन हात उचलणारा एखादाच. उलट मोहनदास गांधींसारखा, म्हणजे सशस्त्र प्रतिकाराला पापाच्या सदरात घालणारा, विपरीत देशभक्त एखादाच ! पण सत्य हे मिथ्या तत्त्वज्ञानावर शेवटी सूड घेतल्याशिवाय राहत नाही. आणि गांधींचेहि तसेच

झालें ! कारण टिळकांचे सशस्त्र प्रतिकाराचे तत्त्व हे 'अत्याचारी' असे ठरवून, ते हाणून पाडून, जगांत सात्त्विक अनत्याचारित्वाचे तत्त्व प्रस्थापित करण्याकरिताच आपला अवतार आहे असे मानणारे व प्रतिपादणारे, आणि हिंदुस्थानातील एका टोकाशी घडलेल्या चौरीचुरा येथील दंग्यामुळे दुसऱ्या टोकाशी बारडोली येथील चळवळ थांबविणारे १९२२ सालातले गांधी, वीस वर्षांनंतर १९४२ त शेवटी तरुण अनुयायांनी केलेल्या सशस्त्र प्रतिकारात्मक चळवळीच्या मोहाला निराशेमुळे बळी पडलेच की नाही ?

मी स्वतः आयर्लंडचा इतिहास पुष्कळ वाचला आहे. यावरून म्हणतो की, या तत्त्वचर्चेत आयर्लंडच्या इतिहासाचे समालोचन हे कोणाहि मार्मिक निरीक्षकाचे समाधान करू शकेल. कारण वर वर्णन केलेल्या सर्व प्रकारची उदाहरणे त्या इतिहासात अगदी तंतोतंत मिळतात ! केवळ इंग्रज व आयरिश गुप्त हेरांचा वध केला की आपण कृतकार्य झालो असे मानणारे आयरिश देशभक्त होऊन गेले. व्यक्तीवध निंद्य पण सामुदायिक बंड हे न्याय्य असे प्रतिपादणारे होऊन गेले. बंड न्याय्य पण व्यवहार्य नाही म्हणून त्याची कल्पना सोडून देणारे, सनदशीर व कायदेशीर पार्लमेंटरी चळवळीनेच होईल ते करू असे म्हणणारे होऊन गेले. बंड अव्यवहार्य असले, तरी करूच करू असे म्हणून आनंदाने प्राण खर्ची घालणारे होऊन गेले. स्वतः कधी शस्त्र हाती न घेणारे पण इतरांच्या शस्त्रकर्मांचे समर्थन करणारे होऊन गेले. पण गांधींच्याप्रमाणे राष्ट्रीय सशस्त्र प्रतिकाराला पाप ठरवूं पाहणारा विपरीत वावदूक तत्त्ववादी आयर्लंडच्या इतिहासात एकहि झाला नाही ! किंबहुना जगाच्या इतिहासातहि झाला नसेल !

परंतु व्यक्तिशः अगर सामुदायिक रीतीने सशस्त्र प्रतिकार करणे केव्हा योग्य किंवा अयोग्य या विषयीच्या अभिप्रायात हटकून मेळ पडतोच असे नाही. म्हणून टिळक, दास, लजपतराय, भाई परमानंद, सावरकर यांच्यासारखे हिंदी पुढारी; ग्लॅड्स्टन, ब्राइट यांच्यासारखे सात्त्विक इंग्रज मुत्सद्दी; कॅव्हूर, मॅझिनी, गॅरिबाल्डी यांसारखे इटालियन राष्ट्रभक्त; टॉलस्टॉय व क्रोपाट्किन यांच्यासारखे रशियन क्रांतिकारक—यांच्या धोरणाविषयी आपण एकच विशेषण लावू लागलो तर ते चूक ठरेल. नुसत्या आयरिश इतिहासातील फीनियन चळवळीच्या पुढाऱ्यांपासून विद्यमान डी व्हॅलेरापर्यंत आयरिश देशभक्त घेतले तर संशोधकाला यासारखे विपुल क्षेत्र कदाचित सगळ्या जगाच्या इतिहासात एकत्र सापडणार नाही.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धातील एक सुप्रसिद्ध इंग्रज चळवळ्या समाजभक्त जॉर्ज जेकब होलियोक याचे चरित्र गेल्या पंधरवड्यात मी वाचले. त्यातहि मला हाच बोध मिळाला. हा गृहस्थ मोठ्यांत मोठा, लहानात लहान, असा होता. मतस्वातंत्र्याची

गौ. म....९

केवळ मूर्ति. धंदा छापखाना व ग्रंथप्रकाशन. ध्येय कनिष्ठ वर्गाची सुधारणा. विशेष परिश्रम धर्म व राजकारण यांची गुंतागुंत सोडविणे. या गृहस्थाने आपल्या तारुण्यात सशस्त्र प्रतिकाराचा नुसता विचारच नव्हे, तर आचारहि केला होता. इंग्लंडात येऊन राहिलेल्या निर्वासित क्रांतिकारांकांशी दाट ऋणानुबंध ठेवला होता स्वतः हाताने बॉम्बगोळे तयार केले होते व उडवून पाहिले होते. त्याचे आत्मचरित्र वाचल्यास आयर्लंडातील गुप्त व प्रकट चळवळीच्या इतिहासाची ती इंग्लिश पुरवणीच असे वाचकांना वाटेल.

१९०५ ते १९०९ सालच्या पुढे परवापर्यंत सावरकरांचे आयुष्य कारागृहात गेले, किंवा कारागृहाबाहेर पण वस्तुतः सरकारी बंदीत बंधनात गेले. यामुळे स्वतंत्रपणे राजकीय अशी कोणतीच चळवळ सावरकरांना करता आली नाही. आणि त्यांची बंधमुक्तता झाल्यावर ते काँग्रेसला किंवा एखाद्या क्रांतिकारक संघाला न मिळता, टिळकांच्या प्रतिसहकारी राष्ट्रीय पक्षाला मिळाले, व हिंदुत्वरक्षणासाठी हिंदुमहासभेचे पुढारीपण त्यांनी हाती घेतले. यावरून सावरकरांना आज तरी कशा प्रकारचा विधायक मतप्रसार करावयाचा आहे हे उघड दिसून येते. मात्र १९०५ ते १९०९ या कालात आपण जे केले त्याबद्दल त्यांना पश्चात्ताप तर वाटत नाहीच; इतकेच काय, पण त्या वेळच्या ज्या कित्येक गोष्टी प्रसिद्ध झाल्या नव्हत्या त्याहि ते आज प्रकट सभांतून उघडपणे सांगतात, व त्या वेळच्या धोरणाबद्दल यथार्थ अभिमानहि बाळगतात. काही काही गोष्टी मनुष्याच्या आयुष्यात एकेकदाच घडून येतात. त्या तो सतत करू शकत नाही व करू इच्छितहि नाही. तथापि एखाद्या नामांकित मनुष्यासंबंधाने ज्याला केवळ गतगोष्टी किंवा निवळ इतिहास याहून अधिक म्हणता येणार नाही अशा हकीकती स्मरणात असतात. म्हणून त्यांचे चरित्र लिहिण्याचा प्रसंग आला असता त्या अवश्य लिहाव्या लागतात. ‘ मी आपल्या हाताने पार्लमेंटवर बॉम्ब फेकण्याला निघालो होतो ’ असे सेनापति बापटांनी पुण्यास एका सभेत सांगितल्याचे पुष्कळांनी ऐकले असेल. आणि त्यांच्या त्या एक वेळच्या धोरणाला राजकीय गुन्ह्याचे जे स्वरूप असेल त्याबद्दल त्यांनी प्रायश्चित्तहि भोगले आहे. पण राजकीय गुन्ह्याचे स्वरूपच असे असते की, शिक्षा भोगल्याने त्याची निष्कृति होते ! त्या अशा अपराधाचा डाग अपराध्याच्या अंगाला कायमचा चिकटवून ठेवू असे स्वतः सरकारलाहि म्हणता येत नाही ! म्हणूनच सावरकरांना बंधमुक्त करणारे मुंबईचे मंत्रिमंडळ ( ना. कूपर-जमनादास मेथा ) व त्या मंत्रिमंडळाने बंधमुक्त केलेले सावरकर, हे गोखले हॉलमध्ये भरलेल्या बंधमुक्ततेनंतरच्या पहिल्याच सभेत मांडीला मांडी लावून बसलेले लोकांना दिसले ! पण अशी अनेक उदाहरणे जगाच्या इतर इतिहासांतील दाखविता येतात. सावरकरांनी पिस्तुले इकडे रवाना केली असतील किंवा पिस्तुल चालविणाऱ्या धिंग्राचे उघड समर्थन केले असेल; पण स्वतः त्यांनी कोणावरहि पिस्तुल चालविलेले नाही.

आज इंग्रज साम्राज्याच्या सैन्यात फील्ड मार्शल व युद्ध-मंडळाचे एक सभासद असणारे जनरल स्मट्स् हे बोअर युद्धात ( १९०० साली सावरकरांचे आधी पाचसात वर्षे ) हातात बंदुक घेऊन इंग्रजांविरुद्ध लढत होते, व त्यांनी बंदुकीने कैक इंग्रज सैनिकांचा प्रत्यक्ष वध केला असेल. आयर्लंडचा इतिहास घेतला तर असे दाखले किती तरी सापडतील. ज्या आयरिश हातांनी पिस्तुल झाडले त्याच हातांशी इंग्रज मुख्य प्रधानाने हस्तांदोलन करून मैत्रीचा तह ठरविला असेहि घडले आहे. ज्याला फाशीची शिक्षा झाली पण अमलात आणायची राहिली असा एक डी व्हॅलेरा आज आयरिश रिपब्लिकचा अध्यक्ष आहे. दुसरा असाच एक सर चार्ल गॅव्हन् डफी हा साम्राज्यांतर्गत ऑस्ट्रेलियन वसाहतीचा मुख्य प्रधान झाला. तात्पर्य, गत व वर्तमान यांमध्ये अवश्य तो भेद करणे हेच शहाणपणाचे लक्षण होय. आणि सावरकर-चरित्रातील एक-दोन पूर्व-प्रकरणांकडे लोकांप्रमाणे सरकारनेहि इतिहास या नात्यानेच पाहिले पाहिजे.

आजचे सावरकर यांचे चरित्र सामान्य वाटले तरी बॅरिस्टरीची परीक्षा उत्तीर्ण होण्यापर्यंतचा काळ ही सावरकरांची विद्यार्थिदशा म्हणता येईल, व या अवधीत त्यांनी ज्या गोष्टी केल्या त्या मात्र असामान्य होत. त्या अशा आहेत—

देशभक्तिभावनेने कवित्व केले. शिक्षकांविरुद्ध स्वाभिमान प्रकट केला. स्वदेशीचा उपदेश केला. बहिष्कारप्रदर्शनार्थ परदेशी कापडाच्या होळ्या केल्या. स्वातंत्र्याच्या ध्येयाचा उघड पुरस्कार केला. कायद्याची भीति मनात बाळगली नाही. बरोबरीच्या विद्यार्थ्यांना आपल्याच दिशेने विचार करावयास लावून त्यांना आपले अनुयायी व सांप्रदायी बनविले. ज्यांची स्वातंत्र्यवादी मते आधीच कळून आली होती अशांची शिष्यवृत्ति मिळविण्याची खटपट केली. विलायतेस गेल्यावर उघडपणे त्यांचाच आश्रय व संगत केली. विलायती लोकांपुढे वक्तृत्वपूर्ण व्याख्याने देऊन स्वातंत्र्यवाद प्रतिपादिला. आपले राहते ठिकाण हे जहाल स्वरूपाच्या उद्योगांचे केंद्र बनविले. युरोपच्या इतिहासातील राज्यक्रांतिकारक चळवळींचा अभ्यास केला व पुरस्कारार्थ लेख लिहिले. मॅझिनीचे चरित्र लिहून अंतिम स्वरूपाचा राष्ट्रस्वातंत्र्यवाद प्रतिपादिला. हिंदुस्थानातील १८५७ सालच्या बंडाचा नवा अर्थ करून सांगितला, व त्यावरील माहिती मिळवून मराठी व इंग्रजी ग्रंथ लिहिले. विलायती छापखानेवाले छापण्यास धजेनात असे लेख व ग्रंथ युरोपातील इतर देशांत छापविले. आक्षित ठरलेले व जप्त झालेले वाङ्मय अनेक युक्तिप्रयुक्तीने विलायतेत व हिंदुस्थानात प्रसृत केले. प्रत्यक्ष खुनी मनुष्यांशी जाहीर रीतीने सहानुभूति प्रकट केली. सहज विकत मिळणारी हत्यारे कधी काळी उपयोगी पडतील; पण आज निदान त्यांचा परिचय असावा, अशा हेतूने पॅरिसमध्ये मिळविलेली पिस्तुले गुप्त रीतीने हिंदुस्थानात आपल्या स्नेह्यासवंगड्यांकरिता पाठविण्यात धाडसी वृत्तीप्रमाणे बुद्धिचातुर्यहि दाखविले. शेवटी

सरकाराचे धरणे आले व खटला झाला तेव्हा किंचित्‌हि भीति दर्शविली नाही, खेद दाखविला नाही, पश्चात्ताप प्रकट केला नाही. अशा संकटांकडे राष्ट्रीय तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने समाधानी वृत्तीने कसे पाहता येते हे तरुणांना शिकविले. तुरुंगवासातील हालअपेष्टा सोसण्याची तयारी दाखविली. जिवावर उदार होऊन कातडी सोलली जाण्याचा धोका पत्करून मार्सेलिस बंदरात जहाजाच्या बारीकशा भोकांतून समुद्रात उडी टाकली; आणि आपल्या संकटातून युरोपच्या राजकारणात आंतरराष्ट्रीय कायदेशीर हक्कांचे वादळ कसे उठविता येईल याविषयी कल्पना चालवून कायदा व राजकारण या विषयांतील प्रौढ बुद्धिमत्ता प्रकट केली. तात्पर्य, वयाच्या विशी-सत्ताविशीत असे देश-भक्तिप्रेरित उद्योग आजवर किती हिंदी तरुणांनी केल्याचे दाखविता येईल ?

प्रस्तुत सावरकर-चरित्र मतप्रसाराचा ग्रंथ नाही, तर केवळ इतिहास आहे हे लक्षांत ठेवले पाहिजे. आणि हा ग्रंथ इतिहासाच्या दृष्टीने वाचणाराच्या मनात, तो बहुश्रुत असेल तर, जगाचा इतिहास त्याच्या डोळ्यांपुढे उभा राहिल्याशिवाय राहणार नाही. तो हेच सांगेल की, ज्या ज्या देशात पूर्वी परकीय अधिकाऱ्याविरुद्ध बंडे झाली, किंवा स्वदेशीच पण एकतंत्री राजसत्ता नाहीशी होऊन राज्यक्रांत्या झाल्या, त्यांतील देशभक्त वृत्तीच्या तरुणांनी सावरकरांसारखेच उद्योग केले. त्यांतले कांही स्वदेशातच राहून करता आले ते केले, व कांही हद्दपार झालेल्या स्थितीत परदेशीहि केले. खुद्द लंडन किंवा न्यूयॉर्क घेतले तर त्या शहरी अशा निर्वासित तरुण देशभक्तांनी, इंग्रज व अमेरिकन सहानुभूतीच्या पंखांखाली राहून, स्वदेशस्वातंत्र्याचे उद्योग कसे केले हे पाहिले म्हणजे, सावरकरांनी जगाचीच एक रीत अनुसरली, पण स्वदेशांतील इतर तरुणांच्या दृष्टीने मात्र असामान्य व अद्‌भुत असेच कांही केले, असे म्हणावे लागते. मित्र-राष्ट्रांनी परस्परांच्या बंडखोरांना आश्रय द्यावा की देऊं नये या प्रश्नाचे उत्तर आंतरराष्ट्रीय कायदा जे देतो, त्याच्याविरुद्ध उत्तर मनुष्यस्वभाव देतो. या स्वभावाला अनुसरूनच लंडन शहराने पूर्वकाळी इतर सर्व देशांच्या बंडखोरांना निवारा व आश्रय दिला. आणि या गोष्टीचा इंग्रज व अमेरिकन लोक मोठा अभिमानहि बाळगतात. लंडनने मॅझिनी, गॅरिबाल्डी, लुइ कोसूथ, ब्लँक अशा परदेशी बंडवाल्यांनाच काय पण पळपुट्या अशा राजांनाहि आश्रय दिला आणि त्या मानसिक औदार्याचे भूषण मानले ! न्यूयॉर्क शहरांत एकाच वेळी निर्वासित देशभक्त गॅरिबाल्डी हा मेणबत्त्या करीत होता. लेड्रू रॉलिन हा बंदरावर हमाली करी. लुई ब्लँक हा नृत्याचे धडे देई. फेलिक्स् पिॲट् हा नाटकाचे पडदे उचलून उदरनिर्वाह करी. ला मार्टिन् हा भिक्षा मागे. एक फ्रेंच तरुण रस्त्यांतून भाजी विकी. आणि एका जर्मन देशभक्ताने शेव्हिंग सलून–न्हाव्याचे दुकान–काढले होते. पण लंडन हे मुंबईप्रमाणे ब्रिटिश साम्राज्यांतच असल्यामुळे, तेथे सावरकर, पंडित शामजी, कामाबाई अशांना थारानिवारा कसा मिळणार ? म्हणून त्यांना तो पॅरिसमध्ये फ्रेंच लोकांकडून मिळवावा

लागला. आणि अशी कल्पना करता येते की, हिंदुस्थानाला परत येणे अशक्य झाल्यामुळे कदाचित् सावरकर हेहि पॅरिसमध्ये राहून क्रांतिकारक उद्योग करीत जन्म घालविते ! कारण, स्वदेशी परत येऊन फांसावर लटकणे किंवा जन्मभर तुरुंगवास पत्करणे यापेक्षा देशकार्यार्थ खुषीची हद्दपारी स्वीकारलेली काय वाईट ? असे तारतम्य पटणे शक्य आहे. मला आठवते की, मी मध्यवर्ति विधिमंडळांत असतां अशा काही निर्वासितांतर्फे होम-मेंबरकडे खासगी विचारणा केली, व म्हणालो की, " या लोकांना जर स्वदेशी परत यावयाचे आहे तर त्यांना पासपोर्ट मिळण्याला सरकारने हरकत कां घ्यावी ? ते इकडे आल्यावर त्यांच्या तशा चळवळींना सहजच मर्यादा व बंधन पडेल." पण होम मेंबर गंभीर स्वराने मला म्हणाले, " केळकर, तुम्ही या भानगडीत न पडाल तर बरे ! कारण तुम्ही ज्यांना पासपोर्ट मिळावे असे इच्छिता त्यांतले काही सरकारचे मोठे गुन्हेगार असून ते हिंदुस्थानांत आले तर त्यांना जन्मभर तुरुंगवास किंवा फाशीची शिक्षा भोगावी लागेल. मग ते आज आहेत तेथेच ठीक आहेत की ! " यावर मी त्यांना प्रथम हद्दपार झालेल्या पण शेवटी परत स्वदेशी येण्यास सापडलेल्या काही युरोपियन तरुण देशभक्तांची उदाहरणे सांगितली. त्यावर ते म्हणाले, " होय, असेहि घडू शकते; पण येथे ती वेळ अजून यावयाची आहे. " आणि स्वतः सावरकरांच्या उदाहरणाने हे आता दिसलेच की ! सर्व जन्म बंदिवासांत जाईल, व कदाचित् तुरुंगातच मृत्यु येईल, अशा निराशाजनक मनस्थिति असताहि सावरकर हे सर्व तऱ्हेचे बंदिवास भोगून निभावून परत आले, मोकळे झाले, व आज उघड व उजळ माथ्याने देशातील एका प्रमुख पक्षाचे पुढारी म्हणून ते विधायक राजकारण करीत आहेत ! आजचे सावरकर डोळ्यांपुढे दिसणाऱ्या एखाद्या अजाण मनुष्याला सावरकरांचे पूर्व-चरित्र सांगितले तर त्याचा कदाचित् विश्वासहि बसणार नाही. परंतु आज सामान्य दिसणाऱ्या सावरकरांनी, असामान्य हा शेरा लिहावा लागण्यासारख्याच गोष्टी पूर्व-चरित्रात केल्या आहेत. आणि म्हणूनच कोणी एखाद्या प्रसंगी विवेकबुद्धीने त्यांना ' देशभक्त ' वा ' स्वातंत्र्यवीर ' हे विशेषण लावले तर ते मात्र सार्थ व समर्थनीय होईल, असे मी निश्चयाने म्हणतो.

सावरकरांच्या एकसष्टाव्या वाढदिवसाचे एकदोन समारंभ पुण्या-मुंबईसारख्या ठिकाणी होतील व ते हजारो लोक पाहतील. तथापि इतर अनेक एकसष्ट्या व सावरकरांची एकसष्टि यात फार मोठा फरक आहे असे मी तरी मानतो. कारण सावरकरांना वयाच्या एकसष्टाव्या वर्षापर्यंत आयुष्य लाभणे ही गोष्ट स्वतः त्यांना व त्यांचे चरित्र माहीत असणाऱ्या इतरांना, केवळ कल्पनातीत होय असे म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही. हे जे आयुष्य त्यांना लाभले ते मृत्यूला चुकवून फसवून बगल देऊन लाभले असे नसून, मृत्यूला सामोरे होऊन, धडक देऊन, झुंज घेऊन, मागे हटवून मिळविलेले आहे. अकस्पित रीतीने मृत्यूचा घाला पडणे हे निराळे आणि

आपल्या जाणत्या कृत्याचा परिणाम म्हणून तो येण्याचा संभव दिसत असता आपण अंगीकारलेले देशसेवेचे व्रत न सोडता, वज्रमुष्टीच्या खेळातल्याप्रमाणे, मृत्यूशी हात करीत राहणे व त्यावर विजय मिळविणे हे निराळे.

१९०५ पासून १९२० पर्यंत सावरकर व मृत्यू हे केव्हाहि समोरासमोर ठाकून उभे नव्हते असे झाले नाही. इंग्लंडात, मार्सेलिसच्या बंदरात, अंदमानाच्या कारागृहात त्या दोघांचा डोळा एकमेकांवर भिडून राहिलेला होता. लो. टिळक हे एरवी तापट असता तुरुंगातील त्यांची वागणूक नेहमी शिस्त व कायदा संभाळणारी, शांतताप्रधान व केवळ स्थितप्रज्ञासारखी होती असे सांगत. यामुळे आकस्मिक रीतीने त्यांना मृत्यु येईल अशी भीति त्यांच्या मित्रांना कधी वाटली नाही. शिवाय १९०८ ते १९१४ या अवधीत तरी टिळकांचे बंदिवासी जीवन अंदमानांतील बंदिवासी जीवनासारखे सश्रम व भयंकर नव्हते. लोक आपल्या ठिकाणी टिळकांच्या तुरुंगवासाची वर्षे मोजीत होते, पण ती गणना निश्चित संपणार व टिळक परत येणार असा एक प्रकारचा विश्वास जनतेला धीरावीत होता. दुर्दैवाने सावरकरांच्या वाट्याला त्याहिपेक्षा खडतर तपश्चर्या आली खरी. आधी विलायतेतल्या उच्छृंखल चळवळीतहि कदाचित् त्यांना मृत्यु यावयाचा. मार्सेलिसच्या बंदरात पोहत असता सावरकरांवर झाडल्या गेलेल्या गोळ्या हे तितके अपमृत्यूच नव्हते काय ? आणि अंदमानातील बंदिवासाची रोमांचकारक व दुःखद कहाणी वाचीत असता तर सावरकर हे दुःसह शरीरकष्टाने, आजाराने, सरकारी पहारेवाल्या पठाणांच्या किंवा गोऱ्या बारीसाहेबाच्या चाबकाच्या आघातांनी कसे मरण पावले नाहीत याचेच आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. येवढेच काय पण मृत्यूने दुर्लक्ष केले असता, स्वतःच आत्महत्या करण्याचे विचार सावरकरांच्या मनांत एकदोनदा येऊन गेले होते असे तेच लिहितात. बरे शिक्षेची मुदत तरी किती ! अनेक अपराधांची संकलित शिक्षा म्हणून पन्नास वर्षांचे काळे पाणी. म्हणजे ती पुरी भोगण्याला सावरकरांना एक जन्महि पुरावयाचा नाही ! बंदिवासातील त्यांची वागणूकहि नमते न घेणारी. पूर्ण स्वाभिमानी ! उत्तरास प्रत्युत्तर देऊन आत्मसमर्थन करण्याला ते तयार. सोबत्या-बंदिवानांची कड घेण्याला व त्याकरिता पहारेवाल्यांशी भांडण्याला ते तयार. संप करण्या-करविण्याला ते तयार, कांटेरी पिंजऱ्यातला पक्षी पिंजऱ्याला धडक देणाऱ्या स्वभावाचा भेटला तर त्याचे अंग नित्य किती रक्तबंबाळ होऊ शकेल याची कल्पना तुम्हाआम्हाला करता येतेच की नाही ! तात्पर्य, या सर्व प्रतिकूल गोष्टी लक्षात घेतल्या तर सावरकरांना साठ वर्षे कशी पुरी करता आली याचे नवल वाटल्याशिवाय राहत नाही....

( करंदीकरकृत सावरकर-चरित्र--प्रस्तावना १९४३ )

• • •

## महात्मा गांधी

✦ ✦ ✦

' महात्मा गांधींच्या आठवणी'संबंधी पुस्तकाकरिता लेख देताना मला एक गोष्ट प्रथमच स्पष्टपणाने सांगितली पाहिजे. ती ही की, मोठ्या माणसांशी आपला आलेला संबंध खुलासेवार सांगताना साहजिकच त्या आठवणी लिहिणारालाहि अनुषंगिक रीतीने महत्त्व येऊन चिकटते. ते महत्त्व मी प्राप्त करून घ्यावे असा या आठवणी लिहिण्यात माझा यत्किंचित देखील उद्देश नाही. मी विभूतिपूजक नाही, त्याचबरोबर आपण या जगात खरोखरच किती लहान आहो याचीहि मला जाणीव नाही असे नाही. एरवी मी या आठवणी कदाचित् लिहिल्याहि नसत्या. पण या ग्रंथाचे संपादक श्री. शुक्ल यांनी वारंवार आग्रह किंबहुना तगादा केल्यामुळेच पुढील आठवणी मी लिहिण्याचे योजले आहे.

महात्मा गांधी या जगद्विख्यात व्यक्तीशी माझा फार जवळचा किंवा घनिष्ठ संबंध होता असे मी म्हणू शकत नाही. त्यांच्या व माझ्या योग्यतेमध्ये बरेच अंतर असले, तरी म. गांधींचे मोठेपण व महानुभावित्व पाहून माझ्या मनाला खराखुरा आनंद व कौतुक वाटते. पण त्याबरोबरच हेहि सांगितले पाहिजे की, महात्मा

गांधींचे अंगी दोष कोणते आहेत याचेहि मला निश्चित व यथार्थ ज्ञान होते. महात्मा गांधी स्वतःच कित्येकदा आपल्या हातून हिमालयाएवढ्या चुका झाल्याची कबुली देत! पण ही बात्र कोणी खरी मानली तरी, त्यातून दुसरी एक गोष्ट आपोआप सिद्ध होते; ती अशी की, हिमालयाएवढ्या चुका करणाऱ्या गांधींचे महानुभावित्व देखील हिमालयाप्रमाणेच मोठे होते!! ते कसेहि असो, राजकारणात परकीय सत्तेच्या मगरमिठीशी झुंज देण्याच्या उद्देशाने बहुजनसमाजाचे सारे बळ त्या सत्तेविरुद्ध यशस्वी-रीतीने केंद्रित करणाऱ्या एकच एक पुरुषाचे जर आज नाव घ्यावयाचे असेल, तर ते निरपवादरीतीने म. गांधींचेच होय यात काडीमात्र शंका नाही. आज दृष्टिपथात आलेले हिंदी स्वातंत्र्य आणि ते आणण्यास कारण झालेली विभूति ही दोघेहि लोकांच्या समोर आहेत हाहि शुभयोगच आहे.

म. गांधींची व माझी पहिली भेट १८९६ सालच्या नोव्हेंबरात मुंबईस मलबारहिलवरील न्यायमूर्ति रानडे यांचे घरी झाली असे स्मरते. लाँग कोट, काळी पाटलोण व बंगाली पद्धतीवर मागे शेपटा असलेली काळी रेशमी टोपी असा त्यांचा वेश होता. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या लढ्यात भाग घेण्यापूर्वी न्या. रानडे यांचा सल्ला घेण्याकरिता तेथे ते आले होते. यानंतरच्या आठदहा वर्षांत त्यांचा व माझा कारणपरत्वे पत्रव्यवहार होत असे. १९१२ साली ना. गोखले यांनी दक्षिण आफ्रिकेतील चळवळीचे मदतीकरिता सार्वजनिक निधि उभारला, त्या वेळी 'मराठा' पत्राचा संपादक या नात्याने, महाराष्ट्रातर्फे पांच हजार रुपये जमवून मी गांधींकडे पाठवून दिले.

यानंतर १९१६ साली लो. टिळकांच्या होमरूल लीगतर्फे बेळगावास राष्ट्रीय पक्षाची परिषद भरली होती. त्या वेळी महात्मा गांधींना मी पाहिले. बरोबर त्यांचा मुलगा बहुधा देवीदास असावा! संध्याकाळी सहा वाजण्याचे सुमारास स्वतःच आपला स्वयंपाक करून दोघे पितापुत्र एकीकडेच जेवीत होते. सर फेरोजशहा मेहेता वगैरे नेमस्त पुढारी एखाद्या परिषदेस प्रतिनिधि म्हणून गेले म्हणजे त्यांची केवढी मिजासखोर वागणूक असे. त्या तुलनेने गांधींची अत्यंत साधी व निगर्वी वागणूक पाहून माझ्या मनावर परिणाम झाला.

दक्षिण आफ्रिकेतून गांधी हिंदुस्थानात १९१५ साली आले. पुढे लखनौला १९१६ साली काँग्रेस भरली. त्यातहि गांधींना विशेष काहीच महत्त्व नव्हते असे दिसून आले. एकदोन वेळा लो. टिळकांचे बोलण्यावरून काँग्रेस-लीग समेटाचे योजनेची चर्चा करण्याला ते आले होते. नेमस्तांचे हाती असलेली काँग्रेस समेटाचे दरवाजाने आत घुसून लो. टिळकांनी काबीज केली होती. आणि ते नुकतेच मंडालचे तुरुंगातून सुटून आल्याकारणाने, या काँग्रेसमध्ये पुढारीपण निर्विवादपणे टिळकांचेकडेच गेलेले होते.

गांधींची सविनय सत्याग्रहाची मते मुंबईच्या ना. समर्थ वगैरे नेमस्त पुढाऱ्यांना मुळीच पसंत नव्हती. आणि त्यांचा हा विरोध किंवा गांधीजीसंबंधाने नावड ही लखनौ कॉंग्रेसमध्ये कोणा तिऱ्हाइतालाहि उघड दिसून येण्यासारखी होती ! पण सांगण्यासारखी गोष्ट यापुढेच आहे. विषयनियामक कमिटीची निवडणूक झाली त्यात मुंबईतील नेमस्तांतर्फे ( गांधी हे गोखल्यांचे अनुयायी असूनहि ) गांधींची निवडणूक होईल अशी आशा नव्हती. तेव्हा स्वतः लो. टिळकांनीच गांधींचे नाव मुंबई-प्रांतातर्फे येणाऱ्या प्रतिनिधींत घालून, गांधींना मते देण्याचा आपल्या अनुयायांना आदेश दिला; म्हणूनच गांधींची निवड विषयनियामक कमिटीत होऊ शकली ! हे न होते तर, गांधींना लखनौ कॉंग्रेसमध्ये कोणतेच स्थान नव्हते. याचा अर्थ असा नव्हे की, त्या निवडणुकीकरिता गांधी हपापलेले होते. प्राप्त परिस्थिति कोणतीहि असो, तीत ते संतुष्ट असत. पण खरी गोष्ट अशी आहे की, फेरोजशहा मेथांच्या अनुयायांच्या कारवायांबद्दल टिळक पक्षीयांना इतका राग आला होता की, नवोदित व प्रगतिपर मतांच्या गांधींशी त्यांनी जाणून बुजून हातमिळवणी करून जुन्या नेमस्त पक्षाचा त्यांनी पाडाव केला !

इतके कशाला ? ‘ सत्याग्रहा ’ चे तत्त्वज्ञानाबद्दल अनेक पुढाऱ्यांची गांधीजी लेखी मते अजमावीत होते त्याबद्दलच गोष्ट सांगतो. मुंबईस सर नारायण चंदावरकर यांचे अध्यक्षतेखाली भरलेल्या एका सभेत, “ सत्याग्रह म्हणजे काय ? ” या विषयावर मी व ना. समर्थ या दोघांनी आपापले निबंध वाचले; त्या वेळी गांधीजी माझे भाषण ऐकण्याला समक्ष हजर होते. श्री. समर्थ यांनी मात्र आपल्या लेखात संपूर्णपणे विरोधी मत दर्शविले होते. कारण त्यांच्या मते ‘ सत्याग्रह ’ करणे हीच मुळी बेकायदेशीर गोष्ट आहे ! माझ्या निबंधात मी असे प्रतिपादन केले होते की, “ राजकारणात ‘ सत्याग्रह ’ हे शस्त्र वापरणे हे पूर्णपणे वाजवी व सनदशीर आहे. मात्र त्या सत्याग्रहाची व्याप्ति मर्यादित व विशिष्ट हेतूपुरतीच असावी. हा हेतु व त्याचे कार्यक्षेत्र ही दोन्हीहि संकुचित असावी. त्याला विशिष्ट कालमर्यादा असावी, तरच तो सत्याग्रह यशस्वी होईल. ज्या कार्याची व्याप्ति अत्यंत व्यापक व दीर्घकालावधीवर पसरलेली असेल, त्याकरिता सत्याग्रह हे शस्त्र उपयोगी पडणार नाही ! ”

या वेळी टिळक पक्षीयांचे गांधींशी जे संबंध होते त्यापेक्षा नेमस्त पक्षीयांशी गांधींचे संबंध अधिक घनिष्ठ होते. अर्थात्, अनपेक्षितरीतीने टिळक पक्षीयांकडून आपणाला पाठिंबा मिळेल अशी स्वतः गांधींचीहि कल्पना नव्हती ! पण तसे अनुभवास येऊन त्यांना आनंद वाटला.

यानंतर, १९१९ सालच्या अमृतसर कॉंग्रेसमध्ये म. गांधी व मोतीलाल नेहरू यांचे विशेष स्नेहसंबंध जुळल्याचे आढळून आले. नेहरू-कुटुंबाशी जडलेला त्यांचा हा

ऋणानुबंध आजतागायत अबाधित आहे. श्रीमंती व ऐषाराम यांत लोळणाऱ्या मोतिलाल नेहरूंना गांधींनीच स्वार्थत्याग व वैराग्य यांची दीक्षा दिली ! आणि जवाहरलाल नेहरू हेच यापुढे आपले राजकीय वारस आहेत, असे अलीकडे महात्माजींनी घोषित केल्याचे सर्वांना महशूरच आहे.

ता. १ ऑगस्ट १९२० च्या दिवशी मध्यरात्री सरदारगृहात लो. टिळकांचे देहावसान झाले तेव्हा महात्मा गांधींनी तेथे रातोरात येऊन टिळकांचे दर्शन घेतले, आणि अत्यंत विनम्रभावाने दिङ्मूढ मनाने त्यांच्या पार्थिव देहापाशी ते बसून होते. जाताना अत्यंत भक्तिभावपूर्वक लो. टिळकांना त्यांनी प्रणिपात केला आणि अगदी मुकाट्याने, पाऊल देखील न वाजविता, ते निघून गेले.

अमृतसर काँग्रेसमध्ये म. गांधी हे टिळकांच्या विरोधी अशा नेमस्त पक्षातच समाविष्ट होते. तथापि, टिळकांच्या मृत्यूनंतर अनेक पुढाऱ्यांवर आपल्या व्यक्तिमत्त्वाने वजन प्रस्थापित करून असहकारितेची एक नवीन चळवळ सुरू करण्याचा गांधींचा मनोदय दिसू लागला. असहकारिता व अहिंसा या दोन्ही गोष्टींबद्दल लो. टिळकांचे मत विरुद्ध असून, राष्ट्रीय पक्षातील आपल्या अनुयायांना त्यांनी ते कळविलेहि होते. तथापि, या वेळी देशभर जागृति झालेली असून चळवळीची काहीतरी नवी दिशा बहुजन लोकांना हवी होती, आणि त्या वादाचे उलटसुलट निनाद वर्तमानपत्रातून उठत होते. अखेर त्या वादाचा बहुमताने निकाल कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेत लागला. गुजराथ व हिंदी प्रांतांनी कसून प्रचार करून गांधीजींना बहुमत मिळवून दिले. आणि तेव्हापासून आजतागायत, आपल्या लहरीस्वभावामुळे धोरण बदलण्याचे, किंवा नमते घेण्याचे कित्येकदा गांधीजींवर प्रसंग आले असले तरी, अखिल भारतीय राष्ट्रीयत्वाची धुरा एकमेव महात्मा गांधींचे हातीच राहिली आहे यात शंका नाही.

१९२० साली माझ्या घरी पाहुणे म्हणून पाहुणचार घेण्याचा गांधीजींना योग आला होता. त्या वेळी हरिभाऊ फाटक यांचेशिवाय पुण्यात घरी उतरण्याला त्यांचे कोणी मित्रच नव्हते ! गांधीजींना प्रिय असणारे शेळीचे दूध हरिभाऊ फाटक यांनी त्यांना मिळवून दिले व याच मुक्कामात त्यांना सिंहगड किल्ला दाखवून आणले.

१९२१–२२ साली काँग्रेसच्या वर्किंग कमिटीचा मी सभासद असल्यामुळे गांधीजींची व माझी गाठ पुष्कळदा पडत असे. गांधीजी अनेकदा उपास करीत. त्यांचे सार्वजनिक उपास म्हणजे देशभर तो काळजीचाच विषय असे. अशा वेळी त्यांचेपुढे जाऊन त्यांचेशी संभाषण करण्याच्या भानगडीत मी पडलों नाही. दूर उभा राहूनच मी आल्याची दखल त्यांना पोचवीत असें. उपोषण करणे हे राजकीय चळवळीत एक साधन म्हणजे हत्यार होऊ शकते ही गोष्ट प्रथम म. गांधींनीच सिद्ध केली. आणि त्यांच्या या उपायाला जगभर प्रसिद्धीहि मिळाली. एक-दोन

वेळा तर मरेपर्यंत प्रायोपवेशन करण्याचा गांधीजींनी आपला निर्धार जाहीर केला होता; पण अखेरीस तो सोडून देण्याविषयी सुदैवाने त्यांच्या मित्रांना त्यांचे मन वळविता आले ! 'मांजर वाघाची मावशी' अशी म्हण आहे; याचे कारण मांजर हे सहसा मरणाला दाद देत नाही. गांधींचेहि अंगी अशीच जिवट आणि चिवट जीवनशक्ति होती. उपवासाप्रमाणे इतर कित्येक लोकविलक्षण गोष्टी त्यांचे दैनंदिन आयुष्यात आल्या आहेत. वस्त्र प्रावरण व पेहेराव ही त्यापैकीच एक. अगदी १८९६ पासून मी त्यांना पाहिले असल्यामुळे त्यांच्या पोषाखात वेळोवेळी पडलेले फरक मला माहीत आहेत. पण अहमदाबाद काँग्रेसच्या वेळी मी जो त्यांचा वेष पाहिला त्याने मी अगदी थक्क झालो ! त्या वेळी इतर सभासदांबरोबर मी उच्चासनावर बसलो होतो. सर्व मांडव हजारो प्रेक्षकांनी गजबजलेला होता. त्या वेळी समोरच्या दरवाजातून प्रवेश करून व्यासपीठापर्यंत गांधीजी चालत आले, तो वीतभर कटिवस्त्राखेरीज त्यांचे अंगावर एक देखील वस्त्र नव्हते ! गुजराथेत डिसेंबर महिन्यात कोण कडाक्याची थंडी असते ! त्यातच गांधीजी उघड्या अंगाने राष्ट्रीय सभेच्या मंडपात येऊन कामकाज चालत असता तेथे तासन् तास तसेच बसले होते ! असा त्यांचा शारीरिक व मानसिक निग्रह असाधारण होता !

१९२२ साली गांधीजींवर जो राजद्रोहाचा खटला झाला तो ऐकण्यास कोर्टात मी समक्षच हजर होतो. त्या अपूर्व व अद्‌भुतरम्य प्रसंगाचे दृश्य माझ्या स्मृतीमध्ये चिरंतन आहे. याकरिता तीच आठवण मी यापुढे देतो. :—

राजद्रोहाचे खटल्यासंबंधी आजवर लोकांची ऐतिहासिक अनुभवावरून जी भव्य किंवा भीतियुक्त कल्पना झालेली असते, तसे निदान बाह्यतः तरी या खटल्यात काहीच दिसत नव्हते. हायकोर्टाची भव्य इमारत, त्यात दिव्यांच्या अंधुक प्रकाशाने येणारी भीषणता, आरोपाच्या गंभीरपणामुळे सामान्य माणसाला वाटणारी उत्सुकता व भीति, सशस्त्र पोलिसांच्या येरझारा असे दृश्य यापूर्वी अनेकदा दिसलेले आहे. राजद्रोहाचा गुन्हा व 'स्टेट-ट्रायल' या दोन्ही शब्दांभोवती काहीसे गंभीर अद्‌भुतरम्य वातावरण आहे. पण आताच्या खटल्यात गंभीरपणाच्या सर्वच गोष्टींची उलटापालट होऊन त्याला फार्साचे स्वरूप आले होते ! न्यायकोर्टाची इमारत म्हणजे भिंतींना चुना फासलेली साधी बराकीवजा खोली होती. त्यात दोनशे माणसे देखील नीटपणे बसू शकली नसती ! व जी बसली होती ती कशीतरी दाटीवाटीने; आत येण्याला तिकीट नसल्यामुळे, खिडकीतून डोकावणारापासून तो जज्जापर्यंत सर्व माणसे एकाच पातळीत सामावली होती. त्यात उच्चनीच्चपणाचा फरक करण्याला पुरेशी जागाच नव्हती ! खुद्द जज्जाच्या खुर्चीला प्रेक्षकांच्या खुर्च्या भिडल्या होत्या व दुरून पाहणारास हा न्यायाधीश, हा खटला चालविणारा बॅरिस्टर व हा आरोपी

असे ओळखताहि आले नसते. आरोपीची खुर्ची न्यायाधीशापासून चार हात देखील दूर नव्हती. जज्ज येऊन दाखल होईपर्यंत महात्माजींचे इतर मित्रमंडळींशी संभाषण सुरू होते.

या संस्मरणीय खटल्यात, खुद्द जज्जसाहेब मि. ब्रूमस्फिल्ड यांची स्थिती अत्यंत केविलवाणी झाली होती; कारण याच्याइतके अप्रिय काम त्यांना यापूर्वी साऱ्या जन्मांत कधीहि दिले गेले नव्हते. न्यायालयाचे कक्षेत आरोपीचे स्थान न्यायाधीशापेक्षाहि वरचढ असू शकते याचा प्रत्यय त्या दिवशी जज्जसाहेबांना आपल्या कारकीर्दीत पहिल्यांदाच आला असेल ! आणि आरोपीचा समाजातील दर्जा लक्षात घेऊन, न्यायाची चाड बाळगण्याची तारेवरची कसरत करण्याची पाळी मि. ब्रूमस्फिल्ड यांचेवर आता येऊन ठेपली होती. म्हणूनच, "हा खटला चालवून तुम्हांला सहा वर्षे कारावास घडविण्यापेक्षा तुमच्या पायापाशी बसून सौजन्यशीलतेचे धडे मी घ्यावे," असे विचार महात्माजींना आरोपीचे पिंजऱ्यात पाहिल्यावर मि. ब्रूमस्फिल्ड यांच्या अंतर्यामी क्षणभर उमटले असल्यास नवल नाही !

स्वतः जज्जसाहेबांप्रमाणेच सरकारी वकिलाची गतहि अशीच शोचिनीय झाली होती. कारण, फिर्यादी पक्षातर्फे पुरावा सादर करण्यासारखे स्वतःच्या बुद्धीला ताण देऊनहि त्यांना असे काही सापडत नव्हते की ज्या योगे म. गांधींवरील सर्व आरोप सिद्ध होऊ शकतील. किंबहुना सादर केलेल्या पुराव्याची ती केवळ थट्टाच झाली असती ! याचे कारण महात्माजींनी सर्व काही शपथेवर आधीच कबूल केले होते ! कायद्याच्या पुस्तकातील कलमांवर बोट ठेवताना सरकारी वकिलास जरा कचरल्यासारखे वाटणे साहजिकच होते; कारण त्यामध्ये सरकारची दांभिकता आणि दर्पोक्ति संपूर्णपणे प्रतीत होत होती. दररोज कोर्टाचे कामात प्रतिवादीची उलट तपासणी घेताना सरकारी वकिलास खूपच करमणूक होत असे. कारण त्यामध्ये त्याला स्वतःच्या बुद्धीची कसरत उत्तम तऱ्हेने करिता येत असे पण यावेळी कोणतीहि फेर-तपासणी अथवा उलट तपासणी करण्याचा योग न आल्यामुळे, स्वतःची भरभक्कम फी आकारण्यास सरकारी वकिलास जरा संकोच वाटल्याखेरीज राहिला नसेल !

आणि या सर्वांपेक्षा खुद्द आरोपीबद्दल काय म्हणावे ? संपूर्ण खादी धारण केलेल्या महात्माजींवरील आरोप सिद्ध करण्याची दुर्मिळ संधि मि. ब्लूमफील्ड यांना मिळालेली होती. महात्माजींना तुरुंगातून कोर्टापर्यंत आणताना त्यांच्या भोवती असलेले पहारेकरी म्हणजे त्यांना संरक्षण देत असलेले शस्त्रधारी मानकरीच वाटत होते. अनेक विपत्तींमुळे कृश झालेले आपले अस्थिपंजर शरीर खादीच्या शालीने झाकीत व हातातील लांब काठीचा आधार घेत महात्माजींनी कोर्टात प्रवेश केला. आणि स्मित-हास्य करून त्यांनी साऱ्या लोकसमुदायाकडे एक दृष्टिक्षेप टाकताच जज्जसाहेबांपासून

ते प्रेक्षकांपर्यंत सर्व लोकांची मने भारावून गेली. महात्माजींच्या चेहऱ्यावरील हावभाव लक्षात घेता, ते स्वतःच्या खटल्याकरता आले आहेत, की आज त्यांचा स्वतःचा लग्नसमारंभ आहे, अशी शंका कोणासहि आली असती, इतकी त्यांची मुद्रा आनंदी दिसत होती. त्यांच्यातर्फे कोणालाहि वकीलपत्र दिले गेले नव्हते. उलटपक्षी ते स्वतःच स्वतःचे वकील म्हणून उभे राहणार होते. आणि याकरिता त्यांना कोणत्याहि साक्षीदाराची अथवा कागदाच्या पुस्तकांची गरज नव्हती. दोन किंवा तीन छापील पाने असलेली जबानी त्यांच्याबद्दल सर्व काही बोलणार होती. त्यातील बहुतेक भाग स्वतःच्या बचावापेक्षा सरकारी अत्याचाराचे प्रदर्शन करण्याकडेच होता.

महात्माजींना त्यांच्यावरील आरोप कबूल होते का ? होय. अर्थातच होते ! त्यांची एकच इच्छा होती की. जज्जसाहेबांनी त्यांना एखादा रोखठोक प्रश्न विचारावा आणि त्याला तितक्याच आवेशाने आपण एखाद्या गोळीबाराप्रमाणे प्रत्युत्तर द्यावे; म्हणजे सरकारी वकिलाला त्यांचे काम किती निरर्थक आहे ते कळून चुकेल; व जज्जसाहेबांनादेखील महात्माजींच्या सौजन्याची व नम्रपणाची किंमत त्यांना सहा वर्षे कारावासाची शिक्षा देऊन करता येईल !

अशा तऱ्हेने महात्माजींनी या खटल्यात आपल्या सुप्त विचारशक्तींचा नाट्यपूर्ण उपयोग करून सरकारी पक्षावर मात केली आणि एखाद्या कसबी इंजिनड्रायव्हरप्रमाणे खटल्यातील पुराव्याची गाडी संघर्षाच्या झंझावाती वावटळीतून समंजसपणाच्या शांत वातावरणात आणून सोडली. सरकारी वकील आणि स्वतः जज्जसाहेब यांची झालेली त्रेधातिरपीट लक्षात घेता या खटल्याचे रूपांतर विचित्र स्वरूपात झाले असते. परंतु केवळ महात्माजींच्या वर्तनानेच त्याचे स्वरूप आमूलाग्र पालटून गेले. आपल्या स्वतःच्या मनातील कोणत्याहि आग्रही भावनेला बळी न पडण्याचे ठरवून सुद्धा जज्जसाहेबांना या खटल्याच्या वेळी टिळकांच्यावर भरलेल्या राजद्रोहाच्या खटल्याची आठवण झाल्याखेरीज राहिली नाही. आणि तशी आठवण त्यांनी करूनहि दिली. गांधीजींना अर्थातच सविनय या गोष्टीस अनुमति देणे प्राप्त होते. किंबहुना टिळकांची आठवण जज्जसाहेबांनी या वेळी करून दिल्यामुळे गांधीजींना स्वतःचा बहुमानच झाल्यासारखे वाटले असेल. लोकमान्य टिळकांप्रमाणेच गांधीजींना सहा वर्षे शिक्षा सांगताना जज्जसाहेबांना जणू काही भूतकालातील सारा इतिहास आपल्या समोर मूर्तिमंत घडत आहे असा भास झाला असेल. आणि टिळक-गांधीजींसारख्या पुढाऱ्यांना सहा वर्षे कारावासाची शिक्षा देताना सरकारला हिंदुस्थानच्या दुःखविमोचनाचा तोच एक तरणोपाय दिसत असेल; तथापि एका दृष्टीने टिळकांसारख्या इतर अनेक पुढाऱ्यांचा कारावास म्हणजे देशाच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने तो एक सर्वोत्तम मार्ग होता.

आपला निकाल जज्जसाहेबांनी जाहीर केल्यानंतर कोर्टाच्या आवाराचे स्वरूप एकदम पालटून गेले आणि दोनतीन वर्षांपूर्वी एका सभेच्या शेवटी महात्माजींना मी जसे अनेक पुरुष, स्त्रिया व मुलांनी वेढलेले पाहिले होते, तसेच आजहि पाहिले. अधूनमधून होणाऱ्या गप्पा, विनोद आणि हास्याची देवाणघेवाण यामुळे साऱ्या कोर्टास एखाद्या अनौपचारिक घरगुती सम्मेलनाचे स्वरूप आल्यासारखे वाटत होते. आपल्याभोवती जमलेल्या मंडळींची कदाचित् ही शेवटचीच गाठभेट आहे असे वाटून गांधीजी प्रत्येकाला वेगवेगळया बाबतीत सल्ला देऊन निरवानिरव करीत होते. स्त्रियांना त्यांचे आशीर्वाद घेताना जणू आपल्या घरातीलच एखाद्या वृद्ध, आदरणीय पुरुषाचे आशीर्वाद घेत आहोत असे वाटत होते. कॉंग्रेसच्या स्वयंसेवक कार्यकर्त्यांना त्यांच्या कार्याची जाणीव महात्माजी करून देत होते, त्या वेळी त्यांचेशी हस्तांदोलन करताना त्यांच्या हातातून एक दिव्य शक्ती आपल्या अंगात संचरत आहे असा त्या स्वयंसेवकांना भास झाला असेल.

अशा तऱ्हेने एका अर्ध्या तासातच हा निरोपाचा कार्यक्रम संपला. आणि कोर्टाचे दालन हळूहळू रिकामे होऊ लागले. सरकारी पोलीस पहाऱ्यामध्ये महात्माजींना पोलीस व्हॅनमधून आमच्या समक्ष नेण्यात आले. परंतु ते स्वतः गेल्यानंतरमुद्धा कोर्टाचे सर्व दृश्य परत एकदा आमच्या डोळयासमोरून जसेच्या तसे सरकून गेले. याचे कारण सहा वर्षे कारावासाची शिक्षा देऊन सुद्धा महात्माजींच्या सेवामय आणि स्वार्थत्यागी जीवनाच्या मानबिंदूला ब्रिटिश सरकार किंचितहि धक्का देऊ शकले नव्हते.

या खटल्याच्या आधी चार–पाच वर्षे महात्माजींनी स्थापन केलेल्या सत्याग्रहाश्रमाचे प्रसिद्धिपत्रक मी जेव्हा वाचले तेव्हा त्यातील काही शब्दांनी माझे लक्ष वेधून घेतले होते. व ते म्हणजे आश्रमवासीयांनी घ्यावयाची "**निर्भयपणाची** शपथ." मला वाटते ना. गोपाळ कृष्ण गोखल्यांच्या पट्टशिष्याने स्थापन केलेल्या या आश्रमात इतर काटेकोरपणे पालन करण्याच्या यमनियमांपेक्षा, राजकीय पार्श्वभूमीवरील हे निर्भयपणाचे व्रतच अधिक वैशिष्ट्यपूर्ण होते. कोर्टाच्या आवारातून मी जेव्हा बाहेर पडलो तेव्हा मनात म्हटले की, निर्भयपणाच्या या गांधी-तत्त्वाची इतकी तंतोतंत परिपूर्ति यापूर्वी क्वचितच झाली असेल. पण महात्माजींच्या कोर्टातील त्या दिवशीच्या वर्तणुकीने मात्र हे निर्भयपणाचे तत्व ठामपणे सिद्ध केले. इतिहासात जमा झालेला भूतकाल तर त्याची नोंद करीलच, पण भविष्यकाळातहि महात्माजींच्या या निर्भय वर्तणुकीची आठवण चिरकाल राहील !

( अनुवाद—ता. १५ जून १९४६ )

• • •

**समाप्त**

## परिशिष्ट

### कै. सौ. कस्तुरबा गांधी

मृत्यू : २२ फेब्रुवारी १९४४

मरण हे कोणालाहि चुकविता येत नाही. पण मरण येण्याला हवी ती वेळ साधता येणे हे काम परमदुर्घट आहे, आणि तशी वेळ साधता येणे हा मानवी स्त्रीने मृत्यूवर मिळविलेला एक विजयच होय. सौ. कस्तुरबा यांच्या मृत्यूमुळे हळहळ वाटणे स्वाभाविक आहे. पण त्या इच्छामरणी ठरल्या, याकरिता व्यक्तिशः त्यांचे अभिनंदन करावे असेच आज कुणालाहि वाटेल. त्यांना इच्छामरणी मी अशाकरिता म्हणतो की, एक तर पतीच्या आधी आपणाला मृत्यु यावा ही जी त्यांची इच्छा ती शेवटी त्यांना सफळ करता आलीच; पण आपल्या मरणाला महाशिवरात्रीसारखा दिवसहि त्यांना साधता आला. आणि अशा दुहेरी रीतीने त्यांनी आपले इच्छामरणत्व प्रगट केले असे मी म्हणतो. आपल्या पतीच्या आधी आपल्याला मृत्यु यावा ही इच्छा कस्तूरबांनी अनेक वेळा आसन्नमरण होऊन प्रगट केली होती. पण मृत्यूला जणु कांही त्यांच्या पतिव्रता-धर्माची कसोटी पाहावयाची होती; म्हणून त्याने कस्तुरबांवर अनेक वेळा जीवदान हे जुलमाने लादले. पण त्यांनी शेवटी अहेवपणाचा आपला दैवी सत्याग्रह शेवटाला नेला. गांधीजींनी स्वतः कस्तुरबांचा उल्लेख कुठे कुठे केला आहे. पण विनयामुळे त्यांना आपल्या पत्नीचे जे गुणवर्णन आपल्या मुखाने करता आले नाही, ते अखिल जनतेने आपल्या मनाने केले होते. एका अर्थाने गांधीजींचे चरित्र हेच त्यांच्या पत्नीचे चरित्र असे म्हणता येईल. पण कांही विशेष बाबतीत कस्तुरबांचे चरित्र गांधीजींच्या चरित्रापेक्षा अधिक उज्ज्वल ठरले असे मी म्हणेन. ईश्वराने हिंदु स्त्रियांना जर विचारले की, तुम्हांला कोणते वरदान देऊ ? म्हणजे तुम्हां स्वतःला महात्मता, यश, व कीर्ति देऊ ? किंवा ती तुमच्या पतींना देऊ ? तर त्या खऱ्या मनोभावाने ईश्वराला असे सांगतील की, आमच्या पतींना महात्मता लाभणे हेच आम्ही पसंत करतो. आणि त्यांच्या सहधर्मचारिणी म्हणून त्या दैवी संपत्तीत आमचा हक्काचा अर्धा वाटा असला, तरी तो आम्ही आपणाकडे न घेता त्याची भर पतीच्या वाट्यातच घालू. मोठ्या कीर्तिमान् पतीची स्त्री होणें हे काम वाटते तितके सोपे नाही. कारण पतीच्या कारणाने अनायासाने मिळणारा मोठेपणा हा सोपा वाटला, तरी ते त्याचे मोठेपण आपणाकडून अबाधित राखणे ही गोष्ट अवघड असते. कस्तुरबांनी सर्व जन्म आदर्श पत्नी म्हणून घालवून शेवटी आपल्या इष्ट सौभाग्याचा कुंकुमतिलक सर्व जगाला दिसेल अशा ढळढळीतपणे मागे ठेविला आहे.

दि. २३ । २ । २४ —न. चिं. केळकर

# THE YOGI AND THE COMMISSARS

............ In 1969 India celebrates the centenary of gandhiji's birth, and it remains to be seen how far events reflect the spirit of the apostle of peace and non-violence. Were the Mahatma to return to earth today he would weep over much that is happening in India.

Gandhi was often wrong on details but he had an uncanny prescience, almost clairvoyant, when peering into the future. As far back as 1931 when Nehru suggested that the Congress should dissolve itself as a Party when independece came, Gandhi demurred. He believed that the Congress should continue as a party but that none of its members should accept a paid-job under the State. In other words he saw the Congress as a party which would not take office or be actively associated with the administration of the country but would content itself with exercising moral pressure on whatever Government happened to be in power.

Sixteen years later when independence came he reiterated this advice and warning. He wanted the Congress to convert itself into a Lok-Sevak-Sangh or Social Service body and to cease functioning as a political organisation. In a conversation with the then President of the Congress, Acharya Kripalani, Gandhi warned him and his colleagures against being drawn into politics. " Today ", he told them, " Politics has become corrupt. Anybody who goes into it is contaminated. Let us keep out of it altogether. Our influence will grow thereby. The greater our inner purity, the greater will be our hold on the people, without any effort on our part. "

It was too late. The Yogi was preaching to the Commissars, who were to come after him. ............

*BY FRANK MORAES.*

( EXTRACT-SUNDAY STANDARD- 26-1-69 )

৯৬
৭
৭১৫

